म. ग्रं. सं. ठाणे

विषय

लेखक

ग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव कला

सं. कृ.

# वक्तृत्व कला

ले. भि. पारनाईक

~ १८९९ ~

मराठी ग्रंथ संग्रहालय

# प्रस्तावना.

इतर प्राण्यांपेक्षां मानवी प्राणी ज्या गुणांनीं श्रेष्ठ गणला जात आहे त्यांपैकीं वाचा हा एक गुण आहे. तेव्हां, बोलतां येणें हा मनुष्यमात्राचा स्वाभाविक गुण झाला; परंतु ज्या बोलण्यापासून आपलें वजन दुसऱ्यांवर पडून त्यांचें चित्त आपल्याकडे आकर्षण केलें जाईल, व आपल्या मनोगताचा ठसा त्यांचे अंतःकरणावर उत्तम रीतीनें उमटेल, त्याच भाषणाच्या असाधारण प्रकारास 'वक्तृत्व' अशी संज्ञा आहे.

या आर्यभूमीच्या फार प्राचीनकाळच्या इतिहासांत ...र्ड उ वक्तृत्वाचा मासला सुदैवानें आपणास वाचाव...ास सांपडत आहे. रावणाच्या सभेंत जाऊन अंगदानें जी ...ढाई केली, तिचें चटकदार वर्णन रामायणांत आहे. ... खुद्द श्रीकृष्णानें दुर्योधनसभेंत जाऊन पांडवांच्या ... जो उपदेश त्या गर्विष्ठ राजास केला, तो महाभार... वर्णिलेलाच आहे. मधल्या काळांत (middle ages) ...क्तृत्वगुणाचा प्रादुर्भाव भिन्न भिन्न रूपानें होऊं लाग... ...्यासपीठावर बसून पुराणिकबुवा नवरसांनीं ओतप्रोत

भरलेलें पुराण सांगूं लागले व तें ऐकून श्रोत्यांचीं अंतःकरणें तल्लीन होऊं लागलीं. त्याचप्रमाणें हरदासांचा वर्ग उत्पन्न होऊन, कीर्तनद्वारें ते आपल्या वाक्चातुर्यानें समाजास धर्म व नीतीचें शिक्षण देऊं लागले. कविकुलगुरू कालि-दासाचे वेळेपासून नाट्यकलेला जोर येऊन त्या रूपानें ही वक्तृत्व चमकूं लागलें. एकंदरींत प्राचीनकाळीं गीर्वाण भाषेंत जो प्रचंड ग्रंथसंचय झाला, व मधल्या काळांत मोरोपंतादि कवींनीं जो प्राकृतांत संग्रह केला, त्या ग्रंथांच्ये परिशीलनानें निरनिराळ्या मंडळीमध्यें स्फूर्ति उत्पन्न हो ऊन, तिचा वाक्प्रवाह श्रोत्यांचीं कर्णरंध्रें पुनीत करण्यास कारणीभूत झाला.

याप्रमाणें कांहीं ठिकाणीं जरी वक्तृत्व झळकत हो तरी त्याची स्थिति अशोधित धातूप्रमाणें होती. सुवर्णम मृत्तिकेपासून बावनकसी सोनें काढण्यास जशी खटप करावी लागते, तशा प्रकारची खटपट, साहित्य व व्याक रण शास्त्राप्रमाणें शुद्ध वक्तृत्वासही शास्त्रीय पद्धतीनें नियम बद्ध करण्यामध्यें आपल्या पूर्वजांची झाली नाहीं, हें देशा दुर्दैवच समजलें पाहिजे. परंतु यासंबंधानें भारतीयांस फार दोष देतां येत नाहीं, कारण त्या वेळची परिस्थितीच त प्रकारची होती. राजाविषयीं ' ना विष्णुः पृथिवीपति अशी प्रजेची दृढतर समजूत प्राचीनकाळापासून चा आल्यामुळें, आणि ' स पिता पितरस्तासां केवलं जन तवः ' या कालिदासोक्तीप्रमाणें बहुशः राजेलोकांचें असल्या कारणानें, राजा व प्रजा यांच्यांत हक्काच्या संबं वादच उत्पन्न होत नसे; व त्यामुळें राजशक्तीचा

प्रतिकार करण्याला समाजशक्ति असली पाहिजे या कल्पनेचा गंधही त्या वेळीं नव्हता.

समाजशक्ति उत्पन्न होण्यास वक्तृत्वशक्ति किती आवश्यक आहे, हें प्राचीन ग्रीक व रोमन राष्ट्रांस कळून चुकलें होतें, आणि ह्मणूनच त्या ठिकाणीं या कलेचा उद्भव झाला. तेथें ती इतक्या कळसास जाऊन पोहोंचली होती कीं, त्या देशांतील सुप्रसिद्ध वक्ते डिमॉस्थनीस व सिसेरो यांच्या तोडीचे अद्याप कोणी निपजले नाहींत; फार तर काय, पण हल्लीं उपलब्ध असणारीं त्यांचीं व्याख्यानें नुसतीं वाचून जो मनावर ठसा उमटतो व मनोविकारांचें उद्दीपन होतें, तसा प्रकार सांप्रतच्या जाड्या वक्त्याच्या व्याख्यानश्रवणापासून होत नाहीं! याला एक कारण सांगण्यांत येत आहे—व विचारांतीं तें खरें ठरतें—कीं त्या काळीं 'विकाराचें' प्राबल्य होतें, हल्लीं 'विचाराचें' आहे, ह्मणून या दोहोंची सांगड वक्तृत्वांत घालणें कठिण होऊन पूर्वीचें रूप त्याला आणतां येत नाहीं.

आधुनिक पाश्चात्य राष्ट्रांनीं तरी याच ग्रीक व रोमन विद्येच्या पायावर आपआपल्या इमारती बांधल्या आहेत; व त्यांच्याद्वारें आह्मा भारतीयांस या अप्रतिम कलेचें दिग्दर्शन झालें आहे. हिंदुस्थानचा पहिला व्हाइसरॉय वॉरन हेस्टिंग्स यानें आपल्या कारकीर्दींत जीं अनन्वित जुलमी कृत्यें केलीं होतीं, त्याबद्दल विलायतेस पार्लमेंटमध्यें चौकशी चालली असतां, एके दिवशीं बर्कनें दोषाविष्करणार्थ जें जोरदार व हृदयद्रावक भाषण केलें, तें ऐकून प्रत्यक्ष आरोपी हेस्टिंग्सचें अंतःकरण कळवळून गेलें, छाती भरून

भरलेलें पुराण सांगूं लागले व तें ऐकून श्रोत्यांचीं अंतःकरणें तल्लीन होऊं लागलीं. त्याचप्रमाणें हरदासांचा वर्ग उत्पन्न होऊन, कीर्तनद्वारें ते आपल्या वाक्चातुर्यानें समाजास धर्म व नीतीचें शिक्षण देऊं लागले. कविकुलगुरू कालिदासाचे वेळेपासून नाट्यकलेला जोर येऊन त्या रूपानें ही वक्तृत्व चमकूं लागलें. एकंदरींत प्राचीनकाळीं गीर्वाण भाषेंत जो प्रचंड ग्रंथसंचय झाला, व मधल्या काळा मोरोपंतादि कवींनीं जो प्राकृतांत संग्रह केला, त्या ग्रंथांच्य परिशीलनानें निरनिराळ्या मंडळीमध्यें स्फूर्ति उत्पन्न हो ऊन, तिचा वाक्प्रवाह श्रोत्यांचीं कर्णरंध्रें पुनीत करण्या कारणीभूत झाला.

यापमाणें कांहीं ठिकाणीं जरी वक्तृत्व झळकत हो तरी त्याची स्थिति अशोधित धातूप्रमाणें होती. सुवर्णम मृत्तिकेपासून बावनकसी सोनें काढण्यास जशी खटप करावी लागते, तशा प्रकारची खटपट, साहित्य व व्याक रण शास्त्राप्रमाणें शुद्ध वक्तृत्वासही शास्त्रीय पद्धतीनें निय बद्ध करण्यामध्यें आपल्या पूर्वजांची झाली नाहीं, हें देशा दुर्दैवच समजलें पाहिजे. परंतु यासंबंधानें भारतीयांस फार दोष देतां येत नाहीं, कारण त्या वेळची परिस्थितीच त प्रकारची होती. राजाविषयीं 'ना विष्णुः पृथिवीपति' अशी प्रजेची दृढतर समजूत प्राचीनकाळापासून च आल्यामुळें, आणि 'स पिता पितरस्तासां केवलं ज तवः' या कालिदासोक्तीप्रमाणें बहुशः राजेलोकांचें असल्या कारणानें, राजा व प्रजा यांच्यांत हक्काच्या संब वादच उत्पन्न होत नसे; व त्यामुळें राजशक्तीचा

आली, व 'माझ्यासारखा दुष्ट व नीच कर्म करण साऱ्या दुनयेंत कोणी नसेल' असे उद्गार त्यानें काढि मग त्या प्रचंड वक्त्याच्या भाषणानें इतर श्रोतेमंडळींच मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना देखी करणें कठिण आहे !

सांप्रतकाळीं आपली राजभाषा इंग्रजी असल्यामुळे तिचा अभ्यास झपाट्यानें सुरू आहे, व आंग्लविद्यापारंगत विद्वानांमध्यें बंगाल्यांतील सन्मान्य गृहस्थ ना. सुरेंद्रनाथ बानर्जी, व मुंबई इलाख्यांतील ना. फेरोजशहा मेथा हे आमचे आधुनिक डिमॉस्थनीस व सिसेरो, इंग्लंड व हिंदुस्थानांतील संभाषणपीठें ( Plat-form ) आपल्या अलौकिक वक्तृत्वानें दणाणून सोडीत आहेत, हें पाहून किंवा ऐकून कोणा आर्यपुत्रास सानंद अभिमान वाटणार नाहीं ?

परंतु इंग्रजी भाषेचा व्यासंग जास्त होऊं लागल्यामुळे एक अनिष्ट परिणाम घडून आला; तो असा कीं, देशी भाषेवरून लोकांचें लक्ष उडत चाललें, साधारण बोलण्याचालण्याच्या व्यवहारांत देखील लोक धेडगुजरी भाषा वापरूं लागले. जन्मभाषेची अशी अवहेलना होत चाललेली पाहून कांहीं दूरदर्शी विद्वानांचें लक्ष तिच्या उन्नती लागलें; व तत्संबंधानें त्यांचे श्रम अव्याहत चालू अ ही अभिनंदनीय गोष्ट होय.

प्रो. लॉरीचें असें ह्मणणें आहे कीं, 'मनास जिर अंशानें ( तद्देशीय भाषाद्वारें ) शाब्दिक बोध प्राप्त हो तितक्याच अंशानें त्याचा विकास होत जातो. परक भाषाद्वारें हें प्राप्त होऊं शकत नाहीं. आईच्या मांडी

प्रति…तांना व खेळतांना जी भाषा आपण शिकतों, तिच्यां-नेच आपली सर्व भावी वृत्ति–भावना व विचारमय जीवन …विलें जातें. * * * * ज्या ज्या इतर भाषा आपण श…कूं त्या सर्व आपल्या स्वभाषेच्या संबंधानें गौणच असतील.'

… या नियमास अनुसरून महाराष्ट्र वाङ्मयाच्या अभि-…द्ध्यर्थ, जे अनेक दिशांनीं प्रयत्न चालले आहेत ते पाहून आपणही यथाशक्ति हातभार लावून तिची अल्प सेवा करावी या हेतूनें बीटनकृत 'आर्ट ऑफ पब्लिक स्पीकिंग'चें मी हें भाषांतर केलें आहे.

आजपर्यंत वक्तृत्व विषयावर एक दोन पुस्तकें मराठींत झालीं आहेत, परंतु त्यांत या कलेसंबंधानें सविस्तर माहिती नसल्यामुळें महाराष्ट्र वाचकांस त्यांपासून व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. मुंबई इलाख्यांत वक्तृत्वोत्तेजक सभा कांहीं प्रसिद्ध ठिकाणीं स्थापन झाल्यास बरींच वर्षें होत आलीं, परंतु ज्या हेतूनें त्यांचा पाया रचिला गेला तो अद्यापि साध्य होत नाहीं; व नावाजण्यासारखा एकही मराठी वक्ता तयार झाला नाहीं. नलपाक तयार करून उत्तम …न घालणारास अमुक बक्षीस मिळेल असें आपण …ों मात्र; पण जर त्या पाकनिष्पत्ति करणारास सूप-… अवगत करून दिलें नाहीं, तर आपली ती इच्छा …ी तृप्त होणार ?

…युरोप व अमेरिकेंत वक्तृत्वाच्या शाळा आहेत, हिंदु-…नांत तशी एकही नाहीं. तेव्हां तशी परिस्थिति येई-

पर्यंत निदान साहित्य तरी जमा करून ठेवण्याचे उद्योगास लागलें पाहिजे, असें जाणून मी जो हा अल्पारंभ केला आहे, तो लोकादरास पात्र होवो, अशी जगन्नियंत्यास प्रार्थना आहे.

मुक्काम औरंगाबाद,
ता. ९ जून १८९९ इ.

ल. त्रिं. पा.



र-१-१४-२३९

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| भाग १–उपोद्घात .... .... .... .... | १ |
| भाग २–स्वाभाविक गुण— | |
| १ तीव्र सहृदयता .... .... .... | ११ |
| २ कुशाग्र बुद्धि .... .... .... | १४ |
| ३ तारतम्य ज्ञान .... .... .... | १५ |
| ४ उल्हास किंवा खरी कळकळ .... | १५ |
| ५ तीव्र कल्पनाशक्ति .... .... | १७ |
| ६ तामसी वृत्ति .... .... .... | १८ |
| ७ दृढनिश्चय आणि मनाची स्थिरता .... | १९ |
| ८ अंतःकरणाची प्रसन्नता .... .... | २० |
| ९ उपजत किंवा ईश्वरदत्त वक्तृत्वगुण | २३ |
| १० सद्गुण किंवा भलेपणा .... .... | २५ |
| भाग ३–अभ्यास— | |
| १ ज्ञानप्राप्ति .... .... .... .... | २९ |
| २ उद्योग .... .... .... .... | ३३ |
| ३ जगाचें ज्ञान .... .... .... | ३७ |
| ४ न्यायशास्त्र किंवा तर्कशास्त्र .... | ३९ |
| ५ मनन .... .... .... .... | ४३ |
| ६ लेखी विषय .... .... .... | ४४ |
| ७ भाषाविनेतृत्व किंवा भाषेवर पगडा .... | ४६ |
| ८ वक्तृत्वसिद्धीस येणारीं विघ्नें .... .... | ५० |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| ९ शब्दोच्चार न करतां मनांतल्या मनांत बोलणें | ५२ |
| १० व्याख्यान शैली .... .... .... | ५३ |
| ११ स्मरणशक्ति वाढविणें .... .... | ५३ |
| १२ स्मरणांत ठेवणें .... .... .... | ५४ |
| १३ व्याख्यान देण्याची कला .... .... | ५६ |

**भाग ४-वक्तृत्वाचे प्रसंग आणि त्याचीं स्थलें—**

| | |
|---|---|
| १ वक्तृत्व .... .... .... .... | ५७ |
| २ पुलपिट (व्यासपिठ) .... .... | ५८ |
| ३ वकिली .... .... .... .... | ६३ |
| ४ प्लॅटफार्म .... .... .... .... | ६९ |
| ५ बहुमानार्थ भाषणें .... .... .... | ७० |

**भाग ५-व्याख्यानाची शैली, आणि त्याची जुळणी—**

| | |
|---|---|
| १ हेत्वैक्य .... .... .... .... | ७१ |
| २ सरणी किंवा जुळणी... .... .... | ७२ |
| ३ सुबोधता .... .... .... .... | ७९ |
| ४ सरसता .... .... .... .... | ८१ |
| ५ शब्दांची निवड .... .... .... | ८१ |
| ६ मूलार्थी योग्य शब्द .... .... | ८२ |
| ७ मूलार्थाहून भिन्नार्थबोधक शब्द .... | ८३ |
| ८ विशेषणें .... .... .... .... | ८६ |
| ९ परभाषेंतील आणि अप्रचारांतले शब्द | ८८ |
| १० शब्दसंख्या .... .... .... | ८९ |
| ११ शब्दरचना.... .... .... .... | ९४ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| १२ भाषासौंदर्य .... .... .... .... | ९४ |
| १३ अलंकार .... .... .... .... | ९५ |
| १४ गमतीचें भाषण किंवा विनोद .... | ९९ |
| १५ कालमर्यादा .... .... .... | १०२ |
| **भाग ६–व्याख्यान विभाग—** | |
| १ प्रस्तावना .... .... .... .... | १०६ |
| २ विषयाची प्रतिज्ञा .... .... .... | ११२ |
| ३ परिच्छेद .... .... .... .... | ११२ |
| ,, नियम १ .... .... .... | ११६ |
| ,, नियम २ .... .... .... | ११६ |
| ,, नियम ३ .... .... .... | ११६ |
| ,, नियम ४ .... .... .... | ११७ |
| ,, नियम ५ .... .... .... | ११७ |
| ४ कथानक .... .... .... .... | ११७ |
| ५ वकिली .... .... .... .... | ११८ |
| ६ उपदेशपीठ .... .... .... | ११९ |
| ७ कोटीक्रम .... .... .... .... | १२१ |
| ८ प्रमाण योजना .... .... .... | १२१ |
| ९ प्रमाणांची व्यवस्था लावणें .... .... | १२३ |
| प्रमाण दुसरें. .... .... .... | १२८ |
| प्रमाण तिसरें. .... .... .... | १२९ |
| प्रमाण चवथें. .... .... .... | १३० |
| १० व्याख्यानाचा रमणीय किंवा चित्तवेधक भाग .... | १३२ |

विषय. पृष्ठ.

११ नियम .... .... .... ....१३५
१२ उपसंहार .... .... ... ....१४८
१३ व्याख्यानाचा मुख्य हेतु .... ....१५१
भाग ७-व्याख्यान देण्याच्या निरनिराळ्या रीती—
१ हस्तलेख वाचणें .... .... ....१५२
२ आठवून बोलणें .... .... ....१५५
३ समयस्फूर्तीचें व्याख्यान .... ....१५७
४ चवथी रीत .... .... ....१५८
५ श्रोते .... .... .... ....१६४
६ श्रोत्यांचा वक्त्यावर परिणाम ....१६९
भाग ८-व्याख्यान देण्याची शैली
१ आवाज .... .... .... ....१७७
२ प्रेमोत्पादक स्वर .... .... ....१७८
३ वाग्यंत्र .... .... .... ....१८१
४ फुफ्फुस .... .... .... ....१८२
५ श्वास मार्ग .... .... .... ....१८२
६ नरडें .... .... .... ....१८२
७ पोकळी .... .... .... ....१८३
८ आवाज कायम राखणें .... ....१८४
९ सूर .... .... .... ....१८८
१० अडखळत व तोत्रें बोलणें .... ....१८९
११ आवाज चिरकणें .... .... ....१९०
१२ घसा चेपणें .... .... ....१९१

| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १३ | श्वासोच्छ्वास .... .... | ....१९२ |
| १४ | कसरत किंवा तालीम .... | ....१९३ |
| १५ | तिसऱ्या प्रकारची कसरत .... | ....१९३ |
| १६ | वर्णोच्चार .... .... | ....१९३ |
| १७ | तोंडांतून स्पष्ट शब्द काढणें.... | ....१९४ |
| १८ | स्वर भेद .... .... .... | ....१९६ |
| १९ | शब्दावरील जोर .... .... | ....१९६ |
| २० | उद्गार .... .... .... | ....१९८ |
| २१ | सूर .... .... .... | ....२०० |
| २२ | जोर .... .... .... | ....२०२ |
| २३ | ठेपे .... .... .... | ....२०४ |
| २४ | बोलण्याचा वेग .... .... | ....२०६ |
| २५ | ठोकळ तत्वें .... .... | ....२१४ |
| २६ | चेहरा किंवा चर्या .... .... | ....२१६ |
| २७ | नेत्र .... .... .... | ....२१७ |
| २८ | मान .... .... .... | ....२१७ |
| २९ | हात .... .... .... | ....२१८ |
| ३० | पाय .... .... .... | ....२१९ |
| ३१ | अभिनयाचे भाग .... .... | ....२१९ |
| ३२ | तिसरा प्रकार .... .... | ....२२१ |
| ३३ | चौथा प्रकार .... .... | ....२२१ |
| ३४ | हॅमलेट नाटककारांचा उपदेश. | ....२२२ |
| ३५ | पोशाख .... .... .... | ....२२४ |
| ३६ | व्याख्यानाचा उद्देश .... | ....२२४ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| **भाग ९–वक्तृत्वाची तालीम ( अथवा ) वाद-विवाद करणाऱ्या सभा—** | |
| १ साहित्य शास्त्रावरील ग्रंथांचें अध्ययन | २२९ |
| २ चांगल्या वक्त्यांचीं भाषणें ऐकणें .... | २३० |
| ३ समाजापुढें वाचणें .... .... .... | २३२ |
| ४ सिद्धांत .... .... .... .... | २३३ |
| **भाग १०–प्राचीन अर्वाचीन वक्तृत्व—** | |
| १ परिशिष्ट अ. .... .... .... | २५६ |
| २ परिशिष्ट ब. .... .... .... | २५९ |
| ३ परिशिष्ट क. .... .... .... | २६१ |

# वक्तृत्वकला.

## भाग १ ला.

### उपोद्घात.

मनुष्याच्या अंगीं अशी कांहीं शक्ति असावी, कीं तिच्या योगानें त्यास दुसऱ्यावर आपलें वजन सहज पाडतां येईल; आणि असें असेल तरच तो जीवंत राहिल्याचा उपयोग आहे. त्याचे नैसर्गिक आणि संपादन केलेले गुण कितीही चांगले असोत, त्याच्या चांगलेपणाची परीक्षा त्याच्या त्या शक्तीच्या योगानेंच विशेष होण्यासारखी असते. गुणाची पारख बहुधा अशी आहे कीं, ज्या गुणाचें तेज जगावर पडेल, तोच गुण चांगला. शारीरशक्ति, द्रव्य आणि विद्या हीं आपल्याजवळ असणें चांगलें खरें; परंतु कधीं ? दुसऱ्यावर वजन

पाडण्याकडे त्यांचा उपयोग करतां आला तर, एरवीं नाहीं. पहा कीं आपण द्रव्याचा नुसता संचय करून ठेविला, आपल्या अंगची विद्या प्रकट न करितां तशीच झांकून ठेविली, आणि आपलें सामर्थ्य कोणास कळूं दिलें नाहीं, तर तें द्रव्य, ती विद्या, आणि तें सामर्थ्य, आपल्याला असून तरी काय उपयोग? ह्या सर्व गोष्टी आपल्याला अनुकूळ असूनही, जर आपलें तेज जगावर पडत नाहीं, तर त्या आपणापाशीं असूननसून सारख्याच आहेत. अंगीं मोठे मोठे गुण आहेत, पण त्यांचा प्रभाव पडून आपल्याला जगावर उत्तम प्रकारचा वस बसवितां येत नाहीं, तर आपण खरोखर मेल्याहून मेलेले आहों.

दुसऱ्याचें मन आकलन करून घेण्याच्या शक्तीसारखी शक्ति दुसरी कोणतीच नाहीं. तेव्हां ही शक्ति अंगीं असणें फार उपयोगाचें आहे.

दुसऱ्याचें बरेंवाईट करण्याचें आपल्या हातांत असणें, त्यांचे विचार सुमार्गाला लावणें, व त्यांचा स्वेच्छाचारीपणा घालवून त्यांचीं मनें आपल्या ताब्यांत ठेवणें, वगैरे कृत्यें करण्याचीं ईर्षा अगदीं स्तुत्य होय. ती पुरी करण्यास एखाद्यास अविश्रांत श्रम करून रात्रंदिवस जरी खपावें लागलें, तरी त्याचा विधिनिषेध न बाळगतां तो तें काम मोठ्या आनंदानें करील. खऱ्या वक्त्याच्या अंगीं दुसऱ्याचें मन आपल्याकडे ओढून घेण्याची शक्ति पूर्णपणें वास करीत असते. एका प्राचीन कवीनें ह्मटलें आहे कीं, वक्तृत्वशक्ति ही सर्व जगाची राज्यकर्त्री होय. विशेषेंकरून याच शक्तीच्या योगानें सर्व काळीं राष्ट्रें सुयंत्र चालत आलीं आहेत;

आणि एकंदर सर्व जगाचा इतिहास पाहिला असतां, त्यांतदेखील या शक्तीचेंच महत्व दिसून येतें. तेव्हां जगाचा इतिहास ह्मणजे वक्तृत्वकलेवर झालेलें एक भाष्य आहे, असें ह्मटलें असतां चालेल. ज्या ज्या ह्मणून इतिहासप्रसिद्ध उलाढाली झाल्या आहेत त्यांचें कर्तृत्व वक्त्याकडेच येऊन पोहोंचतें. चोहोंकडे देशाभिमान प्रज्वलित करून लोकांत उत्साह आणि आवेश उत्पन्न करणारा तरी तोच; त्याच्याच खटपटीनें राज्यांतील जुलमाचे प्रकार बंद होऊन सरळ अशी राजनीति अस्तित्वांत येत आहे; त्यानेंच लोकांची धर्मश्रद्धा जागृत केली आहे; प्रसंगविशेषीं त्यांच्यांत तंटेबखेडे आणि द्वेषबुद्धी उत्पन्न करून पुनः त्यांचा उपशम करण्याचें अघटित कर्म करणारा तरी तोच बहाद्दर आहे. करणारापेक्षां बोलणाराचें महत्व कमी वाटत असतें, परंतु समयविशेषीं बोलणाराच फार महत्वाचीं कृत्यें करितो. बोलणारा किंवा प्रोत्साहक नसता, तर त्या करणाऱ्यांच्या हातून कांहींच झालें नसतें; फार तर काय, पण तें करण्याचा विचारदेखील त्यांच्या मनांत आला नसता. 'मौनं सर्वार्थसाधनं' किंवा 'सबसे चुप भली,' असें नेहमीं लोक ह्मणतात. पण ही ह्मण येथें लागू पडत नाहीं. कांहीं कांहीं प्रसंगीं ती खरी ठरते; तरी पण ज्यांत करणारापेक्षां बोलणाराची सरशी होत असते, असे थोडे का प्रसंग आहेत?

वर निर्दिष्ट केलेल्या शक्तीची कीर्ति ही सहचारिणी आहे. ज्याला ह्मणून लोकांवर आपलें वजन पाडतां येतें त्याची मोठी कीर्ति होते; व तशी कीर्ति आपली व्हावी असें प्रत्येक मनुष्यास वाटत असतें. त्याला कीर्तीची मोठी

हौस असते, असें ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं. वजन पडल्यावर कीर्ति होते हें तर आहेच; पण तसें वजन पडल्यानें लोक पुढें आपलें नांव घेतील, आपली कीर्ति अजरामर राहील, असें एकदां वाटूं लागलें ह्मणजे मग काय? अंतःकरण प्रसन्न होऊन मनुष्यास एकपट तेथें दुप्पट श्रम करण्याचा हुरूप येतो. शक्तीच्या सभोंवतीं कीर्तीचें वेष्टन असतें. त्याशिवाय शक्ति निरर्थक होय, अशी कविकल्पना आहे. पुष्कळ अंशीं वक्त्याचें श्रमसाफल्य कीर्तींतच असतें. आतां कदाचित् कोणी असें ह्मणतील, कीं त्याला कधींकधीं त्याच्या अंगच्या योग्यतेपेक्षां जास्त मान मिळतो. परंतु त्याचीं कारणें अशीं आहेत कीं, एक-तर अतिशयोक्ती करण्याकडे बहुधा लोकांचा कल विशेष असतो; दुसरें अमुक एक चीज अद्वितीय आहे, सर्वोत्कृष्ट आहे, असें जरी कोणीं ठोकळ शब्दांनीं आपल्याला सांगितलेलें आपण ऐकिलें असलें तरी वाढवून सांगण्याचा सर्वत्र प्रघात असतो. तिसरें असें कीं 'वक्ता दशसहस्रेषु' या उक्तीप्रमाणें कदाचित् व क्वचित् वक्ते आपल्या दृष्टीस पडत असतात, ह्यामुळें आपणांस त्यांचें विशेष महत्व वाटून त्यांच्या अंगीं तितकी योग्यता नसतांही सहजीं त्यांस आपणाकडून बहुमान मिळतो.

ज्या अर्थी अंगीं वक्तृत्वगुण असल्यानें जगांत आपल्याला एक प्रकारचें वजन मिळून चोहोंकडे आपली कीर्ति पसरते, असें आह्मीं वर सांगितलें आहे, त्या अर्थी वक्तृत्वाच्या स्वरूपाचें थोडेसें निरूपण करणें अगदीं इष्ट आहे. ह्मणून तें आह्मी येथें देतों.

मराठी ग्रंथ संग्रहालय

वक्तृत्वाविषयीं लोकांच्या इतक्या कांहीं चमत्कारिक व भलत्या समजुती झाल्या आहेत कीं तशा इतर कशाविषयींही झाल्या नसतील; व याचयोगानें वक्तृत्वाची खरी किंमत पुष्कळांना अद्यापपर्यंत कळली नाहीं. याकरितां वक्तृत्वाचें खरें स्वरूप काय आहे, याची अगोदर माहिती करून घेणें अगदीं अवश्य आहे. एखाद्या साधारण मनुष्याजवळ जर आपण वक्तृत्वाविषयीं गोष्ट काढिली, किंवा त्या गुणाची प्रशंसा करूं लागलों, तर तो आपल्या बोलण्याकडे सहजीं दुर्लक्ष करितो. त्याची समजूत अशी असते कीं वक्तृत्व ह्मणजे एक प्रकारची लोकांस फसविण्याची, व आपलीं मतें निर्बल असतां तीं सबळ करून दाखविण्याची एक विद्या आहे; किंवा श्रोत्यांचें नुसतें मनोरंजन होईल अशा प्रकारें बोलण्याची एक खुबी आहे. तो ह्मणेल कीं ‘ आह्मांला फक्त ज्ञान किंवा शहाणपण असलें ह्मणजे पुरे आहे. तुमचें वाक्पांडित्य पोरांनाच राहूं द्या. त्याची आह्मांस मुळींच जरूरी नाहीं. ’ पण हें त्याचें ह्मणणें चुकीचें आहे. वक्तृत्वाचा वास्तविक अर्थ तो ह्मणतो तसा असता तर त्याचें बोलणें रास्त होतें, व ती कला तिरस्कारार्ह होऊन समजूतदार व शहाणे लोक तिच्या नादीं मुळींच लागतेना. परंतु तो ह्मणतो तसा अर्थ मुळींच नाहीं. खरें वक्तृत्व ह्मणजे प्रसंगास धरून मुद्देसूद बोलतां येणें हेंच आहे. ह्यापलीकडे कांहीं नाहीं. ज्याकरितां बोलावयाचें तो हेतु जेणेंकरून साध्य होईल अशा प्रकारचें संभाषण करण्याची शैली ही वक्तृत्व शब्दाची उत्तम व्याख्या होय. जेव्हां आपण

कांहीं बोलतों किंवा लिहितों तेव्हां आपल्या मनांत प्रथम कांहीं एक हेतु असतो. मग तो कोणाला कांहीं सांगण्याचा ह्मणा, किंवा त्यास संतोषित करण्याचा ह्मणा, किंवा कशा तरी रीतीनें त्याच्यावर आपलें तेज पडावें ह्मणून ह्मणा; पण कांहींना कांहीं तरी हेतु असतो हें खचित. आपण जें बोलूं किंवा लिहूं तें सर्व वायफळ न होतां आपला हेतु साध्य होण्याच्या कामीं बहुतांशीं उपयोगी पडेल अशा रीतीनें जो बोलतो किंवा लिहितो त्यासच सुंदर वक्ता हें नांव शोभतें. तेव्हां विषय कशाही प्रकारचा असो, इतिहास तत्वज्ञान यांसंबंधाचा असो कीं इतर कोणताही असो, त्यावर वक्तृत्व करितां येत नाहीं, असें कधींच होत नाहीं. वक्तृत्वाचे पुष्कळ निरनिराळे प्रकार आहेत. कधीं उपदेशरूपानें शिकवणीच्या गोष्टी सांगाव्या लागतात; कधीं श्रोत्यांचें मनोरंजन करून त्यांस खुष करून सोडावें लागतें; कधीं त्यांस संभाषणानें आपल्या बाजूकडे ओढून घ्यावयाचें असतें; अशा अनेक प्रसंगीं अनेक तऱ्हेचें वक्तृत्व करावें लागतें. वर जी वक्तृत्वाची व्याख्या दिली, तींत हे सर्व प्रकार येतात.

परंतु व्याख्यानाचा मुख्य हेतु श्रोत्यांमध्यें एका प्रकारची चळवळ सुरू करून त्यांच्याकडून कांहीं कृत्यें घडविण्याचा जेव्हां असतो, व तसें भाषण होऊन श्रोत्यांमध्यें खरोखर जेव्हां तसली चळवळ उत्पन्न होते, तेव्हां मात्र वक्तृत्वशक्तीचें खरें सामर्थ्य कळून येण्याचा जास्त संभव असतो; आणि मुख्यत्वें एवढ्याचकरितां वक्तृत्व कलेंत मोडलें

जाऊन, तें मन वळविण्याची एक कला आहे अशी त्याची व्याख्या होऊं शकते.

आतां यावर कोणी असा आक्षेप घेतात कीं, वक्तृत्वानें चांगल्या आणि वाईट दोन्ही गोष्टी करण्याविषयीं लोकांचें मन वळवितां येतें. होय, येतें खरेंच; यांत कांहीं शंका नाहीं. पण बुद्धिवादाचा देखील जिकडे उपयोग केला तिकडे होणार आहे; आणि लोकांना फसविण्याच्या कामीं बुद्धिवाद विशेष उपयोगी पडतो, असें तर आपण नेहमीं पाहतोंही. असा त्याचा दुरुपयोग होत आहे, ह्मणून तो वाढविण्याचा प्रयत्न करूं नये असें कोण ह्मणेल? बुद्धिवाद आणि वक्तृत्व ह्या दोनच काय, पण मानवी प्राणी शिकत आलेली आजपर्यंतची दुसरी कोणतीही कला घ्या, ती वाईट मनुष्याच्या हातीं गेल्यावर तिचा दुरुपयोग होतोच होतो. ह्मणून अशा क्षुल्लक कारणावरून त्या कला अगदीं त्याज्य आहेत असें प्रतिपादन करणें ह्मणजे निवळ पोरकटपणा नव्हे काय? दुर्गुणादि वाईट गोष्टी आणि खोटीं कामें करण्यांत आपण जितकी बुद्धी खर्च करितों तितकीच जर सद्गुणादि चांगल्या गोष्टी आणि खरेपणाचीं कृत्यें करण्यांत खर्च केली, तर त्यापासून आपला किती उपयोग होईल बरें? वक्तृत्व हें शाळेंत शिकून यावयासारखें नाहीं. एकदां मनुष्याला कांहींएका गोष्टीची खरी कळकळ लागली, ह्मणजे तो गुण आपोआप त्याच्या अंगीं येतो. फार कशाला, एखाद्यावर कांहीं आणीबाणीचा प्रसंग येऊन त्यांत त्याचें मोठेंसें नुकसान होण्याची भीति त्यास वाटूं द्या; ह्मणजे पहा, तो आपल्या हितासाठीं

कसा हरप्रयत्नानें दुसऱ्याचें मन वळविण्याची खटपट करितो ती? यावरून हें निर्विवाद आहे कीं, सृष्टिनियमानें घालून दिलेला जो धोपट मार्ग आहे, तोच अनुसरण्याला वक्तृत्वकला आपल्याला लावते; यापेक्षां जास्त कांहीं सांगत नाहीं. तेव्हां त्या मार्गाचें अवलंबन आपण बरोबर रीतीनें केलें म्हणजे वक्तृत्वकलेचें आपल्याला पूर्ण अध्ययन झालें असें होईल; आणि मग त्यायोगानें वाईट मनुष्याप्रमाणें आपल्या हातून तिचा दुरुपयोग न होतां, खरी वक्तृत्वशक्ति आणि कोरडें वाक्पांडित्य यांतील भेदाभेद स्पष्टपणें लोकांस दाखवितां येईल.

द्रव्यदानापेक्षां सदुपदेश करणें फार श्रेयस्कर आहे असें साधुवाक्य आहे. या साधूक्तीस अनुसरून हा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. समाजापुढें व्याख्यान देण्यासंबंधानें वाचकांस चांगली उपयुक्त माहिती व्हावी, व ती त्यांनीं ग्रहण करून आपला दृढनिश्चय ढळूं न देतां चांगली मेहनत घेऊन वक्तृत्वाचा अभ्यास करावा, आणि उत्तम वक्ते ह्या नांवास पात्र व्हावें, हाच या पुस्तकाचा मुख्य हेतु आहे. पुष्कळ लोक ह्या वक्तृत्वावर वरच्या प्रमाणेंच आणखी एक विलक्षण प्रकारचा आक्षेप घेत असतात. ते असें ह्मणतात कीं, विद्वानापेक्षां जे अविद्वान आहेत त्यांच्या भाषणांत जोर जास्त असतोसा दिसतो, मग वक्तृत्वाचा अभ्यास करण्यांतच काय विशेष आहे? निरर्थक श्रम मात्र व्हावयाचे. त्यापेक्षां स्वाभाविक रीतीनें जें येईल तेंच चांगलें असें ह्मणून स्वस्थ बसावें हें फार उत्तम. परंतु अशी समजूत बहुतकरून जे अडाणी आहेत,

ज्यांना ह्मणून युक्तीच्या ठिकाणीं शक्तीचा अगदीं अभाव असतो असें वाटतें, त्यांची असते. अर्थात् अशा मंडळीला बहुतकरून दार उघडून आंत जाण्यापेक्षां तें फोडून आंत प्रवेश करणें, तसेंच दोरीला निरगांठ बसली असतां सोईनें ती सोडण्याच्या भरीस न पडतां एकदम दोरी तोडून टाकणें, किंवा जनावरांस हांकून नेण्यापेक्षां त्यांस फरफटत ओढीत नेणें, यांतच जास्त पराक्रम आहे असें वाटत असेल.

हें पुस्तक लिहितांनां प्रथम वक्त्याच्या अंगीं स्वाभाविक गुण कोणते असावे ते सांगून, नंतर वक्ता होऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यानें अध्ययन करण्यासारख्या गोष्टी, वक्तृत्वाचे निरनिराळे प्रसंग, व्याख्यानपद्धति, विषयाचे निरनिराळे भाग, त्यांची जुळणी, व्याख्यान देण्याच्या निरनिराळ्या रीती, श्रोतृसमाज, वगैरेचें थोडेसें दिग्दर्शन करूं.

वक्तृत्वाचा अभ्यास कठिण तर खराच; पण विद्यार्थ्यानें निराश न होतां सतत त्याच्या पाठीस लागल्यास त्यास वक्तृत्वगुण साधण्यासारखा आहे. मनुष्य काय करूं शकणार नाहीं? मनांत आणील तें करील. त्याच्या मानसिक शक्तीचा असाच कांहीं विलक्षण प्रभाव आहे कीं, त्यानें अमुक एक गोष्ट करावयाची असें मनांत आणिलें पुरे, कीं तें तडीस गेलेंच.

आपण जरी सुप्रसिद्ध वक्ते न झालों, आपल्याला मोठमोठ्या ठिकाणीं जाण्याचा प्रसंग जरी न आला, तरी वक्तृत्वकलेचा अंशतः उपयोग होण्यासारखे पुष्कळ प्रसंग आपल्याला येतील, आणि तेथें आपल्या वक्तृत्व-

गुणाचा कांहीं तरी उपयोग होईल. सर्वच उपदेशक, बारिस्टर किंवा पार्लमेंटचे सभासद होतात, असें नाहीं. कांहीं साधारण वकील असतात; कांहीं एखाद्या कंपनीचे भागीदार असतात; कांहीं किरकोळ सभांचे चिटणीस असतात; कांहीं दुसरा व्यवसाय करितात; परंतु सर्वांना थोडा ना फार वक्तृत्वाचा उपयोग आहेच. तेव्हां त्यांस व ज्यांचा निव्वळ वक्तृत्व करण्याचाच धंदा आहे, त्या सर्वांस हें पुस्तक उपयोगी पडेल अशी आशा आहे.

# भाग २ रा.

## स्वाभाविक गुण.

त्या बुद्धीच्या मुळाशीं अशी एक नैसर्गिक शक्ति असते, कीं ती शिक्षणादि कोणत्याही साधनांनीं संपादन करूं ह्मटलें तरी संपादितां येत नाहीं. मोठ्या समाजापुढें व्याख्यान देण्याची गोष्ट तर खरोखर अशीच आहे. तेथें भाषण करणाराच्या अंगीं ही शक्ति मूळची असली पाहिजे. चांगला वक्ता होण्याला अंगीं बरेच स्वाभाविक गुण असावे लागतात. त्याखेरीज वक्त्यास, आपण मोठ्या योग्यतेला चढूं ही आशाच करणें नको.

**तीव्र सहृदयता.**—हा पहिला गुण. हा वक्त्याच्या अंगीं अगदीं जरूर असला पाहिजे. सहृदयता- ह्मणजे आपण जें काय पाहतों किंवा ऐकतों त्याचें चट्कन आपल्या मनावर हुबेहुब चित्र वठणें. तें चांगलें वठलें असलें, ह्मणजे मग अर्थात् आपलें हृद्गत दुसऱ्याला कळविण्यास फारशी अडचण पडत नसते. तें तेव्हांच व्यक्त करितां येतें. पण येथें हें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं जी गोष्ट पुष्कळांनीं पाहिली आहे किंवा ऐकिली आहे, ती सर्वांच्या मनांत सारखी कधींच वठत नसते. प्रकृतिवैचित्र्यामुळें

एकाला जसें भासेल, तसेंच दुसऱ्याला कदाचित् भासणार नाहीं, हें उघड आहे; आणि ही गोष्ट सर्व कलांना लागू आहे. प्रस्तुत आपण वक्तृत्वाचा विचार करीत आहों. तेव्हां त्या कलेंतदेखील पाहानात कीं, व्याख्यानविषयासंबंधानें जसा ज्याचा ग्रह झाला असेल, तशा पद्धतीनें तो बोलत असतो. एखाद्या वक्त्याची कल्पनाशक्ति इतकी तरतरीत असते, कीं तिच्या योगानें तो आपल्या कल्पना जगापुढें चट्कन मांडून, त्यांचा परस्पर संबंध आणि अनुक्रम कसा काय आहे, हें तेव्हांच दाखवून देतो. तसेंच, एखाद्या विषयावरील कोणाचे विचार सारखे जुळतात, कोणाचे विसंगत दिसतात, कोणाची विचारसरणी चांगली, हें ओळखून काढण्याचें त्यास पूर्ण ज्ञान झालें असतें. यामुळें तो ते विचार मोठ्या खुबीनें आणि सौम्यतेनें जगापुढें एकदम मांडूं शकतो. कल्पनेला हव्या तशा भराऱ्या मारूं देणें त्याला आवडत असल्यामुळें, त्या विषयांत काय काय आहे हें त्यास चांगलें माहीत असतें. त्याच्या मनांत हजारों कल्पना जरी आल्या असल्या तरी कांहीं एक घोटाळा न होतां, प्रत्येक कल्पना मनामध्यें नीट रीतीनें आणून व मोठ्या खुबीनें तिची खुलासेवार व्याख्या करून तो लोकांना सांगत असतो. अशा मनुष्याकडून शिक्षकाचें आणि उपदेशकाचें काम चांगलें होईल.

दुसरा बोलणारा असा असतो कीं, त्यास हरएक प्रकारच्या मनोविकाराची चांगली ओळख असते. त्याच्या अंतःकरणांत कठोरपणा, कोंवळेपणा, स्नेहभाव इत्यादिकांचा ठसा चांगला बिंबलेला असतो, त्यामुळें मनुष्याला द्रव येऊन

त्याचें मन वळेल असें करण्याविषयीं तो योग्य उल्हासानें खटपट करितो, व तींत त्यास यशही मिळतें; इतकेंच काय, पण त्याच्या मनांत आलें, तर श्रोत्यांचीं अंगें जेणें-करून पुलकित होतील, जेणेंकरून त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू निघतील, किंवा भीतीनें त्यांचें काळीज धडधड करूं लागेल, असें देखील तो करूं शकेल. अर्थात् असा मनुष्य वक्ताच बनला पाहिजे, शिक्षक होऊन उपयोगी नाहीं. पण तो बुद्धिवादापेक्षां आपल्या अंगविक्षेपादि चेष्टांनींच खरी कळकळ दाखवून लोकांचीं मनें जास्त आपलींशीं करून घेईल, यांत संशय नाहीं.

कोणी नानातऱ्हेचीं रूपकें आणि उत्प्रेक्षा वगैरे देऊन श्रोत्यांचीं मनें रंजवीत असतो. कारण त्याची स्वतःची अशी स्थिति असते, कीं जी गोष्ट तो पाहतो, किंवा ऐकतो, तिची कल्पना एकदां त्याच्या डोक्यांत चांगली शिरली, ह्मणजे ती पुनःपुनः त्याच्या मनांत घोळत असते. ती अशी घोळूं लागली ह्मणजे त्यास ती चांगली कळली असें होतें, आणि एवढ्याचकरितां तिचें पुनरुच्चारण करण्यांत त्यास मोठा आनंद वाटतो. अशा वक्त्याचें व्याख्यान बहुशः वर्णनात्मक असून त्यांत कविलाघव फार असतें. इतर व्याख्यानकारांप्रमाणें तो श्रोतृजनांच्या अंतःकरणांस उद्देशून न बोलतां त्यांच्या कल्पनातरंगांशींच बोलत असतो. त्याच्या भाषणापासून ह्मणजे समाजाच्या मनाला कांहीं एक विकार किंवा उपदेश होतो, हें मुळींच नाहीं. मनरंजन आणि करमणूक मात्र होते. तो कांहीं गोष्टी मूळ आहेत तशाच सांगून, व कांहींला निरनिराळ्या

उत्प्रेक्षा वगैरे देऊन, आणि बोलतां बोलतां मध्येंच थोडासा अलंकाराचा झोंक आणून आपल्या चटकदार भाषणानें श्रोत्यांस गार करून सोडतो. यावरून सहृदयता चांगली जागृत राहण्यास कल्पना, भावना, आणि रूपकें ह्या तीन साधनांपैकीं कोणतें तरी एक साधन निदान जवळ असलेंच पाहिजे, असें सहज दिसून येईल. ज्याला ह्मणून समयस्फूर्तीनें व्याख्यान द्यावयाचें असेल त्यानें प्रथम प्रतिपाद्य विषयाचें चांगलें मनन करून आपल्या मनावर त्याचा उत्तम प्रकारें ठसा उठवून घ्यावा. ह्मणजे असें होईल कीं त्या विषयाचें चित्र त्याच्या हृत्पटलावर जसें वठलें असेल, तशा प्रकारचे त्याच्या तोंडून शब्द निघून, श्रोत्यांच्या मनावर हुबेहूब तोच ठसा उमटेल.

**कुशाग्रबुद्धि.**—सहृदयतेच्या खालोखालचा स्वाभाविक गुण ह्मटला ह्मणजे कुशाग्रबुद्धि हा होय. प्रतिपाद्य विषयासंबंधानें आपल्याला जें भासत असेल, किंवा त्याविषयीं आपला जो समज झाला असेल, त्याचा कल्पनाशक्तीच्या साह्यानें नीट विचार करून आणि रूपकें योजून वाफेचें किंवा ढगाचें पाणी होऊन तें जसें पर्जन्यरूपानें जमीनीवर पडतें, तसा शब्द आणि वाक्यरूपानें तो आपल्या मुखांतून निघून समाजक्षेत्रावर एकदम पडला पाहिजे. ज्या शक्तीच्या योगानें हें रूपांतर होऊन मनांत आलेल्या गोष्टीविषयीं एक निश्चयात्मक विचार करितां येतो, तिलाच बुद्धि असें ह्मणतात. ही बुद्धि मनुष्याला उपजतांक्षणींच असते खरी, पण ती उत्तरोत्तर जास्त वाढवीत गेल्यानें परिपक्व होते. हें सामर्थ्य मनुष्याच्या अंगीं मूळचें असावें;

परंतु मूळचें असूनही तेवढ्यावर त्यानें स्वस्थ बसतां कामा नये. उत्तरोत्तर तें वाढविण्यासाठीं खटपट केलीच पाहिजे. मनुष्याच्या बुद्धीचा प्रकाश केवळ त्याच्या विचारसरणींतच दृष्टीस पडतो असें नाहीं; तर विषयाचा नकाशा तयार करून तो कायम करण्यांत, आयत्या वेळीं उठून व्याख्यान देण्यांत, आणि भाषण चाललें असतां स्मरणशक्ती जागृत ठेवण्यांत देखील, त्याच्या अंगची बुद्धि दृष्टोत्पत्तीस येते. याकरितां वक्त्याची बुद्धि फार तीव्र असली पाहिजे. विषयाचें मनन करण्याकडे जितकी बुद्धी जास्त खर्च करावी, तितकें त्याविषयीं लोकांची समजूत घालण्यास चांगलें सांपडतें असा साधारण नियम आहे.

**तारतम्यज्ञान.**—हें वक्त्याला फार उपयोगाचें आहे. याची मूळ व्याख्या ह्मटली ह्मणजे, पदार्थांतील गुणादिक जाणून तदनुरूप उपचारादि करण्याविषयीं जें बुद्धीच्याठायीं कौशल्य असतें तें. तारतम्याचा वक्त्यास पावलोपावलीं उपयोग आहे. संभाषणांत कोणते विचार काढावे, कोणते काढूं नयेत, शब्दांची योजना कशी करावी, कशी करूं नये, कोणते अलंकार किंवा दाखले लोकांस पटतील, कोणते पटणार नाहींत, या सर्व गोष्टी तारतम्यानें त्यास कळून येतात. एवढ्याकरितां सगळें व्याख्यान संपेपर्यंत व्याख्यानकारानें तारतम्य सोडतां कामा नये. तें धरून चाललें पाहिजे, तरच त्याचें भाषण लोकांस गोड लागेल, एरवीं लागणार नाहीं.

**उल्हास** किंवा **खरी कळकळ.**—हाही एक गुण खऱ्या वक्त्याचे अंगीं असणें जरूर आहे. सबळ आणि

वजनदार पुरावा मांडून कोटिक्रम करीत बसण्यापेक्षां, नुसता उल्हास आणि खरी कळकळ प्रदर्शित केली, तर जास्त कार्यभाग होणार आहे. कारण पुष्कळ प्रसंगीं श्रोत्यांच्या मनोवृत्ती त्यांच्या बुद्धीपेक्षां इतक्या जास्त प्रबळ होतात, कीं त्यांची बुद्धी एक वेळ फिरवितां येईल, परंतु वृत्ती वळविणें वक्त्यास फार कठिण पडणार आहे. एकदां एका बिशपानें एका शोकरसप्रधान नाटकाचा प्रयोग करणाऱ्या इसमास असें विचारिलें कीं, ‘ कां हो, लोकांना नाटकांतील सर्व प्रकार मृगजलवत् खोटे आहेत, व त्यांत आपला कांहीं संबंध नाहीं, असें माहीत असूनही रंगभूमीवर चाललेला प्रकार पाहून त्यांच्या मनोवृत्ती उचंबळूं लागतात, व प्रसंगविशेषीं त्यांच्या नेत्रांतून अश्रुपातदेखील होतो, त्याच लोकांच्यासमोर आम्ही ऐहिक व पारमार्थिक अशा महत्वाच्या विषयांवर जीव तोडून व्याख्यान देत असतां आमचें भाषण अरण्यरुदित होतें, याचें कारण काय असावें बरें ? ’ तेव्हां त्यास त्या नाटककारानें मोठ्या खुबीनें उत्तर दिलें, ‘ महाराज उल्हास आणि खरी कळकळ असल्याखेरीज सर्व व्यर्थ आहे. आपण जें व्याख्यान देतां तें ऐकून आपला खरा प्रकार असतांही लोकांस तो काल्पनिक किंवा खोटासा वाटतो. तेंच आमचें नाटक खरें नसतें, परंतु आमच्या प्रयोगचातुरीनें जगास तें खरें आहे असें त्या वेळीं भासविण्याचा आम्ही मनापासून प्रयत्न करीत असतों. ’

यावरून पहा कीं, नाटकांतील पात्रांच्या अंगीं देखील खोटयाचें खरें करून दाखविण्याचें सामर्थ्य असलें, ह्मणजे

प्रेक्षकांस तें नाटक उत्तम वाटून त्या पात्रांची मोठी वाहवा होते. याचें कारण असें कीं, नाटकांतील पात्रें प्रेक्षकांना लुब्ध करून सोडण्यास जीं सोंगें घेऊन रंगभूमीवर येतात, त्यांचा प्रथम त्यांच्या मनावर पूर्ण संस्कार झालेला असतो. तीं आपलें पूर्व स्वरूप विसरून नवीन धारण केलेल्या सोंगांत अगदीं निमग्न झालेलीं असतात, यामुळें तीं आपल्या कृतीनें प्रेक्षक जनांस मोहित करून सोडतात. ज्या अर्थी रंगभूमीवर हा गुण इतका उपयोगी पडत आहे, त्या अर्थी तो व्याख्यानस्थानीं जास्त उपयोगी पडेल ह्यांत संशय नाहीं. श्रोत्यांचें अंतःकरण सद्गदित करण्यापूर्वी बोलणाराचें अंतःकरण प्रथम सद्गदित झालेंच पाहिजे, व असें जर न होईल तर त्यानें मग किती जरी बडबड केली, तरी ती व्यर्थ होणार आहे. मनांत कळकळ आणि उल्हास असो अथवा नसो, परंतु आहे असें बाहेरून दाखविल्यानें जर लोक इतके गुंग होऊन जात आहेत, तर खरी कळकळ आणि उल्हास मनांत बाळगून तसें वर्तन ठेवल्यास जगावर आपलें किती बरें वजन पडेल ?

यावरून असें दिसून येईल कीं खरा जो वक्ता असतो तोच खऱ्या कळकळीचा माणूस ह्मणून प्रसिद्धीस येतो; तो कारणाशिवाय कधींही बोलत नाहीं; आणि एकदां बोलण्यास उभा राहिला म्हणजे तन, मन, धन सर्व तेंच असें समजून आपल्या वाग्बलानें लोकांचीं मनें तल्लीन करण्याचा तो प्रयत्न करितो.

**तीव्र कल्पनाशक्ति.**—वक्त्याची कल्पनाशक्ति मोठी तीव्र असली पाहिजे. समजा कीं, त्याला समयस्फूर्तीनें

एखाद्या विषयावर बोलावयाचें आहे; तर अशा प्रसंगीं कल्पनाशक्ति चांगली असली, ह्मणजे त्याला ज्या विषयावर बोलावयाचें आहे, त्याचा नकाशा अगोदर मनांत कायम करून तो जगापुढें मांडण्याची वेळ येईपर्यंत तो त्यास तसाच जागृत ठेवितां येईल. एखादी फुलाची कळी सूर्यकिरणांनीं प्रफुल्लित होऊन ज्याप्रमाणें चटकन् दृग्गोचर होते, त्याप्रमाणें व्याख्यान चाललें असतां मध्येंच जर एखादा नवीन विचार त्याच्या मनांत आला, तर त्याविषयींचे आपले विचार श्रोत्यांस कसे व्यक्त करून दाखवावे, हें कल्पनाशक्ति तरतरीत असल्यानें त्याचें त्यास एकदम सुचून, लागलींच तो त्याच्या योग्यायोग्यतेचा विचार करितो; आणि विषयाला तो लागू आहे असें वाटल्यास, व्याख्यान चालू असतांच त्यास रंगरूप देऊन समाजापुढें मांडण्यासारखा करून ठेवितो, व वेळ आली ह्मणजे हळूच समाजापुढें सोडून देतो. ह्यावरून स्मरणशक्ति आणि कल्पनाशक्ति तरतरीत असणें किती अगत्याचें आहे हें सहज कळून येईल. भाषणानें ऐकणाराच्या मनावर जो ठसा उत्पन्न व्हावा असें बोलणारास वाटत असतें, त्याचा चित्रपट वक्त्याच्या मनावर स्पष्ट आणि सुबक उमटला पाहिजे; ह्मणजे त्याला आपल्या इच्छेप्रमाणें श्रोत्यांच्या अंतःकरणांत हुबेहूब तसें चित्र वठविण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं.

**तामसी वृत्ति.**—समाजव्याख्यान प्रशंसनीय होण्याला वक्ता तमोगुणी असला पाहिजे. जे व्याख्यानकार सत्वगुणी किंवा रजोगुणी असतात, ते फारसे प्रख्यातीस येत नाहींत.

कारण जो मनुष्य सात्विक वृत्तीचा आहे त्याचा पित्तप्रकोप कधींच होत नाहीं; तसेंच रजोगुणी मनुष्य फार चंचल असल्यानें त्याच्या हातून नेट धरून धिमेपणानें कोणतेंही काम शेवटास जात नसतें. तमोगुणी मनुष्यांत नुसत्या थोर कल्पनाच असतात असें नाहीं, तर हजारों अडचणी एकीकडे झुगारून देऊन, दृढनिश्चयानें कार्य साधण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं असतें.

**दृढनिश्चय** आणि **मनाची स्थिरता.**—प्रसिद्ध वक्ता होण्यास वक्त्याचें मन स्थिर असावें लागतें. भित्रेपणा आणि कातरता अंगीं असल्यावर त्यास यशप्राप्ति मुळींच व्हावयाची नाहीं. मूळ आरंभीं समाजापुढें उभें राहण्यासच एक प्रकारचें थोडेंसें धैर्य असावें लागतें. विचार प्रकट करण्यास त्याहून जास्त लागतें. तेव्हां मग विरुद्ध मताचें खंडन करून आपलें मत स्थापित करण्यास वक्त्याच्या अंगीं फारच धैर्य असलें पाहिजे हें अगदीं उघड आहे. आयत्या वेळीं भाषण करणारा मनुष्य तर खरोखर मोठा धीट असला पाहिजे; कारण तशा प्रसंगीं भिऊं भिऊं केलें कीं शब्द सुचत नाहींत, मनांत योजिलेला विषयाचा नकाशा विस्कळीत होऊन जातो, स्मरणशक्ति राहत नाहीं, कल्पनाही चालत नसते; अशी धांदल उडून तो मनुष्य इतका गांगरून जातो, कीं त्याच्या तोंडांतून अस्खलित शब्द निघण्याला मोठी मारामार पडते, आणि अखेर त-त-त प-प-प असें होऊन शेवटीं खालीं बसण्याची पाळी येते. याकरितां बोलूं इच्छिणारानें न काचरतां समयस्फूर्तीनें धीटपणा धरून बोललें पाहिजे. केवळ धीटपणाच धरून

उपयोग नाहीं, त्यांतल्यात्यांत त्यानें थोडीशी नम्रताही दाखविली पाहिजे. गर्वोक्ती आणि आत्मस्तुती करून भाषण करणें फार अप्रशस्त आहे. असें भाषण श्रोत्यांस गोड लागत नसतें; इतकेंच नव्हे, तर अशा वक्त्याचा मग ते नेहमीं तिरस्कारदेखील करूं लागतात. प्रसिद्ध वक्ता सिसेरो ह्याला देखील व्याख्यानाच्या आरंभीं विवंचना पडून थोडेंसें कांपरें सुटल्यासारखें होत असे. जो वक्ता भाषणाला सुरुवात होण्यापूर्वीं अंमळ घाबरलेला दिसला नाहीं, अशाचें भाषण सिसेरोला कधींच पटलें नाहीं. जात्या जो भित्रेपणा असतो तो निराळा, आणि बोलण्याला सुरुवात होण्यापूर्वीं मनुष्य अंमळ कचरलेला दिसतो तो भित्रेपणा अगदीं निराळा. मूळचा भित्रेपणा घालविण्याविषयीं प्रयत्न केला पाहिजे. व्याख्यानाला सुरुवात करण्यापूर्वीं जी एक प्रकारची भीति वाटते, ती भीति कांहीं त्याच्या अंगची मूळची नव्हे. कारण समाजापुढें जो बोलायाला येणार, त्याला आपले गुण, आपलें सामर्थ्य, आपलें बळ, आपली विद्या, आपला प्रस्तुतचा विषय, इत्यादि गोष्टींची खात्री असल्याखेरीज तो बोलण्याला उभा राहत नसतो. अशी त्याची त्याला चांगली खात्री असल्यावर मग जरी त्याला एखाद्या मोठ्या समाजापुढें व्याख्यान देण्याला उभें केलें, तरी तो डगमगणार नाहीं. तो आपलें काम बिनहरकत उत्तम तऱ्हेनें करून येईल, यांत शंका नाहीं.

**अंतःकरणाची प्रसन्नता.**—जेव्हां एखाद्या गोष्टीचें खरें तथ्य आपणास कळून येतें, किंवा कळलें आहे असें वाटतें, तेव्हां जो एक प्रकारचा आनंद होतो, तो वर्णन

करितां येत नाहीं. अशा प्रसंगीं अंतःकरण प्रसन्न होऊन आपल्याला जो काय आनंद वाटला असेल, आणि खरा प्रकार कळला असेल, तो दुसऱ्याला सांगावा, अशी सहजीं मनुष्याला इच्छा उत्पन्न होते. आपल्या मनाचा स्वाभाविक धर्मच असा आहे, कीं त्यांत जो ज्ञानाचा प्रकाश पडला असेल त्याचा उजेड दुसऱ्यावर पाडून त्यास होईल तितक्या रीतीनें आपल्या हातून ज्ञानप्राप्ती करून द्यावी, व आपण अनुभविलेल्या आनंदाचे त्यास भागीदार करावें. यांतच मनुष्यास एक प्रकारचें सौख्य वाटत असतें. कधीं कधीं तर मनुष्याला ह्या गोष्टीचें मोठें वैभव वाटून, लोकांमध्यें आपली प्रतिष्ठा व्हावी अशा हेतूनें तो आपलें ज्ञानभांडार मोठ्या उत्सुकतेनें लोकांस फोडून दाखविण्याची संधी मुद्दाम आपण होऊन आणीत असतो. साधारण बुद्धीच्या मनुष्यापेक्षां विशेषतः कुशाग्र बुद्धीच्या मनुष्यास एखादी गोष्ट तेव्हांच चट्कन कळते; तेव्हां त्यास या गोष्टीचें भूषण कां न वाटेल? अर्थात् वाटलेंच पाहिजे; आणि असा मनुष्य जगांत आपलें मोठें वैभव व्हावें ह्मणून खटपट करील, तर त्यांत काय नवल? कारण वैभव मिळावें असें कोणाला वाटत नसतें? सर्वांस तें प्रियच आहे. निदान तरुण मंडळीस तर तें प्रिय असलेंच पाहिजे. समाजापुढें व्याख्यानें देण्याकडे ते आपलें जितकें लक्ष पोहोंचवितील, तितकें त्यांच्या वक्तृत्वशक्तीचें लोकांवर तेज पडून, त्यापासून त्यांचें वैभव जगांत वाढेल.

याखेरीज कांहीं एका प्रकारच्या स्वभावाचीं व अंतःकरणाचीं मनुष्यें असतात, त्यांच्यांत वरील गुण विशेष

आढळून येतो. उदाहरणार्थ स्त्रिया घ्या, किंवा लहान मुलें घ्या; त्यांच्या नजरेंत किंवा ऐकण्यांत एखादी गोष्ट आली पुरे, कीं ती त्यांच्या मनांत तेव्हांच ठसते. हा गुण त्यांच्यांत विशेष असतो. तशांत त्यांचीं अंतःकरणें आणि गात्रें कोमल व नाजूक असून त्यांचें मनही फार चंचल असतें, यामुळें तीं एखादी गोष्ट किती तरी प्रफुल्लित मनानें सहज बोलून जातात. अशाच मासल्याचा कांहीं गुण समयस्फूर्तीनें भाषण करणाराच्या अंगीं असणें जरूर असतें. जो मनुष्य आपल्याच ठिकाणीं गर्क असतो, जो एखाद्या गोष्टीवर फार वेळ विचार करून तीस प्रत्यंतरें पाहत बसतो, आणि ज्याला आपले विचार योग्य शब्द मिळाल्याशिवाय प्रकट करितां येत नाहींत, किंवा प्रकट करावे असें वाटत नाहीं, अशा मनुष्याला आयत्या वेळीं बोलणें मोठें मुष्कील पडेल. तसेंच जो मनुष्य नेहमीं उदास, तिरसट, आणि एकलकोंडा असतो, व ज्यास मंडळींत मिसळावें असें कधींच वाटत नसतें, जो जात्या दिवाभीतासारखा असतो, त्याला समाजांत कधींच बोलतां यावयाचें नाहीं. चार मंडळींत जाणें येणें, बसणें बोलणें, हें ज्याला आवडत नाहीं त्याला वक्तृत्वकलेचें ज्ञान कधींच व्हावयाचें नाहीं हें अगदीं खास आहे. तें प्राप्त व्हावयास निराळ्याच प्रकारचा मनुष्य लागतो. ज्याचा दिल खुला आहे, जो लोकांवर विश्वासतो व लोकांचें विश्वासस्थान होतो, व ज्याची वृत्ति नेहमीं आनंदित असते, अशालाच तें प्राप्त होईल तर होईल; कारण अशा वृत्तीचा मनुष्य मंडळीचा मोटा भुकेला असतो व त्याला मंडळींत गेल्या-

आल्याशिवाय चैन पडत नसतें; यामुळें त्याच्या अंगीं धीटपणा येऊन त्याचें मन सदोदित प्रसन्न असतें. तीच मनुष्याची वृत्ति साशंक असली ह्मणजे, बोलूं कीं नको, असा संदेह वरचेवर उत्पन्न होऊन, किंवा आपणाला कोण काय ह्मणेल, ह्याचीच भीति वाटून सर्व गोष्टी बाहेर न येतां मनांतल्या मनांत तशाच राहतात. यामुळें मन साफ नसतें व कोणीच बोलायाला नसल्यानें तोंडही अर्थात् बंदच राहतें. समयस्फूर्तीनें बोलणारास वरील गुण फार उपयोगी आहेत असें जरी नुकतेंच सांगितलें, तथापि त्यांच्यायोगानें ह्मणजे सर्व व्यंगें दूर होतील असें नाहीं. त्यायोगानें कधीं कधीं मनुष्याच्या हातून एखाद्या गोष्टीचा पुरतासा चांगला विचार न होतां, त्याच्या भाषणांत बराच कोतेपणा दिसून येईल, कदाचित त्याचा निष्काळजीपणा दिसेल, व त्याच्याकडून कधीं कधीं निरर्गल प्रलाप होतील. परंतु बोलावयास उठण्यापूर्वी नीट रीतीनें विचार करून तितक्यांतल्या तितक्यांत जर तो चांगली तयारी करील, आणि अंमळ जपून बोलेल, तर वरील प्रकार किंवा विषयांतर वगैरे कांहींएक न होतां, उलट त्याच्या भाषणाचा परिणामही चांगला होईल.

**उपजत** किंवा **ईश्वरदत्त वक्तृत्वगुण.**—कोणतीही कला घ्या, ती बुद्धीला एक प्रकारचें वळण लावून परिपक्व करणारी असते. परंतु तिच्या अंगीं बुद्धी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य मुळींच नसतें. व्याकरण आणि साहित्यशास्त्र यांच्या साह्यानें मनुष्यास शुद्ध आणि सरस कसें बोलावें हें शिकवितां येईल; परंतु त्याच्यापलीकडे त्यास जातां

येणार नाहीं. अंतःकरणापासून उत्पन्न झालेली व दुसऱ्याच्या अंतःकरणास जाऊन भिनणारी जी वक्तृत्वशक्ति तिचा लाभ त्यास कशानेंच होणार नाहीं. निःसंशय ती एक ईश्वरी देणगीच समजली पाहिजे. हें जें स्वभावजन्य वाक्-चातुर्य कित्येक मनुष्यांच्या अंगीं असतें, तें त्यांचा नीति-स्वभाव व इंद्रियसौष्ठव ह्यांचेंच फळ होय. हीं दोन्ही पूर्णतेला येऊन, एकमेळानें राहिल्याखेरीज वक्तृत्वशक्ति पूर्णतेला कधींच येत नाहीं.

इतर कलांप्रमाणेंच वक्तृत्वकलेंत पारंगत होण्यास मनुष्यास अविश्रांत मेहनत केली पाहिजे. ज्याप्रमाणें लोहचुंबकाचा कांटा नेहमीं उत्तर दिशा दाखवीत असतो, त्याप्रमाणें त्यानें इतर प्रेरणांस वश न होतां, नेहमीं वक्तृत्व विषया-कडे धांव घेतली पाहिजे. तरच त्याचे श्रम सफल होतील, व तो उत्तम वक्ता या नांवास लायक होईल. जगांत ज्या नानाविध कला आहेत, त्या सर्वांच्या मुळाशीं सर्वसाधारण असें एक तत्व आहे. तें तत्व ह्मणजे आत्म्याची व मनाची जागृत अवस्था हें होय. ह्या अवस्थेला प्रोत्साहन मिळून ती वृद्धिंगत व प्रकट होण्याची जरूरी असते. प्रत्येक मनुष्याच्या अंगीं कांहींएक विशेष प्रकारचा नैसर्गिक गुण असतो; त्या गुणामुळें, व त्याच्या शारीरिक व मानसिक रचनेंत जे कांहीं विशेष असतात त्यांच्यायोगानें मनुष्याची मानसिक जागृति एक विशिष्ट प्रकारचें रूप धारण करून प्रकट होत असते. जगांत ज्या नाना प्रकारच्या कला व त्यांपासून झालेलीं कार्यें दृष्टीस पडत आहेत, त्यांचें मूळ कारण तरी हेंच आहे.

**सद्गुण किंवा भलेपणाः**—वक्ता चांगल्या योग्यतेस चढण्यास तो सद्गुणी व थंडा मनुष्य असावा लागतो, हें येथें सांगणें जरूर आहे. प्राचीन साहित्यशास्त्रवेत्तेदेखील असेंच ह्मणत आले आहेत. आतां त्यांनीं सद्गुणाचें स्पष्टीकरण करितांनां कदाचित् थोडीशी अतिशयोक्ती केली असेल, नाहीं ह्मणवत नाहीं; तरी पण, त्यावरून वाईट मनुष्य चांगला वक्ता होत नाहीं, हा सिद्धांत काढण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. एखाद्या चांगल्या गोष्टीचा ठसा आपल्या मनावर उठून, तो दुसऱ्याच्या मनावर उमटविण्यास जी शक्ति, व मनाची प्रसन्नता लागते, ती वाईट मनुष्याच्या अंगीं कधींही वास करीत नाहीं, हें खचित. आपण अपराध केला आहे, मग तो कोणत्याही तऱ्हेचा असो, असें एकदां मनुष्याला वाटूं लागलें, ह्मणजे त्याचा उत्साह आणि हुरूप हीं समूळ नाहींशीं होऊन जातात; व त्याबरोबरच त्यास आपल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप वाटून, तो लागलींच खर्कन् उतरतो. यामुळें त्याच्या मनांत जे मोठमोठे विचार असतात ते तसेच एका बाजूस राहतात. परंतु आपलें आचरण शुद्ध आहे अशी स्वतःची ज्याला खातरी असते, त्याला जो हुरूप असतो, आणि जी मनाची प्रसन्नता असते, ती कांहीं वेगळीच आहे. त्यांच्यायोगानें त्यास कोणत्याही गोष्टीचा अभ्यास करण्यास सुलभ पडतें इतकेंच नाहीं, तर त्या अभ्यासापासून त्याला जें फळ मिळतें, त्याचा उपयोग दुसऱ्यांना त्यास सहज करून देतां येतो. वास्तविक जो

वेळ आपण अभ्यासाकडे घालवावयाचा, तो अगोदर आपण प्रापंचिक व्यवहारांत आणि करमणुकीच्या गोष्टींत फुकट घालवीत आहों, यामुळेंदेखील एकपरी आपलें नुकसान होत आहे, असें म्हटलें असतां चालेल. त्यांत जर आपण आपला आणखी कांहीं वेळ विषयसुखांत व हेवामत्सरादि गोष्टींत घालविला, तर मग तें केवढें नुकसान ह्मणावयाचें? दुष्ट अंतःकरणासारखी उतावीळ, विक्षोभी, आत्मघातक, आणि निरनिराळ्या मनोविकारांच्या जाळ्यांत सांपडणारी अशी दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं. मनुष्याचें मन भ्रमिष्ट होऊन एकदां बिघडल्यावर मग त्यास कसली विद्या आणि कसली कला? तो मग आपला निव्वळ गोटा राहणार. उघडच आहे, शेतामध्यें तन वाढल्यावर तेथें पीक येण्याची कोणी आशा तरी करील काय? एकदां मनुष्याच्या वाईट गुणांची प्रख्याति झाली, ह्मणजे त्याचें कोणी ऐकत नसतें; तो किती जरी चांगलें बोलला तरी ऐकणारावर त्याचें तेज बिलकुल पडत नाहीं. कारण त्याचीं नीच कृत्यें लोकांस चांगलीं माहीत असल्यानें मुळीं त्याचें भाषणच ऐकावेंसें कोणास वाटत नसतें; मग तें पसंत पडण्याची गोष्ट तर लांबच राहिली. त्याचीं मतें खरोखरी जरी ग्राह्य असलीं, तरी तीं त्याज्य अशींच वाटणार. तेंच एखाद्याची सद्गुणाविषयीं चांगली प्रख्याति झाली असली, ह्मणजे मग तो कांहीं ह्मणो, त्याकडे आपलें साहजिक मन वळतेंच. एवढ्याकरितां वक्ता सद्गुणी आणि भला असा असला पाहिजे, इतकेंच नव्हे, तर तशी त्याची

ग्रंथ संग्रहालय

प्रसिद्धिही पण झाली पाहिजे, ह्मणजे त्याचें तेज जगावर सहज पडेल.

क्विंटिलियन नांवाच्या एका पाश्चिमात्य प्राचीन ग्रंथकारानें वक्तृत्वविषयावर आपलीं कांहीं मतें प्रकट केलीं आहेत, त्यांवरून वकील लोकांच्या नैतिक वर्तनाविषयीं जुन्या लोकांच्या कशा काय समजुती असत, हें चांगलें कळण्यासारखें आहे. याकरितां तीं मतें आम्ही खालीं देतों:—वक्ता अत्यंत नीतिमान असून त्याच्या भाषणांत गैरशिस्त किंवा नीतिविरुद्ध कांहीं एक नसलें पाहिजे, असें तो ह्मणतो; तथापि आपण वकील होतों, आणि वकिलाला स्वपक्षाच्या पुष्टीकरणार्थ खऱ्या अगर खोट्या पाहिजेत तशा युक्ती लढवाव्या लागतात; तेव्हां तसें करणें रास्त असतें, असें वकिलास वाटत असतें, हें तो ग्रंथकार विसरला नाहीं. सिसेरोप्रमाणें त्यालाही असेंच वाटत होतें कीं, एखाद्या चांगल्या वक्त्यानें किंवा सद्गृहस्थानें चांगला हेतू मनांत धरून तत्प्रीत्यर्थ जरी एखादे वेळीं असत्य भाषण केलें, किंवा अजाण मनुष्यास त्याच्या हिताकरितां जरी चकविलें, आणि न्यायाधीशाचें मन खऱ्या गोष्टीपासून जरी दूर वळविलें, तरी तें दोषार्ह नव्हे. तसेंच सद्गुणाची अभिवृद्धि व्हावी ह्मणून दुर्गुणाचें जरी कधींकधीं अभिनंदन करावें लागलें, तरी कांहीं हरकत नाहीं, असें त्यास वाटत असे. त्याहीपेक्षां विशेष आश्चर्य करण्यासारखा एक नीतीविरुद्ध मोठा गुन्हा करण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं असें तो ह्मणे; तो असा कीं, अमुक एक गोष्ट खोटी आहे

असें माहीत असून, ती तशी नाहीं असें सांगण्यास खुशाल साक्षीदार मथवावे. यावरून, खरोखर वाईट गोष्ट करून जर आपलें हित होत आहे असें वकिलास वाटत असेल, तर त्यानें ती खुशाल करावी, अशी क्विंटिलियनची समजूत असावी असें वाटतें.



# भाग ३ रा.

## अभ्यास.

मनुष्याच्या अंगीं जाडा वक्ता होण्याला कोणते स्वाभाविक गुण असावे याचा येथवर विचार झाला. आतां आपण त्यांच्या अभ्यासाकडे वळूं. कार्यसिद्धि होण्यास नुसता स्वाभाविक गुण हा पुरेसा होतो असें नाहीं. फार झालें तर कीर्तिध्वज उभारण्यास तो एक प्रकारचा पाया होईल. तेव्हां वक्ते होऊं इच्छिणारांनीं कोणत्या गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावें हें खालीं दाखविलें आहे. तिकडे त्यांनीं लक्ष पुरवून, झटून उद्योग करण्याचें मनांत आणिल्यास त्यांस हटकून यश येईल अशी उमेद आहे.

**ज्ञानप्राप्ति.**—प्रथमतः त्यांनीं आपल्याजवळ ज्ञानाचा सांठा पुष्कळ करून ठेविला पाहिजे. ज्ञानाचें महत्व त्यांस पूर्णपणें कळून आलें पाहिजे. अध्ययनार्जित शहाणपणाखेरीज अंगीं स्वाभाविक गुण जरी पुष्कळ असले, तरी ते व्यर्थ आहेत. मग त्या गुणांची वास्तविक कांहींच किंमत नसते. वक्तृत्वगुण अंगीं येण्यास, त्यास पोषक असे कांहीं गुण आहेत त्यांची जरूरी असते, व त्यास चेतना आणण्यास एक प्रकारचें मानसिक प्रोत्साहन लागतें. तें मिळालें ह्मणजे

मग तो गुण प्रज्वलित होऊन नंतर त्याचें तेज दृष्टोत्पत्तीस येतें, असें एका प्रसिद्ध ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. तेंव्हां सांगावयाचें ह्मणून एवढेंच, कीं वक्तृत्वास पोषक द्रव्याची फार अवश्यकता असते, हें वाचकांनीं चांगलें ध्यानांत ठेवावें. मूळ महत्वाची गोष्ट तीच आहे. तसेंच वक्त्याजवळ कल्पनांची सामग्रीही बरीच भरपूर असली पाहिजे. नाहीं-तर असें होतें, कीं ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं त्याची मोठी फजीती उडते. ज्या भाषणांत नुसत्या शब्दलालित्याची मात्र रेलचेल असते, परंतु कल्पना किंवा विचार यांचा मुळींच कांहीं पत्ता नसतो, तें भाषण श्रोत्यांस अगदीं कंटाळवाणें होतें. त्यांस त्यांत कांहींच गोडी लागत नाहीं. दुसरें, एखाद्या वेळेस वक्त्याला कशा प्रकारच्या विषयावर बोलावें लागेल याचा नेम नसतो; यास्तव त्यास सर्व विषय अवगत असावे लागतात. सिसेरोचादेखील असाच अभिप्राय झालेला होता असें वाटतें. सॉक्रेटीस त्याच्याही पूर्वीं होऊन गेला, त्यानेंही असेंच ह्मटलें आहे; तो ह्मणतो कीं ज्या विषयासंबंधानें मनुष्याला पूर्ण माहिती नसते, त्यावर त्यास कधींच चांगलें बोलतां येणार नाहीं. परंतु टली नांवाच्या एका विद्वानानें, मनुष्याच्या आयुष्याची मर्यादा आणि ज्ञानाचा विस्तार मनांत आणून, असें प्रति-पादन केलें आहे कीं, ज्ञानाच्या जेवढ्या ह्मणून अवश्य शाखा आहेत, तेवढ्या संपादन करण्याचा वक्ता होऊं इच्छिणारानें प्रयत्न केला ह्मणजे पुरे आहे. यावरून एकं-दरीनें पाहूं गेलें असतां असें सिद्ध होतें, कीं वक्त्यांस

ज्या विषयावर बोलावयाचें असतें, त्या विषयाचें त्यांस ज्ञान चांगलें असलें ह्मणजे बस आहे.

यावर कदाचित् कोणी असा आक्षेप घेतील, कीं एका विषयामध्यें पोटविषय बरेच असतात. त्या सर्वांची त्यास माहिती कोठें असते? त्यांवर त्यास बोलण्याचा प्रसंग येतो, तेव्हां त्यानें कशावर बोलावें? अर्थात् तो जें शिकला असेल त्यावर. सर्व शास्त्रांचें व कलांचेंही असेंच आहे. ज्यावर त्यास बोलावयाचें असेल, तेवढ्यापुरती तो प्रथम तयारी करील, आणि नंतर त्यावर बोलेल.

आतां कोणी असें ह्मणतील कीं, असें जर आहे, तर मग एखादा गवंडी किंवा वाद्यविद्यानिपुण मनुष्य आपआपल्या विद्येसंबंधानें वक्त्यापेक्षां उत्तम भाषण कां नाहीं करूं शकणार? खचितच करूं शकेल. जर वक्त्याला त्या विषयासंबंधानें कांहीं माहितीच नसेल, तर त्याच्यापेक्षां तत्तत्कलाभिज्ञ मनुष्य अधिक चांगलें बोलेल, असें कोण न ह्मणेल? समजा कीं, एखाद्या कोर्टापुढें कांहीं खटला चालला आहे. त्या खटल्यांत मूळ भांडण कशाबद्दल आहे हें जर वक्त्याला समजलें नाहीं, तर तेथें तो काय बोलणार? त्याच्यापेक्षां ज्या मनुष्यासंबंधाचा तो खटला आहे, त्या मनुष्यास लिहितांवाचतां येत नसलें तरी तो उत्तम प्रकारें बोलेल, हें उघड आहे. परंतु एकदां कुळाकडून किंवा वाद्यविद्याकुशल मनुष्याकडून त्या वक्त्यास चांगली माहिती मिळाली, ह्मणजे मग तो त्याच्याहीपेक्षां अधिक कुशलतेनें विषय प्रतिपादन करील यांत शंकाच नाहीं.

उदार शिक्षणांत जेवढे ह्मणून विषय मोडण्यासारखे आहेत, त्या सर्वांची वक्त्यास साधारणतः माहिती असली पाहिजे. त्यांतदेखील एकापेक्षां एक विशेष महत्वाचे विषय आहेत. तेव्हां तिकडे वाचकांनीं आपलें लक्ष अवश्य पोंचविलें पाहिजे. परंतु प्रथम त्यास विशेष सुचवावयाचें ह्मणून एवढेंच, कीं त्यांनीं आपल्याला जें शिकावयाचें तें नीट समजून घेऊन, मनांत पूर्णपणें बिंबेल अशा रीतीनें शिकावें, वरवर शिकूं नये. तसेंच आपल्या मनांतल्या कल्पना, आपले विचार, आणि आपणास समजलेलीं तत्वें, हीं नीट जुळून त्यांची अशा रीतीनें सांखळी लावून ठेवावी, कीं निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करीत असतां, व त्यांवर विचार करीत असतां, ज्या गोष्टी आपल्यास खऱ्या ह्मणून भासतील, त्यांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा संस्कार आपल्या मनावर होऊं नये. तरुणपणीं जेवढी विद्या संपादन करावी, तेवढी पुढें फार कामास येत असते; कारण त्या वयांत शिकलेल्या गोष्टी जशा मनावर चांगल्या ठसतात, तशा उत्तर वयांत शिकून ठसत नाहींत, असा नियम आहे. तथापि ज्यांना लहानपणीं विद्या शिकण्यास सांपडलें नाहीं, त्यांनीं पुढेंही अभ्यास केला असतां होणार आहे. लहानपणीं आपण विद्या केली नाहीं, ती आतां आपल्याला कसची येणार, अशा समजुतीनें त्यांनीं निराश होऊन बसूं नये.

विद्याभ्यासाचे श्रम फार आहेत असें वाटून, जो कोणी त्यांचा कंटाळा करील, तो कधींही उदयास यावयाचा नाहीं. पण विद्येच्या योगानें जगांत मोठेपणा

मिळतो, ही आशा लागून जर तो मेहेनतीनें झटून अभ्यास करील, तर निःसंशय त्यास वैभव प्राप्त होईल; व त्यायोगानें त्याच्या अध्ययनश्रमाचा पूर्ण परिहार होऊन, त्या वैभवापुढें खरोखर आपल्यास झालेले श्रम कांहींच नाहींत, असें त्यास अनुभवाअंतीं कळून येईल.

**उद्योग.**—कोणत्याही गोष्टीमध्यें सतत परिश्रम केल्याशिवाय श्रेष्ठता मिळत नाहीं. आपण आयास न करितां एकदम प्रसिद्ध वकील, धर्मोपदेशक, किंवा वक्ते होऊं, असें कोणीं समजूं नये. त्या त्या गोष्टीचा अभ्यासच केला पाहिजे. तोही कांहीं वर्षे करून तसाच अर्धवट सोडून देतां कामा नये. कारण तशानें पूर्ण ज्ञान व्हावयाचें नाहीं, आणि तें न झाल्यानें अर्थात् जगांत आपलें नांव होईल ही आशाच करणें नको. सारांश काय कीं सतत उद्योग करण्याची आपल्याला संवय झाली पाहिजे. जेव्हां जेव्हां उद्योग करण्याचा प्रसंग येईल, तेव्हां तेव्हां अंगांतला आळस झाडून, तो करण्यास आपण नेहमीं तत्पर असलें पाहिजे. उद्योगानें कार्यसिद्धि होऊन मनुष्य श्रेष्ठता पावतो असा एक सृष्टिनियमच आहे. परंतु या नियमास अपवाद आणणारी बुद्धि आपल्या अंगीं आहे, व तिच्या जोरावर आपण उद्योगाशिवाय यशस्वी होऊं असें ज्यास वाटत असेल, तो खरोखर आत्मश्लाघी ह्मटला पाहिजे. वरील सृष्टिनियमांत विधात्याचें किती बुद्धिकौशल्य दिसून येत आहे पहा. खाद्य पदार्थांत मसाला घातला ह्मणजे त्यास रुचि येऊन तो जसा जास्त हवासा वाटतो, तसा उद्योग हा मानवी सुखास खरोखर एक व्यंजन आहे.

तो मनुष्याच्या पाठीमागें लाविलेला आहे, ह्मणूनच बरें आहे. तो जर नसता, तर मनुष्यास आपलें जीवित नकोसें होऊन, त्याचे हातपाय तेव्हांच मोडून गेले असते. आळस आणि विलासीपणा यांपासून शरीराला आणि मनाला जी एक प्रकारची शिथिलता येते, ती आयुष्यांतील खरें सुख भोगण्यास आणि लोकप्रिय गुण संपादन करण्यास नेहमीं वैऱ्याप्रमाणें आपल्या आड येत असते. अंगांत आळस शिरल्यानें अंगांतली तरतरी, हुरूप आणि उत्साह-बुद्धि हीं तीन्हीही जागृत राहत नाहींत. याकरितां अंगांत आळस मुळींच शिरूं देऊं नये. तो न शिरण्याला आपण नेहमीं कोणत्या ना कोणत्या तरी उद्योगांत असलें पाहिजे. ह्मणून विद्यार्थी जनहो, आळस झाडा, व विद्याभ्यास करा, मग तो केवळ ज्ञानप्राप्तीकरितां करा, किंवा दुसऱ्या कोणत्याही हेतूनें करा, पण अभ्यास करा. प्रथम कसलाही हेतू मनांत धरून तुम्ही अभ्यासास लागलां, तरी हरकत नाहीं; कारण अभ्यासाची एकदां तुह्मांला गोडी लागली ह्मणजे मग तुह्मी ज्ञान संपादण्यासाठीं तोच पुढें चालवाल.

मनुष्य पूर्ण वक्ता होण्यास सृष्टिनियम मुळींच आड येत नाहीं. तेव्हां जी गोष्ट होणें शक्य आहे, ती आपल्या हातून होणार नाहीं असें ह्मणून व्यर्थ निराश होऊन बसूं नका; हरएक गोष्टीचें पूर्ण ज्ञान होण्याचा प्रयत्न करा. बऱ्याच गोष्टींत पूर्णत्व येत नसतें हें खरें. तथापि कित्येक लोक एखादी गोष्ट असाध्य ह्मणून आळसानें आणि निराशेनें तिजविषयीं मुळींच यत्न करीत नाहींत. तसें न करितां जर तुह्मी तिचा पिच्छा न सोडतां सतत पाठलाग

कराल, तर तुम्ही पूर्णतेच्या जवळजवळ तरी निदान जाऊन पोहोंचाल. आहे त्यापेक्षां आपली स्थिति जास्त चांगली असावी, अशी जर तुमची मनीषा असेल, तर तुह्मी आहां त्या स्थितींत समाधान मानून स्वस्थ बसूं नका. कारण तसें समाधान मानलें, तर शेवटपर्यंत तुह्मांस ती स्थिती धरून राहावें लागेल. आपलें आहे हें बस आहे, असें ह्मणाल, तर फसाल. नेहमीं आपल्यांत जास्त भर पाडण्याची इच्छा धरून, एकेक पाऊल पुढें टाकीत चला. एकाच ठिकाणीं स्थिर राहूं नका. मागें पाऊल आणूं नका, कीं रस्ता सोडूं नका. तो धरून दिवसानुदिवस पुढें पाऊल टाकण्याला पहा. मन हें खडकाळ जमीनीसारखें आहे. त्या जमीनींत खत वगैरे घालून तिची चांगली मशागत न केली, तर ती निःसत्व होऊन पीक मुळींच येणार नाहीं; किंवा आलेंच तर एक येईल. ह्या गोष्टी तुह्मी पूर्णपणें मनांत बाळगा. कारण ह्या तुमच्या अभ्यासक्रमांत, तसेंच संकटसमयीं आनंद देण्यास आणि साहाय्य करण्यास उद्योग फार उपयोगाचा आहे. आतां इतक्या गोष्टी शिकण्यास वेळ फार थोडा, अशी नेहमीं लोकांची कुरकुर असते. परंतु वास्तविक ह्मटलें तर वेळ पुरत नाहीं हा दोष कोणाचा? आपलाच; कारण आपण आपला पुष्कळ वेळ व्यर्थ घालवितों, ह्मणून तो पुरत नाहीं. निव्वळ अभ्यासाकडे आपला किती वेळ जात असेल हें नीट लक्षांत आणा, ह्मणजे वरील ह्मणण्याची सत्यता तुह्मांला कळेल. आपला बहुतेक काळ एकमेकांकडे व्यर्थ जाण्यायेण्यांत, त्यांच्याशीं चकाट्या पिटीत बसण्यांत, तसेंच नाच, तमाशे

वगैरे ख्यालीखुशालीच्या किंवा करमणुकीच्या गोष्टी पाहण्यांत जात असतो. अशा किरकोळ गोष्टींमध्यें जो आपला काळ व्यर्थ जात आहे, तो जर आपण अभ्यासांत घालविला, तर आपलें आयुष्य आपल्याला पुरें होणार आहे. तरी यांत रात्रीचा वेळ मुळींच धरला नाहीं. त्याचा जर विचार केला, तर काय जे पांचसहा तास झोपेंत जात असतील, ते वजा करून बाकी राहिलेला वेळदेखील उपयोगांत आणितां येईल.

ज्याला ज्या धंद्यांत पडावयाचें, त्यानें त्या धंद्याचें ज्ञान अगोदर करून घेण्याकडे आपलें विशेष लक्ष पोंचविलेंच पाहिजे. ज्यास वकील व्हावयाचें आहे, त्यानें कायद्याची आणि ज्या कलांच्या साह्यानें न्यायाधीशाच्या आणि पंचांच्या मनाची खात्री करून देतां येईल, अशा कलांची पूर्ण माहिती करून घेतली पाहिजे. धर्मोपदेशक होऊं इच्छिणारानें आपलें सर्व लक्ष ईश्वरसंबंधी ज्ञान, धर्म, नीति आणि मानवी स्वभाव यांची ओळख करून घेण्यांत घातलें पाहिजे. ज्याला कायदेकौन्सिलांत आपला प्रवेश व्हावा असें वाटत असेल, त्यानें तेथील कामाकाजाची व्यवस्था, त्याचप्रमाणें आपल्या देशाचा प्राचीन इतिहास, लोकांची सद्यःस्थिति, आपल्या देशांत चालू असणारे कायदे, व त्याचा परराष्ट्रांशीं असणारा संबंध, इत्यादि गोष्टींचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. इतर धंद्यांचेंही असेंच आहे. प्रत्येकास आपआपल्या धंद्याकडे विशेष लक्ष पुरवावयाचें असतें; तथापि सर्वांस साधारण रीतीनें सारख्या लागू पडणाऱ्या अशा कांहीं ज्ञानाच्या शाखा आहेत, व त्या वक्ता होऊं इच्छिणाऱ्या

प्रत्येकानें प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्या येणेंप्रमाणें:—

**जगाचें ज्ञान.**—वक्ता होऊं इच्छिणारानें प्रथम जगाचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. मनुष्यप्राण्याविषयीं सूक्ष्म रीतीनें विचार करून, त्याच्या अंतर्बाह्य स्वरूपांची त्यास चांगली ओळख झालेली असावी. ज्या लोकांस उपदेश करून त्यांचें मन आपल्यास वळवावयाचें आहे, त्यांच्या माहितीच्या गोष्टींची आणि रीतीभातींची त्याला पूर्ण माहिती असली पाहिजे. मनुष्याचा स्वभाव कसा असतो, त्याचे हेतु काय असतात, त्याचें हिताहित कशांत असतें, तसेंच त्याचा स्वभाव, त्याचें मन, त्याचें शरीर, आणि त्याला खरें सुख मिळण्याचा मार्ग, इत्यादिकांचें ज्ञान त्यानें करून घ्यावें. मनुष्यांचे मनोविकार, त्या विकारांत होणारी चलबिचल, त्यांचें दमन करण्याचे उपाय, त्याचप्रमाणें त्यांच्या मनोविकारांस स्फूर्ती देऊन ते सन्मार्गाकडे लावणें, एकंदरींत जेणेंकरून त्यांस सुख आणि शांती मिळवून देऊन स्वतःस लोकप्रिय होतां येईल असे मार्ग वक्ता होऊं इच्छिणारास माहीत असले पाहिजेत. जगाचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासंबंधानें शिलर नांवाच्या विद्वानानें ह्मटलें आहे 'मनुष्यानें दुसऱ्यावरून आपल्यास व आपल्यावरून दुसऱ्यास ओळखण्यास शिकावें.' वक्त्यास जगांत चालणाऱ्या व्यवहाराचें नेहमीं काम पडतें, तेव्हां त्यानें त्याचें नीट परीक्षण करून त्याविषयीं घाटाघाट करीत जावें, व नंतर त्यासंबंधाचे आपले विचार व्याख्यानद्वारा त्यानें प्रगट करावे असें सिसेरोचें मत आहे.

**भाषाज्ञान.**---साधारणपणें वक्त्यास भाषाज्ञान चांगलें असावें लागतें. आपल्या भाषेमध्यें जे ग्रंथ शुद्ध, सुरस आणि जोरदार अशा भाषेंत लिहिले असतील, ते त्यानें नेहमीं वाचावे. त्यांतील चांगले चांगले वेंचे व विशेषतः सुरस कवनें काढून तीं मुखोद्गत करावीं, व तीं फावल्या वेळीं तोंडानें ह्मणत जावें. अशा संवयीनें त्यास करमणूकची करमणूक, आणि उपयोगचा उपयोग असे दोन्ही होतील. यायोगानें त्यास नानातऱ्हेचे विचार सुचतील, भाषामाधुर्य चांगलें कळेल, जगमान्य अशा ग्रंथकारांच्या बुद्धिमत्तेची ओळख होईल, वगैरे अनेक फायदे त्यास होतील. वक्ता होऊं इच्छिणारानें काव्याचें विशेष अध्ययन करावें, असें सिसेरोचें आग्रहाचें ह्मणणें आहे. कारण काय, तर कविता आणि वक्तृत्वशक्ति यांच्या स्वरूपसाम्यामुळें त्यांचा परस्पराशीं फार निकट संबंध आहे. तसेंच थिओफ्रॅस्टस याचें असें ह्मणणें आहे,कीं वक्त्यास काव्याच्या वाचनापासून फार उपयोग आहे. हें मत पुष्कळांना ग्राह्य आहे, व तें सयुक्तिक दिसतें खरें. काव्यें वाचल्यानें एखाद्या गोष्टीचें निरूपण करतांनां एक प्रकारचा आवेश उत्पन्न होऊन, वर्णनही उत्तम प्रकारें करितां येतें, श्रोत्यांच्या मनोवृत्तीचें हवेंतसें उद्दीपन करितां येतें, रूपकें खुबीनें योजतां येतात, व त्याहीपेक्षां जास्त फायदा आहे, तो हा कीं निरनिराळ्या विषयांच्या मननानें वक्त्याचें मन व्यग्र होऊन, डोक्यास फार त्रास झालेला असतो, तो अशा कविकृतींच्या वाचनानें कमी होऊन त्यास एक प्रकारचा आनंद आणि सौख्य होतें. तेव्हां मनाला जें विश्रांतिसुख द्यावयाचें, तें

काव्यें वाचून देत जावें. सिसेरोचाही असाच अभिप्राय आहे. परंतु प्रत्येक बाबतींत कवींचें अनुकरण करणें चांगलें नाहीं, हें मात्र विसरूं नये. उदाहरणार्थ, भाषास्वातंत्र्य किंवा अलंकारांचा अबाधित उपयोग. 'निरंकुशाः कवयः' या संस्कृत म्हणीप्रमाणें कवीला जशा प्रकारची मुभा असते, तशी वक्त्यानें आपल्याला घेऊं नये. काव्यपाटी ही शोभेकरितां असते. काव्यांचा मुख्य हेतु, तीं वाचून आल्हाद आणि आनंद व्हावा, हाच काय तो असतो. यामुळें त्यांत निव्वळ कविकल्पना आणि कधींकधीं तर पुष्कळ अविश्वसनीय गोष्टी दिसून येतात.

**न्यायशास्त्र** किंवा **तर्कशास्त्र**.—वक्त्यास लागणाऱ्या गोष्टींपैकीं न्यायशास्त्र हें एक साहित्य आहे. हें त्यास अवगत असलें पाहिजे. कारण वादविवाद करण्यास हें फार उपयोगी पडतें. कित्येकांना अंगची तर्कबुद्धि असते, परंतु ती उत्तरोत्तर जास्त वाढविण्याचा प्रयत्न केला असतां पुष्कळ उपयोग होतो. निदान ज्या विषयासंबंधानें आपण हल्लीं विचार करीत आहों, त्या वक्तृत्वविषयास तर तर्कशास्त्राचा अभ्यास केला तितका हवाच आहे. वक्तृत्वांत न्यायतत्वांचा फार उपयोग पडतो, याकरितां तीं वक्त्यास चांगलीं कळून, योग्य ठिकाणीं त्यांचा उपयोग करण्याचें चातुर्य त्याच्या अंगीं आलें पाहिजे. कसाही भ्रांतिमूलक सिद्धांत असो, त्याची व्याख्या त्यास चांगली करतां येऊन, त्यावर सयुक्तिक वाद करतां आला पाहिजे, व तो सिद्धांत सोडवितां आला पाहिजे. एखाद्या चांगल्या अनुभविक गुरूजवळ कांहीं काळपर्यंत न्यायशास्त्राचें त्यानें अध्ययन

केल्याशिवाय त्यांत प्रावीण्य मिळावयाचें नाहीं. तत्वें नुसतीं शिकूनही उपयोग नाहीं. त्यांचा कोठें व कसा उपयोग करावयाचा, हें मुख्य ठाऊक करून घेतलें पाहिजे. एखादा मनोरंजक किंवा बोधपर विषय घेऊन, त्यासंबंधाच्या आपल्या कल्पना असतील त्या प्रथम निराळ्या काढून नंतर त्या नीट सयुक्तिक रीतीनें जुळविण्याची त्यानें आपल्याला संवय लावावी. अशी संवय लावावयाची ती लिहून किंवा बोलून लावावी.

अशी संवय लावण्याला, चांगले विषय ह्मटले ह्मणजे भाषाज्ञान नीति आणि इतिहास हे होत. ह्यांपैकीं कोणताही एक घेऊन, त्याचे प्रथम वेगवेगळाले भाग होण्यासारखे असतील तर ते करून, नंतर त्यांची सिद्धता करण्याचीं साधनें शोधून काढावीं; व त्यांस पूर्णत्व आणण्याचे मार्ग कोणते आहेत ते पाहावे. अशा रीतीनें विषयाची नीट जुळणी करून जेणेंकरून तो सुव्यवस्थित रीतीनें प्रतिपादन केला जाईल, असें करण्याची नेहमीं संवय ठेवावी. कधींकधीं एखादा विषय घेऊन त्यावर दोघांनीं पूर्वपक्ष उत्तरपक्ष करावा, व आपल्यापेक्षां वयानें व विद्येनें श्रेष्ठ असा तिऱ्हाईत इसम पाहून त्याच्याकडून त्याचा निर्णय करवावा. या व्यवस्थानें, ते उभयतां विषयासंबंधानें वादविवाद करावयाला लागले, ह्मणजे त्यांचा एक एक विचार न्यायशास्त्ररीत्या, व्यापक-नियम-साधित-व्याप्यानुमानें किंवा त्र्यवयवाचीं अनुमानें लावून सिद्ध केला जातो कीं नाहीं, हें पाहावें, व तसा सिद्ध केला जात

नसेल, तर तो विचार वरील अनुमानें लावून सिद्ध केल्याशिवाय, त्या उभयतांस पुढें वादविवाद करूं देऊं नये.

अनुमान काढावयाचें तें असें.—

१. सर्व केळीं खाण्यायोग्य असतात....व्यापक सिद्धांत.

२. हें फळ केळें आहे ................व्याप्य.

३. अतएव हें फळ खाण्यायोग्य आहे....अनुमान.

अशा रीतीनें प्रत्येक विचार स्थापित झाला पाहिजे. आतां ह्या पद्धतीनें विषय कंटाळवाणा होऊन अंमळ त्रासदायक होईल खरा; परंतु पद्धतशीर संवाद चालल्यानें विषयाचें विशेष स्पष्टीकरण होऊन त्याविषयीं मनाची खात्रीही तेव्हांच होते. दुसऱ्या वेळीं असें करावें कीं, अगोदर विषय न नेमतां, आयत्या वेळीं ज्यावर बोलतां येईल, असा एक विषय घ्यावा, आणि त्यावर बोलावयाला लागावें. अशा वेळीं प्रतिपाद्य विषयाचें स्वरूप अगोदर कळत नसतें, यामुळें वाद चालू झाला असतां, त्यामध्यें खरी विद्वत्ता कोणाची व कोणास चटकन विचार सुचून ते स्पष्टपणें सिद्ध करून देतां येतात, हें सहज कळून येण्यासारखें असतें. ह्या वादामध्यें खंडन व मंडन, किंवा विधान व निषेध चालले पाहिजेत. कारण प्रत्येक विषयास प्रतिकूळ अनुकूळ अशा गोष्टी असतात; तेव्हां प्रत्येक गोष्टीचा ढोबळ विचार करून उपयोग नसतो. तिचीं निरनिराळीं अंगें शोधून त्यांचा सूक्ष्म रीतीनें विचार झाला पाहिजे असतो, तो करण्यास शिकलें पाहिजे. परंतु प्रथम हें सांगितलें पाहिजे, कीं कोणत्याही गोष्टीचा विचार करतांनां, तिच्यासंबंधाचा आपला

जो पूर्वीचा ग्रह असेल, तो धरून बसूं नये. तो अगोदर मनांतून समूळ घालवावा,आणि नंतर त्या गोष्टीचा विचार करण्यास लागावें. आतां ह्या मानसिक कसरतीला मार्गदर्शक कोणी तरी चांगला बुद्धिवान् गुरु मिळाला पाहिजे. मात्र हा गुरु अंधपरंपरेनें चालत आलेल्या गोष्टींचा कांहींएक विचार न करतां त्या खऱ्याच आहेत असें धरून चालणारा नसावा; त्यांवर पुष्कळ विचार करून नंतर त्या खऱ्या अगर खोट्या, जसें त्याच्या निदर्शनास येईल तसें, मानणारा असावा. अशा रीतीच्या वादविवादामध्यें खरे विचार तेव्हांच बाहेर पडत असतात. परंतु ह्या वादविवादांत वक्त्यानें आपला जो मुख्य हेतु, स्वतंत्र रीतीनें आपली तर्कशक्ति वाढविण्याचा, तो विसरतां कामा नये. त्यांत त्यानें आपला कांहीं तर्क चालविला पाहिजे; दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये. कारण केवळ वादविवादपद्धतीनें सत्यशोध करण्याकडे जर त्याचें चित्त लागलें, तर त्यायोगानें त्याच्या जागृत बुद्धीचा ऱ्हास होऊन जाईल. तो हीच पद्धत धरून बसेल, तर त्याची तर्कशक्ति वाढावी तरी कशी? या पद्धतीनें ती समूळ नाहींशी होणारच. एक प्राचीन ग्रंथकार म्हणतो कीं, 'या गोष्टीची मी पुष्कळ वेळां प्रतीती घेऊन पाहिली आहे, व तीवरून माझी तर अशी खात्री झाली आहे, कीं चांगल्या गुरूच्या हाताखालीं राहून जर विद्यार्थ्यांनीं अशा रीतीनें वर्ष दोन वर्षेपर्यंत निरनिराळ्या विषयांची चर्चा करून, त्यावर नानातऱ्हेच्या सयुक्तिक कल्पना लढवून, व नीट संगतवार विचार जुळवून, ते विषय लिहून काढण्याची, किंवा त्यांवर व्याख्यान देण्याची संवय

ठेविली, तर ते मोठे विचारवंत होतील. त्यांत ते तैलबुद्धीचे असल्यावर तर बोलायलाच नको. ते आपापल्या ग्राहकशक्तीनुरूप किंवा स्वभावानुरूप, मोठे वक्ते किंवा राजकार्यधुरंधर होतील, किंवा दोन्ही गुणांनीं युक्त होतील.'

**मनन.**—वक्त्यानें विषयाचें पुष्कळ मनन केलें पाहिजे. वक्तृत्वशक्तीचें रहस्य त्यांतच विशेष आहे. साधरणपणें शुद्ध अंतःकरणानें खरा विचार करणारे असे जगांत फारच थोडे पुरुष आढळतात. तेव्हां अशा लोकांपेक्षां जो कोणी विषयाचें मनन करून त्यावर खोल विचार करील, त्यास इतरांपेक्षां जास्त फायदा होणार हें उघड आहे.

या विषयावर इंग्लडचे माजी मुख्य प्रधान ग्लॅडस्टनसाहेब यांचे फार पोक्त विचार प्रकट झाले आहेत, ते वाचकांनीं वाचण्यायोग्य आहेत, ह्मणून ते आम्ही खालीं देतों. चांगला वक्ता होण्यास उत्तम मानसिक कसरत कोणती असें एकदां त्यांस कोणी विचारलें; तेव्हां ते म्हणाले 'इंग्लंडसारख्या व्यवसायनिमग्न राज्यामध्यें हजारों प्रकारच्या उलाढाली करण्यांत, व त्यांसंबंधाची विशेष काळजी वाहण्यांतच तेथील कारभारी लोकांचा पुष्कळ वेळ जात असतो. ते त्यांत नेहमीं निमग्न असतात, यामुळें समाजांत उत्तम रीतीनें व्याख्यान देण्याच्या पद्धतीचें ज्ञान त्यांस दुसऱ्यांस करून देतां येत नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्या पद्धतीविषयीं विचार करून त्यांना स्वतःलादेखील तिचा उपयोग करून घेतां येत नाहीं. असें आहे तथापि, समजा कीं माझ्या मनांत तो प्रयत्न करून पाहावा असें आलें, तर मी आरंभीं दोन गोष्टी संपादन करण्याचा प्रयत्न करीन. एक सामान्यविष-

यक विद्या. कारण हें ज्ञान झाल्यानें मनाचे ठिकाणीं जसें मार्दव तत्परता आणि दार्ढ्य येतें, तसें इतर कोणत्याही साधनांनीं येत नाहीं. मी जी दुसरी गोष्ट करणार, ती नेमलेल्या संभाषणाच्या विषयाचें अगोदर चांगलें मनन करण्याची संवय ठेवणें, ही होय. विषयाचें अगोदर मनन झाल्यानें त्यापासून साहजिक रीतीनें आपल्याजवळ शब्दांचा भरणा पुष्कळ होऊन, आयत्या वेळीं ते शब्द आपल्याला आपोआप भराभर सुचूं लागतात.

**लेखी विषय.**—ज्या विषयावर भाषण करावयाचें, तो प्रथम लिहून काढण्याची संवय ठेवल्यास फार श्रेयस्कर होणार आहे. कारण विषय लिहून काढल्यानें, त्याचें विवेचन अगदीं रेखलेलें, मर्यादित व सुव्यवस्थित होत असतें. तसेंच बोलतांनां तोंडांतून निष्काळजीनें वाटेल तशीं वाक्यें निघत असतात, पण लिहितांनां कागदावर तशीं पडण्याचा संभव फारच कमी असतो. अमुकच विषय लिहावा असा नियम नाहीं. कधीं गोष्ट लिहावी, कधीं ज्यावर पुष्कळ विचार करावयाला सांपडेल असा विषय घेऊन, त्यावर निबंध लिहावा. कवित्वगुण अंगीं असेल तर एक चमत्कारिकसें कवन करावें. परंतु कधीं लिहावें, आणि कधीं आळसानें लिहूं नये, असें करून तें आपल्या लहरीवर आणि मर्जीवर टाकूं नये. तर नियमितपणें रोज लिहिण्याची संवय चांगली बरेच दिवस ठेवावी.

या लिहिण्याच्या पद्धतीसंबंधानें एक विशेष सांगण्यासारखा नियम आहे, व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांस पुष्कळ प्रकारें होणार आहे, तेव्हां तो येथें देणें अगदीं जरूर आहे.

तो नियम हा, कीं ज्या कोणत्याही विषयावर आपणांस लिहावयाचें असेल त्यावर झालेले ग्रंथ न पाहतां, आपल्याला जें सुचेल तें लिहिण्यास प्रथम आरंभ करावा. त्याविषयीं अगोदर आपल्या मनांत काय येतें तें पाहावें, सुचलेले विचार नीट जुळून मनांत कायम करावे, आणि नंतर ते कागदावर टिपावे; मग ग्रंथांतरीं तो विषय कसा प्रतिपादन केला आहे हें पाहावें. आतां हें पुष्कळ श्रमाचें काम आहे खरें, परंतु त्यापासून पुष्कळ फायदा आहे. लेखणी ही वक्तृत्वास एक प्रकारचें वळण देऊन तें शिकविणारी आहे, असें जें सिसेरो म्हणत असे तें यथार्थ होय.

एका प्राचीन ग्रंथकाराचें असें म्हणणें आहे, कीं आपल्याच्यानें लिहवेल तितकें लिहून, तें काळजीनें लिहावें. शेतांतील जमीन जितकी खोल खणावी, तितकी ती पोंकळ होऊन, तींत पीक चांगलें येतें, याचा अनुभव जे कोणी शेतकरी असतील त्यांस असेलच. वरवरचें ज्ञान संपादण्यापेक्षां वर सांगितलेल्या पद्धतीनें आपली मानसिक सुधारणा आपण करीत गेलों, तर खचित तिजपासून आपणांला उत्तम फळें मिळून, तीं चिरकाल राहतील. कारण आपण जर ही खबरदारी न ठेवली, तर कदाचित् आपल्याला समयस्फूर्तीनें बोलण्याची हातोटी जरी साधली, तरी तीपासून विशेषसा फायदा होणार नाहीं; फार झालें तर वेळेवर शब्द सुचून, नुसती बडबड मात्र करतां येईल. विषय लिहून काढणें, म्हणजे वक्तृत्व करतां येण्यास एक प्रकारचा पाया उभारण्यासारखें आहे. वक्तृत्वाच्या साहित्य-

संग्रहापैकींच लेखन हें एक आहे. त्यांतून प्रसंगानुसार आपल्याला जेवढें लागेल तेवढें काढून घेतां येणार आहे.

चांगलें बोलतां येण्यास प्रथम चांगलें लिहितां आलें पाहिजे, हें जरी खरें आहे, तथापि त्यावरून असें ह्मणतां येत नाहीं, कीं चांगलें लिहितां येण्यास बोलतांही चांगलेंच आलें पाहिजे. पुष्कळ मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले, परंतु त्यांस क्वचितच चांगलें बोलतां येत असे. याचें कारण ग्रंथकाराची स्मरणशक्ति राहावी तशी तरतरीत राहत नाहीं. विचारप्राबल्यामुळें ती दिपून जाऊन तिला मांद्य आलेलें असतें. हा तिचा मूळचा कमीपणा म्हणा, किंवा संवय नसल्यामुळें तसें होतें म्हणा. एखाद्या मनुष्याला घेरी आली, ह्मणजे त्याच्यानें जसें एक पाऊलही पुढें टाकवत नसतें, तसें संवय नसल्यानें मंडळीपुढें उभें राहिल्यावर मनाची जी काय चलबिचल होऊन जाते, तिच्यायोगानें त्याला कांहीं एक सुचेनासें होतें.

**भाषाविनेतृत्व किंवा भाषेवर पगडा.**—भावी वक्त्यानें पुष्कळ दिवस अध्ययन करून व पुष्कळ विषय हातानें लिहून काढून, विचार प्रकट करण्याचे भाषेंत जितके ह्मणून प्रकार असतील, तितक्या प्रकारची निरनिराळी वाक्यरचना व समास वगैरे करण्याची संवय ठेविली पाहिजे. तिच्यायोगानें त्यास एक प्रकारचें उत्तम साधन होऊन, बोलतांनां अडखळण्याचे प्रसंगही क्वचित येतील, व मनांत आलेली एखादी कल्पना किंवा विचार तत्काळ लोकांपुढें मांडतां येईल.

जगांत जे मोठमोठे वक्ते होऊन गेले, त्या सर्वांनीं चांगलें बोलतां येण्यासाठीं ज्या पद्धतीचें अवलंबन केलें, त्या पद्धतीनें वक्तृत्व गुण संपादण्यास त्यांस पुष्कळ परिश्रम करावे लागले खरे; परंतु त्यापासून त्यांना जो अनन्वित फायदा झाला तो अवर्णनीय आहे. परंतु हाच त्यांनीं कंटाळा केला असता, तर त्यांस यश मुळींच आलें नसतें हें खचित. वुइल्यम पिट ( अर्ल ऑफ चॅथम ) याची गोष्ट अशी सांगतात कीं, त्यानें भाषाज्ञान चांगलें होण्याकरितां, व जवळ शब्दसंग्रहही पुष्कळ व्हावा ह्मणून जॉनसनच्या पूर्वी बेलीसाहेबांनीं केलेला जो प्रसिद्ध कोश होता, तो दोनदां वाचून काढला; व पुढें त्यानें आपल्या मुलालाही तसेंच करण्याचा उपदेश केला.

शब्दांचा भरणा जवळ चांगला होण्यास एका विद्वानानें एक चांगली युक्ती काढिली आहे ती अशी:—कोणतेंहि पुस्तक घेऊन त्यांतून कांहीं शब्द व वाक्यें वेगळीं काढावीं, व तसल्या अर्थाचे दुसरे निरनिराळे शब्द किंवा वाक्यें शोधून काढावीं. उदाहरणार्थ, 'मी इच्छितों,' याला 'माझा मानस आहे, माझा हेतु आहे, माझा विचार आहे,' वगैरे जितके शब्दसमुच्चय आठवतील, तितके आठवण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणें तिरस्कार, तिटकारा, कंटाळा, नावड, नाखुषी, वगैरे अनेक शब्द, व शुद्धीवर या, जागे व्हा, अंतःकरणांत उजेड पडूं द्या, डोळे, उघडा, वगैरे त्या त्या अर्थीं अनेक शब्दसमुच्चयांची योजना करावी. आतां हा प्रकार अंमळ पोरकटसा दिसेल, पण त्यापासून उत्तम भाषण करतां येणार आहे.

वाक्यरचना करण्याची दुसरी अशी एक रीत आहे कीं, कोणतेंहि एक पुस्तक घ्यावें, त्यांतील ओळीवार पांच-पंचवीस वाक्यें दोनतीन वेळां वाचून काढावीं, नंतर पुस्तक मिटावें, आणि त्यांचा भावार्थ आपल्या स्वतःच्या भाषेंत लिहावा. असें करावयाला प्रथम एखादें गोष्टीचें पुस्तक मिळाल्यास उत्तमच. यांत थोडीशी गति झाली ह्मणजे मग वादविषयक ग्रंथ हातीं घ्यावा. त्यांत थोडासा प्रवेश झाला कीं, दुसरें एखादें गहन विषयावर लिहिलेलें पुस्तक घेऊन पूर्ववत् वर्तन ठेवावें. याप्रमाणें संवय लागली म्हणजे त्यानें त्या पुस्तकांतील एक एक परिच्छेद किंवा प्रकरण वाचून, स्मरणार्थ टांचण करावें, आणि नंतर त्या टांचणावरून प्रकरणांतील आशय तोंडानें बोलण्याचा प्रयत्न करावा.

आणखी एक तिसरी रीत आहे, तिच्यापासूनही बराच उपयोग होण्याचा संभव आहे. ती रीत अशीः—एखादा पद्यात्मक ग्रंथ घेऊन, तो गद्यांत आणावा; आणि आपण जणूं काय कोणापुढें व्याख्यानच देत आहों अशी कल्पना करून, त्यांतील आशय तोंडानें ह्मणत जावा. ही खुबी साधली ह्मणजे मग कवीच्या कल्पनेवर जास्त आपली कांहीं कल्पना चालत असल्यास पाहावी. अशा रीतीनें मानसिक कसरत करणारास वाटेल तें शिकतां येईल. परंतु ही कसरत साधली मात्र पाहिजे; कारण ती मोठ्या विद्वानासदेखील कष्टसाध्यच होणार आहे.

आतां अशा प्रसंगीं त्याचें बोलणें ऐकण्यास कोणी नसलें, तरी हरकत नाहीं. अशी संवय करून घेते वेळीं खरो-

खर ऐकायाला कोणी नसेल तितकें बरें. मात्र विद्यार्थ्यानें, आपणास कांहीं काळानें जगापुढें येऊन बोलावयाचें आहे, ह्मणून आपण ही खटपट करीत आहों, तेव्हां आपल्या अभ्यासाच्या खोलींत कोणी ऐकणारे नसतांही, ती श्रोत्यांनीं गजबजून गेली आहे, व त्यांच्यासमोर आपल्यास हल्लीं बोलावयाचें आहे असें समजून, वर्णोच्चार वगैरे स्पष्ट करण्याची खबरदारी घ्यावी.

शब्दसंग्रह करावयाचा तोदेखील होईल तितका निवडक शब्दांचा असावा. शब्द निवडतांनां, बढाईखोराप्रमाणें वाचाळता करण्याकरितां आपण ही खटपट करीत नसून, वक्तृत्व संपादन करण्याकरितां करीत आहों, असें मनांत बाळगून, शब्दांची निवड केली पाहिजे. चांगल्या भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें वाचून, किंवा विद्वान लोकांचीं व्याख्यानें ऐकून देखील, वरील हेतु चांगला सिद्धीस जाणार आहे. वरील संवयीनें शब्दज्ञान होईल, एवढेंच केवळ नव्हे, तर शब्दाचा योग्य ठिकाणीं समर्पक उपयोग कसा करावा याचेंही ज्ञान होईल.

साजेल असा, साधा, व सभ्य पोषाख केल्यानें मनुनुष्यास जो मान मिळतो, तो छचोर किंवा डामडौली पोषाख केल्यानें मिळत नाहीं, व तो शोभतही नाहीं; इतकेंच नव्हे तर उलट त्यापासून हलकटपणा मात्र दिसून येतो, व उपहासास कारण होतें. तसेंच कित्येक व्याख्यानकार एकदां शब्दलालित्य करावयास लागले ह्मणजे सर्व व्याख्यानांत त्याचीच झोड उडवून देतात. यामुळें प्रतिपाद्य विषयाचा सर्व जोर निघून जातो. ह्मणून शा-

संग्रहापैकींच लेखन हें एक आहे. त्यांतून प्रसंगानुसार आपल्याला जेवढें लागेल तेवढें काढून घेतां येणार आहे.

चांगलें बोलतां येण्यास प्रथम चांगलें लिहितां आलें पाहिजे, हें जरी खरें आहे, तथापि त्यावरून असें ह्मणतां येत नाहीं, कीं चांगलें लिहितां येण्यास बोलतांही चांगलेंच आलें पाहिजे. पुष्कळ मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले, परंतु त्यांस क्वचितच चांगलें बोलतां येत असे. याचें कारण ग्रंथ-काराची स्मरणशक्ति राहावी तशी तरतरीत राहत नाहीं. विचारप्राबल्यामुळें ती दिपून जाऊन तिला मांद्य आलेलें असतें. हा तिचा मूळचा कमीपणा म्हणा, किंवा संवय न-सल्यामुळें तसें होतें म्हणा. एखाद्या मनुष्याला घेरी आली, ह्मणजे त्याच्यानें जसें एक पाऊलही पुढें टाकवत नसतें, तसें संवय नसल्यानें मंडळीपुढें उभें राहिल्यावर मनाची जी काय चलबिचल होऊन जाते, तिच्यायोगानें त्याला कांहीं-एक सुचेनासें होतें.

**भाषाविनेतृत्व** किंवा **भाषेवर पगडा.**—भावी व-क्त्यानें पुष्कळ दिवस अध्ययन करून व पुष्कळ विषय हातानें लिहून काढून, विचार प्रकट करण्याचे भाषेंत जि-तके ह्मणून प्रकार असतील, तितक्या प्रकारची निरनिराळी वाक्यरचना व समास वगैरे करण्याची संवय ठेविली पा-हिजे. तिच्यायोगानें त्यास एक प्रकारचें उत्तम साधन होऊन, बोलतांना अडखळण्याचे प्रसंगही क्वचित येतील, व मनांत आलेली एखादी कल्पना किंवा विचार तत्काळ लोकांपुढें मांडतां येईल.

जगांत जे मोठमोठे वक्ते होऊन गेले, त्या सर्वांनीं चांगलें बोलतां येण्यासाठीं ज्या पद्धतीचें अवलंबन केलें, त्या पद्धतीनें वक्तृत्व गुण संपादण्यास त्यांस पुष्कळ परिश्रम करावे लागले खरे; परंतु त्यापासून त्यांना जो अनन्वित फायदा झाला तो अवर्णनीय आहे. परंतु हाच त्यांनीं कंटाळा केला असता, तर त्यांस यश मुळींच आलें नसतें हें खचित. वुइल्यम पिट ( अर्ल ऑफ चॅथम ) याची गोष्ट अशी सांगतात कीं, त्यानें भाषाज्ञान चांगलें होण्याकरितां, व जवळ शब्दसंग्रहही पुष्कळ व्हावा ह्मणून जॉनसनच्या पूर्वी बेलीसाहेबांनीं केलेला जो प्रसिद्ध कोश होता, तो दोनदां वाचून काढला; व पुढें त्यानें आपल्या मुलालाही तसेंच करण्याचा उपदेश केला.

शब्दांचा भरणा जवळ चांगला होण्यास एका विद्वानानें एक चांगली युक्ती काढिली आहे ती अशी:—कोणतेंहि पुस्तक घेऊन त्यांतून कांहीं शब्द व वाक्यें वेगळीं काढावीं, व तसल्या अर्थाचे दुसरे निरानिराळे शब्द किंवा वाक्यें शोधून काढावीं. उदाहरणार्थ, 'मी इच्छितों,' याला 'माझा मानस आहे, माझा हेतु आहे, माझा विचार आहे,' वगैरे जितके शब्दसमुच्चय आठवतील, तितके आठवण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणें तिरस्कार, तिटकारा, कंटाळा, नावड, नाखुषी, वगैरे अनेक शब्द, व शुद्धीवर या, जागे व्हा, अंतःकरणांत उजेड पडूं द्या, डोळे, उघडा, वगैरे त्या त्या अर्थी अनेक शब्दसमुच्चयांची योजना करावी. आतां हा प्रकार अंमळ पोरकटसा दिसेल, पण त्यापासून उत्तम भाषण करतां येणार आहे.

ब्दांची योजना करण्यांत, व त्यांतही विशेषेंकरून अर्थबोध होण्याविषयीं जास्त काळजी घेतली पाहिजे.

एका व्याख्यानांत निरनिराळ्या हजार शब्दांहून जास्त शब्दांचा उपयोग करणारा वक्ता क्वचितच सांपडेल, व त्यापेक्षां जास्त शब्दांची जरूरीही पण नसते.

इंग्लंडामध्यें चांगला विद्वान् जरी कोणी झाला, तरी त्याच्या साधारण बोलण्यांत तीन चार हजारांपेक्षां जास्त शब्द असत नाहींत. जे कोणी नीट विचार करून बोलणारे असतात, व मुद्दाम आपलें मनोगत व्यक्त करून दाखविण्यास योग्य शब्द शोधून काढण्याच्या भरीस पडतात, त्यांच्यापाशीं शब्दसंग्रह पुष्कळच असतो. जे कोणी उत्तम वक्ते ह्मणून नांवाजलेले असतात, त्यांच्याजवळ दहा हजारपर्यंत देखील शब्दभांडार असूं शकेल. मिल्टन् नामक एक प्रख्यात इंग्लिश कवि होऊन गेला; त्याच्या सर्व ग्रंथांत निरनिराळे आठ हजार शब्द आहेत. तसेंच निरनिराळ्या प्रकारची शब्दरचना करण्यांत प्रसिद्धीस आलेल्या शेक्सपीयरच्या ग्रंथांत पंधरा हजारांवर शब्द असावे असें म्हणतात.

**वक्तृत्वसिद्धीस येणारीं विघ्नें.**—आतां आपण वक्त्यास कोणत्या कोणत्या अडचणी येत असतात तें पाहूं. घरगुती मंडळींत, किंवा मोठ्या जनसमूहांत वक्ता पहिल्यानेंच बोलायला उभा राहिला, ह्मणजे त्यास आपली फजीती उडेल कीं काय अशी मोठी भीति वाटत असते. याप्रमाणें, कसें होईल, काय होईल, अशी धास्ती वाटून, तीच बहुतांशीं त्याच्या अपयशास कारणभूत होत असते. आणि असें त्यास एकदां अपयश आलें, ह्मणजे मग तो नादच सोडून

द्यावा, असा सहजीं त्याच्या मनाचा कल होतो. परंतु पहिल्या वेळीं अशी अकीर्ति झाली, ह्मणून त्यानें कच खाऊन निराश होऊं नये. अशा वेळेस शेरिडॅन, रॉबर्ट हॉल आणि अर्ल ऑफ बीकन्सफील्ड यांचीं उदाहरणें नजरेपुढें आणून त्यानें चित्ताचें समाधान करीत जावें. शेरिडॅनविषयीं असें सांगतात कीं, त्यानें पार्लमेन्ट सभेमध्यें जें अगदीं प्रथम भाषण केलें, त्यांत त्याची इतकी फजीती उडाली, कीं पुन्हां त्यानें भाषण देखील करूं नये ह्मणून त्याच्या मित्रमंडळींनें त्यास पुष्कळ उपदेश केला; पण त्यानें त्यांचें ऐकलें नाहीं. तो म्हणाला, 'कांहीं होवो, वक्तृत्वगुण माझ्यांत वास करीत आहे, तेंव्हां तो कधीं तरी उदयास आल्यावांचून राहणार नाहीं, हें तुम्ही खास समजा.' तोच शेरिडॅन पुढें केवढा थोरला वक्ता झाला हें सुप्रसिद्धच आहे. रॉबर्ट हॉल ह्मणून एक मोठा विख्यात धर्मोपदेशक होऊन गेला. तोही पहिल्यानें असाच कच्चा होता, पण पुढें फार प्रख्यातीस आला. जेंव्हां त्यास अगदीं पहिल्या प्रथम देवळांत उपदेश करण्याचा प्रसंग आला, तेंव्हां तो एकदोन शब्द बोलून लागलींच थबकला, आणि शरमेनें तोंड झांकून मोठ्यानें म्हणाला, 'विसरलों हो, विसरलों, मी सर्व विसरलों; आतां मला कांहीं सुचत नाहीं.' दुसऱ्या वेळेस पहिल्याहीपेक्षां त्याची जास्त त्रेधा उडाली. लॉर्ड बीकन्सफील्डचें असेंच झालें. कॉमन्स सभेमध्यें त्याचें जें पहिलें भाषण झालें, त्यासंबंधानें तेथें मोठा हंशा पिकून मंडळीनें त्याची जी हुर्रेवडी केली, ती सर्वांस ऐकून माहीत असेलच. त्या प्रसंगीं तो खालीं बसतां बसतां ह्मणाला,

'कांहीं हरकत नाहीं, कधीं तरी मी आपलें भाषण तुह्मांस शांतपणें ऐकायला लावीन.' व त्याप्रमाणें त्यानें पुढें करूनही दाखविलें. ज्यांचा प्रसिद्धीस येण्याचा मनोनिग्रह झाला आहे, त्यांना हीं वरील महान् पुरुषांचीं उदाहरणें ऐकून जास्त हुरूप आल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

बोलण्याच्या कामांत पहिलें विघ्न ह्मटलें ह्मणजे भित्रेपणा हें होय. पण तो हळूहळू संवयीनें जातो. तो घालविण्यास प्रथम वादविवाद करणाऱ्या परिमित मंडळीमध्यें बोलण्याची सुरुवात करून, नंतर मोठ्या श्रेष्ठ समाजापुढें उभें राहण्याची संवय करावी. याप्रमाणें कांहीं दिवस करीत गेलें असतां, पुढें समोर केवढाही मोठा समाज असला, तरी न डगमगतां, स्थिर मन करून व्याख्यान देण्याची अंगीं ताकद येते. ती आली म्हणजे मग आपल्या मनांत जें कांहीं खरें अगर खोटें म्हणून वागलें असेल, त्याचा ठसा दुसऱ्याच्या अंतःकरणावर कसा बठेल, एवढीच कायती काळजी असते.

दुसऱ्या पुष्कळ किरकोळ अडचणी वक्त्यास येत असतात, त्यांपैकीं एक ही कीं बोलतां बोलतां अर्धेंच वाक्य तोंडांतून निघून, पुढें घुटमळल्यासारखें होऊन, तें वाक्य तसेंच अपुरें राहतें. अशा वेळेस जेथून संदर्भ सुटला असेल, तेथून पुन्हां भाषणास सुरुवात करावी, किंवा व्याकरणाच्या नियमाकडे लक्ष न देतां कशा तरी लटपटीनें तें वाक्य पुरें करावें. या दोहोंपैकीं दुसरा प्रकार पसंत दिसतो. कारण ह्या वेळीं श्रोत्यांचें लक्ष व्याकरणाकडे वि-

शेष नसून, वक्ता कोठें अडखळतो व घरसोडीचें भाषण करतो, हें पाहण्याकडे जास्त असतें.

**शब्दोच्चार न करतां मनांतल्या मनांत बोलणें.**—असें बोलण्याची संवय फार उत्तम. ह्यामध्यें विद्यार्थी आपल्या मनांत कांहीं एक विषय योजून त्यावर आपल्याशींच बोलत असतो; परंतु त्याच्याकडे पाहणारास, वास्तविक तो कांहीं-एक बोलत नाहीं, असें वाटत असतें.

**व्याख्यानशैली.**—ही उत्तम उत्तम मासलेवाईक उदाहरणें पाहून व त्यांचें अनुकरण करून प्राप्त होणारी आहे, हें मागेंच सांगितलें आहे. तेव्हां तिजविषयीं येथें जास्त लिहिण्याचें कारण दिसत नाहीं.

**स्मरणशक्ती वाढविणें.**—वक्त्यानें आपली स्मरण-शक्ती वाढविली असतां, तिचा त्यास जितका उपयोग होणार आहे, तितका इतर कशाचाही नाहीं. समयस्फूर्ती-च्या व्याख्यानामध्यें पूर्वी कांहींच तयारी करावयाची नसते. सर्व आयत्या वेळीं होत असतें. तरी त्यांतदेखील विषयाचा नकाशा ध्यानांत धरण्यांत स्मरणशक्तीची विशेष अवश्यकता असते. प्राचीन व अर्वाचीन काळच्या उदाहरणांवरून स्मरणशक्ती जितकी वाढवावी तितकी वाढवितां येते, असें खास सिद्ध होतें. उदाहरणार्थ, थेमिस्टॉक्लीज हा एका वर्षाच्या अभ्यासानें फारशी भाषा व्याकरणशुद्ध बोल-ण्यास शिकला. तसाच मिथ्रॅडेटस हा बावीस देशांचें राज्य हांकीत होता, व त्यास तितक्या भाषा चांगल्या अवगत होत्या. त्याचप्रमाणें सायरसचें असें सांगतात कीं

त्याच्या प्रचंड फौजेंतील प्रत्येक शिपायाचें नांवगांव वगैरे माहिती त्यास विचारून घ्यावी; ती तो खडान्खडा सांगत असे.

साधारणतः मनुष्याची स्मरणशक्ति मूळची कोती असते, असा नियम आहे. ती कोती असण्याचें कारण बहुधा असें आहे, कीं हरएक गोष्टीकडे लक्ष पुरवून आपली स्मरणशक्ती वृद्धिंगत करण्याची, व मंडळींत मिसळून त्यांच्याशीं नेहमीं दळणवळण किंवा सहवास ठेवण्याची संवय मनुष्य आपल्याला लावून घेत नाहीं. ती लागून, तो हरएक गोष्टीकडे लक्ष पुरवूं लागला, आणि मंडळींत मिसळूं लागला, ह्मणजे स्मरणशक्ति कोती आहे असें म्हणण्यास मुळींच जागा राहणार नाहीं.

**स्मरणांत ठेवणें.**—कोणताही संभाषणाचा विषय ध्यानांत धरण्याची उत्तम रीत ह्मटली ह्मणजे, त्याचे वेगवेगळे लहान भाग पाडावे; नंतर एक चांगला शिकून तयार करावा, व तो तयार झाला कीं दुसरा, दुसरा झाला, कीं तिसरा, अशा रीतीनें सर्व भाग शिकून विषय तयार करावा. न्यायशास्त्राच्या पद्धतीनें विषयाचे विभाग केले ह्मणजे ते ध्यानांत ठेवण्यास फार सोपें जातें.

पाठ करण्याचा उत्तम वेळ ह्मटला ह्मणजे रात्रीं निजावयास जाण्याच्या अगोदरचा आहे. मात्र पूर्वी जाड्य येई अशा रीतीनें जेवूं नये ह्मणजे झालें. सकाळीं उठल्याबरोबर रात्रीं पाठ केलेलें पुन्हां ध्यानांत आणून, त्यास उजळणी द्यावी. स्मरणशक्ति जागृत नसल्यानें प्रसंगविशेषीं मोठे अघोर परिणाम घडून येतात, असें खालीं दिलेल्या एका ऐतिहासिक

उदाहरणावरून वाचकांस कळून येणार आहे. एकदां लिनसेस्टीस नांवाच्या कोणा एका शिपायावर अॅलेक्झांडर बादशहाविरुद्ध फितुरी करण्याविषयीं कांहीं कट केल्याचा आरोप येऊन बादशहानें त्यास एकाएकीं कारागृहांत ठेवलें. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर त्या वेळेच्या रीतिरिवाजाप्रमाणें, त्याजवरच्या आरोपासंबंधानें त्याचें काय ह्मणणें आहे तें ऐकून घेण्याकरितां आरोपीला जेव्हां सैन्यासमोर उभें केलें, तेव्हां आरोपी लिनसेस्टीस याला आपल्यावर आलेल्या आरोपासंबंधानें जें काय सांगावयाचें होतें, तें त्यानें कारागृहांत असतां चांगलें पाठ करून ठेवलें असतांही, स्मरणशक्ति धड नसल्यानें चमत्कार असा झाला कीं, वेळेवर त्यास कांहींएक न सुचून कांपरें सुटल्या सारखें झालें, आणि तोंडांतून एक ब्रही निघेना, इतका तो भयचकित झाला होता. परंतु त्याचा असा प्रकार पाहून सभोंवतीं असलेल्या शिपायांचा भलताच समज झाला. त्यांना काय वाटलें, कीं इतके दिवस लिनसेस्टीस हा तुरुंगांत राहून त्यास आपला जबाब तयार करण्यास पुष्कळ सवड असतांही तो त्यास देतां आला नाहीं, तेव्हां त्यास तो आठवला नसेल असें ह्मणतां येत नाहीं; तर खरोखरच आपण अपराधी आहों, अशी त्याची मनोदेवता त्यास साक्ष देत असल्यानेंच तोंडांतून एक चकारशब्द काढण्यास देखिल त्याला धैर्य झालें नसावें; तेव्हां त्यानें अपराध केला हेंच खरें, अशी त्यांची चमत्कारिक समजूत होऊन त्यांनीं त्यास तत्काल आपल्या भाल्यांनीं भोंसकून यमसदनास धाडिलें.

**व्याख्यान देण्याची कला.**—ही कला वक्त्यास चांगली साधली पाहिजे. हिच्यासंबंधानें पुष्कळच सांगायाचें आहे; पण तें पुढें सांगू. प्रस्तुत वक्त्याच्या गुणांबद्दल सिसेरोचे जे विचार आहेत ते येथें देऊन हा भाग संपवितों. तो ह्मणतोः—

'वक्त्याचे अंगीं नैय्यायिकाची तीव्रता, तत्ववेत्त्याचें शहाणपण, कवीची कल्पना व त्याची भाषा, वकिलांची स्मरणशक्ति, व उत्तम नाटककारांचे अंगविक्षेप व भाषणशैली वगैरे बरेच गुण असावे लागतात. परंतु असा सर्वगुणसंपन्न वक्ता फारच दुर्मिळ. इतर कलांप्रमाणें वक्तृत्वकलेचें नाहीं. कारण इतर शाखांत निष्णात असणाऱ्या पंडितांमध्यें कांहीं गुण जरी बेताबातानें वास करीत असले तरी चालण्यासारखे असतात. परंतु तेच गुण वक्त्यामध्यें तशा प्रमाणानें असून उपयोगाचे नसतात. ते ओतप्रोत भरलेले असतील तरच तो स्तुतीस पात्र होऊन उत्तम वक्ता ह्मणून गणला जातो.'

# भाग ४ था.

## वक्तृत्वाचे प्रसंग आणि त्यांचीं स्थलें.

वक्तृत्व निरनिराळ्या प्रसंगीं त्या त्या प्रसंगास उचित असें निरनिराळ्या प्रकारचें करावें लागतें. असले प्रसंग ह्मणजे वक्तृत्व करण्याचीं स्थळें पांच मानिलीं आहेत. पहिलें, पुलपिट किंवा व्यासपीठ. येथें धर्मसंबंधी विषयांवर वादविवाद चालतात. दुसरें, न्यायासन. येथें कायद्यासंबंधाचा कोटिक्रम करण्याचें काम चालतें. तिसरें, लोकनियुक्त सभा. येथें राजकीय विषयांवर वाटाघाट चालून त्यांची भवतिनभवति होते. चवथें, सार्वजनिक जागा. ह्या ठिकाणीं सार्वजनिक हिताहिताच्या गोष्टींचा विचार होऊन बरीच चर्चा चालते. पांचवें, घरगुती प्रसंगांत आदरातिथ्य करतांना जीं बोलणीं चालतात तीं. पूर्वी वक्तृत्वाचे तीन प्रकार चालू असत. पहिला 'निंदास्तुतिपर,' दुसरा 'विषयविवेचनपर,' आणि तिसरा 'न्यायसंबंधी.' निंदापर किंवा स्तुतिपर भाषण पहिल्या प्रकारांत मोडत असे. दुसऱ्या प्रकारांत, कांहींएक गोष्ट करावी कीं न करावी, अशाबद्दल उपदेश केला जात असे. तिसऱ्या प्रकारच्या वक्तृत्वाचा उपयोग, बहुशः, एखाद्याला दोषी ठरविण्यांत, किंवा दोषमुक्त करण्याचे कामीं, होत असे. स्मशानभूमीवर होणारीं व्याख्यानें पहिल्या प्रकारच्या

वक्तृत्वपद्धतीखालीं येत, आणि समाजांत कांहीं विषयांची वाटाघाट होत असे, ती करतांनां दुसऱ्या प्रकारच्या वक्तृत्वाचा उपयोग करीत; तिसऱ्या प्रकारचें वक्तृत्व न्यायाच्या कोर्टापुढेंच फक्त होत असे; अशी पूर्वींची व्यवस्था होती, ती कांहीं वाईट नव्हती; परंतु वरीलप्रमाणें वक्तृत्वाचे पांच भाग केल्यानें जास्त स्पष्टता होऊन, सहज समजूत पडण्यासारखी आहे. वर ज्या वतृक्त्वाच्या जाती केल्या आहेत, त्या प्रत्येकीस निरानिराळी पद्धति आहे. त्या पद्धतींचें स्वरूप कळणें अगदीं अवश्य आहे. प्रधानाच्या बोलण्याहून वकिलाचें बोलणें कांहीं निराळेंच असतें; आणि त्याहीपेक्षां मुत्सद्याचें भाषण तर फारच भिन्न.

**पुलपिट ( व्यासपीठ ).**—धर्मसंबंधी व्याख्यानें देतांनां वक्त्यास किती अडचणी सोसाव्या लागतात याचा आपण येथें विचार करूं. धर्मसंबंधी व्याख्यान ह्मणजे नेहमीं आपण बोलतों तसें बोलणें, असा लोकांचा साधारण समज झालेला असतो. परंतु वाचकांनीं हें लक्षांत आणलें पाहिजे, कीं वकील किंवा मुत्सद्दी यांना बोलण्यास नेहमीं ताजे विषय मिळत असतात, यामुळें त्यांच्या मनांत प्रत्येक खेपेस नवीन नवीन विचार सुचण्यास जागा असते. त्यांत त्यांना थोडेंसें भाषाज्ञान असून, आपले विचार प्रकट करण्याचें अंगीं सामर्थ्य असलें, ह्मणजे मग त्यांना दुसरी कांहीं तयारी करावी लागत नाहीं. असें जरी आहे, तरी देखील त्यांना नेहमीं तोच तो विषय दिला, आणि पूर्वींचीच मंडळी ऐकायला असली, ह्मणजे पूर्वींप्रमाणें मंडळीच्या मनावर ठसा उमटविण्यास नवीनच आधार आणि

दाखले द्यावे लागतात. त्याशिवाय त्यांचें भाषण पूर्वीप्रमाणें चटकदार आणि वजन पडण्यासारखें होत नाहीं. तसा प्रकार धर्मोपदेशकांचा नाहीं. धर्मसंबंधी उपदेश करण्याचा त्यांचा धंदाच पडल्यानें, त्यांच्या व्याख्यानाचा नेहमीं एकच एक विषय असतो, व त्यांत तेच ते विचार पुनः पुनः येत असतात. जों जों ते आपला इष्ट हेतु साधण्याची खटपट करूं पाहतात, तों तों त्यांस आपल्या जवळ असलेली सामग्री फार अपुरी आहे असें पाहून फार वाईट वाटतें. आपली पुंजी होती तेवढी आपण श्रोतृमंडळीपुढें ओतली आहे, परंतु सत्याविषयींची त्यांच्या मनाची खात्री पटण्यास तेवढी बस होणार नाहीं, त्यांच्या हृदयांत सत्याचा उजेड पाडण्यास ह्या वेळेस आपल्या अंगीं कांहीं अद्वितीय विचारशक्ति असावयाला पाहिजे होती, तसेंच तें सत्य त्यांच्या निदर्शनास आणून देण्यास कांहीं प्रत्यक्ष प्रमाणें दाखविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं असलें पाहिजे होतें, कारण तसें केल्याशिवाय लोकांस आपला खरेपणा वाटणार नाहीं, व त्यांची खात्रीही पण व्हावयाची नाहीं, असें त्यांस राहून राहून वाटत असतें.

तथापि एवढें खरें आहे, कीं जर एखादा धर्मोपदेशक ह्मणेल, कीं मी किरकोळ मंडळीसमोर कांहींएक तयारी न करितां जसें धर्मपर व्याख्यान देऊं शकेन, तसें विद्वान लोकांपुढेंही देईन, तर त्याचें ह्मणणें बिलकुल शोभणार नाहीं. त्याची ती तयारी पाहून, तो विद्वत्समूह खरोखर संतापून जाईल, व त्याची पुष्कळ निर्भर्त्सना करील.

धर्मोपदेशकाचें काम, लोकांची खात्री करून देण्यापेक्षां विशेषेंकरून त्यांचें मन वळविण्याचें असल्यामुळें त्यानें त्यांच्या विचारशक्तीशीं न बोलतां, मनोवृत्तीशीं बोलत असावें. ह्मणजे असें कीं त्यांना फारसें विचारांत गुंतूं न देतां, त्यांचे मनोधर्म जेणेंकरून आपल्या बाजूस वळतील असें करावें. त्याच्या भाषणांत प्रौढता, थोडासा आवेश, आणि खरी कळकळ, किंवा उत्साह हे गुण असले पाहिजेत. धर्मसंबंधी विषयाचें महत्व फार मोठें असल्याकारणानें त्याचें प्रतिपादनही गंभीरपणानेंच झालें पाहिजे; व मोठ्या आस्थेनें त्या विषयाचें महत्व लोकांस कळवून दिलें पाहिजे. परंतु इतक्या गोष्टींचें धोरण ठेवून भाषण करणें, ह्मणजे साधारण काम नाहीं. कारण गंभीरपणाचें जरा जास्त प्राबल्य झालें कीं तेथें स्थिरता आणि ढिलाई आलीच. तसेंच ज्यांत आवेश व कळकळ आहे परंतु गंभीरपणाचा अभाव आहे तें भाषण निव्वळ नाटकवजाच भासणार, अशी मोठी पंचाईत असते. याकरितां आपल्या भाषणाच्या जुळणींत, व तसेंच तें करण्यात, गंभीरपणा, आवेश, आस्था, वगैरे अवश्य लागणारे गुण एकसमयावच्छेदेंकरून दिसण्यांत येतील, असें करण्याविषयीं धर्मोपदेशकानें विशेष काळजी घेतली पाहिजे. यासंबंधानें क्लेअरसाहेबांनीं कांहीं नियम घालून दिले आहेत, ते आह्मी सारांशरूपानें खालीं देतों.

नियम १. कोणता तरी एक मुख्य विषय धरून त्यावर व्याख्यान देत जावें; अनेक विषयांचा एका व्याख्यानांत समावेश करूं नये.

२. विषय जितका मर्यादितपणें प्रतिपादन केला जाईल, तितकें लोकांच्या मनावर त्याचा चांगला ठसा उमटाविण्यास सोपें पडेल.

३. मनांत आलेले सर्व विचार एकदम सांगून टाकूं नये. ते एकदम बोलून दाखविणें ही चूक आहे. कारण त्या योगानें वक्त्याचा घोंटाळा होऊन, भाषणाचाही जोर कमी होतो.

४. जें सांगावयाचें तें गोड आणि सुरस अशा शब्दांनीं सांगावें, ह्मणजे त्यापासून आपल्या भाषणाला रंग येऊन, श्रोत्यांना उपदेशाचा उपदेश होतो आणि त्यांचें मनरंजनही होतें.

५. अलीकडे लोकांना अमुक एक पद्धत आवडूं लागली आहे, तेव्हां तीच आपण घ्यावी, असें कधीं करूं नये. त्यांचाच कित्ता वळवून उपयोगी नाहीं. कारण असल्या पद्धती ह्मणजे आळवावरच्या पाण्यासारख्या असतात. त्या आज आहेत, उद्यां नाहींत. लोकांची अभिरुचि घटकोघटकीं बदलत असते. त्या आज आवडत आहेत खऱ्या, परंतु उद्यां त्याच बहुमतानें नापसंत ठरल्या, कीं गेल्या उपयोगांतून! कधीं कधीं लोकांना काव्यधाटी आवडते, कधीं तत्वज्ञानप्रचुर व्याख्यानाची हौस वाटते; केव्हां केव्हां हृदयद्रावक व्याख्यानाची गोडी असते; केव्हां वादविवादप्रधान विषय पसंत पडतो. अशी त्यांची भिन्न वेळीं भिन्न प्रकारची अभिरुचि असते. ह्या सर्व पद्धती परमावधीस गेल्या असतां त्या दूषणार्ह होतात. तेव्हां जे कोणी

ह्या पद्धती स्वीकारण्याच्या नादीं लागतील, ते आपल्या बुद्धीवर व्यर्थ ओझें लादून तिचा नाश मात्र करून घेतील, यांत संशय नाहीं.

उपदेशकांनीं उपदेश करावयाचा तो पद्धतवार करण्यास शिकलें पाहिजे. त्यांच्या अंगीं समयोचितपणा असावा; आवेशाचा अविर्भाव असावा; वाणी मधुर असून स्मरणशक्ति चांगली असावी; पर्यवसान केव्हां करावयाचें याचें धोरण असावें; तसेंच आपलीं मतें खरीं आहेत, अशी त्यांची त्यांस खात्री झालेली असावी. एकंदरींत या कामीं त्यांनीं जीव तोडून मेहनत केली पाहिजे. तसेंच कोणी थट्टा करो, किंवा निंदा करो, ती सर्व निमूटपणें सहन करण्यास त्यांनीं शिकलें पाहिजे.

व्याख्यानाचें लांबच लांब चऱ्हाट वळून श्रोत्यांस तें कंटाळवाणें होईल असें करूं नये; कारण असलें व्याख्यान ऐकण्याचा त्यांस मुळींच उल्हास नसतो, त्यांत तें कंटाळवाणें झालें ह्मणजे मग, 'आधींच हौस आणि त्यांत पाऊस' या ह्मणीप्रमाणें होतें; व बोलणाराचाही त्यामुळें कार्यभाग होत नसतो. श्रोत्यांच्या मनाची स्थिती पाहून त्याप्रमाणें उपदेश करीत जावें. पुष्कळांना हें तत्व कळत नसतें. अशांच्या उपदेशाचा परिणाम साध्या भोळ्या मंडळीवर मुळींच घडत नसतो. सरळ आणि सुरस अशा भाषेनें उपदेश करणें फार कुशलतेचें काम आहे. आपण जसें घरीं बोलतों, तशा प्रकारच्या साध्या भाषेत उपदेश केला असतां, तो चांगला वठतो. चांगलें व्याख्यान देतां येण्यांत मोठें महत्व व भूषण आहे. परंतु असें व्याख्यान

देणारे फारच थोडे उपदेशक आढळतात. उपदेशकानें आपल्या भाषणांत एकच एक सूर काढूं नये. कित्येकांना गोरेंमोरें तोंड करून स्फुंदत स्फुंदत बोलण्याची खोड असते, परंतु ती चांगली नाहीं; कारण व्यासपीठासारख्या ठिकाणीं धर्मासारख्या पवित्र विषयावर बोलतांनां अशा स्वैरचेष्टा करणें किती अप्रशस्त होणार आहे याचा वाचकांनींच विचार करावा.

**वकिली.**—वादविवाद करणाऱ्या मंडळीच्या सभेमध्यें जी भाषणपद्धति प्रशस्त मानिली जाते, तिचा न्यायाच्या कोर्टांत बोलतांनां उपयोग करणें फार गैर आहे. तिचें त्या ठिकाणीं अवलंबन करणारास अपयश आणि कमीपणा हीं हटकून येणारच. वकिलानें त्या पद्धतीचा अंगीकार केला, कीं त्याचा सर्वस्वी नाश झालाच ह्मणायचा. फार नको, सुमारें सहा महिनेपर्यंत सतत जर त्यानें न्यायाधीशासमोर ह्या पद्धतीनें बोलण्याची सुरुवात केली, तर तिच्या पायीं त्याच्या माथ्यावर अपयशाचें खापर फुटून, आमरण त्यास दोम दोम करीत फिरावें लागेल, यांत तिळमात्र संदेह नाहीं. याकरितां अशी ही घातक संवय ज्यांच्या अंगवळणीं पडून खिळत चालली असेल, त्यांनीं ती समूळ दवडण्याचा प्रथम प्रयत्न करावा. वकिलाचें भाषण ह्मणजे अगदीं साधें, स्पष्ट आणि प्रचारांतलें असावें, कीं तें ऐकतांक्षणींच ऐकणाराच्या अंतःकरणांत चक्क खासा उजेड पडावा. आपण एकमेकांशीं ज्याप्रमाणें साधारणपणें बोलत असतों, तद्वत् वकिलाचें भाषण असावें. न्यायासनापुढें वाक्पांडित्य केलें तर त्यानें त्याचें हंसें होणार आहे.

दुसरी एक विशेष महत्वाची गोष्ट वकिलानें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं आपल्याला जूरीचें मन वळवून न्यायाधीशाचीही खात्री करून दिली पाहिजे, तेव्हां ह्या गोष्टी जेणेंकरून साधतील, असें सयुक्तिक भाषण आपल्याकडून झालें पाहिजे, तरच भाषणाचा उपयोग होणार आहे.

जूरींत असलेल्या लोकांना न समजण्यासारख्या भाषेंत बोलणारे पुष्कळ वकील दृष्टीस पडतात. परंतु असें दुर्बोध भाषण करणें ही त्यांची मोठी चूक समजली पाहिजे. वास्तविक म्हटलें तर जूरीमध्यें सर्वांत कमी शिकलेला जो कोणी असेल, त्याची समजूत होईल अशा भाषेचा तेथें करवेल तितका उपयोग केला पाहिजे. जूरीला उद्देशून जें बोलावयाचें तें सरळ व सोप्या भाषेंत, आणि हास्यमुख करून बोलत जावें; व आपला पक्ष सबल आहे असें दर्शित करण्यास नेहमीं झटावें. विद्वान् लोकांची जूरी असेल तेव्हां मात्र भाषण मोठें खुबीचें, जोरदार आणि विचाराचें व्हावें लागतें. परंतु येथें हें अवश्य सांगितलें पाहिजे, कीं कशाही लोकांची जूरी असो, विद्वानांची असो, किंवा गैरविद्वानांची असो, वाजवीपेक्षां जास्त बोलून तिला कंटाळा येईल असें कधीं करूं नये. जूरीला कंटाळा आला आहे असें दिसून आलें, कीं लागलीच आपल्याला जरी जास्त कांहीं सांगावयाचें असलें, तरी तें न सांगतां आपलें बोलणें आंखडतें घेऊन खालीं बसावें. यांतच शहाणपणा विशेष आहे. कारण असें जर न केलें, तर आपलें मागचें पुढचें सर्व बोलणें व्यर्थ

जाऊन, आपल्या पक्षासंबंधानें यदाकदाचित् जूरीचा अनुकूल असा ग्रह झाला असला, तर तोहि नाहींसा होईल; आणि मग आपला मूर्खपणा आपल्यास भोंवून, विनाकारण अपयश घेऊन घरीं परत यावें लागेल.

न्यायाधिकारी लोकांसमोर बोलतांनां निराळ्या प्रकारची, ह्मणजे विद्वान् व विचारी लोकांस पटेल अशी, पद्धत स्वीकारली पाहिजे. आपले विचार व आपलें भाषण अगदीं मर्यादशील असून त्याची सरणी न्यायशास्त्ररीतीला धरून असावी. बोलण्याच्या इतर रीतीभातींकडेही दुर्लक्ष करितां कामा नये. सभ्य रीतीनें कसें बोलावें हें ज्याला ठाऊक नसेल, अशाचेंही बोलणें न्यायाधीश ऐकतो, नाहीं असें नाहीं. परंतु बोलण्याच्या चालीरीती माहीत असलेल्या मनुष्याची गोष्ट कांहीं निराळीच आहे. त्याच्या गौरवयुक्त भाषणानें न्यायाधीशाच्या मनावर जसें वजन पडेल, तसें इतर मनुष्याच्या रीत सोडून बोलण्यानें पडणार नाहीं, हें निर्विवाद आहे. चांगल्या भाषणाचा परिणामही चांगलाच व्हावयाचा. लोकसमाजांत होणाऱ्या भाषणापेक्षां, वकील या नात्यानें न्यायाधीशापुढें होणारें आपलें भाषण फार सौम्य, मर्यादशील व शुद्ध रीतीचें असावें लागतें. ही गोष्ट मनांत आणून व्लेअरसाहेबांनीं होतकरू वकिलांस उपदेशरूपानें पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या आहेत, त्या येथें देणें इष्ट वाटल्यावरून खालीं दिल्या आहेत, तिकडे वाचक लक्ष पुरवितील अशी उमेद आहे. ते ह्मणतात—'न्याय व इनसाफसंबंधानें पूर्वींच्या लोकांची जी वक्तृत्वपद्धति होती तिचें अनुकरण हल्लीं अगदीं करूं नये. सिसेरो,

डिमॉस्थेनीस यांचा देखील त्या कामांत कित्ता घेणें हल्लींच्या प्रसंगास उचित होणार नाहीं. कारण हल्लीं ज्याप्रमाणें लोकसमाजांत व्याख्यान दिलें जातें, तशाच मासल्याचें व्याख्यान ग्रीस व रोम येथील न्यायासनांपुढें करण्याचा प्राचीनकाळीं रिवाज होता. तशा पद्धतीनें भाषणें न करण्याचीं मुख्य दोन कारणें आहेत.

इनसाफ करण्याचे कामीं हल्लीं जसें कायद्याकडे लक्ष पोंचविलें जात आहे, तसें पूर्वींच्या काळीं नव्हतें. डिमॉस्थेनीज आणि सिसेरो ह्यांचे वेळीं व्यवहारसंबंधाचे स्थानिक कायदे फारच थोडे असतील, किंबहुना नव्हतेच असें ह्मटलें असतां चालेल; आणि जे होते ते स्थूल मानाचे, अगदीं ठोकळ आणि साधे असे होते. तेव्हां न्यायाधीश खटल्याचा निकाल फक्त समता व तारतम्य यांस धरून बहुधा करीत. ह्या कारणामुळें वकील लोकांचें लक्ष, कायदेकानू, लोकांच्या रीतीभाती, व त्यांचे हक्क ह्यांविषयींचें ज्ञान करून घेण्याकडे विशेष नसून, केवळ वक्तृत्वविषयाकडे फार असे. सिसेरोनें एके ठिकाणीं असें देखील ह्मटलें आहे, कीं ‘ मनुष्यास कायद्याचें ज्ञान चांगलें होण्यास तीन महिने अगदीं बस होणार आहेत. इतकेंच नाहीं, तर ज्यास कायद्याचा नुसता गंधही नाहीं असा मनुष्य वकिलीचें काम बिनदिक्कत चांगलें करूं शकेल. ’ ह्यावरूनच त्या काळीं चालू असलेल्या कायद्यांच्या संख्येचें अनुमान होणार आहे. ह्याचें कारण असें कीं त्या काळीं रोमन लोकांमध्यें एक ठराविक मंडळी असे, व ह्या थोड्याशा मंडळीला मात्र त्या वेळच्या कायदे-

कानूंचें ज्ञान असे, व जो कोणी चांगला वक्ता होऊन वकिली करावयाला लागे, त्यास त्याच्या खटल्यासंबंधानें लागणारी कायद्याची माहिती ही मंडळी देत असत. अशी माहिती मिळाल्यावर त्याला काय करावयाचें राहिलें? फक्त तिला वक्तृत्वाचीं एक दोन पुटें काय द्यावयाचीं तीं देऊन, न्यायाधीशाचें मन वळवून तो आपलें काम करून घेत असे. दुसरें असें कीं ग्रीस व रोम येथें दिवाणी आणि फौजदारी काम चालविणाऱ्या न्यायाधीशांची संख्या त्या काळीं हल्लीं आपल्या इकडे आहे त्यापेक्षां फार जास्त होती. ज्या वेळीं सॉक्रेटिस याजवर कांहीं आरोप येऊन, न्यायाचे कोर्टासमोर त्याची चौकशी सुरू झाली, त्या वेळीं त्याच्याविरुद्ध मत देणारे न्यायाधीश दोनशेंऐशीं होते, यावरून एकंदर न्याय देणारी मंडळी किती असेल हें लक्षांत आणा. अशी त्या काळची स्थिति असे, ह्मणूनच रोमन वक्त्यांस आपल्या वाक्चातुर्यानें न्यायाधीशांस वश करून घेऊन, काम करून घ्यावें लागत असे. ते आपली गरीबी दाखवून, रडून भेंकून, कसेंही ह्मणा, न्यायाधीशाला द्रव आणून आपला कार्यभाग उरकून घेत. प्रसंग पड-ल्यास जे प्रकार आपण हल्लीं नाटकी असे मानतों, ते करून ह्मणजे आरोपीस दुःखप्रदर्शक पोषाख देऊन, कोर्टापुढें उभे करीत. त्याचीं चिलींपिलीं, बायकापोरें, गणगोत यच्चयावत् सर्व मंडळी तेथें येऊन, दीन स्वरानें न्यायाधीशांची करुणा भाकीत. मग त्यांचें चित्त कां न द्रवेल? खाईन खाईन करीत असलेल्या मोठ्या पाषाण-हृदयी मनुष्यास देखील, त्यांचा तो आक्रोश आणि दीन

मुद्रा पाहून, प्रेमपाझर सुटल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां त्या विचारी व सदय अंतःकरणाच्या रोमन व ग्रीक न्यायाधीशांस द्रव येत नसेल, असें कोण ह्मणेल ?

असो. अशा रीतीनें वकील लोक आपआपल्या तर्फे प्राचीन काळीं निकाल करून घेत.

स्वपक्षसमर्थनार्थ जें भाषण करावयाचें, त्यामध्यें खरी कळकळ आणि थोडासा तरी आवेश दिसून आला पाहिजे. समाजापुढें बोलतांनां आवेश साहजिक येतोच; परंतु जूरी-समोर किंवा न्यायाच्या कोर्टापुढें भाषण करतांनां देखील तितकाच आवेश आणि उत्कंठा हीं प्रदर्शित झालीं पाहिजेत; ह्मणजे त्यायोगानें जूरीचें आणि न्यायाधीशाचें मन लवकर वळणार आहे. वकील ह्मणजे साक्षात् कूळच ह्मटला पाहिजे. कुळाची नफानुकसानी सर्व वकिलाच्या शिरावर असते. तो कुळाच्या वतीनें उभा राहत असतो. तेव्हां तो जर कुळाप्रमाणें हातीं घेतलेल्या कामांत उत्साहबुद्धी न दाखवितां, औदासीन्य प्रकट करील, तर त्यास यश ह्मणून कधींच येणार नाहीं; व त्यामुळें त्याचा धंदा अगदींच बसून जाईल. कारण त्याची ती अनास्था पाहून कुळेंही त्याच्याकडे कामें नेण्याचें बंद करितील.

राज्यकारस्थानी मंडळीच्या भाषणांत दांभिकपणा नसावा. त्यांचें भाषण अस्खलित निघून, तारतम्यास धरून असलें, ह्मणजे पुरे असतें.

पार्लमेन्टसारख्या सभेमध्यें वक्तृत्व करण्याचे प्रसंग फारच थोडे येतात. तथापि खऱ्या गोष्टीच्या प्रतिपादनार्थ तेथें तारतम्याची जरूर विशेष असते. एकंदरींत अशा सभांमध्यें

बोलण्याचा मुख्य हेतु सभासदांचें मन वळविणें हा असतो. तेव्हां तो साधेल अशी पद्धत त्या ठिकाणीं योजिली पाहिजे.

**प्लॅटफॉर्म** (लौकिक कृत्यांच्या विचारार्थ सार्वजनिक स्थळें.)— ह्या ठिकाणीं जनसमूहास उद्देशून व्याख्यान देण्याचा प्रघात असून तेथें सर्व प्रकारचीं भाषणें होतात. पार्लमेंटचा सभासद आपल्या मतदार लोकांस जें व्याख्यान देतो तें त्याचप्रमाणें राज्यकारस्थानसंबंधानें चळवळ करणारी मंडळी ज्या रीतीनें आपलीं मतें प्रगट करतात ती, आणि ज्या व्याख्यानांमध्यें लोकमताकडे दाद मागितली जात असून, सर्व लोकांची मनें आपणाकडे वळवून घेण्याचा वक्त्याचा प्रयत्न असतो, तीं सर्व व्याख्यानें प्लॅटफॉर्मवर होत असतात. असलीं व्याख्यानें ऐकणारा श्रोतृसमाज तरी कसा असला पाहिजे, त्याच्यासंबंधानें वक्त्याचा समज कसा असावा, कशा रीतीनें अशा समाजावर त्याचें वजन पडेल, वगैरे गोष्टींचें दिग्दर्शन पुढें केलें आहे. अशा ठिकाणीं कशा प्रकारें व्याख्यान द्यावें, हें मात्र येथें सांगितलें आहे. प्लॅटफॉर्मवर जें व्याख्यान द्यावयाचें तें साधें परंतु जोरदार असें असावें. नेहमींच्या प्रचारांत जे शब्द, व जीं उदाहरणें आपण योजतों, तींच येथें उपयोगांत आणावीं; वक्त्याच्या मनांतील विचार कसेही असोत, ते व्यक्त करून दाखवितेवेळीं आबालवृद्धांस कळेल अशा भाषेंत ते सांगावे. विचार पोक्त व शहाणपणाचे असावे; व ते साधारण लोक जसे बोलतात तसें बोलून प्रकट करावे; परंतु बोलतांना तोंडांतून सहज रानवट किंवा अश्लील शब्द न निघतील, अशाबद्दल फार खबर-

दारी ठेवावी. निरनिराळे कल्पनातरंग चालवून व रूपकादि अलंकार योजून, भाषेला शोभा आणली असतां, श्रोत्यांचें चित्त वेधण्यास सुलभ जातें खरें. परंतु कोठेंही पहा, 'अति सर्वत्र वर्जयेत्,' हें वाक्य खरें ठरतें. सर्वत्र अलंकारांनीं भरलेलें भाषण नुसतें भपकेदार दिसतें मात्र; बाकी परिणामीं गोड नसतें. असें ज्याचें भाषण असतें, त्याचा लोक उलट उपहास करतात; व तो त्यांच्या मर्जीतून तेव्हांच उतरतो. समाजव्याख्यानामध्यें श्रोत्यांच्या मनोवृत्तींचें उद्दीपन करण्यांत जो फायदा आहे, तो त्यांच्याशीं बुद्धिवाद करण्यांत नाहीं, ही गोष्ट वाचकांनीं पक्की लक्षांत ठेवावी. त्याचप्रमाणें वक्त्याच्या भाषणांत थोडासा विनोदही असावा, ह्मणजे त्या योगानें तो सर्व मंडळीला हंसवून सोडील, व व्याख्यानाला चांगला रंगही येईल.

समाजव्याख्यानाचा उत्तम मासला पाहणें असल्यास, वाचकांनीं शेक्स्पीयरच्या जूलियस सीझर नामक नाटकांतील ऍन्टनी आणि ब्रूटस यांचीं रोमन लोकांस उद्देशून झालेलीं भाषणें वाचावीं, अशी आमची त्यांस फार शिफारस आहे. हीं भाषणें नुसतीं उत्तम आहेत, इतकेंच नव्हे तर तीं आज मित्तीस अगदीं जगमान्य होऊन बसलीं आहेत.

**बहुमानार्थ भाषणें.**—शिष्टादिकांचा आदरपूर्वक सन्मान करते वेळीं जें भाषण करावयाचें, तें गौरवून गोड असें झालें पाहिजे. आतां ही एक प्रकारची हांजीहांजीच आहे. परंतु ती करतां येणें देखील थोडेंसें कठिण काम आहे. ती गैरशिस्त आणि दांभिक अशी न दिसूं देणें, हेंच मुख्य कठिण काम आहे.

## भाग ५ वा.

# व्याख्यानाची शैली, आणि त्याची जुळणी.

व्याख्याता वक्त्याच्या मनांतून इतरांस जें काय सांगावयाचें तें त्याचें त्यास समजलें आहे असें गृहीत धरून, त्याच्या भाषणाची शैली आणि जुळणी कशी असावी, याचा आतां आपणास येथें विचार करणें आहे. तेव्हां त्याविषयीं प्रथम स्थूलमानानें सांगून नंतर भागाभागाचा विचार करूं.

**हेत्वैक्य.**—मोठमोठे ग्रंथकार देखील कबूल करतात, कीं विषयामध्यें मुख्य मुद्दा म्हटला ह्मणजे अव्वलपासून अखेरपर्यंत एक हेतु कायम ठेवणें हा आहे. तो हेतु आपल्या सर्व भाषणाचा मध्यबिंदू कल्पून, त्यास धरून व्याख्यानचक्रांतील सर्व विचार असावे; किंवा दुसऱ्या तऱ्हेनें म्हटलें तर, त्या भाषणापासून कांहीं तरी एक 'इतिकर्तव्यता' सिद्ध झाली पाहिजे, व आपल्या मुखांतून जे शब्द किंवा वाक्यें निघतील, तीं इतिकर्तव्यतेचीं द्योतक असलीं पाहिजेत, ह्मणजे त्यांपासून ऐकणारास आपल्या मुख्य हेतूचा बोध झाला पाहिजे. भाषणामध्यें वाजवीपेक्षां फाजील कांहींएक नसावें; ह्मणजे व्याख्यानाची अशा प्रकारची जुळणी असावी, कीं तींतील एखादा भाग चुकून सुटून गेला, कीं सर्व विषयाचा बिघाड होऊन जावा. अशा प्र-

कारची विषयाची जुळणी असली ह्मणजे तींत शेवटपर्यंत हेतूचें ऐक्य राहतें. ज्यानें मुख्य हेतु साधण्यासारखा नसतो, असा भाषणाचा कांहीं भाग असेल, तर तो मुळींच वर्ज्य करावा, असें सिसेरोचें ह्मणणें आहे. परंतु पुष्कळ वक्त्यांचें भाषण ह्या नियमास धरून नसतें. त्यांची व्याख्यानसरणी अशी कांहीं चमत्कारिक असते, कीं तीवरून त्यांच्या मनांतील मुख्य उद्देश मुळींच कळून येत नसतो. अर्थात् त्यांच्या मनांत कांहीं हेतु असल्याखेरीज ते बोलत नसतील हें उघड आहे; पण तो हेतु लोकांपुढें मांडतांना ते इतक्या कांहीं निरर्थक आणि अप्रासंगिक गोष्टी निवेदन करीत बसतात, कीं त्यायोगानें त्यांचा हेतु झांकला जाऊन, श्रोत्यांस कळेनासा होतो.

**सरणी** किंवा **जुळणी**.—हेतू प्रकट करण्याकरितां जें सांगावयाचें त्याचा त्या हेतूशीं संबंध असून, तें विचाराचें असावें, इतकेंच नव्हे, तर तें योग्य ठिकाणीं सांगावें, भलत्याच ठिकाणीं सांगू नये. आणि एवढ्याचकरितां विषयाची जुळणी चांगल्या प्रकारची झाली पाहिजे असते. ती न झाल्यानें गलबतास सुकाणूं नसलें, ह्मणजे तें जसें भलतीकडे भटकत जातें, तसा वक्ता अगदीं गोंधळून जाऊन, विषय सोडून भलतेंच बोलत बसतो. त्याच्या त्या बोलण्यांत पूर्वापर संबंध मुळींच राहत नाहीं. अंधाऱ्या रात्रीं अपरिचित प्रदेशांत प्रवासी गेला असतां ज्या दिशेला वास्तविक जावयाचें, ती दिशा माहीत नसल्यानें जिकडे वाट फुटेल तिकडे ज्याप्रमाणें तो जातो आणि फसतो, तद्वत् आमच्या या वरील वक्त्याची स्थिति होऊन जात

असते. याच्या स्पष्टीकरणार्थ ॲडिसन यानें आपल्या स्पेक्टेटर नामक ग्रंथांत एक लेख लिहिलेला आढळतो, त्याचा उतारा खालीं मराठींत दिला आहे. त्यानें हा लेख वक्तृत्वविषयासंबंधानेंच जरी केवळ लिहिलेला नसला, तरी त्यांतील बराच भाग आपल्या प्रस्तुत विषयास चांगला लागू पडत आहे; याकरितां त्याकडे विद्यार्थ्यानें अवश्य लक्ष पुरवावें, असें आमचें त्यास अगत्यानें सांगणें आहे. तो म्हणतो:—'विषयामध्यें अनियमितपणा किंवा अव्यवस्था असलेली जाड्या विद्वानांसच शोभते. कारण त्यांचें ज्ञान-भांडार इतकें ओतप्रोत भरलेलें असतें, कीं त्यांच्यानें ते नियम सहसा पाळले जात नाहींत; आणि ह्मणूनच ते आपलीं मुक्ताफळें मालारूपानें सूत्रांत ग्रथित करून ती माला वाचकांस अर्पण करण्याच्या भरीस न पडतां, त्यांच्या राशीच्या राशी जशाच्या तशाच त्यांच्यापुढें ओततात. यामुळें त्यांच्यांत पद्धतीची उणीव अशी दिसून येत नाहीं. लिहिण्याच्या कामांत काय, किंवा बोलण्याच्या कामांत काय, पद्धत ही एक अजब चीज आहे. बोलणारास व लिहिणारास, दोघांनाही एक पद्धत धरून चालल्यास विशेष फायदा आहे. लिहिण्यांत कांहीं एक पद्धत ठेवल्यापासून ग्रंथकारास नवीननवीन कल्पना आणि युक्ती लढविण्यास मोठें साहाय्य होतें. व्याख्यानविषयाचा नकाशा तयार करून ठेवला, ह्मणजे प्रत्येक बाबतींत त्याला जसे विचार सुचूं लागतात, तसे तो विषयाचा स्थूलमानानें विचार करूं लागला असतां सुचत नाहींत. शिवाय ह्या वेळेस त्याचे विचार एकामागून एक प्रौढ निघत असतात, व ते योग्य

ठिकाणीं सांगितल्यानें त्यांपासून अर्थबोध चांगला होऊन वाचकांस त्यांतील मर्म किंवा खुबी कळते, तशी ते व्यवस्थेशीर जुळणी न करतां सांगितल्यानें कळत नाहीं. त्यांचा सर्व घोंटाळा होऊन अर्थ दुर्बोध होतो; आणि जेथें जें वाक्य घालावयाचें, तेथें तें न घातल्यानें वाचकांस तें न कळून त्यांच्या मनाचा अगदीं घोंटाळा होऊन जातो. चित्रामध्यें योग्य ठिकाणीं योग्य रंग भरल्यानें त्यास जशी शोभा येऊन, तें फार खुबीदार दिसतें, तद्वत् विषयांत पद्धत ठेविल्यानें, त्यांतील प्रत्येक विचार मोठा सुंदर आणि खुबीदार असा दिसतो. वाचणारा आणि बोलणारा यांनाही लिहिणाराप्रमाणेंच एक पद्धत ठेवल्यापासून फायदा आहे. विषयरचना चांगली झाली असली, ह्मणजे वाचकाची लवकर समजूत पटून, आनंदानें त्यांतील गोष्टी ग्रहण करण्यास तो तयार असतो, व त्या पुष्कळ दिवसपर्यंत त्याच्या स्मरणांत जशाच्या तशा कायम राहतात. लिहिण्याला जशी पद्धत अवश्यक आहे, तशी बोलण्यालाही आहे. बोलणाराचा मात्र, आपलें बोलणें लोकांना कळावें, असा हेतु असला पाहिजे. चहाकॉफी घेण्याचे गृहामध्यें माझी रोज एक खेप होत असते. तेथें हजारों प्रकारचे वादविवाद चालतांनां मी पाहतों, परंतु माझ्या देशबांधवांमध्यें मला पद्धत ह्मणून कांहीं आढळून आली नाहीं, ही त्यांच्यांत मोठी उणीव आहे. राजकीय विषयांची चर्चा ज्या ठिकाणीं चालते, तेथेंही ज्याची पद्धतवार सुव्यवस्थित चर्चा चालू आहे, असा फार काय पण दहांत एकदेखील विषय सांपडणें मुष्कील पडतें! तेथें कशींबशीं पहिलीं तीन

वाक्यें, विषयास धरून आणि संगतवार अशीं, फार झालें तर निघत असतील, पुढें सर्व विचकाच; पद्धत सुटून पुष्कळ असंबद्ध भाषण तेथें चालत असतें. तेथील तसा प्रकार पाहून मला कटलफिश नांवाच्या माशाची आठवण होते. तो, आपण सुटत नाहीं असें पाहून, सभोंवतालीं असलेलें पाणी हालवूनहालवून अगदीं गढूळ करून टाकतो, ह्मणजे तो मुळींच दिसेनासा होतो. ज्या मनुष्याला आपले विचार शिस्तवार सांगतां येत नाहींत, त्याला त्याची नुसती बडबड पाहून 'रिकामें पांडित्य; पानें रग्गड आहेत, पण फळ कोठें ?' असें लोकांकडून ह्मणून घ्यावें लागतें. बोलण्यांत असंबद्धता होऊं लागली, ह्मणजे वक्त्याच्या मुख्य विषयाचें अनुमान श्रोत्यांस करतां येत नसतें. मूळांत पद्धत ठेविली नसल्यानें मुख्य विषय एकीकडेस राहून, वक्ता भलतेंच बरळूं लागतो.'

भाषेची पद्धत किंवा शैली आपल्या योग्यतेला व आपले जे श्रोते असतील त्यांच्या मोठेपणाला शोभेल, आणि जेणेंकरून आपला इच्छित मनोरथ प्राप्त होईल, अशी हरएक वक्त्यानें नेहमीं धरीत जावी, हें सयुक्तिक दिसतें. पण पुष्कळ वक्ते ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात, हें चांगलें नाहीं. वाक्याची ओढाताण करून, कृत्रिम रीतीनें तें चांगलें दिसण्याचा कधींहीं प्रयत्न करूं नये. आपण आपलें भाषण पुष्कळ परिश्रम घेऊन तयार केलें आहे, असें दिसूं देऊं नये. एवढ्याकारितां आपल्या भाषापद्धतींत थोडासा निष्काळजीपणा दाखवावा, ह्मणजे आपण आपलें भाषण घराहून चांगलें तयार करून आलों आहों, असें

ऐकणारास सकृद्दर्शनीं वाटणार नाहीं. असें करण्याविषयीं प्राचीन काळच्या मोठमोठ्या वक्त्यांचीही संमति असे, असें दिसतें. पुस्तकांत लिहिलेली भाषा बोलण्यांत कांहीं एक उपयोगाची नाहीं. बोलण्याच्या आणि लिहिण्याच्या भाषेंत जमीनअस्मानाचें अंतर आहे, हें ह्मणणें कांहीं खोटें नाहीं. बोलण्यामध्यें आपल्याला पुष्कळ गोष्टींचें स्वातंत्र्य असतें, कोणत्याही गोष्टीचा संकोच नसतो; तसें लिहिण्यांत नसतें. लिहिण्यांत पुष्कळ गोष्टींचा विचार करावा लागतो. आपण लिहितों हें व्याकरणशुद्ध आहे, कीं अशुद्ध आहे, हें पाहावें लागतें; फाजील मजकूर असेल तो गाळून विषय मर्यादित करावा लागतो. द्विरुक्ति न होईल असें करण्याविषयीं फार काळजी घेणें अवश्य असतें. भाषा प्रगल्भ आणि कमावलेली अशी निघण्यास पुष्कळ झटावें लागतें. अशा एक कां अनेक गोष्टींचा विचार लिहितांनां करावा लागतो. बोलण्यांत वाटेल तशी अत्यंत सोपी भाषा जरी उपयोगांत आणिली तरी चालते. बोलण्याच्या भाषेला लिहिण्याच्या भाषेइतकीं नियमबंधनें नसतात. द्विरुक्ती करण्याचा प्रसंग तर नेहमीं पडतो. लिहितांनां अर्थाला जोर येण्याकरितां, जे शब्द किंवा जीं वाक्यें आपण कंसांत घालतों, त्यांचा बोलण्यांत तशा प्रकारें उपयोग केला असतां, भाषण जास्त खुबीदार दिसतें, व त्यांत जोरही तसाच येतो. ऐकणारापेक्षां वाचकास एक मोठा फायदा आहे, तो असा कीं जी गोष्ट आपल्याला पूर्णपणें समजली नाहीं, ती वाचकास पुनःपुनः पुस्तकांत पाहतां येते, तसें ऐकणाराचें नाहीं. वक्त्याच्या बोलण्याकडे त्यानें अंमळ कां दुर्लक्ष

केलें, कीं गेलें तें निघून. त्यास तें पुन्हां ऐकावयाला किंवा पाहावयाला मार्ग नसतो. वक्ता आपण होऊन जर तें वाक्य पुन्हां बोलेल, तरच त्यास तें कळणार आहे, एरवीं नाहीं. श्रोते असावधानचित्त असण्याचा बराच संभव असल्यामुळें वक्त्याला बोलतांनां तोच तो विचार पुनःपुनः भिन्न भिन्न शब्दांनीं प्रकट करावा लागतो. वस्तुतः व्याख्यान चांगलें वाचतां येऊं नये; आणि जें असें वाचतां येतें, तें चांगलें व्याख्यान असें ह्मणतां येत नाहीं.

बोलतांनां देखील निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळी भाषापद्धती घ्यावी लागते. दोघांतिघांत जें संभाषण चालतें, त्याची भाषा कांहीं निराळीच असते; मोठ्या जनसमूहासाठीं भाषा वेगळी; आणि लिहितांनां त्या दोहोंपेक्षां अगदीं भिन्न अशी पद्धत धरावी लागते. ह्या प्रत्येकीस निरनिराळें बुद्धि-कौशल्य खर्चावें लागत असतें, आणि एक पद्धत सोडून दुसरी घ्यायची, ह्मणजे एकींतले कांहीं गुण टाकावे लागतात, कांहीं घ्यावे लागतात, व कांहीं नवीन घालावे लागतात. असें पहा, कीं मनुष्य आपल्या इष्टमित्राशीं बोलत असतांनां, बोलण्याच्या नियमांची कांहीं पर्वा करतो का? त्याला शुद्धाशुद्धतेची त्या वेळेस फारशी भीति नसते, यामुळें तो त्यांची तितकी जरूरही ठेवीत नाहीं, कशा तरी वांकड्यातिकड्या रीतीनें तो आपल्या मनांतील हेतू त्यास कळवीत असतो. परंतु जनसमूहापुढें व्याख्यान देण्याचा प्रसंग त्यास येऊं द्या, ह्मणजे पहा, त्याचें विचारचक्र जरा जोरावत जाऊन, समाजपद्धतीच्या ग्राह्याग्राह्यतेच्या विचारांत तो घुटमळून गेल्यासारखा

दिसेल. त्याच्या जिवाची इतकी गडबड होऊन जाते, कीं त्या वेळेस त्याच्या मुखावाटे जे शब्द निघतात, ते इतके घाईनें आणि अस्पष्ट निघालेले असतात, कीं कित्येक वेळां ऐकणारास त्यांचा अर्थबोध होणें देखील कठिण पडतें. कधीं कधीं तर त्याचा आवाज उतरून बसल्यासारखा होतो; किंवा मधल्यामध्येंच चिरकतो. अशी त्याची मोठी त्रेधा उडून जाते. बोलण्यापेक्षां लिहितांनां कांहीं निराळ्याच दिशेकडे त्याचें विचारचक्र फिरत असतें. त्याच्या विषयरूपी वनामध्यें सुंदर अशी वाक्यवाहिनी संचार करीत असते. त्याच्या ग्रंथवृक्षाचीं पानें हजारों दृष्टांतरत्नांनीं शोभायमान झालेलीं दिसत असतात. आवेशाच्या भरांत आलेल्या मनुष्याचें भाषण देखील असेंच जीवदार आणि जोराचें निघत असतें. त्याच्यावर क्रोधाचें दडपण पडून त्याचा आवाज इतका फुगलेला आणि कांपरा निघतो, कीं त्यायोगानें त्याचे शब्द सहजीं एखाद्या ओबडधोबड वाद्याच्या सुराप्रमाणें कानाला भासतात; मात्र त्यांत गाण्याचें अंग कमी असतें. सृष्टिसौंदर्य डोळ्यानें पाहून जशी मनाची खात्री आणि समाधान होतें, तसें त्याचें हुबेहुब कागदावर काढलेलें चित्र पाहून, किंवा लिहिलेलें वर्णन वाचून होत नसतें. एखादा मजकूर तोंडानें बोलून दाखविण्यांत जो हेतु असतो, तो तो मजकूर लिहून कळविल्यानें साधत नसतो. एखादी गोष्ट घडते वेळीं जो प्रकार घडला असेल, तो गद्यांत लिहून ठेवतांनां पूर्वीच्या आवेशाच्या भरांत जी बोलाचाली झाली असेल,

व जे शब्द उच्चारले गेले असतील, त्यापेक्षां दुप्पट जोराचे व आवेशाचे शब्द योजले पाहिजेत.

**सुबोधता.**—व्याख्यानांतील भाषा सरळ, सुरस आणि प्रौढ अशी असावी लागते. याकरितां या तीन्हींविषयीं येथें थोडेंसें सांगितलें पाहिजे. प्रथम सुबोधता किंवा सरळता घेऊं. हा गुण अलंकारिक भाषणांतच असला पाहिजे असें नाहीं, तर यच्चयावत् सर्व प्रकारच्या भाषणांत सुबोधता किंवा सरळपणा हा गुण असलाच पाहिजे. कारण जी भाषा स्पष्ट ह्मणजे तत्काळ समजण्यासारखी नसते, तिची योजना केल्यानें, भाषेचा जो मूळ हेतु, हृद्गत दुसऱ्याला कळविण्याचा, तो तसाच एकीकडे राहतो. श्रोतृसमाजाची ग्राहकता पाहून भाषेंत कमजास्त फेरबदल केला असतां हरकत नाहीं. कांहीं विवक्षित मंडळीला जें स्पष्ट आणि सहज समजण्यासारखें असतें, तें दुसऱ्या मंडळीस कळण्यासारखें नसतें. ज्यांचें ज्ञान कोतें आहे, अशांना थोडक्यांत संक्षेपरूपानें एखादी गोष्ट सांगूं ह्मटलें, तर तशा सांगण्यानें त्यांची समजूत पटणार नाहीं. तथापि त्यांची समजूत पटावी ह्मणून फार पाल्हाळिकही भाषण करतां कामा नये. कारण त्यानें त्यांस कंटाळा येणार आहे. तेव्हां अशा प्रसंगीं द्विरुक्ती केली असतां चालणार आहे. मात्र आपले विचार पुनः पुनः सांगतांना, ते निरनिराळ्या शब्दांनीं सांगत जावें, ह्मणजे भाषण कंटाळवाणें होण्याची फारशी भीति राहत नाहीं.

ह्यासंबंधाची एक सर्वसाधारण चूक होत असते, ती अशी कीं, सामान्य मंडळीची ग्राहकशक्ती न पाहतां, कि-

त्येक आपल्या भाषणांत उगीच मोठमोठाले शब्द घालीत असतात. परंतु मोठमोठे शब्द घालण्यांत कांहीं खरें वक्तृत्व नसतें. उलट वक्तृत्वाचा जो मुख्य हेतु तो त्यापासून मुळींच साधत नसतो. सामान्य जनसमूहास शुद्ध आणि साधी मराठी भाषा जितकी चांगली समजेल, तितकी तीमध्यें जाड्या शब्दांची भेसळ केली असतां समजणार नाहीं. अशा मंडळीला ह्मटलें ह्मणजे अगदीं साधी आणि सोपी भाषा समजण्यासारखी असते. तथापि तींत प्रौढता आणि थोडासा अलंकारही असावा लागतो, ह्मणजे त्यांना ती गोड लागते. मंडळी जरी अविद्वान् असली तरी त्यांना भाषागौरव आणि अलंकार यांची अभिरुचि असतेच; आणि भाषेच्या सुबोधतेला किंवा सरळपणाला अलंकारानें ह्मणजे कांहीं बाध येतो असें नाहीं. सर्व अर्थालंकारांत उपमा किंवा रूपकालंकार श्रेष्ठ आहे. याचा नेहमीं उपयोग पडतो. शिवाय रूपकानें अर्थबोधही पण तेव्हांच होतो. एखाद्या गोष्टीचा नुसता भावार्थ सांगत बसण्यापेक्षां, रूपक करून किंवा दृष्टांत देऊन ती सांगितली असतां, अशिक्षित मंडळीलादेखील ती चटकन् कळून त्यापासून त्यांचें एक प्रकारें मनरंजनही होतें.

सरळ भाषा येणें हें कांहीं अंशीं आपल्या वाक्यरचनेवर असतें. आपण जितकी साधी आणि सरळ वाक्यरचना करूं, तितकी आपली भाषाही साधी व सरळ होणार आहे. तीच फार भानगडीची झाली, कीं भाषा तिच्यायोगानें दुर्बोध होणारच. याकरितां वाक्य जितकें लांबलचक आणि घोंटाळ्याचें न करवेल, तितकें करण्याची नेहमीं

काळजी घेत जावी. अशी सावधगिरी ठेवूनही, जर कदाचित् वाक्य मोठें झालेंच, तर त्याची रचना तरी निदान घोंटाळ्याची करूं नये. तें दुसऱ्याच्या कानीं पडतांच, त्यास त्याचा कांहींएक विचार न करतां एकदम अर्थ समजेल, असें करण्याविषयीं जपावें. आपल्या मनांतील विचारांचा एकच एक घोंटाळा होऊन गेल्यानें, ते जागच्या जागीं नीट व्यवस्थेनें बसविले जात नाहींत. यामुळेंही आपल्या भाषणाला दुर्बोधता येते. परंतु विचार नीटनेटके जुळविले असूनही, कित्येकांना ते स्पष्टपणें जगापुढें मांडतां येत नसतात, असेंही कधींकधीं अनुभवास येतें. तेव्हां याचें कारण बहुधा त्यांना ते व्यक्त करून दाखविण्याची खुबी साधलेली नसावी, हेंच होय.

**सरसता.**—लोकांचें लक्ष आपल्याकडे ओढून घेण्याला आपण जो कार्यकारणभाव दाखवून बुद्धिवाद करितों, त्याच्या सत्यतेचा ठसा त्यांच्या मनावर उमटविण्यास, त्यांच्या कल्पना उत्तेजित करण्यास, व त्याचप्रमाणें त्यांच्या मनोवृत्ती जागृत करण्यास, आपल्या भाषणांत सरसता हा गुण असणें अत्यंत अवश्यक आहे; व ती येण्याला मुख्य तीन गोष्टी ध्यानांत धराव्या लागतात. एक शब्दांची निवड, दुसरी शब्दसंख्या आणि तिसरी शब्दरचना. ह्या तिहींचा आपण येथें अनुक्रमानें विचार करूं.

**शब्दांची निवड.**—शब्दांच्या निवडीविषयीं विचार करतांनां, आर्चबिशप व्हेटले यांनीं ॲरिस्टॉटल्प्रमाणेंच शब्दांचे दोन वर्ग केले आहेत. पहिल्या वर्गांत ज्यांना मूळचा कांहीं अर्थ आहे अशा नेहमींच्या रूढ शब्दांचा

समावेश होतो; आणि ज्या शब्दांना, मग ते शब्द रूढ असोत कीं अप्रयुक्त असोत, मूलार्थ जाऊन त्यापेक्षां अगदीं भिन्न असा अर्थ मिळालेला आहे, किंवा साधारण भाषणाहून निराळ्याच रीतीनें ज्यांचा उपयोग केला जात आहे, असे शब्द दुसऱ्या वर्गांत मोडतात. एकंदरींत प्रचारांतून गेलेले सर्व शब्द दुसऱ्या वर्गांत गणले आहेत. व्याकरण आणि अलंकारशास्त्र यांवरील ग्रंथकारांच्या मतें, मूलार्थ जाऊन भिन्नार्थ पावलेले सर्व शब्द आणि अलंकार दुसऱ्या वर्गांत येतात.

**मूलार्थी योग्य शब्द.**—शब्दाची योग्य निवड करण्याचा मुख्य नियम असा आहे कीं, ज्या शब्दांवरून त्यांचा मूळचा जो खरा अर्थ आहे तो सहज समजण्यासारखा असतो, ते शब्द बहुशः पसंत करावे. भाषण रसयुक्त आणि जोरदार होण्यास असे शब्द जितके उपयोगी पडतील, तितके ठोकळ व भावार्थी शब्द उपयोगी पडणार नाहींत. कारण ठोकळ किंवा भावार्थबोधक शब्दांनीं बोलणें अगदीं फिकें पडतें. तेंच त्या त्या अर्थाचे योग्य शब्द योजल्यानें भाषणांत एक प्रकारचें स्वारस्य येऊन तें मोहक दिसतें, व त्याचा परिणामही तसाच सुंदर होतो. दोन्ही प्रकारच्या शब्दांनीं बोलणाराच्या मनांतील भाव सारखाच प्रकट केला जातो; परंतु पहिल्या प्रकारानें भाषणाला यावा तसा रंग येत नाहीं. त्यांत चित्तवेधकता आणि रस हीं कमी असतात, आणि ह्मणूनच त्या भाषणापासून ऐकणारांच्या मनांवर उमटावा तसा ठसा उमटत नाहीं.

परंतु अशी निवड करणें न करणें हें वक्त्याच्या खुषीवर आहे कीं काय असा कोणीं प्रश्न केल्यास, अर्थात् ती बहुतांशीं त्याच्या मर्जीवरची गोष्ट आहे, असें म्हणावें लागतें. एखाद्या विषयाला साधारण ठोकळ शब्द जास्त प्रमाणानें घालणें न घालणें, हें ज्याच्या त्याच्या आवडीचें काम आहे. ज्या विषयाचें सविस्तर विवेचन व्हावयाला पाहिजे आहे, तो जरी आपण ठोकळ रीतीनें प्रतिपादन केला, तरी चालण्यासारखें असतें. ठोकळ मानानें त्याचा विचार झाल्यानें ह्मणजे त्यांत असंबद्धतेचा किंवा असत्यतेचा प्रकार येतो असें नाहीं; मात्र त्या भाषणांत रस आणि जोर हीं मुळींच नसतात, हें खचित. समजा कीं, एका मनुष्यानें 'खून' केला आहे, आणि खून करणें हा कायद्यानें गुन्हा आहे, तर त्यानें 'गुन्हा' केला असें ठोकळ रीतीनें सांगितल्यास काय चूक आहे? त्यांत असत्यता किंवा असंबद्धता मुळींच नाहीं हें खचित; पण 'गुन्हा' या शब्दावरून खुनाच्या गुन्ह्याचें जें भयंकर स्वरूप आहे तें स्पष्ट होत नाहीं. ठोकळ शब्दांत अवगुण काय तो हाच आहे, व ह्याचमुळें ऐकणाराला त्याचें महत्व वाटत नसतें.

बोलणाराच्या मनांतूनच जेव्हां असेल कीं, आपल्या भाषणापासून श्रोत्यांच्या मनावर तत्काळ असा कांहीं एक परिणाम घडूं नये, तेव्हां मात्र त्याविषयीं ठोकळ माहिती दिली असतां अप्रशस्त होणार नाहीं.

**मूलार्थाहून भिन्नार्थबोधक शब्द.**—आतां ज्या शब्दांचा मूळचा अर्थ अगदीं बदलला आहे अशां-

विषयीं थोडासा विचार करूं. मूळचा साधा अर्थ जाऊन नवीन अर्थ आलेल्या सर्व प्रकारच्या शब्दांत अतिशय महत्वाचा आणि नेहमीं उपयोगांत येणारा असा अलंकार म्हटला ह्मणजे रूपकालंकार होय. रूपक ह्मणजे दोन शब्दांत अर्थसादृश्य असल्यामुळें एकाऐवजीं दुसरा शब्द ज्यामध्यें योजिला जातो तें. रूपक आणि उपमा यांत थोडासा फरक आहे. उपमेमध्यें सादृश्य व्यक्त करून दाखविलेलें असतें. तसें रूपकांत नसतें, तें गर्भित असतें. दोहोंमध्यें प्रत्यक्ष रीतीची तुलना असतेच. उदाहरणार्थ, रूपक—ज्ञानदीप, उपमा—पर्वतप्राय लाटा इ०

आतां कोणी असा प्रश्न करतील कीं, तर मग बोलण्यांत किंवा लिहिण्यांत कोणत्या अलंकाराचा उपयोग करावा? रूपकाचा कीं उपमेचा? यावर असें उत्तर आहे कीं, आपल्या श्रोतेमंडळीस किंवा ज्यांच्याकरितां ग्रंथ लिहिणें असेल त्यांस रूपकें समजतील असें वाटत असेल तर नेहमीं रूपकेंच योजावीं. तथापि अशीं कांहीं रूपकें आहेत कीं, तीं तशींच ठेविलीं असतां त्यांचा स्पष्टार्थ कळून येत नाहीं, परंतु तीं उपमेंत आणिलीं कीं, तीं निव्वळ आरसा होऊन, लोकांस अर्थ स्पष्ट दिसूं लागतो. तेव्हां अशीं रूपकें योजण्यापेक्षां त्या ठिकाणीं उपमालंकार घालावा हें फार चांगलें.

ॲरिस्टॉटलनें असें म्हटलें आहे कीं, बोलणाराचा किंवा ग्रंथकाराचा जसा हेतु असेल, त्याप्रमाणें त्यानें विषयास गुरुत्व किंवा लघुत्व आणण्याकरितां उच्चनीच पदार्थ उत्प्रेक्षेस घेऊन रूपकें करावीं. मोठ्या आवाजानें बोलणारास

वक्ता, 'तो सिंहनाद करतो आहे' असें ह्मणेल किंवा 'गर्दभशब्द' करतो असेंही ह्मणेल. ह्या दोन्ही उदाहरणांमध्यें प्रसंगास उचित असें रूपक साधल्यास, त्या बोलण्याला किंवा लिहिण्याला साहजिक जोर आणि रस येणार आहे. विशेषणें देण्यासंबंधानेंही असेंच आहे. ज्यासंबंधानें बोलावयाचें किंवा लिहावयाचें आहे, त्याच्या अंगचे चांगलेवाईट गुणधर्म पाहून त्याप्रमाणें विशेषणें देत जावें. अजहल्लक्षणेचाही याचप्रमाणें निरनिराळ्या तऱ्हेनें उपयोग करतां येतो. या अलंकारांत एक भाग देऊन सर्व भागांचा बोध होत असतो. उदाहरणार्थ 'मेकॉले वाचण्यास चांगला आहे;' 'तो असें बोलतांच त्याच्यावर गांव उलटला.' येथें मेकॉले आणि गांव या शब्दांनीं मेकॉलेचे सर्व ग्रंथ, आणि गांवांतील सर्व लोक असा अर्थबोध होतो. यांहीपेक्षां सुंदर उदाहरण ॲरिस्टॉटल यानें दिलेलें व्हेटलेसाहेबांनीं घेतलें आहे. तें असें कीं, एकदां एके ठिकाणीं खेंचरांची शर्यत झाल्यावर, ती जिंकणारानें सिमॉनिडीज नांवाच्या एका कवीस तिजसंबंधीं एक कवन करा, मी तुह्मांस अमुक देईन असें सांगितलें. देणगी थोडी आहे असें पाहून, कवि मोठ्या तिरस्कारानें ह्मणाला 'छट्, जें धड घोडेंही नाहीं, व गाढवही नाहीं, अशा खेंचराच्या शर्यतीवर कवन तें काय करावें?' परंतु पहिल्यापेक्षां जास्त रक्कम देण्याचें त्या मनुष्यानें कबूल केल्यावर त्याच कवीनें त्याच खेंचराचें वर्णन इतकें उत्तम करून सोडलें, कीं तें ऐकून तो विजयी मनुष्य त्या कवीवर बालंबाल खुष होऊन गेला. अशा प्रकारें एखाद्याचा तिरस्कार किंवा गौरव रूपकानें करितां येतें. एखाद्या

विषयांतील अतिमहत्वाचा भाग सांगतेवेळीं रूपकाचा उपयोग केला असतां, भाषणास जास्त रस येऊन त्याकडे लोकांचें चित्तही अधिक वेधतें. त्याचप्रमाणें इंद्रियगोचर पदार्थांनीं बुद्धिगम्य पदार्थ व्यक्त करून दाखविण्यास रूपकें योजिलीं असतां, भाषेला जास्त सरसता आणि प्रौढी येणार आहे. उदाहरण, 'कवीचें निरंकुशत्व' 'चिंताज्वर' इत्यादि. परंतु ह्याहींपेक्षां विशेष रस, निर्जीव पदार्थांस सजीव पदार्थांचें रूपक दिल्यानें येत असतो. निर्जीवांस सजीवांचे मनोविकार आहेत असें वर्णिल्यानेंदेखील भाषेला अशीच प्रौढता आणि रस येतो. उदाहरणें—'जी ही गदा मम करांत सदैव नाचे.' 'नदीला पूल सहन झाला नाहीं.' 'ही नदी इतका आक्रोश करीत आहे, याचें कारण ती माहेर सोडून सासऱ्यास चालली आहे.' वगैरे. रूपकामध्यें आणखी एक खुबी असावी, ती ही कीं त्यांत कांहीं तरी अपूर्व किंवा नवल वाटण्यासारखें नेहमीं असावें, ह्मणजे तें जास्त खुलतें. कारण साधारण ऐकिवांतलीं रूपकें किंवा शब्द पुनःपुनः ऐकल्यापासून मनाला विशेष कौतुक आणि आनंद वाटत नसतो. रूपक ओढूनताणून बनविलेलें नसावें. एकाच रूपकांत दोनतीन रूपकें घालूं नयेत, व आपलें अलंकारिक भाषण दृष्टांतकथेसारखें न होईल अशाविषयीं फार जपत जावें. जें रूपक दिसायला मात्र सुंदर, परंतु समर्पक नसून, अर्थबोध होण्यासही कठिण आहे, असें सहसा योजीत जाऊं नये.

**विशेषणें.**—आपल्या भाषणांस रस यावा व तें जोरदार व्हावें, असें जर वक्त्यास वाटत असेल, तर त्यानें

त्यांत अगदीं समर्पक विशेषणें घालवतील तितकीं घालावीं. मात्र तीं भलत्याच ठिकाणीं भलत्याच अर्थी त्यानें उपयोगांत आणूं नये. अलंकारशास्त्रांत विशेषणाचा उपयोग प्रत्येक गुणवाचक शब्द दाखविण्याकडे केला जात नसून, फक्त ज्याच्यायोगानें नामाच्या अंगचे गुणधर्म व्यक्त केले जातील, तेवढ्या गुणवाचक शब्दांपुरताच केलेला असतो. पुष्कळ ग्रंथकार आणि वक्ते आपल्या लेखांत आणि भाषणांत विशेषणांची इतकी रेलचेल करून देतात, कीं त्यायोगानें आपल्या लिहिण्याला किंवा बोलण्याला जोर आणि सरसता यावी, हा जो त्यांचा इच्छित हेतु तो एकीकडेसच राहून वाजवीपेक्षां जास्त विशेषणें झाल्यानें, उलट रसभंग मात्र होतो, व भाषणांत मूळचा जो कांहीं जोर असतो तोही जाऊन, सर्व लेख किंवा भाषण बेचव होऊन जातें. याकरितां त्यांचा जितका परिमित उपयोग केला जाईल, तितकें भाषण किंवा लेखन चांगलें वठणार आहे. त्यांचा मुळींच उपयोग करूं नये असें नाहीं. योग्य वाटतील तेवढींच विशेषणें सुस्थळीं उपयोगांत आणावीं. त्यांचा अतिरेक होऊं देऊं नये, ह्मणजे झालें. तसेंच व्याख्यान ऐन भरांत आलें, ह्मणजे आवेश उत्पन्न करणारे व काव्यधाटीचे शब्द योजण्याचा होईल तितका प्रयत्न करावा. कारण अथपासून इतिपर्यंत एकच एक प्रकार ठेवला, तर त्यांत वैचित्र्य नसल्यानें भाषण अखेरअखेर अगदीं कंटाळवाणें होऊन जातें. रोजरोज तेंच तें अन्न खाऊन वीट आला, ह्मणजे त्यांत कांहीं तरी आलटपालट केल्याशिवाय तें गोड लागत नाहीं, याचा

अनुभव वाचकांस आहेच. झाडासदेखील ऊन आणि सावली हीं नसलीं तर तें जळून जातें. तद्वत् व्याख्यानांत सर्वत्र एकच एक धाटी ठेवली, तर तें गोड लागणार नाहीं. त्यांत भिन्नभिन्न प्रकार आणावे ह्मणजे लोकांस तें ऐकावेंसें वाटतें.

**परभाषेंतील** आणि **अप्रचारांतले शब्द.**—परकीय आणि प्रचारांत रूढ नसलेले शब्द जितके परिमित रीतीनें आणि धूर्ततेनें योजले जातील, तितकी संभाषणाला आणि लिहिण्याला जास्त प्रौढता आणि अर्थगांभीर्य येणार आहे. होमर नामक कवीच्या काव्यामध्यें, तो जेथें राहत असे त्याच्या आसपासच्या संस्थानांत रूढ असलेलेच शब्द फार येत असत. यामुळें त्यांतील दृष्टांत फक्त त्याच्या वेळच्या लोकांसच काय ते कळले असतील. एखादा अनोळखी मनुष्य पाहून आपल्याला जसा संतोष होतो, आणि त्याच्या त्या नुसत्या वजनानेंच आपल्यावर त्याची छाप बसून, आपल्याला त्याचें मत ग्राह्य धरावेंच लागतें, तद्वत् परभाषेंतील शब्द आपल्या कर्णरंध्रांत शिरतांक्षणींच आपल्यावर त्यांचा एक प्रकारें दाब बसून आपल्यास ते गोड वाटतात. प्रचारांतले शब्द कोणते आणि अप्रचारांतले कोणते हें बहुधा देशांतील सुशिक्षित लोकांच्या सहवासानें कळणार आहे. त्यांच्या नेहमींच्या बोलण्यांत जे शब्द येत असतात, तेच प्रचारांतले असें मानल्यास कांहीं गैरवाजवी होणार नाहीं.

जेथें शास्त्रीय किंवा पारिभाषिक शब्दांचा उपयोग केला नसतां चालण्यासारखें आहे, तेथें अर्थात् ते घालूं नये, हें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

धर्मसंबंधीं माहिती देतांनां मात्र बहुशः अशी चूक होण्याचा संभव असतो. तेथें शास्त्रीय शब्दच ठेवावे लागत असतात. लाक्षणिक शब्द घालण्याचा प्रसंग, वक्त्यानें आपल्याकडून जितका टाळवेल तितका टाळण्याविषयीं नेहमीं तारतम्य धरून चालावें. त्यास ते माहीत नसावे असें आमचें मुळींच ह्मणणें नाहीं; पण इतकें मात्र खरें कीं, त्यानें ते संभाषणांत आणूं नये.

**शब्दसंख्या.**—आपल्या मनांतील भाव कशाही स्वरूपाचा असो, हास्यरसप्रधान असो, विनोदी असो, गंभीर असो, जोराचा असो, कीं प्रौढतेचा असो, तो जितका थोडक्यांत प्रदर्शित केला जाईल, तितका आपल्या भाषणास जास्त रस येणार आहे, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. तथापि असे कांहीं विषय आहेत, कीं ते विस्तार करून सांगितल्याखेरीज गत्यंतरच नसतें. अशा प्रसंगीं भाषण जोरदार आणि रसभरित व्हावें ह्मणून संक्षेपरूपानें विषयाचें निरूपण करूं ह्मटलें तर चालणार नाही, हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे. संक्षेपरूपानें लिहिण्यासारखे विषय ह्मटले ह्मणजे ज्यांत पुष्कळ वर्णन करावयाचें असतें, चित्तवेधक भाग बराच असतो, किंवा ज्यांत अलंकार फार असतो असे होत. यांत विशेषेंकरून अलंकारिक भाषण थोडक्यांतच व्हावें लागतें. त्याशिवाय तें चटकदार होत नाहीं. ही संक्षेपपद्धति बोलण्यापेक्षां लिहिण्यांत फार सोइस्कर होते. वाचणाराला हवा तितका वेळ असतो, यामुळें जलद किंवा सावकाश त्याच्या मर्जीस वाटेल तशा रीतीनें तो वाचीत बसेल. एकदां

वाचलेलें पुन्हां वाचावेंसें वाटल्यास, त्यास तसें करतां येईल. पुस्तक मिटून वाचलेल्या हकीकतीचें तो मनन करूं शकेल, आणि ती बरोबर कळली नाहीं असें वाटल्यास, पुस्तक उघडून त्यांत ती पुन्हां पाहील; तसें व्याख्यान ऐकणारास करतां येण्यास मार्ग नसतो. व्याख्यानांत पुष्कळ गोष्टी आणून त्या थोडक्यांत सांगूं असें जर वक्ता ह्मणेल, तर त्याच्या श्रोतृगणापैकीं दोनतीन जे कोणी अद्वितीय ग्राहकशक्तीचे असतील ते खेरीज करून बाकीच्यांस त्याचें भाषण चटकन् ध्यानांत घेण्यास फार पंचाईत पडेल. कारण त्यांची ग्राहकशक्ति तितकी तीव्र नसल्यानें, वक्ता एकामागून एक अशीं वाक्येंच्या वाक्यें भराभर उच्चारूं लागला, कीं त्यास आटपण्यास त्यांच्या नाकीं नव येतात. त्याचें पुढचें वाक्य समजावयाला ते जातात, तों मागचें सुटतें आणि मागचें समजून घेतात तों पुढचें अनुसंधान सुटत जातें, अशी त्यांची मोठी त्रेधा उडते; आणि अखेरीस त्यांनीं भाषण ऐकलें न ऐकलें सारखेंच होतें. असें झाल्यानें मग वक्त्याची ती वडबड सर्व फुकट जाऊन, त्याच्या मनांतील हेतु तसाच जागच्याजागीं राहून जातो. ही अडचण दूर व्हावी ह्मणून, वक्त्यानें बोलतांनां वाक्यामध्यें केवळ जास्त शब्द घालून वाक्यविस्तार केला पाहिजे असें नाहीं. तर फक्त एकच विचार, पण तो पुनःपुनः निरनिराळ्या शब्दांनीं सांगितला, ह्मणजे वरील अडचण दूर होणारी आहे.

तरुण ग्रंथकारांना आणि व्याख्यानकारांना आपल्या लिहिण्यांत किंवा भाषणांत साधारणपणें मोठमोठे शब्द

घालण्याची फार संवय असते, पण ती चांगली नव्हे. त्यांच्यांत हा मोठा उणेपणाच आहे असें ह्मटलें पाहिजे. त्यांना ही संवय ह्मणजे त्यांच्या हलगर्जीपणामुळें किंवा हयगयीमुळें लागलेली असते असें मुळींच नाहीं; तर जाडे शब्द घातल्यानें आपल्या ग्रंथाला किंवा व्याख्यानाला जास्त सुबोधता आणि जोर येईल, अशा अज्ञानपणाच्या समजुतीनें ते जाणूनबुजून आपल्याला ही वाईट संवय लावून घेतात. बरें, अशी समजूत केवळ तरुण ग्रंथकारांची आणि वक्त्यांचीच असते का? नाहीं. त्यांच्या वाचकगणापैकीं किंवा श्रोतृसमूहापैकीं ज्यांची बुद्धि चांगली संस्कृत होऊन परिपक्क झालेली नसते, अशा अविद्वान् लोकांसही असेंच वाटत असतें, कीं मोठमोठे शब्द घालून केलेले ग्रंथ किंवा भाषण ह्मणजे अगदीं सभ्य, वजनदार आणि हृदयभेदक. ज्यांच्यासाठीं ग्रंथ किंवा भाषण करावयाचें, त्यांचाच असा चुकीचा ग्रह झाल्यानें कर्त्याच्या हातून तसली चूक होणें अगदीं साहजिक आहे. आणि अशा प्रकारें जो बोलेल किंवा लिहील त्यास भाषेचें ज्ञान चांगलें आहे, भाषेवर त्याचा पगडा आहे, असें लोक नेहमीं ह्मणतांनां आपण ऐकतों. तेव्हां ग्रंथकार आणि व्याख्यानकार ह्यांनाही त्यांच्या चुकीच्या समजुतीबद्दल फारसा दोष देतां येत नाहीं. अशांचा भाषेवर चांगला पगडा आहे असें ह्मणण्याऐवजीं, भाषेचा त्यांवर पगडा विशेष आहे असें ह्मटलें असतां वास्तविक शोभणार आहे. कारण अशी मंडळी विचारसरणीस एके बाजूस ठेवून, निव्वळ शब्दांवर झोड देत असते. विषयासंबंधानें जेवढे

ह्मणून सांगणें अवश्य आहे, त्याचा योग्य अर्थ प्रथम मनांत आणून नंतर तो योग्य शब्दांनीं सांगावयाचा, तसें न करतां एकदम आठवतील तितकीं दुसऱ्यास चकित करून टाकणारीं वाक्यें ते तोंडानें नुसतीं बोलून जात असतात; मग त्यांत आपला अर्थ निष्पन्न होतो किंवा नाहीं, हें धोरण त्यांस मुळींच राहत नाहीं. तेव्हां घोडा अनावर होऊन वर बसणारासुद्धां उधळूं लागला, ह्मणजे त्यावर बसणाराची जितकी हुकमत घोड्यावर असते असें आपण ह्मणूं, तितकीच वरील मंडळीची भाषेवर हुकमत आहे असें कां न ह्मणावें? प्रसंग पाहून संक्षिप्त किंवा मर्यादित भाषण करावें असें आह्मी ह्मणतों खरें, परंतु अमुक प्रसंगीं अमुक तऱ्हेचें थोडक्यात आणि मर्यादित भाषण केलें असतां तें पसंत ठरेल, असा कांहीं एक नियम घालून देतां येणार नाहीं. तरी इतकें मात्र सांगतां येईल, कीं आपले भावदर्शक शब्द सरळ असावे कीं सुरस असावे, अशाविषयीं जेव्हां एखाद्या वक्त्याच्या किंवा ग्रंथकाराच्या मनाचा घोंटाळा होईल, तेव्हां त्यानें सुबोधता आणि सरसता हे दोन्ही गुण ज्यांत असतील, असे शब्द आपल्या भाषणांत किंवा लिहिण्यांत घातले पाहिजेत. सुबोधतेसंबंधानें तर त्यानें प्रथम काळजी घेतली पाहिजे; कारण ती न घेतली तर सुबोधता आणि सरसता ह्या दोन्ही त्याच्या भाषणांत यायच्या नाहींत. तसेंच एखादें वाक्य फारच संक्षिप्त झाल्यानें तें फार कठिण होऊन लोकांस समजेल कीं नाहीं, अशाविषयीं जेव्हां त्याचें मन साशंक राहील, तेव्हां त्यानें त्याचा प्रथम विस्ताररूपानें उलगडा करून, नंतर पुनः तें

थोडक्यांत सांगावें. सकृद्दर्शनीं ही युक्ति संक्षेपपद्धतीस विरुद्धशी वाटेल खरी, परंतु अनुभवाअंतीं असें आढळून येईल, कीं विस्तारानें वर्णन केलेल्या गोष्टीचें तात्पर्य काढून तें मूळांत सामील केलें असतां, संक्षिप्त कथनानें जें फळ मिळावयाचें तेंच वरील युक्तीनें निष्पन्न होणार आहे. नुसती शब्दसंख्या ज्यास्त झाल्यानें विस्तारदोष येतो असें नाहीं, तर त्यांत मनास आल्हाद होण्यासारखा कांहीं प्रकार नसतो व तशा दीर्घसूत्रीपणानें श्रोते शेवटीं कंटाळून जातात; ह्मणून तसा विस्तार करणें अश्लाघ्य होतें. याकरितां कंटाळवाणा झालेल्या प्रकाराची संक्षेपानें पुनरुक्ती केली, ह्मणजे कंटाळवाणेपणा हा दोष जाऊन, उलट भाषण मोठें खुबीदार आणि चटकदार झालें असें श्रोते आपण होऊन कबूल करतील, व त्यांस त्या भाषणाचा उद्देशही चांगला कळून येईल. वाक्य विस्तृत केल्यानें ऐकणाराला त्याचा अर्थ स्पष्ट कळतो, व पुनः तें तात्पर्यरूपानें सांगितलें गेल्यानें चांगलें ध्यानांत राहतें. परंतु हा क्रम सोडून उलट प्रकार केला, ह्मणजे प्रथम संक्षेपानें सांगून नंतर अर्थबोध होण्याकरतां स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला, तर त्यापासून भाषणांतील रस आणि जोर समूळ किंवा अंशतः तरी कमी होईल. संक्षिप्त रीतीनें वर्णन करणें चांगलें असें ह्मणून, अतिशय संकोच करून भाषण केलें, तर त्यांत विचारांची एकच गर्दी उडून सर्व गोंधळ होऊन जाईल. तेव्हां असें करूं नये. तसेंच वाक्यें मोठ्या प्रयासानें साधलीं आहेत असेंही दिसूं देऊं नये; कारण तसें दिसल्यास मंडळीला तें न आवडण्याची फार भीति असते.

**शब्दरचना.**—शब्दरचना योग्य आणि सुव्यवस्थित झाल्यानेंदेखील भाषण रसाळ होऊन प्रौढ दिसणार आहे. 'मनांत आलें तें जनांत यायला काय उशीर ?' अशी एक साधारण प्रचारांतली म्हण आहे. त्या म्हणी-प्रमाणें जी गोष्ट अंतःकरणांत चांगली वागली आहे, जी उत्तम बिंबलेली आहे, ती मुखावाटें निघायला कांहीं उशीर नसतो. ती पटकन् बाहेर निघत असते, मग कशाही भाषेत म्हणा, ज्या रीतीनें व्यक्त करतां येईल त्या रीतीनें मनुष्य प्रथम ती सांगत बसतो.

**भाषासौंदर्य.**—भाषण सरस आणि जोरदार हो-ण्याला शब्दांची निवड, त्यांची संख्या आणि त्यांची र-चना, इत्यादि गोष्टींचा जसा विचार करावा लागतो म्हणून मागें सांगितलें आहे, तसा भाषासौंदर्य साधण्या-लाही त्या गोष्टींचा विचार अवश्य करावा लागतो. तरी पण तीच निवड, तेच शब्द आणि तीच रचना, भाषेला सौंदर्य आणण्याकरितां उपयोगी पडेल असें नाहीं, हें मात्र पूर्णपणें लक्षांत ठेविलें पाहिजे. कधींकधीं असें होतें कीं भाषासौंदर्य साधण्याकरितां कांहींएक वाक्यरचना क-रावी, ती सरसतेला बाधक अशी होते, आणि सरसता व जोर आणायला पाहावें, तों भाषेची शोभा म्हणून जी कांहीं आहे ती जाते; तेव्हां करावें काय असा बोलणाराला मोठा विचार पडून तो बुचकळ्यांत पडतो. अशा वेळेस सौंदर्याकडे विशेष लक्ष न देतां, भाषेला जोर आणि रस हे जेणेंकरून येतील अशी शब्दयोजना आणि वाक्य-रचना करावी. विषयाच्या मोठेपणाला आणि त्या त्या प्रसं-

गाला अनुचित असें असभ्यतेचें वाक्य तोंडांतून मुळींच काढूं नये. कारण ऐकणारांपैकीं कांहींना जरी तें खुबी-दार असून जोरदार आणि रसाळ आहे असें वाटलें, तरी एकंदर श्रोतृसमाजाला त्यापासून वीटच येणार आहे. मग त्या थोड्यांनीं चांगलें ह्मणून काय उपयोग? तसेंच ज्या वाक्यरचनेनें भाषासौंदर्य पुष्कळ साधण्यासारखें आहे, परंतु जोर आणि रस हीं कमी साधणार आहेत, किंवा अज्जी साधणार नाहींत, तरी त्याची फारशी पर्वा न करितां, तें वाक्य घालून भाषेला सुंदरपणा आणावा. थोडक्याशा रसाकरितां सौंदर्याची सर्वस्वी धाण करून घेऊं नये. एकंदरींत ज्या शब्द किंवा वाक्यरचनेपासून दोहोंपैकीं एक कोणतें तरी जास्त आणि चांगलें साधण्यासारखें असेल, ती वाक्यरचना नेहमीं घेत जावी. दोन्ही साधल्यास उत्तमच. परंतु ज्याला ह्मणून श्रोत्यांची खऱ्या रीतीनें समजूत घालण्याची किंवा त्यांचें मन वळविण्याची अगदीं मनापासून इच्छा आहे, त्यानें इतर सर्व गोष्टी एकीकडे ठेवून, आपला प्रधान हेतू साधण्याकरितां जिनें रस आणि जोर जास्त साधणार आहे अशी वाक्यरचना करण्याविषयीं नेहमीं झटावें. श्रोत्यांची करमणूक कशी होईल, व ते आपल्यास चांगलें कसें ह्मणतील, ह्या गोष्टीकडे फारसें लक्ष पुरवूं नये.

**अलंकार.**—कित्येक आपल्या भाषणांत अलंकारांचा अतिशयच उपयोग करतात. व कित्येक तो मुळींच करीत नाहींत. ह्या दोघांचेंही भाषण अगदीं फिकें पडतें. अलंकारांचा भाषणांत अतिरेक होणें, किंवा अगदीं अभाव

असणें, हीं दोन्हीही वाईटच. निव्वळ भाकडकथा सांगून लोकांचें मन वळत नसतें. तेव्हां त्यांचें चित्त वेधून टाकण्यास त्यांत थोडीशी अलंकाराची झांक असली पाहिजे. अलंकार योजणें, तो तरी शोभेल असा योजावा; भलतासलता अलंकार घालून कांहीं उपयोग नसतो. उलट त्यापासून बिघाड मात्र होतो. ह्मणून योग्य अलंकार साजण्यासारखा असेल तोच घालावा. चवाळ्याला शालजोडीचें ठिगळ दिलें, किंवा शालजोडीला चवाळ्याचें दिलें, तर तें साजेल काय? नाहीं. तेव्हां योग्य अलंकार ह्मणजे असा, कीं जो अलंकार घातला असतां आपल्या भाषणाचें इतकें तेज पडणार आहे, कीं तो न घातला तर तितकें तेज पडायला सप्रमाण वचनें देऊन श्रोत्यांशीं बुद्धिवादच केला पाहिजे, आणि त्यांचें मन वळवून आपलें कार्य साधून घेण्याला त्याशिवाय दुसरा इलाजच नसतो. सप्रमाण वचनांच्या अंगीं जो गुण असतो, तोच गुण त्या अलंकारामध्यें जर असेल, तर तो खरा योग्य अलंकार असें समजावें. बाकीचे अलंकार निव्वळ शोभेचे असें ह्मटलें पाहिजे. असले निरर्थक शोभेचे अलंकार भाषणांत फार असल्यानें श्रोत्यांचें लक्ष विषयाकडे न जातां वक्त्याकडेसच जास्त जास्त जात असतें. ह्मणून समाजव्याख्यानांत ते न आणले तितकें चांगलें होणार आहे. असले अलंकार जे बहुतकरून विषयाचा विचार न करितां, एकदम त्यावर बोलण्याची सुरुवात करीत असतात, त्यांच्या भाषणांत फार येतात.

क्विंटिलियन नामें ग्रंथकार ह्मणतो, कीं आपल्या भाषणाला जी शोभा आणावयाची, तींत आवेश, सभ्यता आणि पवित्रता हे तीन गुण असलेच पाहिजेत, ह्मणजे ती भाषणपद्धति जास्त खुलते. तिच्यांत मूळचा खरा जोर असावा. ती बाह्य रंगांनीं खुलवलेली व स्त्रियांप्रमाणें नाजूक नसावी. तरुण मंडळींना आपल्या भाषणांत अलंकारांची अतिशय गर्दी करून द्यावी असें फार वाटत असतें; परंतु तसें वाटूं देऊं नये. योग्य ठिकाणीं योग्य अलंकाराची योजना केली असतां भाषणाला किती शोभा आणि महती येत असते, हे सांगणें नकोच. वक्ता ह्मणजे साधारण कविच असावा लागतो. कवीच्या कल्पनाशक्तीसारखी वक्त्याची कल्पनाशक्ति असावयाला पाहिजे. मानव प्राणी इतका रूपकप्रिय आहे, कीं त्याचें मन रूपकानें जितकें वश होतें, तितकें दुसऱ्या कशानेंही होत नाहीं. याचें प्रत्यंतर पाहायला फार लांब जाणें नको. आपल्या प्रत्यहीं अनुभवाच्या गोष्टींसच चकाकी आणणारी एक प्रकारची झिलई देऊन त्या व्याख्यानरूपानें लोकांपुढें मांडा, ह्मणजे पहा, त्या निव्वळ गप्पा ऐकूनच श्रोते मंडळी कशी गर्क होऊन जाते ती. रूपकाचें आपल्या मनावर असें कांहीं विलक्षण वजन पडतें, कीं तें सांगतां येत नाहीं. साधी गोष्ट कां असेना, ती रूपक करून सांगितली, कीं लागलीच तिजकडे आपलें मन वेधतें; व ती सयुक्तिक असून सर्वथैव खरी आहे, तेव्हां ती आपण अंगीकारलीच पाहिजे, असा आपला तत्काळ ग्रह होऊन जातो. रूपकानें आपली स्मरणशक्ति दृढतर होते. दृष्टांत किंवा

रूपकरूपानें सांगितलेली गोष्ट जशी फार दिवस आपल्या ध्यानांत राहते, तशी इतर राहत नाहीं.

वक्त्यानें आपले आवडते शब्द किंवा वचनें प्रत्येक प्रसंगीं पुनः पुनः बोलण्यांत आणूं नये. आवडते शब्द ह्मणजे असे, कीं जे शब्द साधारण उपयोगांत नसून ज्यांचा विशेष अर्थ, जो ते योजतो त्याचा त्यालाच समजाणारा असतो, असे शब्द, किंवा ह्मणी, किंवा वचनें, एकाच भाषणांत फार तर काय, पण दोन वेळां देखील आलेलीं उपयोगी नाहींत.

तसेंच हलकट शब्दांचा तोंडावाटें कधींही उच्चार करूं नये. हलकट शब्द ह्मणजे कोणते, कीं विषयाला न शोभणारे, किंवा ज्या लोकांपुढें उभें राहून बोलावयाचें, त्यांच्या मोठेपणाला लांछनास्पद व त्यांना शरम उत्पन्न करणारे असे शब्द. असले शब्द मुखांतून काढावयाचे नाहींत ह्मणून ते गाळतांनां पुष्कळ वक्ते एक मोठी ढोबळ चूक करतात, ती ही कीं साधारण नेहमींच्या प्रचारांत असणारे शब्द, मग ते विषयास अवश्यमेव लागणारे असोत वा नसोत, ते देखील ते टाकून देत असतात. दुसरें, आपण असमंजस मनुष्यांशीं बोलतांनां 'तुह्मी घोड्यावर आहां,' 'तो कोण उंटावरचा शहाणा?' 'अन्नाला पाठ देऊं नका' असें जर बोलत बसलों, तर त्यांना त्यापासून काय कळणार? तेव्हां जीं वाक्यें अथवा ज्या ह्मणी ऐकणाराला अर्थबोध होण्यास कठिण पडतात, तीं वाक्यें किंवा त्या ह्मणी सहसा वक्त्यानें आपल्या भाषणांत आणूं नये.

**गमतीचें भाषण किंवा विनोद.**—भाषणामध्यें मधूनमधून कधीं थोडासा विनोद आणीत जावा; ह्मणजे त्यायोगें हास्यरस उत्पन्न होऊन, श्रोतेमंडळी खुष होऊन जाते. एखादा नीरस विषय असला, किंवा नुसती भाकडकथा असली, ह्मणजे ती ऐकतां ऐकतां ऐकणाराला कंटाळवाणें होऊन, आतां ही कथा कधीं संपते असें होतें. अशा वेळेस त्यांस हंसवण्यासारखे विनोदाचे चार शब्द वक्त्याच्या तोंडून ऐकण्याला मिळाले, ह्मणजे त्यांना कंटाळा आलेला असतो तो जाऊन बरीच करमणूक होते. त्यांचें अंतःकरण प्रफुल्ल होऊन त्यांना एक प्रकारची हुशारी आणि तरतरी येते; व बोलणाराविषयीं, ह्यानें हें आपलें उगीच चऱ्हाट लाविलें आहे, असें जें वाटत असतें, त्याचें निरसन होतें. शिवाय विषय कठिण असल्यास श्रोत्यांचें चित्त त्याकडे मुळींच न लागतां दुसरीकडे पांगत असतें, तें भाषणांत कांहीं थट्टेचा प्रकार निघाल्यानें पुन्हां विषयाकडे वळतें, तसें सप्रमाण वचनें देऊन बुद्धिवाद केल्यानेंही वळत नसतें. परंतु हें विनोदपर भाषण तरी जितक्यास तितकेंच असलें पाहिजे. नाहीं तर 'अति तेथें माती' या साधारण ह्मणीप्रमाणें भाषण बेचव होऊन त्याचा सर्व रंग बिघडेल. शहाण्या सुज्ञ मंडळीला फार थट्टा केलेली आवडत नसते, हें पूर्ण लक्षांत असलें पाहिजे.

ज्या थट्टेची गैरथट्टा होणार नाहीं, ह्मणजे जी विकोपाला न जातां परिणामीं सुखद आणि संतोषकारक होईल, अशी थट्टा किंवा मस्करी केली असतां उत्तम. कारण

अशी जी थट्टा असते, ती मोठ्या तजविजीची आणि युक्तीची असते. अशा शिताफीनें विनोद केल्यावर त्यापासून श्रोतृवृंदाच्या मनावर विपरीत परिणाम होईल अशी भीति बाळगण्याचें मुळींच कारण राहत नाहीं. एवढ्याकरितां थट्टामस्करी करायची ती बेताबाताची आणि जपून करावी. तथापि प्रतिपक्ष्याचें ह्मणणें हाणून पाडण्याकरितां त्याची वाटेल तितकी थट्टा केली किंवा निंदा केली, त्याचा मोठा उपहास केला, तरी चालण्यासारखें आहे. कारण असे कांहीं विलक्षण प्रसंग येतात कीं, त्या ठिकाणीं प्रतिपक्ष्याच्या कोटिक्रमावर विचारानें कांहीं जमण्यासारखें नसतें. त्याचें जेणेंकरून हंसूं पुष्कळ होऊन छीथू होईल असें करण्यांत जें महत्व आणि अर्थसाधन आहे, तें बुद्धिवाद करून बोलण्यांत नाहीं; पण त्यांचें हंसूं करतांनां आपलें हंसूं न होईल अशाविषयीं खबरदारी घेतली पाहिजे, हें मात्र विसरतां कामा नये. आतां हें जें विनोदपर भाषण करावयाचें, तें अगदीं उत्तमच असलें पाहिजे, असेंही केवळ ह्मणतां येत नाहीं. कारण आपण आपसांत खाजगी रीतीनें बोलत असतांनां, त्यांत विनोदाचा बराच भाग असतो; पण त्यापासून आपणाला कांहीं हंसूं येत नसतें, तेंच सार्वजनिक ठिकाणीं एकत्र जमलेल्या मंडळीसमोर झालें असतां लोक पोट धरधरून हंसतात, असें आपण नेहमीं पाहतों.

वक्त्यानें भाषणांत अश्लील शब्द घालून बीभत्सपणाचा प्रकार आणूं नये. आपलें मन कोणीं दुखवूं नये असें ज्याला वाटतें, व जो चांगल्या मनुष्याची नेहमीं चहा क-

रतो, तो कधींही वरील प्रकारची थट्टा करून नियमाचें उल्लंघन करणार नाहीं हें उघड आहे, ज्या गुणांनीं भाषणाला शोभा येते, त्या गुणांसंबंधानें ह्यूम नांवाच्या एका इंग्रजी ग्रंथकारानें आपल्या निबंधांत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, ' भाषणांत प्रचारांत नसलेलीं वाक्यें घालून आपल्या शहाणपणाचे तारे तोडल्यानें, व दुसऱ्याचे मनास चटका लावणारे हृदयभेदक दृष्टांत आणि कवितेचे चुटके सांगितल्यानें ह्मणजे भाषणाला खरी शोभा येते असें मुळींच नाहीं. उलट त्यापासून बेरंग मात्र होतो. अशा भाषणांत वास्तविक पाहूं गेलें तर खरा सुंदर असा विचार विसांत एक; बाकीचे आपले विचारच. एक विचार थोडक्यांत आणि सुरेख रीतीनें सांगण्यांत वास्तविक जी मौज आणि शोभा आहे, ती त्याचे छप्पन हजार निरर्थक प्रकार करून सांगण्यांत नाहीं, हें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील.

क्विंटिलियन यानें या विषयावरील आपल्या उपसंहारांत असें म्हटलें आहे कीं, पदरचना भिन्न प्रकारची असून, ती प्रौढ व मनोरम असावी. ती करतांना क्रम, परस्परसंबंध, आणि ताल ह्या तीन गोष्टींकडे विद्यार्थ्यांनीं विशेष लक्ष पोहोंचविलें पाहिजे. मुख्य खुबी काय ती पदरचनेंत जास्त सामील करण्यांत, व मूळची रचना फिरवून नवीन करण्यांतच आहे. ती प्रतिपाद्य विषयास अनुरूप अशी असावी, ह्मणून वक्त्यानें बरीच काळजी घेतली पाहिजे; व याहीपेक्षां जास्त काळजी विषयाचें मनन करून विवेचन करण्यांत घ्यावी लागते. परंतु आपण ती घेत आहों, किंवा

विषयाचें घराहून चांगलें अध्ययन करून आलों आहों, असें लोकांस समजूं देऊं नये. उलट आपलें भाषण ऐकून त्यांनीं असें म्हटलें पाहिजे, कीं 'हा जें बोलतो आहे तें साहजिक व अस्खलित निघत आहे. याची पदरचना उगीच आपल्या मेंदूस त्रास देऊन बळेंच ओढूनताणून तयार केलेली दिसत नाहीं.'

पदरचनेची खरी परीक्षा कर्णेंद्रियासच आहे. कर्णरंध्रांत ती शिरतांक्षणींच त्यास तिची बरी कीं वाईट ही परीक्षा होत असते. तींत कांहीं उणीव असली कीं, तें भ्रमिष्टासारखें होतें. कर्णकटु शब्द त्यास त्रासरूप होतात; मृदु शब्दांनीं त्याचें शांतवन होतें; भलतेच शब्द ऐकून तें दचकतें; थोडें आणि आटपसर असेल, तेंच त्यास पसंत पडतें. पदरचनेंत काय लंगडें आहे हें त्यास तेव्हांच कळतें; वाजवीपेक्षां फाजील रीतीची पदरचना त्यास मुळींच आवडत नसते. पदरचनेची खरी खुबी विद्वानांनाच काय ती कळते; तेच तिचे मर्मज्ञ. इतरांस तिजपासून करमणूक आणि मनोरंजन मात्र होतें.

**कालमर्यादा.**—व्याख्यान फार मोठेंही नसावें, व अगदीं लहानही नसावें, मध्यम असावें. अगदीं लहान असेल तर तें थोडें वाढवावें, आणि अतिशय मोठें असेल तर थोडें कमी करावें.

व्याख्यानशैलीसंबंधानें आम्हांला जें काय सांगावयाचें होतें तें सर्व आतां आटपलें. तीविषयीं सांगण्याचें ह्मणून कांहींएक उरलें नाहीं. विचारापेक्षां शैलीचें महत्व फार कमी आहे. कारण भाषाशैली ह्मणजे केवळ विचार साजरे कर-

ण्याचें एक पांघरूण होय. यापेक्षां तिला जास्त महत्व नाहीं. मुख्य महत्व विचारालाच आहे. तेव्हां ते चांगले निघण्याविषयीं जास्त काळजी घेतली पाहिजे. क्विंटिलियनसारख्या अनुभवशीर ग्रंथकाराचें देखील असेंच सांगणें आहे. तो म्हणतोः—"शब्दयोजनेकडे तर तुह्मी लक्ष घालच, परंतु व्याख्यानविषयाचा आस्थापूर्वक विचार करा, आणि यश मिळवा."



# भाग ६ वा.

## व्याख्यानविभाग.

प्रसिद्ध डॉक्टर ब्लेअर यांच्या ह्मणण्याप्रमाणें, कोणत्याही विषयावर व्याख्यान देतांनां त्या विषयाचे सहा भाग करून नंतर प्रत्येक भागावर थोडें थोडें भाषण करावें. ते सहा भाग येणेंप्रमाणें:—

१ ला—प्रस्तावना किंवा उपोद्घात.

२ रा—विषयनिर्देश आणि विभाग.

३ रा—निरूपण किंवा विवरण.

४ था—बुद्धिवाद किंवा कोटिक्रम.

५ वा—चित्तवेधक व हृदयद्रावक भाग.

६ वा—उपसंहार.

साधारणपणें, कोणत्याही विषयावर मनन करतांनां बहुशः हाच अनुक्रम धरून प्रत्येक भागावर वक्त्यानें वेगवेगळा विचार करावा. कांहीं विवक्षित विषयांचा विचार करतांनां मात्र ह्यांत थोडासा फेरबदल करावा लागतो. कधीं कधीं तर ह्यांतील कांहीं भाग अज्जी गाळावे लागतील. नियम जरी घालून दिलेले असले, तरी प्रसंगविशेषीं

ते मोडावे लागतात, याचा वाचकांस अनुभव असेलच. याकरितां वरील नियमांचा जेथें. जसा उपयोग करतां येईल तसा करून घेण्यास वक्त्यानें थोडेसें तारतम्य खरचलें पाहिजे. लढाईला लोक उभे करतांनां अघाडीचे लोक एका ओळींत सन्मुख असे उभे करावे, त्यांच्या उजव्या आणि डाव्या बाजूला निशाणें उभारावीं, सैन्याच्या बाजूचें संरक्षण करण्याकरितां दोहोंकडे घोडेस्वार राहूं द्यावे, वगैरे पुष्कळ नियम सेनाधिपतीला घालून दिलेले असतात; ह्मणून त्यानें सदासर्वदां कशाही प्रसंगीं तेच पाळीन ह्मटलें तर चालेल काय? नाहीं. खरोखर, प्रसंग न पाहतां तो तेच धरून चालूं ह्मणेल, तर प्रसंगविशेषीं त्याची मोठी फजीती होईल. लढाईची जागा जशी असेल, तशी त्यानें वरील पद्धत बदललीच पाहिजे. एखादी टेंकडी आड येऊं लागली, किंवा नदी आडवी वाहत असली, अगर जमीनीला फार खळगे पडले असले, किंवा तेथें झाडी वगैरे दुसऱ्या कांहीं अडचणी येत असल्या, तर अर्थात् वरील व्यवस्थेंत फेरबदल करावा लागेल, हें उघड आहे. शत्रूचा रंगरोख पाहून देखील वर सांगितलेली व्यवस्था पालटून दुसरीची योजना करावी लागते. त्याचप्रमाणें जनसमूहांत भाषण करण्याचें आहे. प्रसंगानुसार नवीन युक्ती अगर कल्पना बसवून व्यवस्था लावावयाची किंवा जुळणी करावयाची असते. तेव्हां वक्तृत्वाचे जे निरनिराळे महत्वाचे भाग आहेत, त्या सर्वांत रचना किंवा जुळणी हा दुसऱ्या प्रतीच्या महत्वाचा भाग होय, असेंच ह्मटलें पाहिजे. कारण समजा कीं, आपल्याला एक मूर्ती

किंवा प्रतिमा तयार करावयाची आहे, ह्मणून तिचे सर्व अवयव वेगवेगळे ओतून ठेवले. आतां त्यांतील प्रत्येक जागच्या जागीं जोडून बसविल्याखेरीज त्यांला प्रतिमा किंवा पुतळा हें नांव देतां येत नाहीं; आणि दिलें असतां तें शोभणारही नाहीं. तसेंच, आणखी असें पहा कीं, आपल्या अगर इतर प्राण्यांच्या शरीरांतील एखादा भाग किंवा अवयव जर त्या ठिकाणचा काढून दुसऱ्या जागीं बसविला, तर तो प्राणी किती अक्राळविक्राळ आणि भयंकर दिसेल बरें? त्यास पाहून खरोखर आपल्याजवळ हा कोणीं मूर्तिमंत राक्षसच उभा आहे कीं काय, असा आपणास भास होईल, यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणें व्याख्यानांतील निरनिराळे भाग यथोचित स्थानीं बसविले पाहिजेत. त्याचा आपण आतां विचार करूं.

**प्रस्तावना.**—कोणत्याही गोष्टीला प्रथम आरंभ चांगला झाला, ह्मणजे ती गोष्ट अर्धी तडीस गेली असें ह्मणत असतात, व तें खरेंच आहे. एवढ्याकरितां पूर्वांग किंवा प्रस्तावना ह्मणून जें सांगावयाचें, तें चांगलें साधण्याविषयीं वक्त्यानें विशेष काळजी घेतली पाहिजे. ह्या पूर्वनिरूपणांत मुख्य तीन गोष्टी साधावयाच्या असतात. त्या चांगल्या साधल्या ह्मणजे मग प्रस्तावना उत्तम वठली असें ह्मणावयास फारसा बाध नाहीं. त्या तीन गोष्टींत विशेष महत्वाची गोष्ट ती ही, कीं श्रोत्यांचें अंतःकरण प्रसन्न करून आपल्याविषयीं त्यांचा ग्रह अनुकूल असा करून घेतां आला पाहिजे; आणि हें, वक्त्यानें आपल्या पूर्वभाषणांत अहंपणा न धरतां जर थोडीशी मर्यादा

दाखविली, आणि मधूनमधून श्रोत्यांची खुशामत व स्तुतिपाठ करण्याचें मनावर घेतलें, तर त्यास सहज साधण्यासारखें आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, श्रोतृगण सावधचित्तेंकरून आपलें ह्मणणें ऐकून घेईल असें करावयाला झटलें पाहिजे. ह्मणजे त्यानें असें करावें कीं, जो विषय हातीं घेतलेला असेल, त्याचें महत्व किंवा अपूर्वता दाखवून थोडक्यांत गौरवयुक्त भाषण करावें, अथवा त्या संबंधाचीं आपलीं जीं मतें असतील तीं निवेदन करावीं. किंवा ज्या तऱ्हेनें आपणास विषयाचें विवेचन करावयाचें असेल त्याचें दिग्दर्शन करावें. ह्मणजे त्यायोगानें श्रोत्यांचें चित्त विषयाकडे विशेष ओढणार आहे. तिसरी गोष्ट श्रोत्यांना इतकें आपलेंसें करून घ्यावें कीं, त्यांस कोणतीही गोष्ट सांगितली असतां, ते तिजविषयीं दुराग्रह न धरतां एकदम ती करण्यास तयार होतील, इतकी आपल्याविषयीं त्यांच्या मनांत पूज्यबुद्धी उत्पन्न करून त्यांस गरीब करून सोडलें पाहिजे. असें होण्याला, आपण ज्या मतांचा स्वीकार केला असेल त्याविरुद्ध जर श्रोत्यांचा अगोदरच गैरसमज झाला असेल, तर तो समूळ काढून टाकण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे. ह्मणजे ते तेव्हांच आपलेसे होऊन त्यांचीं मनें वळण्यासही उशीर लागणार नाहीं.

प्रस्तावनेदाखल भाषण करण्याच्या अनेक धाटी आहेत. तथापि, प्रत्येक प्रसंगीं त्या त्या प्रसंगास उचित, आणि विषयास लागू पडणारी व श्रोत्यांच्या स्थितीस अनुरूप, अशा धाटींत तें भाषण झालें पाहिजे. कित्येक व्याख्यानकार मोठ्या समाजापुढें बोलावयास उठले, ह्मणजे कांहींएक

प्रस्ताव न करतां आरंभींच बेधडक विषयनिरूपण करावयास लागतात, आणि क्षणभर मंडळीला चकित करून सोडतात. अशाविषयीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. ओकॉनेल नांवाचा कोणी एक पाद्री होता. त्यानें एकदां आपल्या भाषणारंभींच असें सांगितलें कीं, 'मी पाद्री आहें, आणि हाउस ऑफ लॉर्ड्स ( पार्लमेन्टची एक शाखा ) ला धर्मोपदेश करण्यास आलों आहें. तसेंच रोबक यानें केलें. हा एका प्रसंगीं उठून भाषणाच्या आरंभींच असें ह्मणाला, "काय? राजनातीसंबंधानें बोलावयाचें नाहीं? तो तर माझा विषयच आहे, व त्यावर बोलणें हें माझें काम आहे."

परंतु मुख्य नियम असा आहे, कीं भाषणाला आरंभ करावयाचा तो मोठ्या सौम्यतेनें आणि लीनतेनें केला पाहिजे. हा नियम ह्मणजे आजकालचा आहे, असें नाहीं; तो पूर्वापार चालत आला आहे. भाषण जितकें सौम्य होईल, तितकें श्रोत्यांना फार आवडणार आहे. अंगीं सौम्यता आणि लीनता असल्यानें कोणाचेंही मन तेव्हांच वश करून घेतां येतें. ह्मणून प्रथमारंभीं वक्त्यानें आपल्या भाषणांत सभ्यता आणि विनय हे दोन गुण अवश्य दाखविले पाहिजेत. तेंच उद्धटपणाचें वर्तन केल्यास, बोलणारास आपल्या विद्वत्तेची मोठी घमेंडी आहे, असें वाटून लोक त्याच्या भाषणास बिलकुल महत्व देत नाहींत.

एक हात लांकूड आणि नऊ हात ढलपी, ह्या ह्मणीप्रमाणें आपल्या हातून पुष्कळ गोष्टी घडतील अशी वृथा अभिवचनें उपोद्घातांत देऊन ठेवणें ह्मणजे महामूर्खपणाचें काम आहे. तीं न देण्याविषयीं फार जपून राहिलें

पाहिजे. बोलणारानें आरंभींच मोठा आव घालून बोलूं नये. कारण, तो शेवटपर्यंत तसा टिकणें फार कठिण काम आहे. त्यांत उंच शिखरावरून घसरत घसरत खालीं येण्याची फार भीति असते. अगोदर मोठें अवडंबर घालून नंतर खालावत जाणें, ह्मणजे त्या फजीतीस पारावार नाहीं. वरून एकदम खालीं ढांसळत येणें यासारखी अत्यंत शरमेची गोष्ट दुसरी कोणतीच नसेल. कांहीं थोड्या प्रसंगीं अवडंबर घातलें असतां निभेल,तथापि कालवर्तमानानुरूप मोठ्या गंभीर आणि प्रगल्भ स्वरानें व्याख्यान देण्यास सुरवात केली असतां शोभणार आहे. प्रस्तावनेंतील आशय, व तो देण्याची रीत फार सोपी असून तींत ओढाताण केलेली नसावी. प्रस्तावना विषयास धरून असावी. ती सरळ व सोप्या भाषेंत येण्याला अगोदर विषयाचें चांगलें मनन झालें पाहिजे. विषयाचें नीट मनन करून नंतर प्रस्तावना तयार करण्यास लागावें. तसें न करतां प्रथम प्रस्तावना तयार करण्याच्याच नादीं जर आपण लागलों, तर ती विषयाला धरून कधीं होणार नाहीं. प्रस्तावनेंत असेल तें विषयांत नसावयाचें, व विषयांत असेल तें प्रस्तावनेंत नसावयाचें, असें होईल; किंवा विषयास धरून प्रस्तावना न झाल्यानें, तिला जुळण्यासारखा विषय काढावा लागेल, हें एक, किंवा विषयास धरून ती पुन्हां नवीन तयार करावी लागेल. प्रसिद्ध वक्ता सिसेरो हा स्वतः करून ठेवलेल्या नियमांस क्वचितच धरून चाले. तथापि त्यानें- देखील एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, मी पहिल्यानें विषयाचा नकाशा व त्यास लागणारीं साधनें नीट मनांत

आणून कायम करून ठेवीं, आणि मग प्रस्तावना कशी करावी याविषयीं विचार करीं, असा माझा नित्याचा क्रम असे; परंतु जर कदाचित प्रस्तावना प्रथम तयार करण्याच्या भरीस मी पडलों असेन, तर ती तयार करावयाला विषयही मला अगदीं क्षुल्लक, आणि ज्यावर विचार करण्याची अवश्यकता नाहीं असाच मिळाला असेल. एकदां विषयाचें चांगलें मनन होऊन तो नीट जुळला, ह्मणजे उपोद्घात तयार करण्यास फारसे श्रम पडत नाहींत. आपल्याला त्याचें साहित्य आपोआप भराभर मिळत जातें.

प्रस्तावनेंतील भाषा अगदीं व्याकरणशुद्ध असून निर्दोष अशी दिसली पाहिजे. प्रस्तावना निर्दोष होण्याकरितां शब्दरचनेसंबंधानें इतकी कांहीं विशेष काळजी घ्यावी लागते, कीं तितकी व्याख्यानविषयक इतर कोणत्याही भागासंबंधानें घ्यावी लागत नाहीं. याचें कारण असें, कीं प्रथमारंभीं श्रोत्यांचें लक्ष गुणदोषविवेचनाकडे फार असतें; तसें विषयाकडे नसतें. ह्या वेळेस वक्ता काय बोलतो आहे, ह्याची ते मुळींच पर्वा करीत नाहींत; तिकडे ते चित्तही देत नाहींत, पण तो कसें बोलतो, व कोठें चुकतो हें पाहण्याला मात्र ते अगदीं मांजराप्रमाणें टपून बसलेले असतात.

तेव्हां प्रस्तावना अशी असली पाहिजे, कीं ती वाचतांच किंवा ऐकतांच श्रोत्यांचें चित्त जागृत होऊन पुढील विषय वाचण्याची किंवा ऐकण्याची त्यांस सहजीं जिज्ञासा व्हावी.

विषयांतील अतिमहत्वाचा भाग प्रथम उपोद्घातांत आणूं नये. कारण पुढें विस्तार करून सांगण्याचे जे विषय किंवा मुद्दे असतात, ते अगोदर प्रस्तावनेंत सांगून टाक-

त्यानें दुसऱ्या वेळेस ते ऐकतांना त्यांच्यांतलें पूर्वीचें रहस्य किंवा अपूर्वता एकदां कळून आल्यानें त्यांविषयीं फारसें कौतुक वाटत नसतें. शिवाय मुख्य मुद्याच्या गोष्टीचा विचार योग्य ठिकाणीं होऊन तो पूर्ण झाला असला म्हणजेच त्याचा ठसा ऐकणारावर उत्तम वठतो. विषय ज्या प्रकारचा लहानमोठा असेल, तशी त्याची प्रस्तावना झाली पाहिजे, समजा कीं लहानशा इमारतीसमोर एक भलें थोरलें ढेलज उभें केलें, किंवा स्मशानभूमीकडे जाण्याचा मार्ग वेली मंडप इत्यादिकांनीं आच्छादित करून त्यास बगीच्याची शोभा आणूं म्हटलें, तर तें करणें साजेल काय? तें करणाराचा त्यांत अविचारीपणा मात्र दिसून येईल. तद्वत् विषय व प्रस्तावना यांच्यांत विजोड केला असतां, वक्त्याची किंवा ग्रंथकर्त्याची अक्कलहुशारी कळून येणार आहे, हें ज्यास थोडेंबहुत तारतम्यज्ञान आहे त्यास सहज कळून येईल. तेव्हां सांगावयाचें म्हणून इतकेंच, कीं व्याख्यानांतील रहस्य आणि त्याचें वळण न बिघडेल अशा तऱ्हेचा त्याचा प्रत्येक भाग असला पाहिजे.

न्यायासनापुढें किंवा मोठ्या जनसमूहापुढें बोलतांना प्रस्तावनेदाखल जे चार शब्द बोलावयाचे, त्यांत प्रतिपक्षी मंडळीला दोष काढण्यास संधी सांपडेल अशा प्रकारचें कांहीं नसावें. उत्तरपक्ष करण्याचे बाबतींत, प्रतिपक्षाचें बोलणें झाल्यावर त्याचें खंडन करण्यास उत्तरपक्ष करतांना जें भाषण होत असतें, त्याची प्रस्तावना फार सरळ, सुरस आणि खुबीदार अशी वाटत असते. त्यासंबंधाचा विचार घरीं झालेला नसून तेथल्यातेथेंच निघालेला असतो;

म्हणून वक्त्याच्या ह्या वेळेच्या समयोचित भाषणाबद्दल त्याची मोठी प्रशंसा होते. प्रारंभाचें भाषण कृत्रिम आणि कष्टसाधित नसल्यानें त्या विषयाला इतकी महती येते, कीं पुढील सर्व भाषण घरीं लिहून पाठ केलेलें असलें, तरी तें पूर्वीप्रमाणेंच समयस्फूर्तीचें आहे अशी लोक सहज कल्पना करितात.

**विषयाची प्रतिज्ञा.**—व्याख्यानविषयासंबंधी वक्ता आपल्याला पुढें काय सुचविणार, हें ह्या प्रतिज्ञेवरून सु-व्यक्त होत असतें. आतां ती चांगली मात्र झाली पाहिजे. ती जितकी थोडक्यांत, स्पष्ट, आणि साध्या रीतीनें सांगितली जाईल, तितकी श्रोत्यांच्या मनांत पुढील विषयाच्या स्वरू-पाची कल्पना चट्कन येणार आहे. अशा रीतीनें तिची रचना झाली असली म्हणजे बस आहे. प्रतिज्ञेसंबंधानें यापेक्षां जास्त कांहीं सांगण्याचें प्रयोजन दिसत नाहीं, व सांगण्यासारखेंही नाहीं.

**परिच्छेद.**—वरप्रमाणें विषयाची प्रतिज्ञा सांगितल्यावर विवेचन करण्यासारखे जे मुख्य मुद्दे असतील, ते सांगण्यास सुरुवात करावी. प्रत्येक व्याख्यानांत असे मुद्दे काढावे लागतात असें नाहीं. एकाच प्रकरणाचा विचार करावयाचा असेल, किंवा बोलण्याच्या ओघांत सुचतील तसे निरनिराळे मुद्दे काढण्यांत जास्त खुबी किंवा कुशलता आहे असें वक्त्यास वाटत असेल, तर अगोदर मुद्दे काढण्याची जरूरी नाहीं. धर्मपर व्याख्यानविषयाचे नेहमीं असे पृथक् पृथक् विभाग प्रथम करतात. परंतु तसे करावे किंवा करूं नये, याबद्दल मतभेद आहे. एका अत्यंत विद्वान् आर्चबिशपानें

आपल्या वक्तृत्वविषयावरील ग्रंथांत वरील पद्धत अग्राह्य आहे, असें साफ म्हटलें आहे. तो म्हणतो कीं, ही युक्ति अगदीं अलीकडची म्हणजे नवी आहे. पूर्वीचे लोक असें करीत नव्हते. धर्मसंबंधी उपदेश करतांनां अध्यात्मज्ञानाचा विषय लोक त्यांत घुसडूं लागल्यापासून हा मुद्दे काढण्याचा प्रघात सुरू झाला. परंतु या पद्धतीनें धर्मपर व्याख्यानांत बिलकुल रस येत नाहीं एवढेंच नाही, तर व्याख्यानाच्या पूर्वापर संबंधांचें ऐक्यही राहत नाहीं; आणि हें ऐक्य कायम ठेवणें तर अत्यवश्यक असतें. कारण तें कायम राख-ल्यानेंच श्रोत्यांचीं मनें विषयाकडे वेधून जाण्याचा विशेष संभव असतो, असें वरील आर्चबिशपाचें म्हणणें आहे. परंतु डॉक्टर ब्लेअर यांच्या मतें विषयाचे मुद्दे काढण्याची पद्धत फार चांगली असून अनुकरणीय आहे. ते म्हणतात—'हा प्रचार अलीकडील धर्मोपदेशकांच्या अंगीं फार खि-ळून गेल्यानें इतका जोरावला आहे, कीं तो टाकून नि-राळ्या पंथानें आपण चालूं असें कोणीं मनांत आणल्यास त्याचें व्याख्यान मुळींच सुरळीत कडेस लागणार नाहीं. हा प्रचार फार दिवस त्यांच्या वहिवाटींत पडल्यानें म्हणजे यास इतकें महत्व आलें आहे असें नसून, तो जात्याच चांगला व विचाराचा आहे, असें माझें पूर्ण मत आहे. विषयपरिच्छेदनानें धर्मपर व्याख्यानास वक्तृत्वाची जरी शोभा येणारी नाहीं, तथापि तें स्पष्ट आणि सहज सम-जण्यासारखें होऊन, त्यापासून श्रोतृसमूहास उपदेश-ही चांगला होतो. धर्मोपदेश करण्याचा मुख्य हेतु तरी तोच आहे. आणखी विषयपरिच्छेदनाचा ऐकणारास

एक मोठा फायदा आहे, तो हा कीं विषयाचे भाग पाडून प्रत्येक भागावर वक्ता मुद्देसूद बोलत असला, म्हणजे श्रोत्यांस तें सर्व व्याख्यान इत्थंभूत ध्यानांत ठेवण्यास फार सुलभ जातें. दुसरें, त्यांचें चित्त एकदां भाषण श्रवण करण्यामध्यें चांगलें रमलें, म्हणजे मग वक्ता कितीही जलद बोलत असला, तरी अव्वलपासून अखेरपर्यंत कांहीं एक न सुटतां त्यांस तें ग्रहण करतां येतें. शिवाय परिच्छेदनपद्धतीनें वक्त्यास ठिकठिकाणीं थांबण्याचा प्रसंग येतो, त्यामुळें अनायासें श्रोत्यांनाही विसांवा मिळतो; आणि झालेल्या भाषणावर तेवढ्यांतल्या तेवढ्यांत विचार करायला सांपडून, पुढील भाषण ऐकण्यास जास्त हुशारी आणि उमेद येते. त्यांस विषयाचे विभाग माहीत झालेले असतातच; यामुळें वक्त्याच्या भाषणाची इतिश्री कोठें होणार हें, आणि एकाग्र चित्तानें तें ऐकत बसल्यानें होणाऱ्या तापापासून आपण केव्हां मोकळे होऊं हें, त्यांस अगोदर कळण्याला मार्ग राहतो. म्हणून एक चित्त करून सर्व भाषण ऐकून घेण्यास त्यांस फारसे परिश्रम किंवा दुःख वाटत नसतें. स्वसंतोषानें तें भाषण कान देऊन ते नीट ऐकत बसतात. वाटचालीनें थकलेल्या प्रवाशाला रस्त्याच्या बाजूस असलेला मैल पाहून ज्याप्रमाणें एका प्रकारची विश्रांति मिळून पुढें पाऊल टाकण्यास हुशारी येते, तद्वत् विषयपरिच्छेदनांतील प्रत्येक भागाचें अखेरचें वर्णन संपत येतांच, व्याख्यानश्रवणानें त्रस्त झालेल्या श्रोत्यांस एक प्रकारचें विश्रांतिसुख मिळून पुढील विवेचन ऐकण्याची अत्यंत उत्कंठा प्राप्त होते.'

हातीं धरलेलें काम जों जों हलकें होऊन आपल्या आटोक्यांत आलें आहे असें वाटतें, तों तों राहिलेलें काम केव्हां लवकर संपवून टाकूं अशी उत्कटेच्छा उत्पन्न होऊन आपण तें करून टाकण्याला मनोभावानें झटत असतों; व त्या करण्यापासून आपणास कांहीं त्रास किंवा दुःख वगैरे न होतां उलट संतोष आणि आनंद होत असतो. हें आज नव्यानें सांगावयास हवें असें नाहीं. याचा अनुभव सर्वांस आहेच. डा. ब्लेअरसाहेब आणखी असें ह्मणतात कीं, 'विषयाचे वेगवेगळे भाग केल्यानें त्यांचा परस्परांशीं असलेला संबंध राहत नाहीं ह्मणून जें वरील आर्चेबिषपांचें ह्मणणें आहे, तें मला पसंत नाहीं. जर कदाचित् तसल्या प्रकारचें यांत ऐक्य राहत नसेल, तर खरोखर तें विभागपद्धतीनें राहत नसेल, असें मला वाटत नाहीं. मूळ मुद्याचें किंवा विषयाचें प्रतिपादनच ऐक्य न राहण्यासारखें होत असेल. बाकी विषयाचीं प्रकरणें चांगलीं निवडलीं जाऊन त्यांचें विवेचनही चांगलें झालें, तर विषयांतील ऐक्यभाव तर जात नाहींच, पण उलट, तो, प्रत्येक भागांत मुख्य मुद्दा एकच असून ते भाग एकमेकांत कशा रीतीनें गोंवले आहेत हें दाखविण्यांत आल्यानें, उत्तम रीतीनें प्रगट केला जातो.'

यावरून धर्मपर व्याख्यान घ्या, वकिलाचें भाषण घ्या, किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचें व्याख्यान घ्या, त्यांत विषयाचे पृथक् पृथक् भाग करून त्यांचें यथासांग विवेचन करणें फार महत्वाचें आहे हें खास सिद्ध होतें. तेव्हां विषयपरि-

च्छेदनासंबंधीं उपयुक्त नियम येथें दिले असतां गैर होणार नाहीं असें वाटतें. ते नियम असेः—

**नियम १.** विषयाचे भाग पाडावयाचे ते परस्परांपासून अगदीं भिन्न, ह्मणजे एकांत दुसऱ्याचा समावेश न होईल असे पाडावे. उदाहरणार्थ, 'सद्गुणापासून होणारे फायदे' हा एक भाग, आणि 'नेमस्तपणापासून होणारे फायदे' हा दुसरा. आतां वास्तविक म्हटलें तर हे दोन्ही भाग एकाच स्वरूपाचे आहेत; कारण सद्गुणांत सर्व प्रकारचे चांगले गुण येतात. नेमस्तपणा असणें हा एक चांगला गुण आहे. तेव्हां अर्थात् तो सद्गुणांत आलाच पाहिजे, हें उघड आहे. असे विभाग करूं नये. ते केल्यानें विषयाचें विवेचन अस्पष्ट आणि अव्यवस्थित असें होतें.

**नियम २.** भाग पाडतांनां स्वाभाविक रीतीनें जेवढे पडण्यासारखे असतील तेवढेच पाडावे. प्रथम अगदीं साधे मुद्दे, कीं जे सहज कळण्यासारखे असून आरंभीं सांगितलेच पाहिजेत, असे मुद्दे काढावे. नंतर हे समजले आहेत असें कल्पून, हे आधारभूत धरून दुसरे काढावे. 'तोडा, पण छिन्नभिन्न न होईल असें तोडा' असें ह्मणण्याची एक साधारण प्रवात आहे. त्या ह्मणीप्रमाणें विषयाची ओढाताण करून तो विस्कळीत न होतां व कांहीं एक आयास न करितां, आपोआप त्याचे साहजिक जितके भाग पडूं शकतील तितकेच पाडावे.

**नियम ३.** प्रत्येक भागाचे सर्व घटकावयव मिळून एक सबंध विषय झाला पाहिजे. तसें न झालें तर विषयाचे पूर्ण विभाग झाले नाहींत असें म्हणावें लागेल. य-

राचे कोनकोंपरे वगैरे सर्व भाग नकाशांत दाखविल्याखेरीज जशी त्याची पूर्ण आकृति ध्यानांत येत नसते, तद्वत् अपुऱ्या परिच्छेदनानें विषयाचें संपूर्ण स्वरूप लोकांस कळून येणार नाहीं.

**नियम ४.** मुद्दे थोडक्यांत वर्णन करून सांगावे. उगीच चर्पटपंजरी करतां कामा नये. मुद्दे सांगतांनां फाजील असा एकही शब्द काढूं नये. आपली वर्णनपद्धति मर्यादित आणि रेखलेली असावी. मुख्यत्वेंकरून रेखलेली पद्धत ठेवल्यानेंच विषयविभाग नीट आणि सुरेखसे झालेले दिसतात. त्यांचा थोडक्यांत परंतु स्पष्ट विचार झाल्यानेंच श्रोते अगदीं आश्चर्यचकित होतात; व विषय तेव्हांच त्यांच्या ध्यानांत बसतो.

**नियम ५.** मुद्यांत आणखी निरर्थक पोटमुद्दे काढण्यांत फारसें हांशील नसतें; व त्यापासून व्याख्यानास शोभाही येत नाहीं. शास्त्रविषयक भाषणामध्यें पोटमुद्यांचेंही प्रतिपादन केलें असतां चालणार आहे. परंतु भाषणाच्या विषयचा इतका कीस काढला असतां, तें फार गहन आणि नीरस असें होऊन ध्यानांत ठेवण्यालाही फार जड जातें, व त्याचा फारसा उपयोग नसल्यानें आपल्या स्मरणशक्तीला विनाकारण त्रास मात्र होतो. धर्मपर व्याख्यानाचे विभाग सहा किंवा ह्यापेक्षां जास्त कधीं करूं नये.

**कथानक.**—कथानक आणि विवरण हे दोन्ही व्याख्यानाचे अवयवभूत भाग आहेत. दोन्ही एके जागीं चालण्याचें कारण ह्मणून इतकेंच कीं, ह्या दोहोंला सारखे नियम लागू असून दोहोंचा हेतुही साधारणतः सारखाच

आहे. हा हेतु ह्मणजे दुसरा कांहीं नसून, सयुक्तिक वाद करून श्रोत्यांची खात्री करून देण्यापूर्वी किंवा त्यांच्या मनोवृत्ती रंजित करून त्यांस संतुष्ट करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी विषयाचें स्पष्टीकरण व्हावें, हाच असतो.

**वकिली.**—न्यायाच्या कोर्टासमोर वकील या नात्यानें बोलण्यास उभें राहिलें ह्मणजे तेथें देखील कथानकाचा फार उपयोग होत असल्यानें त्याविषयीं अवश्य विचार करावयास हवा. कथानकाचें निरूपण करणें तेथें मोठें कठीण जातें. कारण वकिलास निव्वळ खरेंच बोलावें लागत असतें असें नसून, जेणेंकरून आपल्या कुळाचा मुकद्दमा जिंकला जाईल, अशा रीतीनें भाषण करावें लागतें. कथानकात ज्या गोष्टी तो सांगून जाईल, त्याच आधारभूत धरून त्यास पुढील भाषण करावयाचें असतें. तेव्हां सत्याची मर्यादा जितकी उल्लंघन न होईल तितक्यापुरती एखाद्या गोष्टीची चर्चा करणें, स्वपक्षाच्या बळकटीकरितां तिला उत्तम प्रकारचें स्वरूप देणें, व तिचा न्यायाधीशाच्या मनावर स्पष्ट ठसा उमटेल अशा रीतीनें ती सांगणें, व आपल्या पक्षास प्रतिकूळ असणाऱ्या गोष्टी हाणून पाडणें, हीं कामें फार शहाणपणाचीं आणि बुद्धिकौशल्याचीं आहेत. क्विंटिलियन ह्मणतो कीं, ह्या कथानकांत आपली लुच्चेगिरी आणि डावपेंच हे बाहेर दिसण्यांत न येतील तितके न येऊं देण्याविषयीं वकिलानें फार सावधगिरी ठेवली पाहिजे. कारण कांहींएक गोष्टींचें निरूपण वकील करूं लागला, ह्मणजे तींत सत्यांश किती आहे हें पाहण्याकरितां न्यायाधीश इतके टपून बसत असतात, कीं तसे ते

इतर कोणत्याही प्रसंगीं बसत नाहींत. याकरितां आपलें बोलणें सर्व बनावट आणि खोटें असून त्यांत बऱ्याच गोष्टी मुद्दाम झांकून ठेवल्या आहेत असें वकिलानें दिसू देऊं नये. आपण जें बोलत आहों, तें खटल्याचें अंशभूतच आहे, त्यांत आपल्या पदरचें एक अक्षरही नाहीं, असें न्यायाधीशाच्या निदर्शनास आणून दिलें पाहिजे. कथानकांत येणाऱ्या गोष्टी संभवनीय असाव्या. त्यांविषयीं जें काय सांगावयाचें तें स्पष्ट आणि मर्यादशील असें असावें. अशा प्रकारें वकिलाचें सर्व भाषण जर होईल, तर तें खरोखर अवर्णनीय होऊन जाईल यांत संदेह नाहीं.

**उपदेशपीठ.**—धर्मपर व्याख्यानांत कथानकाची विशेषतः मुळींच जरूरी नसते. त्यांत व्याख्यानविषयाचें विवेचन करावें लागतें, तें तरी कथानकाप्रमाणेंच मर्यादित असून सरळ, सुरस, आणि स्पष्ट अशा रीतीनें झालें पाहिजे. धर्मपर व्याख्यानांतील भाषण फारसें अलंकारिक नसावें. तें सरळ आणि प्रौढ असें असलें ह्मणजे पुरे आहे. मूळ ग्रंथांतील मतांचा संभवण्यासारखा योग्य अर्थ करून तो श्रोत्यांस नीट समजावून सांगणें, व व्याख्यानविषयापासून घेण्यासारख्या गुणांची किंवा धर्माच्या स्वरूपाची पूर्ण आणि खुलासेवार माहिती देऊन त्यांची नीट रीतीनें ओळख करून देणें, हाच मुख्य महत्वाचा भाग असतो; आणि हा भाग उत्तम वठला असला, ह्मणजे श्रोत्यांची खात्री पटवून त्यांचें मन वळविण्याच्या कामीं ज्या अनेक अडचणी येत असतात त्या तत्काळ दूर होतात. धर्मपर व्याख्यान चांगलें वठण्याची मुख्य गुरुकिल्ली ही आहे कीं, त्या विषयाचें

अगोदर चांगलें मनन करावें लागतें. तें झालें असलें ह्मणजे तो विषय लोकांपुढें मुद्देसूद रीतीनें मांडावयाला फारसे आयास पडत नाहींत. धर्मपुस्तकांतील कांहीं वचनें दाखल्याकरितां घेणें, तीं, त्यांचा अर्थ काय होतो, व तीं आपल्या प्रस्तुत विषयाला कितपत लागूं पडतात, वगैरे गोष्टींचा नीट बारीक रीतीनें विचार करून, आपल्या उपयोगी पडण्यासारखीं आहेत असें वाटल्यास घ्यावीं. आपल्या विषयाचा दुसऱ्या कोणत्या विषयाशीं निकट संबंध असेल, तर दोहोंतला फरक काढून सांगावा. इतर गोष्टी तुलनेकरितां घेऊन त्यांत असणारें सादृश्य आणि विरोध दाखवून किंवा कार्यकारणभाव दाखवून अगर नाना तऱ्हेचे दाखले देऊन विषय प्रतिपादन केला असतां फार श्रेयस्कर होणार आहे, असें वाटल्यास तसें करावें; किंवा श्रोत्यांच्या मनोवृत्ती आपल्याकडे वळतील असें करावें. एकंदरींत श्रोत्यांच्या मनावर जीं मतें प्रतिबिंबित करण्याचा आपला मानस असेल, त्यांच्या आजूबाजूच्या गोष्टींविषयीं त्यांस जेणेंकरून थोडक्यांत आणि चांगली माहिती मिळेल तसें करण्याचा प्रयत्न करावा; ह्मणजे त्यायोगानें जीं मतें त्यांस शिकवायचीं आहेत त्यांचें वास्तविक स्वरूप श्रोत्यांस कळेल. असें केल्यानें आणखी एक विशेष महत्वाचा फायदा होईल, तो असा, कीं ह्यायोगानें उपदेशकाच्या वाक्यरचनेला भारदस्तपणा येऊन त्याचीं व्याख्यानें मोठीं वजनदार, बोधपर आणि उपयुक्त अशीं होतील; आणि खरोखर ह्मटलें तर हीच मुख्य महत्वाची गोष्ट त्याच्या व्याख्यानानें घडून आली पाहिजे.

**कोटिक्रम.**—आतां आपण व्याख्यानविषयांतील कोटिक्रम किंवा बुद्धिवाद ह्मणून जो एक महत्वाचा भाग आहे त्याकडे वळूं या. वक्ता कोठेंही भाषण करावयास उठो, व त्याचा विषय कोणताही असो, त्यास सप्रमाण भाषणपद्धतीनें किंवा बुद्धिवादरूपानें भाषण करण्यापासून विशेष फायदा होत असतो. कारण वक्तृत्वाचा मुख्य हेतु, ऐकणाराचें मन वळविण्याचा आहे, हें मागें सांगितलेंच आहे; व तो हेतु साधण्यास प्रमाणें देऊन बुद्धिवाद केल्याशिवाय गत्यंतरच नसतें. यासंबंधानें ब्लेअरसाहेबांनीं फार उपयुक्त सूचना केल्या आहेत, त्या आमच्या जिज्ञासु वाचकांकरितां खालीं दिल्या आहेत; तरी त्यांनीं तिकडे अवश्य लक्ष पुरवावें:—

येथें मुख्यत्वें तीन गोष्टी ध्यानांत धरण्यासारख्या आहेत. त्या येणेंप्रमाणें:—१ प्रमाणें चांगलीं योजिलेलीं असावीं. २ त्यांची योग्य जुळणी करून तीं सुस्थळीं ठेवावीं. व, ३ तीं जोरदार वठण्यास वजनदार अशा भाषेंत सांगावीं.

**प्रमाणयोजना.**—हीं प्रमाणें योजण्याला ह्मणजे मोठें कौशल्य लागतें असें नाहीं. विषयाची चांगली माहिती झाल्यावर, प्रमाणें किंवा आधार सांपडतील त्यांची योग्य व्यवस्था लावण्यांत कदाचित् कांहीं कसब उपयोगी पडलें तर पडेल. परंतु विषयाचें ज्ञान कांहींएक न होतां एकदम तो प्रतिपादन करण्याकरितां प्रमाणें शोधून काढण्यास कोणतेंही कसब साधनीभूत होईल असें वाटत नाहीं. कारण खात्रीलायक प्रमाणें शोधून काढणें आणि शोधून काढलेलीं प्रमाणें व्यवस्थेशीर ठिकाणीं बसविणें, या दोन गो-

ष्टींत महदंतर आहे. यांपैकीं दुसरी गोष्ट, प्रमाणें योग्य ठिकाणीं बसविणें, ही साहित्यशास्त्राच्या साह्यानें सहज करतां येण्यासारखी आहे, असें प्राचीन शास्त्रवेत्ते मोठ्या डौलानें ह्मणत असत. ते नुसतें असें ह्मणून राहिले नाहींत. त्यांनीं त्या शास्त्रांत बरीच सुधारणा करून त्यास पद्धतशीर पूर्ण स्वरूप आणण्याचीही पुष्कळ खटपट केली. साहित्य-शास्त्रास पूर्णावस्था प्राप्त करून देण्याच्या ते इतके भरीस पडले होते, कीं तें शास्त्र शिकल्यानें वक्त्यास आपल्याला फायदेशीर होईल अशा रीतीनें प्रमाणें जेथल्यातेथें ठेवतां येतात इतकेंच नव्हे, तर नवीन प्रमाणें कशीं शोधून काढावीं, व काढलेल्या प्रमाणांत कांहीं चूक झाली अस-ल्यास ती कशी दुरुस्त करावी, तसेंच कोठें कसें प्रमाणशीर बोलावें हें साहित्यशास्त्राच्या अध्ययनानें वक्त्यास सहज कळून येणार आहे, असें ते छातीला हात लावून सांग-ण्यांत कधीं कमी करीत नसत. त्यांनीं पुष्कळ विषयांवर सारखे लागू पडणारे सर्वसाधारण विचार निराळे काढून ठेवले होते, आणि तेच ॲरिस्टॉटल सिसेरो आणि क्किं-टिलियन यांनीं आपल्या ग्रंथांत ठिकठिकाणीं गोंवले अस-ल्यानें त्यांची इतकी चहा झाली. तत्कालीन वक्त्यांस या सामान्यविचारयोजनेची मोठी मदत होत असे.

व्याख्यानाची ही कृत्रिम रीत प्रथम ग्रीशियन चार्वा-कांनीं शोधून काढिली. या सामान्यविचारसंग्रहाच्या योजनेमध्यें खरोखरच त्यांचें अतर्क्य शहाणपण आणि विचारबाहुल्य दिसून येतें. त्यांची ही अमोलिक शहाणप-णाची क्लृप्ति पाहून त्यांच्यामागून जे साहित्यशास्त्रवेत्ते झाले,

त्यांचे तर डोळे दिपून जाऊन, ते त्या सामान्यविचार-संग्रहकारांच्या विशाल बुद्धीविषयीं मोठा अचंबा करीत राहिले. पुढें त्यांनींही वरील सामान्यविचार लोकांत इतके प्रचारांत आणले कीं, ती एक प्रकारची पद्धत पडून तिच्या साह्यानें अंगीं कांहींएक गुण किंवा बुद्धि नसतां-ही आपण वक्तृत्व करूं असें सहजीं एखाद्यास वाटेल. ते विचार जणूं काय त्यास वाटेल त्या विषयावर संभाषण करतां येईल अशी हमी देत असत. आतां ह्या सामान्य विचारपद्धतीच्या अध्ययनानें दिसण्यांत सुंदर आणि घोंकीव असें अलंकारिक भाषण कदाचित् करतां येत असेल, परंतु खऱ्या कामास उपयुक्त असें भाषण करितां येत नसावें हें उघड दिसतें. त्या विचारांच्या साह्यानें लिहिण्याला किंवा बोलण्याला भरपूर मजकूर सांपडत असेल हें कांहीं खोटें नाहीं. ज्याला आपल्या वाक्चातुर्यानें लोकांचें नुसतें मनोरंजन करावें असें वाटत असेल, तोच वरील पद्धतीची मदत घेऊन निरर्गल प्रलाप करीत असेल; परंतु असें भाषण ह्मणजे किरकोळ, त्यांत वास्तविक ह्मटलें तर कांहींच अर्थ नसतो. विषयाची अगोदर पूर्ण माहिती मिळवून त्यावर चांगलें मनन झालें असलें ह्मणजे जें भाषण होतें, तेंच खरें भाषण. बाकीचीं आपलीं भाषणेंच. तें भाषण जितकें उपयुक्त, मोहक आणि चटकदार होत असतें, तितकें दुसरें कोणतेंहीं नसतें.

**प्रमाणांची व्यवस्था लावणें.**—येथवर प्रमाणयोजनेसंबंधाचें झालें. आतां त्यांची व्यवस्था कशी लावावी

व ती नीट लाविली गेल्यानें वक्त्याला किती उपयोग होणार आहे हें पाहूं.

बुद्धिवाद किंवा तर्कविचार चालविण्याच्या दोन पद्धती आहेत. पहिली पृथक्करणपद्धति किंवा मूलतत्वशोधनपद्धति, आणि दुसरी संयोजनपद्धति. आपल्या मनांत जो सिद्धांत स्थापित करावयाचा असतो त्या जवळ जवळ श्रोत्यांना आणीपर्यंत, सिद्ध करण्याच्या मुद्याविषयींचे आपले स्वतःचे अभिप्राय वक्ता जींत प्रकट करीत नाहीं, ती पहिली पद्धत. ह्मणजे एक गोष्ट सिद्ध झाली कीं दुसरी, दुसरी झाली कीं तिसरी, अशी एकेक गोष्ट क्रमाक्रमानें सिद्ध करीत जात जात, अखेर तो सिद्धांताला येऊन मिळतो, आणि मग एकदम अमुक अमुक सिद्धांत असा असा ठरतो, असें श्रोत्यांकरवीं कबूल करून घेतो. उदाहरणार्थ 'ईश्वर आहे' असें कोणास स्थापित करावयाचें असल्यास तो प्रथम असे सांगेल कीं, ह्या जगांत आपण जें कांहीं पाहत आहों त्यास मूळ (आदि) आहे, व ज्यास मूळ आहे त्यास कांहीं तरी निमित्त किंवा कारण पाहिजे. कार्य करणारा कोणी तरी लागतोच. मानव प्राण्याच्या उत्पत्तीमध्यें जें विलक्षण कौशल्य दृष्टीस पडतें, त्यावरून तें कार्य करणारा आपल्याहून सर्व गुणांनीं श्रेष्ठ व महापराक्रमी असावा असें सहजीं कळून येतें, व तें कार्य करण्यांत त्याचा कांहीं तरी अस्पष्ट किंवा अवाच्य हेतु असेल, हें उघड आहे. अशा प्रकारें निरनिराळ्या कारणांचें प्रतिपादन करून, तो या अमानुष कृतीचा ह्मणजे विश्वरूपाचा मूळ कर्ता जो परम शक्तिमान ईश्वर त्याचें अस्तित्व स्थापित करून देईल.

सॉक्रेटिसाची बुद्धिवाद करण्याची हीच पद्धत असे. याच पद्धतीनें तो आपल्या काळच्या नास्तिक लोकांचीं मतें खोडून टाकीत असे. बुद्धिवाद करण्याची ही रीत फारच पसंत आणि खुबीदार अशी आहे. एखाद्या गोष्टीच्या सत्यतेविषयीं कोणाच्या मनांत कांहीं शंका येऊन तें कलुषित झालें असल्यास, त्याच्या मनांतील किल्मिष काढून ती गोष्ट अगदीं सत्य आहे अशी त्याच्या मनाची खात्री करून देण्यास वरील पद्धत फारच उपयोगी पडते. परंतु ह्या पद्धतीनें बुद्धिवाद करण्यालायक असे फारच थोडे विषय असतात; ह्मणून सर्वत्र हिचा उपयोग करून चालणार नाहीं. संयोजनपद्धतीनेंच बहुधा वादविवाद करण्याचा प्रघात फार आहे. ह्या पद्धतींत मूळ अमुक एक सिद्धांत आहे असें प्रथम सांगून, नंतर एकामागून एक प्रमाणें देऊन त्याची सिद्धता करावी लागते. कोणत्याही पद्धतीनें वादविवाद करतांनां, प्रथम आपल्याला जीं प्रमाणें बलवत्तर वाटत असतील तींच घेऊन, मुख्यत्वें त्यांच्याच साह्यानें श्रोत्यांस वश करण्याचा प्रयत्न करावा, हें फार उत्तम. आपण आपल्यालाच श्रोते समजून, आपण काढलेलीं प्रमाणें आपल्याला कितपत पटतात, व त्यांचा आपल्या मनावर काय परिणाम होतो, ह्मणजे त्यांच्यायोगें आपलें मन कितपत वळतें, हें आपलें आपण प्रथम पाहून, त्यावरून जगास तीं कितपत पटतील ह्याविषयीं वक्त्यानें आपली स्वतःची प्रथम चांगली खात्री करून घ्यावी, आणि नंतर पाहिजे असल्यास तीं प्रमाणें घेऊन कोटिक्रम चालवावा. केवळ आपल्या वाक्चातुर्यानें आपण लोकांस फसवूं,

असें कोणींही समजूं नये. ती गोष्ट मनांत देखील आणतां कामा नये. बहुतकरून सर्व व्याख्यानकारांस आपण सहज लोकांस फसवूं असें वाटत असतें. परंतु त्याप्रमाणें लोक बहुधा फसले जात नाहींत, क्वचित फसतात. कोणत्याही पदवीचे लोक असोत, लहान असोत कीं मोठे असोत, तेही मोठे धूर्त, शहाणे आणि मर्म जाणणारे असतात. ते, फार झालें तर, वक्त्याचें भाषण मोठें सुंदर आणि गोड झालें असें ह्मणतील; परंतु त्यानें सांगितलेल्या गोष्टींच्या सत्यतेविषयीं त्यांच्या मनाची खात्री होणें वक्तयास वाटतें इतकें सोपें नसतें.

आतां, प्रमाणें जरी उत्तम प्रकारचीं निवडलेलीं असलीं, तरी त्यांपासून चांगला परिणाम घडणें हें पुष्कळ अंशीं त्यांची सुव्यवस्था लावण्यावर अवलंबून असतें. तीं जर व्यवस्थित रीतीनें योग्य ठिकाणीं ठेवितां आलीं तर तीं एकमेकांत गुंतलीं न जातां, त्यांचा परस्परांस जोर मिळून थेट मुख्य मुद्याच्या दिशेला तीं जाऊन मिळतील. ह्यासंबंधानें खालील नियम घेण्यासारखे आहेत:—

भिन्न स्वरूपाचीं जीं प्रमाणें असतील तीं एकत्र गोंवून त्यांचा एकच गोंधळ होऊं देऊं नये. कसाही कोटिक्रम केला तरी त्यापासून, अमुक एक गोष्ट खरी आहे, किंवा ती नीतीला धरून आहे, अथवा अमुक एक गोष्ट करणें फार चांगलें आणि फायदेशीर आहे, ह्या तीन गोष्टींपैकीं कोणती तरी एक ठरवायची असते, ह्यापलीकडे जास्त कांहीं नसतें. आणि त्यासंबंधानेंच सत्य, कर्तव्यकर्म किंवा धर्म, आणि हिताहित ह्या तीन मुख्य विषयांची जगामध्यें

नेहमीं वाटाघाट चालत असते. परंतु हे तीन्ही विषय परस्परांपासून अगदीं भिन्न असल्यानें ह्यांतील एकाचीं प्रमाणें दुसऱ्यास कधींही सामान्यतः लागू पडणार नाहींत. असें असून जे कोणी वरील तीन विषयांवर सारखाच कोटिक्रम करीत बसतात, त्यांचे विचार सुंदर नसून अस्पष्ट असतात. उदाहरणार्थ समजा कीं, आपल्यासमोर असलेल्या श्रोतृसमाजास आपण, परोपकार करीत जावा, आजूबाजूच्या मंडळीवर प्रीती करावी, वगैरे सदुपदेश करण्याचें मनांत आणून, त्याच्या पुष्टीकरणार्थ जर असें सांगितलें, कीं 'परोपकारबुद्धी जागृत ठेवल्यानें त्यापासून आपल्या मनालाही कांहींएक प्रकारें समाधान आणि सौख्य वाटत असतें. दुसरें परोपकार करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे. तो आपला धर्म आहे. त्यांत महत् पुण्य आहे. जे साधुजन आहेत ते नेहमीं 'परोपकारार्थमिदम् शरीरम्' असें ह्मणतांनां आपण ऐकतों, व त्याप्रमाणें महान् महान् सत्पुरुषांनीं पुनः पुनः अवतार धारण करून परोपकार करण्याच्या कामीं आपले देह झिजविल्याचीं शेंकडों उदाहरणें ग्रंथांतरीं आपल्या आढळांत येतात; तेव्हां त्यांनीं घालून दिलेला सुबोध कित्ता आंपल्यासारख्यांनीं वळविल्यास त्यांत आपलें अनहित न होतां उलट मोठें हित होणार आहे. जगावर उपकार केल्यानें आपण आपल्या कर्तव्यास जागलों असें खास होणार आहे, ह्मणून परोपकार करावा; तिसरें असें कीं, आपण लोकांवर उपकार केल्यानें प्रसंगविशेषीं तेही आपल्या पुष्कळ उपयोगी पडतात. त्यांची आपल्यावर श्रद्धा राहते. ते आपल्याला चांगलें ह्मणत असतात. ऐहिक दृष्टीनें

पाहूं गेलें तर ह्या परोपकारापासून किती मोठा फायदा आहे बरें? आणि असा फायदा आपल्याला नको आहे असें कोणास वाटेल काय? ऐहिक आणि पारमार्थिक दोन्ही रीतींनीं 'परोकार आणि परस्पर प्रीति' ह्यांपासून आपल्याला उत्तम फळ प्राप्त होणार आहे,' वगैरे आपला बुद्धिवाद चांगला होणार आहे खरा, परंतु तो व्यवस्थेशीर व्हावा तसा होणार नाहीं. कारण पहिला आणि तिसरा मुद्दा मानसिक शांतता किंवा चित्तस्वास्थ्य व आत्मिक सुख ह्या संबंधाचा असून, त्या दोहोंच्या दरम्यान कर्तव्यकर्माचा विचार आणला आहे, तो गैरशिस्त आहे. वास्तविक ह्मटलें ह्मणजे मानवी स्वभावांत असलेल्या निरनिराळ्या तत्वांस उद्देशून सांगावयाचे जे मुद्दे असतील, ते कधींही एकांत एक करून सांगूं नये, ते नेहमीं अलग ठेवून त्यांचा स्वतंत्र रीतीनें विचार करीत जावें, ह्मणजे त्यांत अर्थसाधकता विशेष आहे.

**दुसरें.**—प्रमाणास बळकटी आणण्याचे जे नाना पर्याय आहेत त्यांसंबंधाचा एक ठोकळ नियम असा आहे, कीं तीं क्रमाक्रमानें वाढवून नंतर उद्दीपित केलीं पाहिजेत. विषय फारसा भानगडीचा नसला, आणि तो आपल्यास पूर्णपणें सिद्ध करतां येईल अशी वक्त्यास आपली स्वतःची खात्री असली, ह्मणजे त्यानें वरील पद्धतीचें खुशाल अवलंबन करावें. प्रथम त्यानें अगदीं निर्बळ कारणें देण्यास सुरवात करावी. नंतर पहिल्यापेक्षां कांहीं जास्त जोरदार कारणें सांगावीं. अशीं क्रमाक्रमानें एकांपेक्षां एक जोरदार प्रमाणें देत जावें. तीं कोठवर? पहिल्या प्रमाणापासून तों श्रो-

त्यांच्या मनावर चांगलासा ठसा उमटेपर्यंत असा क्रम ठेवावा. एकदम सर्व प्रमाणें सांगून आपलें भांडवल उघडें करूं नये. परंतु सर्व ठिकाणीं हा नियम लागू करूं नये. कारण आपल्या मताच्या सत्यतेविषयीं त्याची त्यालाच जर खात्री पटत नसेल, आणि द्वारका एका खांबावरच उभारायची असेल, ह्मणजे त्याचा सर्व भर जर एकाच प्रमाणावर असेल, तर त्यानें निर्बल प्रमाणें अगोदर पुढें आणून उपयोग काय? सबळ असतील तेवढींच प्रमाणें पुढें केलीं पाहि-जेत. ह्मणजे त्यायोगानें असें होईल कीं श्रोत्यांचें मन तिकडे लागून सकृद्दर्शनीं त्याच्याविषयीं त्यांचा चांगला ग्रह होऊन जाईल. अशा प्रकारें त्यांचा आपल्याविषयीं एकदां अनुकूल असा ग्रह होऊन चुकल्यावर, मग जरी त्यानें कांहीं निर्जोर प्रमाणें सांगितलीं तरी ते तीं निमूट-पणें ऐकून घेतील. यावर सिसेरोचें ह्मणणें असें आहे, कीं आपल्या प्रमाणसमुदायापैकीं जेव्हां कांहीं प्रमाणें देण्या-योग्य परंतु अनिश्चित अशीं असतील, तेव्हां तीं प्रमाणें कोठें तरी मध्येंच घालावीं, हा उत्तम पक्ष होय.

**तिसरें.**—आपलीं कारणें सबळ आणि समाधानकारक असलीं, ह्मणजे तीं जितकीं वेगळीं आणि स्पष्ट करून दाखवितां येतील तितकीं चांगलीं. अशानें प्रत्येक कारण स्वतंत्रपणें पुढें करतां येतें; आणि त्याचा उल्लेखही चांगला केला जातो. आणि हींच कारणें जर निव्वळ अटकळीचीं आणि संशयात्मक असलीं, तर तीं एकामागून एक भराभर सांगून टाकावीं, हाच उत्तम मार्ग होय. क्विंटिलियन ह्मणतो कीं, असलीं कारणें जात्या जरी निर्जोर असलीं, तरी त्यांत

अन्योन्याश्रयानें जोर आणि बळकटी येते, यावर त्यान एका खुनी मनुष्याचा दाखला दिला आहे. तो ह्मणतो, एकानें आपल्या एका नातेवाइकाचा खून केला. खून करण्यांत त्याचा इरादा एवढाच होता, कीं त्या नातेवाइकाची मालमत्ता वारस या नात्यानें आपल्याला मिळावी. परंतु त्याच्या त्या नातेवाइकाचे मनांतून ती दुसऱ्याला द्यावी असें फार होतें. ह्मणून त्यानें ती दुसऱ्याला देण्यापूर्वी यानें त्याचा खून केला, असा खरा प्रकार होता. परंतु खून केल्याबद्दलचा प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध होईना, तेव्हां आरोपीला खालील प्रश्न करण्यांत आले. 'तूं मृताचा नातेवाईक असशील, नाहीं? हा मेल्यानें आपल्याला बराच लाभ होईल असें तुला वाटत होतें ना? तुझ्यावर फार अडचणीचा प्रसंग होता, सावकारांनीं उचल केली होती, नाहीं बरें? हा मयत मनुष्य आपल्या मालमत्तेचें मृत्युपत्र दुसऱ्याच्या नांवानें करून ठेवणार होता ही बातमी तुला अगोदर होतीच? तेव्हां तसें न व्हावें आणि आपल्याला त्याची जिनगी मिळावी ह्मणून हा भयंकर खटाटोप?'

आतां हे सवाल प्रत्येकीं अनिश्चित पुराव्याच्या स्वरूपाचे आहेत खरे; परंतु त्या सर्वांचीं उत्तरें एका ठिकाणीं केलीं असतां त्यांपासून वरील आरोपाचा बराच खुलासा होणार आहे.

**चवथें.**—सप्रमाण कोटिक्रम करावयाचा तो फार लांबवूं नये, किंवा जास्त जास्त प्रमाणें देऊन वाढवूं नये. त्याची फारच काथ्याकूट केल्यानें आपल्या पक्षास बळकटी तर येत नाहींच; उलट त्याच्या खरेपणाविषयीं ऐकणाराचा

संशय मात्र वाढतो. थोडींच पण समर्पक प्रमाणें दिल्यानें आपला पक्ष जितका खरा वाटणार आहे, तितका पुष्कळ परंतु निरर्थक प्रमाणें देत बसल्यानें त्याविषयीं श्रोत्यांस संशय मात्र उत्पन्न होतो, आणि वक्त्याच्या स्मरणशक्तीला त्रास पडतो. एवढ्याकरितां कारणें फार लांबवूं नये. आणि वाढवूंही नये. दाखले किंवा उदाहरणें देऊन कारणें व्यक्त करीत जावें. वक्ता आपलें एकच एक आवडतें प्रमाण धरून त्यावर फार वेळ घासाघीस करीत बसूं लागला ह्मणजे शेवटीं होतें काय, कीं अखेर तो अगदीं दमून जाऊन, ज्या धैर्यानें आणि आवेशानें त्यानें भाषणास प्रथम सुरवात केलेली असते, तें धैर्य, तो आवेश आणि तो मूळचा हुरूप हीं सर्व लयास जाऊन तो हतवीर्य होतो, हतश्री होतो. नेमस्तपणा हा सर्वत्र प्रशंसनीय आहे. तेव्हां बुद्धिवाद करतांनां देखील त्याजकडे दुर्लक्ष करतां कामा नये. तेच ते आधार किंवा प्रमाणें पुनः पुनः सांगण्यांत आलीं तरी चालतील. प्रत्येक वेळीं नवीन नवीन शब्दांनीं तीं सांगितलीं, ह्मणजे ऐकणारास त्यापासून कंटाळा न येतां, त्याची जास्त गोडी लागते, आणि वक्त्यालाही बराच उपयोग होतो.

विरुद्ध पक्षाकडून बुद्धिवादरूपानें जीं प्रमाणें पुढें करण्यांत येतील, त्यांचा भलताच अर्थ करून गैरसमज होईल असें कधीं करूं नये. असें करणें निव्वळ अन्याय होय. यांतील आपली लुच्चेगिरी उघडकीस आल्याखेरीज कधीं राहणार नाहीं; ती तेव्हांच बाहेर पडेल. ती एकदां उदयास आली, कीं श्रोत्यांचा वक्त्यावरील विश्वास उडालाच

त्यांना मग उलट असें वाटूं लागेल, कीं या व्याख्यानकाराच्या ठिकाणीं सदसद्विचारशक्ति, किंवा विरुद्ध पक्षाचें ह्मणणें खरोखरच सप्रमाण आहे असें निःपक्षपात रीतीनें कबूल करण्याइतका प्रामाणिकपणा मुळींच वास करीत नाहीं. अशा प्रकारें वक्त्यावरचा त्यांचा विश्वास समूळ उडून जाणें वक्त्यास कधींही श्रेयस्कर नाहीं.

**व्याख्यानाचा रमणीय किंवा चित्तवेधक भाग.**— इतर भागांपेक्षां ह्यांत मात्र खरी वक्तृत्वशक्ति आणि तिचें महत्व कळून येत असतें. प्रत्येक व्याख्यानांत रमणीय असा कांहीं भाग अवश्य असावा; आणि वक्तृत्वगुणाचें तेज जर कोठें झळकत असेल, तर तें व्याख्यानाच्या ह्याच भागांत झळकत असलें पाहिजे. आतां श्रोत्यांच्या मनोवृत्तींस उद्देशून भाषण करणें योग्य होईल कीं काय अशी पुष्कळ लोकांना शंका आहे, परंतु त्या शंकेचें निरसन करण्याकडे फुकट वेळ घालविण्यापेक्षां येथें इतकें सांगणें पुरे होईल कीं, ही शंका ह्मणजे केवळ शाब्दिक आहे, आणि तिची निवृत्ति ज्याला ह्मणून कांहीं तारतम्यज्ञान आहे त्याच्याकडून तेव्हांच होणारी आहे. थोडकेंसें तारतम्य लढविलें कीं वरील संशयाचा निकाल लागणार आहे. सत्यशोधांत किंवा साध्या माहितींत मनोवृत्तींचा कांहीं संबंध नसतो; तेव्हां सत्यशोध लावतांनां, किंवा तसली माहिती मिळवितांनां मनोवृत्तींला उद्देशून बोलण्याचें कांहींएक प्रयोजन नसतें; हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. कोणत्याही गोष्टीविषयीं लोकांची खात्री करून देण्याला त्यांच्या बुद्धीला अनुलक्षून बोललें पाहिजे. तसेंच

सत्य आणि न्यायान्यायविचारांत आपल्या विचारशक्तीचा मुख्यत्वें उपयोग केला पाहिजे. परंतु केवळ श्रोत्यांचें मन वळविणें हाच हेतु असेल, तर तेथें बुद्धिवाद करून उपयोग नाहीं. अशा प्रसंगीं त्यांच्या विस्मय, कौतुक, आश्चर्यादि मनोवृत्तींस जेणेंकरून जागृतावस्था प्राप्त होऊन त्यांचें अंतःकरण आपल्याकडे वळेल, असें बोललें पाहिजे. कारण मनुष्यांमध्यें कांहीं एक प्रकारची चळवळ उत्पन्न होण्यास त्यांच्या मनोवृत्तीच मूळ कारण होत. तेव्हां ज्या प्रकारचा भाव प्रदर्शित करावयाचा असेल, तसल्या प्रकारचे उद्गार काढून तद्भावजनक मनोवृत्ती चंचल करून सोडल्या पाहिजेत, ह्मणजे श्रोते वश होण्यास काडीमात्र आयास पडत नाहीं. सद्गुणी मनुष्य सदाचरणाच्या गोष्टी सांगतांनां कांहींएक गोष्टींत अन्याय झाला असला तर त्या अन्यायाबद्दल किंवा त्या अन्यायपीडित मनुष्याच्या दुःखद स्थितीबद्दल श्रोत्यांच्या अंतःकरणांत क्रोध किंवा दया उत्पन्न करण्याकरितां झटणार आहे. तसें करण्यास तो मागेंपुढें घेईल काय ?

विषयाच्या प्रमाणव्यवस्थेसंबंधानें प्राचीन लोकांनीं जसे अतोनात श्रम घेतले, तसे विषयांतील या मनोरम भागासंबंधानेंही घेतले आहेत. प्रत्येक मनोधर्माचा त्यांनीं अध्यात्मिक विचार करून शोध केला आहे. प्रत्येक मनोवृत्तीची सुलभ आणि स्पष्ट अशी व्याख्या देऊन, त्यांनीं तिचें थोडेंसें वर्णनही दिलें आहे, व कार्यकारणभावाचा फार बारीक रीतीनें शोध करून त्यासंबंधीं कांहीं नियमही घालून दिले आहेत.

ॲरिस्टॉटल यानें आपल्या 'साहित्यशास्त्रविवेचन' नांवाच्या पुस्तकांत मनुष्याच्या मनोवृत्ती व त्यांचें खरें स्वरूप ह्यांविषयीं फार खोल आणि अत्यंत सूक्ष्म असा विचार केला आहे. तो वाचला असतां नीतितत्वांची उपयुक्त माहितो वाचकांस होणार आहे. तथापि हें मात्र खरें आहे कीं तो वाचल्यापासून वक्त्याला आपलें भाषण चित्तवेधक करण्यास चांगलासा उपयोग होईल कीं नाहीं याची शंकाच आहे. मनोधर्मांविषयीं तात्विक माहिती करून घेण्यापासून वक्त्याच्या भाषणांत चित्तवेधकता हा गुण येण्याचा बहुधा वानवाच. कारण भाषणाला चित्तवेधकता कशी आणावी हें कांहीं केल्यानें शिकून यावयाचें नाहीं. एखाद्याच्या भाषणांत मूळचीच रसवंती असते. मग तो कसेंही बोलो, त्याचें बोलणें मनमोहक व्हावयाचेंच, हा अगदीं नियम. तो गुण प्रकृतिसिद्धच त्याच्या अंगीं असतो. तेव्हां असा मनुष्य परमेश्वराचा मोठा ऋणी आहे. तो गुण प्रासादिक आहे, असेंच म्हटलें पाहिजे; दुसरें काय? मनोधर्मासंबंधीं संपादन करतां येईल तेवढें ज्ञान संपादन करून कोणी जरी मोठा पट्टींतला विद्वान झाला तरी त्याचें बोलणें स्वभावसिद्ध दुसऱ्याचें चित्त वेधून घेण्यासारखें असल्याखेरीज शिक्षणादि बाह्योपचारांनीं त्याच्या भाषणांत सरसता आणि मनमोहकपणा येईलच असें खास ह्मणतां येत नाहीं. वक्तृत्वाविषयीं कांहीं नियम घालून दिल्यानें ह्मणजे जास्त बुद्धि वाढणार आहे असा अर्थ नाहीं. पण इतकें मात्र होईल कीं, त्याविषयींचे कांहीं नियम पाळल्यानें बुद्धीला एक प्रकारें चांगलें वळण

लागून, ती भलत्याच दिशेकडे जाण्याची बहुधा फारशी भीति राहणार नाहीं. तिचा चांगला विनियोग झाल्यानें तोटा तर व्हावयाचा नाहींच, उलट झाला तर मोठा फायदा होईल; आणि फायदा व्हावा ह्मणूनच नियम घालून द्यावयाचे. ह्या चित्तवेधनप्रकरणासंबंधानेंही कांहीं नियम सांगण्यासारखे आहेत, ते खालीं दिले आहेत; त्यांकडे वाचकांनीं जरा लक्ष पुरविल्यास उपयोग होणार नाहीं असें नाहीं.

**नियम.**—व्याख्यानांतील मनोवेधक भागासंबंधानें पाळण्यासारखे असे मुख्य नियम सात आहेत, त्यांपैकीं पहिला नियम असा आहे कीं, आपण हातीं घेतलेला विषय चित्तवेधक होण्यासारखा आहे कीं काय; आणि असेल तर तो कोणत्या ठिकाणीं चित्तवेधक केला असतां विशेष शोभण्यासारखा आहे, हें पाहावें. पण हें समजण्याला अंगीं थोडेंसें तरी तारतम्य असावें लागतें. त्याखेरीज तें कळणार नाहीं. पुष्कळ विषय असे असतात कीं, त्यांत हा भाग आणून उपयोग नसतो; आणि ज्यांत त्याचा उपयोग होण्यासारखा असतो, तेथें देखील भलत्याच ठिकाणीं चित्तवेधकता आणण्याचा प्रयत्न केल्यानें उलट उपहासास मात्र कारण होईल, हें उघड आहे. तेव्हां एकंदरीनें पाहतां, आपण प्रदर्शित केलेला भाव श्रोत्यांच्या मनावर चिरकाल तसाच कायम राहावा असें आपल्याला व्हावयाला पाहिजे असेल, तर प्रथम त्यांचा समजही आपल्याच बाजूकडचा करून घेण्याला आपण विशेष जपलें पाहिजे. त्यांना असें खात्रीपूर्वक समजून आलें

पाहिजे, कीं हा वक्ता ह्मणतो तिकडे आपण आस्थापूर्वक लक्ष दिल्यास तें अनाठायीं होणार नाहीं. याला साधन हें एक आहे कीं, त्यांत वक्त्यानें स्वत: खरी कळकळ दाखवून अवश्य मन घातलेंच पाहिजे. त्यांची त्यांना स्वत: अशी खात्री वाटली पाहिजे, कीं आपल्या मनाची जी अशी वृत्ति बदलली आहे, ती कांहीं वक्त्यानें आपल्याला फसविण्याच्या हेतूनें चार गोष्टी सांगितल्या त्या ऐकून बदलली आहे असें नाहीं. खरोखर त्याचीं कारणेंच आपल्या वृत्तींत बदल होण्यासारखीं दिसत आहेत. अशा स्थितींत जोंपर्यंत श्रोते येऊन ठेपले नाहींत, तोंपर्यंत यदाकदाचित् वक्त्याच्या भाषणानें त्यांच्या मनोवृत्तींत फेरबदल होऊन त्यांच्यांत कांहीं एक प्रकारची चळवळ उत्पन्न झाली, तरी ती आळवावरच्या पाण्यासारखी थोड्याच अवकाशांत अदृश्य होणार. उघडच आहे, जी गोष्ट मनाला पुरतेपणीं समजली नाहीं, ती एकदां कानावरून गेल्यानें तिचा आपल्यावर परिणाम तो काय व्हावयाचा ? आणि झाला तरी तो टिकणार किती वेळ ? ती कानावरून गेली होती कीं नव्हती याचीदेखील भ्रांतिच राहणार. तसेंच, वक्त्याचें भाषण चाललें असतांनां तें ऐकून श्रोत्यांच्या मनाची तत्काळ जी स्थिति होते, ती पुढें तशीच कायम राहत नाहीं, याचें कारण तरी वरचेंच. पुराण ऐकून घरीं आल्यावर ‘ पुराणांतलीं वांगीं पुराणांतच ’ असें ह्मणणाऱ्याप्रमाणेंच, व्याख्यान संपण्याचा उशीर, तें संपून त्या जागेवरून श्रोते हालले कीं, पुढें त्या व्याख्यानांत सांगितलेल्या गोष्टींपैकीं एकही गोष्ट त्यांच्या स्मर-

णांत राहील तर शपथ! त्यांचें आपलें, येरे माझ्या मागल्या, जें असतें तें असतेंच. ते आपल्या पूर्वस्थिती-वर तेव्हांच येऊन बसतात. ह्मणून बहुतेक मोठमोठ्या ग्रंथकारांचें असें मत आहे कीं, आपल्या व्याख्यानांत चित्तवेधक असा जर कांहीं भाग आणायचा आहे, तर तो उपसंहारांत आणावा. त्यासारखें चित्तवेधक भाग आणण्याला योग्य असें व्याख्यानांत दुसरें स्थळच नाहीं; आणि खरोखर, व्याख्यानांतील इतर सर्व गोष्टींचा यथा-स्थित जम बसून, कोटिक्रम किंवा बुद्धिवाद करून श्रोत्यांच्या मनांत विषयाविषयींची कल्पना जागृत करून दिल्यावर, मग उपसंहारांत चित्तवेधक असा थोडकासा भाग आणावा, व हेंच करणें रास्त आहे, असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील.

दुसरा नियम असा आहे कीं, चित्तवेधक भाग घाल-तांनां तो निराळा काढून दाखवूं नये. आतां आपण चित्त वेधण्यास अत्यवश्यक जो भाग तो सांगणार आहों, अशी सूचना श्रोत्यांस देऊं नये. असें केल्यानें श्रोत्यांच्या ज्या मनोवृत्ती उत्तेजित व्हावयाच्या, त्या तशाच निर्विकार आणि थंड राहतील. ह्मणजे अर्थात् वक्त्याचा सर्व बेत फसलाच म्हणावयाचा; व तो फसल्यानें उलट असें होईल, कीं श्रोतृसमूह आपल्या भाषणावर निरर्थक टीका मात्र करूं लागेल. तेव्हां प्रत्यक्ष रीतीनें श्रोत्यांच्या मनावर ठसा उमटविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां अप्रत्यक्ष रीतीनें तसा प्रयत्न केल्यास, तो पुष्कळ अंशीं फलद्रूप होणार आहे. श्रोत्यांचीं मनें उद्दीपित करण्याची संधि कोठेंही सांपडो,

ती कधीं गमावूं नये. तिचा तत्काल उपयोग करून घ्यावा. अशीं त्यांचीं मनें उद्दीपित होतांच, त्यांस विचार करण्यास काडीमात्र सवड न देतां, एकदम त्यांच्यापुढें इतक्या कांहीं गोष्टी आणि कल्पनाचित्रें मांडावीं, कीं त्यांच्या गर्दींत श्रोत्यांच्या मनोवृत्ती अगदीं तल्लीन होऊन जातील. अंतःकरणांत खरी कळकळ असल्यावर तोंडांतून स्वाभाविक जे थोडकेच शब्द निघतील त्यांच्यायोगानें, हें जितकें चांगलें साधेल, तितकें अगोदर चांगली तयारी करून पुष्कळ वडबड जरी केली, तरी साधण्यासारखें नसतें.

तिसरा नियम असा कीं, आतां तुह्मांस मोहित करून टाकतों असें श्रोत्यांस अगोदर सुचवून ठेवल्यानें, ते मोहित होऊन न जाण्याविषयीं आपल्याकडून राहवेल तितके सावध राहतील; आणि असें झाल्यानें वक्त्याच्या भाषणानें खरोखरच श्रोते मोहित होण्याचा फारच कमी संभव असतो. यावरून मोहित करून सोडतों असें सुचविण्यांत वक्त्यास कितीसा फायदा आहे हें सहज लक्षांत येऊन चुकणार आहे. परंतु धर्मोपदेशक मंडळींच्या मनांत याविषयीं काडीइतकाही विचार येत नसतो. त्यांच्या व्याख्यानविषयांत, अमुक कृत्याबद्दल आपण परमेश्वराचे फार आभारी आहों, तेव्हां त्याचे आभार मानणें हें आपलें कर्तव्यकर्म होय; तसेंच पीडाग्रस्त, दुःखित, गोरगरीब यांवर दया करावी हा आपला धर्म आहे, अशा अर्थाचा कांहीं भाग असला, कीं तो कायतो चित्तवेधक भाग, अशी त्यांची समजूत असते. जेव्हां आपण एखाद्यास असें सांगतों कीं, बाबारे दररोज परमेश्वराची आराधना करीत जाणें, हा आपला

धर्म आहे, ईश्वरोपासना करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, त्याला आपण जागलें पाहिजे, किंवा अमुक एक गोष्ट करणें मोठें विचाराचें आणि शहाणपणाचें काम आहे, व ती केली असतां योग्य आणि विचाराचें होणार आहे, तेव्हां आपल्या ह्या सांगण्यानें त्याच्या मनाची खात्री पटून त्यावर त्याचा चांगला संस्कार घडावा ह्मणून पुष्कळ तऱ्हेचे आधार दाखवून आपण कोटिक्रमही करीत असावें; परंतु त्या सांगण्यानें ह्मणजे त्यांच्या मनावर खरोखरीचाच तसा तत्काळ परिणाम घडतो असें कांहीं नाहीं. इतकें मात्र खरें कीं, त्या योगानें सांगितलेल्या गोष्टीचा संस्कार घडण्यास योग्य अशा त्याच्या मनाची स्थिति त्या वेळेस होत असते. हर-एक प्रकारचे मनोविकार उत्पन्न व्हावयाला विधात्यानें तत्तद्वि-कारजनक अशा कांहीं गोष्टी मूळच्याच करून ठेवल्या आहेत. तेव्हां अमुक एक मनोविकार उत्पन्न करायचा ह्मणजे प्रकृतिसिद्धपणेंच जाबास जाब घेणाऱ्या तत्तद्वि-कारजनक गोष्टी श्रोत्यांच्या मनापुढें साद्यंत मांडून ठेवल्या-खेरीज, कसाही वक्ता असो, त्याच्यानें तो मनोविकार कधीं-ही उत्पन्न करवणार नाहीं हें खचित. तसेंच जर कोणी वक्ता आपल्या श्रोत्यांस उद्देशून असें ह्मणेल कीं, 'अहो तुमचें हें औदासीन्य आणि शैथिल्य कोणत्या थरास जा-ईल न कळे; तुह्मांला कोणत्याही गोष्टीची खरी कळकळ अशी नाहींच; तुमच्या अंगीं कृतज्ञता आणि भूतदया हीं सभ्यपणाचीं चिन्हें असावीं, पण तींही नाहींत,' वगैरे पुष्कळ प्रकारें श्रोत्यांची निर्भत्सना करून, त्यांच्यांत आ-वेश आणि उत्सुकता हीं उत्पन्न व्हावीं ह्मणून, वक्त्यानें

किती जरी आपला घसा त्यांच्यापुढें ताणला, तरी त्याच्या त्या कोरड्या ओरडण्यानें त्यांच्या मनास काडीइतका तरी विकार उत्पन्न होईल काय? नाहीं; त्याच्या वरील कोटीनें श्रोत्यांच्या मनांत कृतज्ञता किंवा दयेचा पाझर ह्मणून कांहीं एक सुटणार नाहीं. त्याचें हें भाषण निव्वळ त्यांच्या मनोदेवतेला किंवा विचारशक्तीला उद्देशून झालेलें असतें. परंतु खरोखरच श्रोत्यांच्या मनांत दया उत्पन्न करावयाची ह्मणजे ज्याच्या दुःखद स्थितीकडे श्रोत्यांनीं लक्ष पुरवावें, असें वक्त्याच्या मनांत येत असतें, त्या मनुष्यास होणारीं दुःखें, त्याच्यावर येणारे प्रसंग, वगैरेंचें चित्र हुबेहुब श्रोत्यांच्यापुढें वर्णनरूपानें मांडावें, तेव्हां श्रोत्यांच्या अंतःकरणास दयेचा पाझर फुटून, उपकारबुद्धीचे लोटच्या लोट येऊं लागतात. ह्मणून आपलें भाषण चटकदार आणि हृदयद्रावक होण्याला त्या त्या मनोविकाराचें स्वाभाविक चित्र श्रोत्यांच्या मनामध्यें ढळढळीत उमटविण्याचा वक्त्यानें होईल तितका प्रयत्न करावा. कोणतीही गोष्ट घ्या, ती इंद्रियांस एकदां चांगली समजलेली असली, ह्मणजे त्यायोगानें मनोविकार चांगले उत्तेजित होत असतात, असें साधारण अनुमान आहे. उदाहरणार्थ पहाना, आपल्याला कोणीं कांहीं निरर्थक त्रास दिला असला, किंवा आपल्या शरीराला कांहीं दुखापत केली असली, ह्मणजे अमक्यानें आपल्याला अमुकअमुक प्रसंगीं विनाकारण त्रास दिला होता अशी आठवण होऊन, किंवा त्यानें केलेल्या दुखापतीकडे पाहून, आपला क्रोधाग्नि पुनः भडकत असतो. फार काय, त्याविषयींची नुसती कल्पना पुनः मनांत आली

कीं पुरे, लागलेंच त्याविषयीं आपलें पित्त पुनः खवळतें. याचा अनुभव प्रत्येक मनुष्यास आहेच. इंद्रियांना प्रत्यक्ष रीतीनें ज्ञान होऊन ह्मणा, किंवा गतगोष्टीची कल्पना पुनः मनांत वागल्यानें ह्मणा, मनुष्याच्या मनोवृत्तीवर जसा कांहीं परिणाम घडतो, तसा परिणाम वक्त्याकडून श्रोत्यांच्या मनावर घडण्यास त्यास खरोखर कथेकऱ्याप्रमाणें चुटके वगैरेंचेंच साहाय्य पुष्कळ पाहिजे आहे. हे चुटके हृदयंगम आणि गमतीचे असावे, ह्मणजे ते ऐकल्याबरोबर श्रोत्यांच्या मनावर जो ठसा उठेल, तो अगदीं कायम व्हावा, कालांतरानेंही तो पुसला जाऊं नये. इतके ते चटकदार आणि परिणामालाही टिकाऊ असे असावे.

चवथा नियम असा कीं आपण जे चुटके देणार ते वर सांगितलेल्या स्वरूपाचे आहेत कीं नाहींत हें अगोदर पाहावें. आतां याचा वक्त्यानें आपल्या स्वतःशीं प्रथम अनुभव घेऊन पाहावा. ते आपल्याला कितपत गोड लागतात, आपलें अंतःकरण त्यांकडे कितपत ओढलें जातें, हें पाहून, नंतर त्यावरून आपल्या श्रोतृसमाजाची स्थिती लक्षांत आणून, त्यांस ते कितपत पटतील आणि आपला हेतू साधण्यास कारणीभूत होतील, ह्याचें अनुमान सहज करतां येणार आहे. मूळ हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जी गोष्ट आपण दुसऱ्याला सांगूं, आणि ती सांगितल्यानें त्याच्या मनाला जो अमुक एक विकार व्हावा असें इच्छूं, तसला विकार वास्तविक आपल्यांत त्या गोष्टीपासून होत असेल, तर त्यांस ती सांगण्यायोग्य आहे. आपल्या मनोवृत्ती चांगल्या जागृत झाल्याखेरीज दुसऱ्याच्या जागृत

कधींच करितां येणार नाहींत. व्यक्तिमात्राच्या मनोधर्मांत असा एक प्रकारचा कांहीं विलक्षण सांसर्गिक संबंध आहे कीं, एकाच्या मनोवृत्ती खरोखर रीतीनें जागृत झाल्या असल्या, कीं त्यास दुसऱ्याच्या वृत्ती उत्तेजित करण्यास फारसे परिश्रम पडत नाहींत. दुसऱ्याच्या मनोवृत्ती कशा वळवाव्या हें त्यास आपोआप सुचत असतें; त्यास मोठें कौशल्य किंवा युक्ति अशी मुळींच लागत नाहीं. हजारों प्रकारचीं विचारचित्रें त्याच्या मनांत येऊन, जणूं काय तींच दुसऱ्याचीं मनें हरण करून घेत असतात. परंतु हा सर्व प्रकार घडतो कधीं? आपल्या स्वतःच्या मनोवृत्ती वश झाल्या असतील तर; एरवीं आडांतच नाहीं तर पोहोऱ्यांत येणार कोठून? यास प्रत्यक्ष उदाहरण वक्त्याचेंच घेऊं या, ह्मणजे झालें. प्रतिपाद्य विषयासंबंधानें त्याची त्याला खात्री पटून, तो त्याच्या मनांत चांगला बिंबला गेला असला, ह्मणजे त्याच्या तोंडांतून जे शब्द निघत असतात ते, व त्याचा सर्व चेहरा, त्याचे अंगविक्षेप, त्याचें वर्तन, एकंदरींत त्याचें सर्व भाषण इतकें रम्य आणि मोहक होऊन जातें, कीं जणूं काय त्यास आंतून प्रोत्साहन मिळत आहे; व त्या योगानें श्रोतृसमूहावर त्याचें असें कांहीं तेज पडतें, कीं तें सांगतां येत नाहीं. 'आपण गोड, तर लोक गोड, नाहीं तर कोण कोणाचें?' अशी एक प्रचारांत ह्मणण्याची रीत आहे. ही येथें लागू केली असतां चालेल असें वाटतें. कारण आपण गोड नसून, दुसऱ्यांनीं आपल्याशीं गोड असावें अशी इच्छा करणें जितकें वेडगळपणाचें काम आहे, तितकेंच आपल्या मनावर ज्या गोष्टीनें कांहीं-

संस्कार झाला नाहीं त्याच गोष्टीनें दुसऱ्याच्या मनावर कार घडावा अशी आशा करणें ह्मणजे मूर्खपणाचें आणि उपहास्यतेचें काम होणार आहे. मागें वक्त्याच्या गुणांविषयीं लिहितांनां यासंबंधानें बरेंच सांगितलें आहे, तेव्हां याविषयीं त्याहून जास्त सांगून जागा आडविण्यांत अर्थ नाहीं. तरी पण सावधगिरीसाठीं एक सूचना करावयाची राहिली ती ही कीं, वक्त्याच्या मनाला जी भावना झाली असेल, तिची वाजवीपेक्षां फाजील अतिशयोक्ती करून वर्णन करण्याच्या नादांत पडूं नये. कारण आपल्या खऱ्या भावना शब्दरूपानें व्यक्त करून दाखविणें देखील अंमळ कठिण जातें; त्यांत त्या जास्त करून सांगण्याच्या भरीस पडल्यावर, मग तर त्या व्यक्त करून दाखविणें अगदींच अशक्य होईल, यांत बिलकुल शंका नाहीं. व्हॉल्टेअर नामें एक फ्रेंच ग्रंथकार होऊन गेला, त्यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, वक्त्यानें आपल्या श्रोतृसमूहापुढें कधींही अश्रुपात करूं नये, किंवा स्फुंदूनस्फुंदून रडल्यानें तोंडावाटें शब्दोच्चारही होण्याची मारामार पडेल इतकें अंतःकरण विव्हळ होऊं देऊं नये. नेत्रावाटें अश्रुधारा वाहविण्यापेक्षां, आपल्या मुखांतून निघणारे शब्द दुसऱ्यास रडवून सोडतील अशा स्वरूपांचे निघत असले ह्मणजे पुरे आहे. त्यांचादेखील ओघ पटकन थांबवून धरतां येईल असा असावा. हा ओघ थांबवून धरतां येण्याला, बोलतांनां आपलें देहभान ठिकाणीं राहत नसतें, तें मूळ ठिकाणीं ठेवण्याची फार काळजी घेतली पाहिजे, ह्मणजे आपला शब्दौघ सुरळीत रीतीनें वाह-

णार आहे. अचाट बुद्धीचा जो कोणी वक्ता असेल त्यानें वाक्चातुर्यानें श्रोतृसमूह सद्गदित अंतःकरण होत्साता धडधडसा अश्रू गाळील असें करण्याचा प्रयत्न करावा. इतरांनी तसें करण्याच्या नादीं लागून व्यर्थ आपलें हंसें करून घेऊं नये, असें क्विंटिलियनचें साफ सांगणें आहे. हा ग्रंथकार बहुजनसमूहापुढें वक्ता होऊन भाषण करण्यास येत असे, तेव्हां त्याची अशी रीत होती कीं, ज्या मनुष्याच्या दुःखद स्थितीविषयीं श्रोत्यांच्या मनामध्यें कींव उत्पन्न होऊन त्यांनीं त्याजवर कृपादृष्टी करावी असें त्यास वाटत असे, त्या मनुष्याचीं तीं दुःखें आणि तसल्या अपमानकारक गोष्टी आपणा स्वतःस झाल्या असत्या तर आपल्या मनाची कशी स्थिति होऊन गेली असती ह्याविषयींची कल्पना नीट मनांत आणून, त्याच्या दुःखप्रद स्थितीबद्दल आपल्या मनांत कांटा उभा राहिला असें वाटलें ह्मणजे, मग तो श्रोत्यांस दुःखार्णवांत बुडवून टाकण्याच्या भरीस पडे, व त्यांत त्यास त्याच्या इच्छेनुरूप यशाही मिळे, असें त्याच्या स्वतःच्या लेखावरून कळतें. आणि हें खचित आहे कीं वक्त्याच्या मनावर दुसऱ्याच्या सुखदुःखाची भावना जितकी जास्त ढळढळीत उमटेल, तितका त्याच्या वाणींत मोहकपणा आणि दुसऱ्याचें मन आकलन करून घेण्याची शक्ति जास्त येणार आहे.

पांचवा नियम असा आहे कीं, श्रोत्यांच्या मनावर जसा भाव उत्पन्न करावयाचा असेल तदनुरूप शब्दयोजना करण्याकडे अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे. खऱ्या आणि सबळ मनोवृत्तींस वश झालेल्या मनुष्याचें, ह्मणजे

ज्याच्या मनोवृत्ती खऱ्याखऱ्या रीतीनें उचंबळल्या आहेत, त्याचें भाषण जर लक्षपूर्वक वाचलें किंवा ऐकलें, तर खात्रीनें असें वाटेल कीं, तें दांभिक रीतीचें नसून अगदीं साधें आणि खऱ्या भावानें निघालेलें आहे. आतां त्यांत कदाचित भव्य अलंकार असून, तें जरा जोराचें असूं शकेल; परंतु त्यांत नुसता दिखाऊ असा नाजूकपणा मुळींच नसायचा हें खचित. कारण त्याचें सर्व चित्त एकाच गोष्टीनें व्यापून गेल्यामुळें त्यास हजारों तऱ्हेचे कल्पनातरंग चालविण्यास अवकाश मुळींच सांपडत नसतो. ती गोष्ट त्याच्या मनांत फार घोळत असल्यानें तें इतकें तरवरलेलें असतें कीं, जी गोष्ट अंतःकरणांत दृढ बिंबून राहिली तिजविषयींची आपली भावना श्रोत्यांस प्रदर्शित करण्याखेरीज त्यास दुसरें कांहीं सुचत नसतें. अशा मनुष्याच्या भाषणासारखें वक्त्याचें भाषण जर प्रगल्भ, खऱ्या मनोभावाचें आणि साधें असें झालें, तर तें जितकें रसाळ आणि चित्तवेधक होईल, तसें दुसरें कोणतेंही होणार नाहीं. आणि तोच जर प्रथम आपली भाषणपद्धती नीटनेटकी करून, ती सुरेख आणि शोभिवंत दिसायाला मुद्दाम प्रयत्न करावयाला पाहील, तर तेवढ्या वेळांत त्याचा पूर्वींचा जो साहजिक उत्पन्न झालेला आवेश आणि हुरूप होता, तो ऱ्हास पावून त्याला श्रोत्यांचें अंतःकरण सद्गदित करतां येणार नाहीं. त्याच्या संतप्त झालेल्या मनाला ह्या योगानें थंडपणा येऊन, अर्थात् मग त्याच्या भाषणासही शिथिलता प्राप्त होईल. आणि असें झाल्यानें त्याचें बोलणें निव्वळ बरपंगीचें आहे असें लोकांस वाटून, त्यावर ते विश्वासही

ठेवणार नाहींत. लोकांच्या कल्पना उत्तेजित करणें आणि त्यांचें अंतःकरण प्रसन्न करून घेणें, ह्या दोहोंत बरेंच मोठें अंतर असून, दोन्ही सारख्या अवकाशाचीं कामें नाहींत. कल्पना उत्तेजित करणें त्या शांतपणानें आणि स्थिराईनेंच केल्या पाहिजेत. परंतु अंतःकरण प्रसन्न करावयाचें तें तत्काळ झालें पाहिजे, स्थिराईवर टाकून उपयोग नसतो. कारण तें स्थिराईवर टाकल्यानें आपली मूळची जी तातड असते, ती पुढें कमी होत जाते, व मूळचा जो हुरूप असतो तोही लयास जातो. यामुळें आपला जो इच्छित हेतु असतो, तो सिद्धीस जाणें मग कठिण पडतें. दुसरें, कल्पना उत्तेजित करण्यामध्यें आपण फार श्रम घेत आहों आणि आपली कर्तबगारी दाखवीत आहों, असें जरी श्रोत्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें, तरी हरकत नसते. त्यांचें तिकडे दुर्लक्ष असतें. परंतु अंतःकरण प्रसन्न करण्याचें तसें नाहीं. त्यांत सर्व गोष्टी सहजासहजीं आणि स्वाभाविकपणें होत आहेत, असें ऐकणारांस भासलें तरच आपलें भाषण फलद्रूप होणार आहे; एरवीं आपला हेतु सफल होण्याचा संभव फारच कमी असतो.

सहावा नियम असा कीं, व्याख्यानाच्या ह्या चित्तवेधक भागामध्यें असंबद्ध असा दुसरातिसरा परकीय विचार मुळींच आणूं नये. मनोविकार उत्पन्न होऊन ते वृद्धिंगत झाले म्हणजे, त्यांच्या गतीस विरोध आणणारे किंवा त्यांस भलत्या दिशेस लावणारे असे अनेक आडफांटे येत असतात, ते न येऊं देण्याविषयीं सावध राहिलें पाहिजे. अलंकारादि भूषणांनीं मंडित अशा केवळ दिसण्यांत सुंदर आणि

डौली भाषणपद्धतीनें मन मुख्य विषयापासून पराङ्मुख राहून काडीइतकेंही न द्रवतां नुसतें रमविलें मात्र जात असतें. तेव्हां असलें देदीप्यमान सौंदर्य व्यर्थ समजून, तें आपल्या भाषणपद्धतीस आणण्याचें कधींही मनांत वागवूं नये. मनोविकार उत्तेजित करण्याच्या खटपटीमध्यें दृष्टांत किंवा उपमा देऊन सांगणें अगदीं धोक्याचें आणि अप्रशस्त होणार आहे. अशा वेळीं उगीच फार वेळ कारणवाद घालीत बसणें देखील चांगलें नाहीं.

आणखी एक सांगण्यासारखा शेवटचा नियम आहे तो असा कीं, भाषण चित्तवेधक जरी असलें, तरी तें फार लांबचलांब होतां उपयोगी नाहीं. 'थोड्यांत जी गोडी आहे ती फारांत नसते.' ही ह्मण सर्वांस माहीत आहेच. फार दिवस गोड अन्न एकसारखें मिळत गेलें, कीं त्याचाही वीट येतो. तद्वत् भाषण चित्तवेधक असलें, तरी तें लांबत गेल्यानें त्यांतील चित्तवेधकता हा गुण बऱ्याच अंशानें नाहींसा होऊन, मग तें भाषण ऐकणारांस पूर्वीप्रमाणें रुचत नसतें. आणखी दुसरें कारण असें कीं, संतप्त झालेल्या मनोवृत्तींच्या भावना क्षणभंगुर असतात. त्या फार वेळ मनांत टिकून राहत नसल्यानें शब्द एकदम भडभड भडभड बोलून न जातां, कोणत्या ठिकाणीं ते थांबवून धरावे ह्याचें ज्ञान झालें पाहिजे. तसेंच अशा वेळेस मनाची वृत्ति तडफड होऊन आवेशयुक्त शब्द मुखांतून निघत असतात; तेव्हां तें शांत वृत्तीवर येऊन सावकाश आणि धिमेपणाचें वर्तन घडेल असें केलें पाहिजे. परंतु आवेश आणि जोर कमी करावयाचा ह्मणून

आपला स्वर एकदम खालीं उतरितां कामा नये. उतरीत उतरीत आवाज कमी केला पाहिजे; आणि पूर्ववत् तीच भावना कायम ठेविली पाहिजे. पूर्वी आणि हल्लीं फरक ह्मणून एवढाच कीं, पूर्वी ती जरा आवेशाच्या शब्दांत प्रदर्शित केली असेल, तर हल्लीं तो आवेश कमी करावयाचा; बाकी सर्व सारखेंच. मुख्य गोष्ट ही कीं मनोवृत्ती फार उच्छृंखल होऊं देऊं नये. त्यांची परमावधी करण्याच्या खटपटींत कधीं पडूं नये. ऐकणारांना आपलें कोणतें बोलणें रुचेल त्याकडे विशेष नजर पोहोंचविली पाहिजे. जो वक्ता आपल्या आवेशाच्या भरांत थांबण्याचीं जीं योग्य ठिकाणें आहेत त्या ठिकाणीं क्षणमात्रही न थांबतां, श्रोत्यांच्या मनोवृत्ती उद्दीपित करण्याच्या हेतूनें एकदम आपलें शब्दरूपी गाडें पुढें ढकलीत असतो, व श्रोत्यास तें आटपेल कीं नाहीं याची मुळींच पर्वा करीत नाहीं, त्याचा हेतु कधींच साध्य होत नसतो. तो आपण होऊन आपल्या पायावर धोंडा पाडून घेतो असेंच ह्मटलें पाहिजे. त्याच्या ह्या कृतीनें श्रोत्यांच्या मनोवृत्ती प्रज्वलित न होतां, उलट त्या जागच्याजागीं तशाच थिजतात.

**उपसंहार.**—आपणाला आतां व्याख्यानविषयाचा अखेरचा भाग जो उपसंहार त्याविषयीं येथें विचार कर्तव्य आहे. समयस्फूर्तीच्या ह्मणजे आयत्या वेळीं बोलण्याच्या विषयांत देखील पुष्कळ प्रसंगीं व्याख्यानाच्या परिसमाप्तीचा ह्मणजे हा अखेरचा भाग अगोदर नीट तयार करून लिहून ठेवतात आणि मुखोद्गत करीत असतात. यावरून अखेर गोड करणें किती कुशलतेचें आणि शहाणपणाचें

काम आहे याचा तर्क वाचकांस होईलच. यास अनुभाविक उदाहरण ह्मटलें ह्मणजे, आपण एखाद्या सभ्य गृहस्थास भेटून परत येते वेळीं त्याचा निरोप घेतांना हात जोडून 'बरें आहे, येतों आतां, आपण बसावें,' वगैरे जें बोलतों त्यांत जें कौशल्य किंवा खुबी असते, तेंच कौशल्य आणि तीच खुबी व्याख्यानाच्या उपसंहारांत असावी लागते. ही खुबी साधावयाला कांहीं शिकलेंही पाहिजे, व कांहीं मूळची अभिरुचि आणि रसिकताही पाहिजे. त्याशिवाय ती साधणें कठिण आहे. व्याख्यानाचा ओघ पूर्वीपासून जसा चालत आला असेल, त्याप्रमाणें त्याची परिसमाप्ति व्हावयाला पाहिजे असते असा नियम आहे; यामुळें त्याविषयीं येथें फारसें कांहीं सांगतां येण्यासारखें दिसत नाहीं. कधीं कधीं व्याख्यानाचा चित्तवेधक भाग उपसंहारांत येत असतो, आणि व्याख्यानविषय वादग्रस्त, ह्मणजे कार्यकारण वाद करून कोटिक्रम करण्यासारखाच असला, तर त्याच्या उपसहारांत पूर्वी झालेल्या वादाचा गोषवारा किंवा सार काढून, तें जमलेल्या श्रोतृसमाजापुढें इतक्या कांहीं खुबीनें ओतावें, कीं त्यांचीं अंतःकरणें आरशाप्रमाणें सोज्वळ होऊन, त्यांत त्या विषयाचें सुरेखसें चित्र वठेल. ज्याच्यावर आपला विशेष भर आहे व जें आपल्या मजबुतीस विशेष कारणीभूत होणार त्याचेंच अखेरीस निरूपण करावें, असा विषयसमाप्तीचा नियम आहे; व तेंच करणें स्वाभाविकपणें बरें दिसतें. धर्मपर व्याख्यानांतील उपसंहारांत पूर्वनिरूपणांत सांगितलेल्या गोष्टींवरून अनुमित सिद्धांत काढून विषयाचें पर्यवसान करतात. परंतु

तें साहजिक झालें आहे असें दाखविण्याची विशेष खबरदारी घ्यावी लागते. इतकेंच नाहीं, पण व्याख्यानाचा ऐक्यभंग होऊं न देतां, ज्या झोंकांत पूर्वनिरूपण झालें असेल त्याच झोंकांत उपसंहार उतरला पाहिजे. कारण हे सिद्धांत मूळ धर्मपुस्तकाच्या आधारानें जरी खरोखर काढलेले असले तरी त्यांजपासून जर एक निराळाच स्वतंत्र विषय निघत असला, तर त्याचा परिणाम कांहीं चांगला होत नसतो. त्यायोगानें उलट व्याख्यानाच्या मूळ हेतू(विषया)पासून श्रोत्यांचीं मनें दुसरीकडे फिरण्याचा संभव मात्र जास्त असतो. तेव्हां तें उपसंहारांत आणून उपयोग नाहीं. आपल्या अंगावर गुळुंब किंवा आवाळूं येत असतें, तें शरीराच्या भागापैकीं एक मूळचें नसल्यानें आपल्याला किती कुरूपता येते बरें? तद्वत् धर्मपर व्याख्यानाच्या उपसंहारांत वरील प्रकारचीं अनुमानें काढल्यानें मध्येंच एक आगंतुक विषय निघून, पूर्वनिरूपणानें जो रंग उडालेला असतो, व श्रोत्यांचा जो चांगला ग्रह झालेला दिसतो, त्या सर्वांस विरजण पडतें.

आतां व्याख्यानाचें पर्यवसान कोठें व केव्हां करावें, आणि आपल्या मूळ मुद्याला आणून कसें सोडावें, हें माहीत असणें फार महत्वाचें आहे. कारण गैरशिस्त रीतीनें एकदम व्याख्यानाची परिसमाप्ती करणें आणि व्याख्यान आतां संपेल मग संपेल अशा आशेला श्रोतेमंडळी लागली असतां, उपसंहारासभोंवतीं घिरट्या घालूनघालून त्यांच्या त्या आशेची निराशा करणें, व त्यांस कंटाळा आणणें, कांहीं चांगलें कृत्य नव्हे. श्रोतृसमूह हर्षभरित होऊन आनंदयुक्त अंतः-

करणानें व्याख्यानस्थळाहून आपापल्या घरीं जाण्यास निघेल अशा रीतीनें व्याख्यानाचा शेवट गोड झाला पाहिजे. द्राविडी प्राणायाम करून, रेंगाळत रेंगाळत एकेक वाक्य तोंडावाटें काढीत न बसतां, मोठ्या गंभीर आणि आवेशयुक्त वाणीनें व्याख्यान शेवटास न्यावें, ह्मणजे तो विषय श्रोत्यांच्या मनांत ताजा राहून, व्याख्यानकाराच्या गुणाविषयींही त्यांचा चांगला ग्रह होऊन जाईल. 'शेवट गोड तर येथूनतेथून सर्वच गोड' ही ह्मण येथें पूर्णपणें लक्षांत ठेवावी.

**व्याख्यानाचा मुख्य हेतु.**—वक्त्यानें व्याख्यानाची जुळणी करतांनां व व्याख्यान देतांनां आपला व्याख्यान देण्याचा मूळ उद्देश काय आहे हें विसरतां कामा नये. तो उद्देश ह्मटला ह्मणजे श्रोत्यांचीं मनें वळविणें हा होय. आणि हा हेतू साधण्यापुढें वक्त्यानें आपला मान, सन्मान आणि कीर्ति हीं सर्व रद्द असें समजलें पाहिजे. वक्त्यानें श्रोत्यांस असें भासवून दिलें पाहिजे कीं, आपण जें बोलतों तेंच खरें, व आपण तद्वत् आचरण केलें पाहिजे. असा श्रोत्यांच्या मनाचा संकल्प झाला, ह्मणजे त्यांतच वक्त्याची थोरवी आहे, व त्याला शाबासकीदाखल योग्य बक्षीस तेंच आहे.

## भाग ७ वा.

# व्याख्यान देण्याच्या निरनिराळ्या रीती.

रीती चार आहेत:—

१. हस्तलेखावरून व्याख्यान विषय वाचून दाखविणें.

२. व्याख्यान लिहून काढून अगोदर तें पाठ करणें, व नंतर तोंडानें बोलून दाखविणें.

३. विषयाचें साधारण चित्र प्रथम मनांत आणून आयत्या वेळीं जसे विचार सुचतील तसे ते प्रकट करणें.

४. विशेष महत्वाचे जे भाग असतील, ते अगोदर चांगले तयार करून पाठ करणें, आणि बाकीचे वेळेवर जसे शब्द सुचतील तशा शब्दांनीं व्यक्त करणें.

**हस्तलेख वाचणें.**—वर सांगितलेल्या चार रीतींपैकीं प्रत्येकींत नफानुकसान आहेच. सर्वांत सोपी रीत ह्मटली ह्मणजे पहिली होय. ही रीत उपदेशरूप आणि शास्त्रीय विवरणामध्यें फार उपयोगी पडते. कारण तशा प्रसंगीं श्रोत्यांचें मन ओढून घेण्यापेक्षां त्यांना आपल्या भाषणापासून कांहीं तरी बोध व्हावा, हाच काय तो वक्त्याचा मुख्य हेतु असतो. परंतु प्रत्येक नियमास कांहीं तरी अपवाद असतोच. पहिल्या प्रकारच्या व्याख्यान देण्याच्या

पद्धतीपासून बराच मोठा उपयोग होतो, हें डा. चामर्सच्या उदाहरणावरून सहज कळून येणार आहे. आपलीं धर्मविषयक व्याख्यानें वाचतांनां तो ठिकठिकाणीं जोर देऊन आणि पुनः फार जलद वाचीत, त्यायोगानें त्याच्या वाचण्यापासून ऐकणाराच्या मनावर चांगला ठसा उठत असे.

व्याख्यान लहानशा कागदाच्या तुकड्यांवर लिहून आणूं नये. कारण तशानें असें होतें कीं, पानें उलटण्याचा वारंवार त्रास पडून शिवाय बोलण्यांत खंड पडलासा दिसतो. आणखी एक महत्वाची सूचना करावयाची आहे, ती ही कीं, मुद्याचे जे शब्द असतील त्यांच्याखालीं एक ठळक रेघ मारावी, ह्मणजे वाचतांनां ते चटकन नजरेस येऊन ते जोरानें उच्चारण्यास सुलभ पडतें. अर्थात् कोणत्या शब्दावर विशेष जोर द्यावयाचा आहे, त्याविषयीं मात्र अगोदर चांगला विचार झाला पाहिजे. आठवून बोलण्याला जितकी काळजी घ्यावी लागते, तितकीच लिहून आणलेलें वाचण्यामध्यें जर घेतली, तर खरोखर त्यापासून परिणामही चांगला होईल.

प्रसिद्ध वक्ता मि. जॉन ब्राइट यास धर्मविषयक आणी व्यवहारविषयक लेखी व्याख्यानाविषयीं आपलें कसें काय मत आहे असें एका गृहस्थानें विचारल्यावरून त्यानें त्यास खालील माहिती दिलीः—तो ह्मणाला ‘ मी आज तीस वर्षांत व्याख्यान लिहून कधींही तयार केलें नाहीं. लिहिण्याचें काम फार त्रासदायक असतें; त्याहून ध्यानांत ठेवण्याचें तर फार कठिण. पण लिहून वाचलेल्या व्याख्यानासंबंधानें लोकांचा ग्रह चांगला होत नसतो. तेव्हां आप-

त्याला जें कांहीं बोलावयाचें असेल त्याचें अगोदर चांगलें मनन करून त्यांतील ठोकळठोकळ गोष्टींचें एक टांचण तयार करावें. विषयाची मात्र आपल्याला चांगली माहिती असली ह्मणजे झालें. ती असल्यावर मग मनुष्याला संवयीनें सहज चांगलें भाषण करितां येतें. धर्मपर व्याख्यानांसंबंधानें या बाबतींत मी फारसें कांहीं सांगूं शकत नाहीं. इतर व्याख्यानांस जे नियम लागू आहेत ते त्यांलाही असावे असें वाटतें. इतकेंच कीं, इतर प्रसंगीं साधारण विषयासंबंधानें भाषण करण्यास वक्त्याला पुष्कळ साहित्य मिळण्यासारखें असतें, तसें धर्मविषयक व्याख्यान देण्याला मिळत नाहीं. तो विषय गहन असतो, व वेळही अगदीं मर्यादित असतो. बहुधा पाद्री लोक चांगले वक्ते नसतात, व ते होणारही नाहींत; कारण वक्तृत्वाची स्वाभाविक देणगी त्यांच्या अंगीं नसते. त्यांच्या मनावर न्यायशास्त्राचा संस्कार झालेला नसतो. त्यांना पुष्कळ विचार सुचत नसतात, व त्यांचें बोलणेंही मनापासून नसतें. दुसऱ्याचें सहज मनरंजन करणाऱ्या जाड्या वक्त्याच्या अंगीं जी नैसर्गिक तत्परता असावी लागते, तिचा त्या पाद्र्यांचे ठिकाणीं गंधही नसतो. धर्मपुस्तक वाचून उपदेश करण्याची जी रीत आहे ती जर बंद केली, तर धर्मपर व्याख्यानें हल्लींपेक्षां अंमळ बरीं वठतील. परंतु त्यांत हें एक व्यंग राहील कीं, भोळ्या मंडळीवर त्याचा चिरकालपर्यंत ठसा राहणार नाहीं. समजा कीं, एखाद्या मनुष्याला विषयाचें चांगलें ज्ञान आहे, आणि ईशसत्तेनें वक्तृत्व ही देणगी त्याच्या अंगीं आहे, तर अशा मनुष्यानें व्याख्यान वाचणें हा एक त्याच्या

ठिकाणीं कमीपणाच समजला पाहिजे. आतां ज्याला विष-याचें ज्ञान नाहीं, व अंगीं वाक्चातुर्यही नाहीं अशानें व्याख्यानविषय वाचलाच पाहिजे, कारण त्याशिवाय त्याला दुसरा मार्गच नसतो. परंतु प्रत्येक आठवड्यास तोच तो विषय त्याच मंडळीपुढें वाचणें किंवा व्याख्यानरूपानें सांगणें फार कठिण काम आहे. तें वक्त्याला कठिण जातें इतकेंच नाहीं,तर श्रोत्यांनाही त्याचा कंटाळा आलेला असतो. आतां जे मोठ्या मनाचे आहेत, जे विशेष ज्ञानी आहेत, व ज्यांचा पराक्रम मोठा आहे अशांना मात्र तें चांगलें साधत असतें. बाकी वाटेल तो मनुष्य हें काम करूं शकेल असें ह्मणणें ह्मणजे मोठें आश्चर्यच ह्मणावयाचें; निदान वाटेल तो मनुष्य हें काम करील किंवा नाहीं याची मला तर शंका आहे. ह्मणून आपण विचारलेल्या प्रश्नासंबंधानें मी खात्रीपूर्वक काहींएक सांगूं शकत नाहीं. तथापि एकंदरींत असें सुचवितों कीं, एखाद्या विषयावर ज्याला चांगलें बोलतां येत असेल त्यानें बोलावें, ह्मणजे परिणाम चांगला होईल, व ज्याला बोलतां येत नसेल त्यानें अर्थात् तो विषय लिहून वाचला असतां बरें होणार आहे.'

**आठवून बोलणें**—तोंडपाठ करून आणलेल्या भाषणानें प्रचलित वादग्रस्त विषयांवर बोलणारांचा क्वचितच नांवलौकिक होतो. परंतु त्यांच्याखेरीज इतर जे वक्ते आहेत, उदाहरणार्थ पाद्री लोक, त्यांनीं जरी पाठ केलेलें व्याख्यान दिलें तरी त्यांची बरीच मान्यता होते. बूझे मॅसिलान आणि बोरडेलो ह्या तीन फ्रेंच पाद्यांच्या उदाहरणांवरून वरील गोष्टीची सत्यता कळून येणार आहे. ही

मंडळी आपलीं व्याख्यानें तोंडपाठ करून येत असत, असें असतांही त्यांची मोठी प्रख्याति झाली होती. याचें कारण निःसंशय हेंच असावें कीं, वादग्रस्त विषयांत वादाचा मुद्दा एकच एक कधीं असूं शकत नाहीं; तो नेहमीं बदलत असतो. हातीं धरलेल्या मुद्याच्या प्रश्नाचे नवीननवीन रंग दृष्टोत्पत्तीस येत असतात, त्यांस आकस्मिक कांहीं एक दिशा प्राप्त होत असते. त्यामुळें एकांत स्थळीं विचारानें तयार केलेलें भाषण असल्या प्रसंगीं कुचकामाचें ठरतें. वादविवाद करते समयीं बोलतांनां त्यास जणूं काय अपायकारक हवा लागून तें बिघडतें, व त्यामुळें इष्ट हेतु सिद्धीस जात नाहीं. तसें धर्मपर व्याख्यान देणाराचें नसतें; त्याचा मुद्दा निश्चल राहतो. त्याला कधीं नवीन रंग येत नाहीं, किंवा त्याची दिशा बदलत नाहीं, ह्यामुळें सर्व गोष्टी त्याच्या स्वाधीनच्या असतात. आणि यदाकदाचित् तें व्याख्यान तयार झाल्यानंतर त्याच्या मनांत कांहींएक प्रकारची प्रेरणा उत्पन्न झाली, तर ती व्याख्यान देते वेळीं त्यास पुढें आणतां येते.

पूर्वी जे महान् महान् वक्ते होऊन गेले, तेदेखील आपलीं व्याख्यानें अगोदर पाठ करून नंतर देत असत; निदान व्याख्यानाचा कांहीं भाग तरी ते पाठ करीत असतील असें म्हणावें लागतें. डेमॉस्थेनीस आणि सिसेरो हे दोघेही व्याख्यान देण्यापूर्वी तें शब्दशः तोंडपाठ करीत होते किंवा नाहीं याबद्दल खात्रीलायक आधार नाहीं.

परंतु अंगीं कांहीं कौशल्य नसतांही निव्वळ पाठ केलेलें भाषण चांगलें वठूं शकतें. मात्र तें पाठ केलेलें ते-

व्हांच उघडकीस येतें. असल्या भाषणांतील शब्द अगदीं ठराविक आणि मर्यादित असतात; व त्यायोगानें श्रोत्यांच्या मनावर व्हावा तसा परिणाम होत नाहीं. तसलें भाषण ऐकण्यास त्यांना मोठासा उल्हास वाटत नसतो. ते त्याचा नेहमीं अनादर करितात. यासंबंधानें एक अडचण येत असते ती येथें सांगितली पाहिजे. समयविशेषीं वक्त्यास पाठ केलेलें वेळेवर आठवत नसतें. ही अडचण दूर व्हावी ह्मणून त्यानें अगोदर एक चांगलें टांचण करून ठेवावें, किंवा समयस्फूर्तीनें बोलण्याची जर त्याला ताकद असली, तर सुटलेल्या संदर्भास येऊन मिळेपर्यंत त्यानें आयत्या वेळीं सुचेल तसें बोलावें.

**समयस्फूर्तीचें व्याख्यान.**—विषयाचा नकाशा पूर्णपणे मनांत आणून नंतर आयत्या वेळीं जसे शब्द सुचतील तसें बोलून विचार प्रकट करण्याची रीत खरोखर सर्वांत उत्तम आहे. याच रीतीनें लोकांवर आपलें तेज पडणार आहे. आणि ज्याला ही रीत चांगली साधली नाहीं, तो वक्ता या नांवास पात्र होत नाहीं. कांहीं विशेष प्रसंगीं मनुष्यास विषय तयार करण्यास इतर पद्धतीचें अवलंबन करावें लागतें हें खरें. परंतु एखाद्या प्रसंगीं आयत्या वेळीं बोलण्याचें जर कारण पडलें, तर त्याला तसें बोलतां आलें पाहिजे. वर निर्दिष्ट केलेल्या चार रीतींपैकीं हीच रीत सर्वांत श्रेष्ठ कां, याचें कारण व्हेटलेसाहेबांनीं आपल्या साहित्यशास्त्रावरील ग्रंथामध्यें चांगलें दिलें आहे. तें असें:—या रीतीनें वक्ता जे विचार प्रकट करीत असतो ते ऐकून श्रोत्यांस असें खात्रीनें वाटत असतें कीं,

ते विचार वक्त्याचे डोक्यांतून याच वेळीं अगदीं मनापासून निघालेले आहेत. त्यास कोणत्याही ग्रंथाचें त्या वेळीं साहाय्य न मिळतां तो केवळ आपल्या बुद्धिबलानेंच भाषण करतो आहे असें पाहून त्याच्या त्या श्रमाबद्दल त्यांना मोठा कळवळा येतो, व त्यायोगानें त्यांचें चित्त त्या भाषणाकडे अधिक वेधलें जातें. भोपळा वगैरे कांहीं एक साहित्य न घेतां केवळ आपल्या बाहुबळानें पाण्यांतून मोठ्या शिताफीनें पोहून जाणाऱ्या इसमाप्रमाणें समयस्फूर्तीनें बोलणाऱ्या वक्त्याचें श्रोत्यांस कौतुक वाटत असतें. अशा वक्त्यानें आपलें काम उत्तम रीतीनें बजाविल्यावर त्या संकटांतून तो मोठ्या चतुराईनें पार पडला असें पाहून ऐकणारांस त्याची मोठी धन्यता वाटते. त्यांत विशेषेंकरून ज्यांना आपल्या अंगीं हा गुण नाहीं असें वाटत असतें, अशा श्रोत्यांना तर त्याचें फारच नवल वाटतें. असा वरील पद्धतीपासून मोठा फायदा आहे. याशिवाय आणखी एक फायदा आहे तो असा कीं, वक्त्याला तशा व्याख्यानांत शब्दस्वातंत्र्य मिळून वाटेल तशा भराऱ्या मारावयास सांपडतें; व यामुळें त्याचें तें भाषण मोठें जोरदार वठतें.

या पद्धतींत भाषण अगदीं अस्खलित असावें लागतें, व भाषेवर वक्त्याचा चांगला पगडा असून तींतील शब्द अगदीं त्याच्या जिव्हाग्रीं असले पाहिजेत. हे गुण कसे संपादन करावे याविषयीं तिसऱ्या भागांत सांगितलेंच आहे.

**चवथी रीत.**—हीमध्यें वरील दुसऱ्या व तिसऱ्या रीतींचीं बहुतेक सर्व लक्षणें येतात. मात्र हिच्यासंबंधानें

ध्यानांत ठेवण्यासारखी एक गोष्ट आहे, ती ही कीं जें कांहीं पाठ केलेलें आठवून बोलावयाचें असतें त्यांत, व समयस्फूर्तीनें आयत्या वेळीं जें बोलावयाचें असतें त्यांत, कांहीं-एक अंतर दिसूं देऊं नये; ह्मणजे असें कीं अमुक एक भाग पाठ केलेला, व अमुक आयत्या वेळेचा असें ऐकणारांस दिसून न येईल अशा रीतीनें सारखें बोलत जावें. कारण हें बिंग जर बाहेर पडलें तर व्याख्यान निरुपयोगी होऊन जाईल.

वाचण्यापेक्षां बोलण्यानें विशेष उपयोग कां होतो याचें कारण सहज समजण्यासारखें आहे. दोन्ही पक्षांचीं सैन्यें समोरासमोर उभीं राहिलीं ह्मणजे लागलेंच उभयतांस युद्धाचें स्फुरण येत असतें, व तोफांच्या भडिमारानें शत्रूच्या सैन्याची फळी मोडून त्याच्या तोफखान्यास आग लागली असतां विरुद्ध पक्षांतील योद्ध्यास जसा परमानंद होत असतो, तद्वत् व्याख्यानकार आपल्या समाजास सामना देत असतांनां आपले वाग्बाण सोडून त्याचें हृदय विदारण करूं लागला असतां, त्यास एक प्रकारचा आनंद होऊन जास्त स्फुरण येत असतें. अशा प्रसंगीं श्रोत्यांचीं मनें खळबळून गेल्यानें त्यांच्या मनांत कर्तव्यबुद्धि जागृत होऊन तसें झाल्याचीं चिन्हें ते आपल्या वर्तनानें दर्शवितात. उघडच आहे, आगीवर तेल टाकलें असतां जास्त भडका व्हावयाचा. आपल्या व्याख्यानाचा ठसा उमटविण्यास नुसता मंडळीचा मोठा समाज असला तरी पुरे आहे. मग त्यांच्यांत दुफळी नसली, व प्रतिपाद्य विषयाकडे जरी कोणाचें विशेष लक्ष लागलें नसलें, तरी हरकत नाहीं. जें भाषण दहापांच

मंडळीमध्यें प्रशस्त अंतःकरणानें ऐकलें जाईल, तेंच मोठ्या समाजांत झालें असतां त्यानें सर्व जनसमूह अगदी खळबळून जाईल. तसेंच जो कोटिक्रम सर्व समाजास हंसवून सोडील, तोच दोनचार मंडळींत थट्टेवजादेखील मानला जाणार नाहीं.

परंतु डोक्यांतून आपोआप योग्य विचार निघून ते निवडक शब्दांनीं व्यक्त केले असतां, व त्याचप्रमाणें आयत्या वेळीं पदरचना उत्तम रीतीची बनली जाऊन योग्य कल्पनातरंग सरणीबद्ध निघाले ह्मणजे, मनास एक प्रकारचा आनंद होत असतो. ही रीत साधारण प्रचारापासून जरी फार भिन्न आहे, तरी तिच्या त्या अद्वितीय शक्तीच्या योगानें पुनः पुनः जरी ती उपयोगांत आणिली, तरी प्रत्येक वेळेस तिच्यापासून नवीन नवीन आनंद होत असतो. वक्ता किती जरी मोठा विद्वान असला, तरी तो आपलें व्याख्यान थोडेंबहुत लिहून काढून पाठ करून ठेवीत असतो. परंतु त्याच्या अंगीं एवढें चातुर्य असतें, कीं तो, पाठ केलेलें आणि आयत्या वेळीं सुचलेलें या दोहोंचा एक जीव आपल्या भाषणांत इतका बेमालूम करतो, कीं पाठ केलेलें कोणतें आणि आयत्या वेळीं सुचलेलें कोणतें हें ओळखण्यास ऐकणारास तो कांहींच मार्ग ठेवीत नाहीं, अशी त्याची मोठी शिताफी असते. परंतु हेंच वक्त्याच्या अडाणीपणामुळें चांगलें जुळलें नाहीं असें श्रोत्यांस दिसून आलें, तर त्याच्या त्या व्याख्यानाचा सर्व रंग त्यानेंच बिघडवून टाकिला असें होईल.

परंतु लिहून आणलेल्या वादग्रस्त विषयावरील व्याख्यानांत

ग्रंथ संग्रहा

वक्त्याला वरील हातोटीनें श्रोत्यांस फसविण्यास मार्ग नसतो. कारण त्या विषयाची भाषा त्याच्या तोंडून त्या वेळेस ताजी निघालेली नसते, यामुळें ते तो विषय छापील मजकुराप्रमाणें लेखितात. पुष्कळ प्रसंगीं वक्त्याच्या शरीराची आकृति, त्याचा आवाज, त्याची बोलण्याची शैली, इत्यादि गोष्टी बऱ्याच अंशीं त्याच्या शब्दास जोर आणि उद्दीपन देण्यास कारणीभूत होतात. वक्त्याच्या एकंदर कृतीमध्यें त्याची व्याख्यानशैलीही येत असते. तेव्हां ती मूळ अवश्यमेव चांगली असली पाहिजे, असें प्रसिद्ध वक्ता डेमॉस्थेनीस याचें ह्मणणें आहे. वक्त्याच्या संभषणामध्यें शैली हाच कायतो प्रधान गुण असतो, असें सिसेरोही ह्मणतो. आणखी त्याचें असें ह्मणणें आहे कीं, शैली उत्तम असल्याशिवाय व्याख्यान अत्युत्तम कधींच होणार नाहीं, व एखाद्या साधारण मनुष्याच्या अंगीं हा गुण असला, तर तो मोठ्या प्रासादिक वक्त्यास देखील मागें टाकील. ह्या गुणाची हल्लींच्या काळीं ज्यांला गरज लागणार नाहीं असें फारच थोडे लोक आहेत. इतर पुंजी जरी जवळ थोडी असली, तरी ती या गुणानें झांकली जाते. हें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. प्रत्येक काळामध्यें जेवढे ह्मणून नांवाजलेले वक्ते झाले आहेत त्यांचा नांवलौकिक होण्यास तरी त्यांची व्याख्यान देण्याची शैली हेंच कारण झालें आहे.

प्रख्यात निबंधकार मॉन्टेन यानें आपल्या निबंधांत एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, परम उदार जो ईश्वर त्यानें सर्व मनुष्यांचे ठिकाणीं सर्व गुण सारखेच ठेवले

नाहींत. या त्याच्या वाक्यावरून असें निघतें कीं मनुष्यानें अल्पसंतोषी असावें. वक्तृत्वासंबंधानें देखील आपण असेंच पाहतों. कित्येक मंडळींच्या अंगीं इतकी समयसूचकता असते, कीं ते कसाही प्रसंग आला तरी बिलकुल न डगमगतां सहज रीतीनें व्याख्यान देत असतात; आणि कित्येक इतके मंद आणि जड बुद्धीचे असतात कीं त्यांना पुष्कळ दिवसपर्यंत मोठे परिश्रम करून अगोदर विषय तयार करावा लागतो. असें केल्याखेरीज त्यांस एक अक्षरही आयत्या वेळीं सुचत नसतें.

हा निबंधकार ह्मणतो कीं 'जर मला उपदेश करण्याचा अधिकार असता, व तितकी माझ्या अंगीं योग्यताही असती, तर मी मंडळींना खचित असें सांगितलें असतें, कीं जे कोणी मतिमंद असतील त्यांनीं धर्मोपदेशकाचें काम करावें; व जे चलाख, आणि तीव्र बुद्धीचे असतील त्यांनीं वकिली करावी. कारण धर्मविषयामध्यें वक्त्याला आपलें भाषण तयार करण्यास वाटेल तितकी सवड असते; शिवाय त्याचें बोलणें चाललें असतां त्याला बहुश: मध्येंच प्रश्न करून कोणी आडवीत नाहींत, कीं त्यास कसलेही अडथळे येत नाहींत; यामुळें त्याचें व्याख्यान निर्वेध चालतें. तसें वकिलाचें नाहीं. त्यास प्रत्येक प्रसंगीं तोंडास तोंड देऊन विरुद्ध पक्षाशीं सामना करावा लागतो, आणि विरुद्ध पक्षानें मध्येंच कांहीं शंका किंवा हरकती काढल्या, ह्मणजे त्यांचें खंडन करण्यासाठीं त्याला आयत्या वेळीं समर्पक उत्तरें शोधून काढावीं लागतात, व अशा प्रकारें आपल्या पक्षाचें समर्थन करावें लागतें. असें जरी

आहे तरी एखाद्या प्रसंगीं उलट प्रकार घडून येतो. फ्रान्स देशाचा राजा फ्रान्सिस याची व पोपची मार्सेल्स येथें गांठ पडावयाची होती. त्या प्रसंगास अनुसरून कांहीं तरी बोलावें लागेल ह्मणून राजानें तें काम आपल्या एका वकिलाकडे सोंपविलें होतें. ह्या वकिलाची वक्तृत्वासंबंधानें मोठी ख्याति होती, व त्यानें आपलें सर्व आयुष्य वकिलीच्या धंद्यांत घातलें होतें. राजाची आज्ञा झाल्यावर या स्वारीनें पारिस येथें असतांच फार परिश्रम करून तें भाषण तयार करून ठेविलें. परंतु चमत्कार असा झाला कीं, पोप यानें आपण काय बोलणार त्याचें एक टांचण प्रथम राजाकडे अवलोकनासाठीं पाठविलें. पोपला अशी भीति पडली कीं, न जाणों कदाचित् राजाजवळ असणारे जे परदेशीय राजांचे वकील आहेत त्यांना लागण्यासारखें आपल्या भाषणांत कांहीं असेल, तेव्हां तें राजास प्रथम दाखविलें असतां बरें. याप्रमाणें तें टांचण फ्रान्सिसच्या वकिलाच्या हातीं गेलें. तें त्यानें वाचून पहिल्यावर त्याचा पूर्वींचा सर्व बेत फिरला. शेवटीं तो निराळ्या तऱ्हेचें भाषण तयार करावयास लागला, व आयत्या वेळीं त्यास तें न साधल्यामुळें त्याचें तें काम दुसऱ्या एका वकिलाच्या गळ्यांत घालावें लागलें.'

'धर्मोपदेशकापेक्षां वकिलाचें काम फार कठिण आहे; असें असूनही माझ्या मतें पटण्यासारखे जितके वकील झाले आहेत तितके धर्मोपदेशक झालेले नाहींत. चटकदार व खुबीच्या भाषणाचा अंमल तेव्हांच बसतो, परंतु वकिलाच्या भाषणाचें तसें होत नाहीं. त्याचा स्थिरपणें विचारच करावा

लागतो. चांगलें बोलतां येणें शिकण्यासाठीं आपल्याला फुरसत नाहीं असें ह्मणून जे स्तब्ध बसतात, व ज्यांना वेळ असूनही त्या वेळेचा चांगला उपयोग करून घेतां येत नाहीं अशी मंडळी केवळ हतभागीच समजली पाहिजे. सिविरस क्याशसाविषयीं असें सांगतात, कीं तो समयस्फूर्तीचें भाषण फार उत्तम करीत असे; व अशा कामीं तो उद्योगापेक्षां नशीबावर फार हवाला देत असे. साधारणपणें मनुष्य बोलत असतां जर त्याला कोणीं मध्येंच अडथळा केला तर त्याचा सर्व घोटाळा होत असतो, परंतु या क्याशसचें उलट होतें. त्यास त्यायोगानें दुप्पट जोर येत असे. त्याचे शत्रू त्या कारणामुळें त्यास चिरडीस नेण्यास फार भीत असत; कारण त्यांना हें माहीत होतें कीं, याला जितका राग आणावा तितकें त्यास स्फुरण येऊन त्याचा फायदाच होत असे.

**श्रोते.**—एकंदर श्रोतृसमाज, विशेषतः ज्यांच्यापुढें वक्त्यास उभें राहून बोलावयाचें ती मंडळी, कशा प्रकारची आहे हें वक्त्यानें प्रथम ताडलें पाहिजे. ज्या प्रचंड जनसमूहापुढें तो उभा राहतो त्यास त्यानें योग्य मान दिला पाहिजे. बहुसमाजाचीं मतें आणि त्यांचा हेतु यांत कांहींच अर्थ नसतो असें कित्येक वक्त्यांना वाटत असतें; एक प्रसिद्ध वक्ता तर असें ह्मणतो कीं समाज ह्मणजे एक मोठें पोर आहे. दुसऱ्या एकाचें ह्मणणें असें आहे कीं, समाज हें एक गाढव आहे, व आपण त्याला हांकून वाटेवर आणलें पाहिजे, तें जिकडे जाईल त्याच्या मागोमाग आपण जातां कामा नये. आतां या ह्मणण्यांत कांहीं

तथ्य असेल, परंतु मोठ्या जनसमूहासंबंधानें पाहूं गेलें तर त्यांत बरीच मंडळी सभ्य असते, यांत संशय नाहीं. तेव्हां असला समाज पाहून पूज्यबुद्धि उत्पन्न झाली नाहीं असा एकही सुविचारी मनुष्य सांपडणार नाहीं. त्या समाजाला खऱ्याचें खोटें करून दाखविलें असतां तें जसें पटणार आहे, तसें खऱ्याची खात्री करून दिली असतां तेंही त्यांना पटणार हें उघड आहे. वक्ता जर त्यांना तुच्छ मानून त्यांच्याशीं तशी कृती करील, तर त्याचा हेतु कधींही सफल व्हावयाचा नाहीं. त्यानें किती जरी बडबड केली तरी श्रोत्यांचें मन त्याच्याकडे वळणार नाहीं. याकरितां वक्ता श्रोत्यांचा तिरस्कार जितका न करील तितका त्याला फायदाच होणार आहे. त्याला जें सांगावयाचें तें त्यानें मोठ्या सौम्यतेनें आणि सभ्यपणानें मोहक अशा शब्दांनीं सांगितलें पाहिजे. त्याच्या श्रोतृगणापैकीं प्रत्येकास असें वाटलें पाहिजे कीं हा वक्ता आपल्यासच अनुलक्षून बोलत आहे, व त्याचा आपल्यावर मोठा भरंवसा आहे.

इमर्सन ह्मणतो कीं, वाजविण्याचीं जीं कांहीं वाद्यें आहेत त्यांतलेंच समाज हें एक मोठें विस्तृत व नानासुरांनीं भरलेलें वाद्य आहे. हें वाजविण्याला कांहीं अंगचें शहाणपण लागत असून त्याचा थोडा अभ्यासही करावा लागतो, ह्मणजे त्यापासून होणारा परिणाम फारच अद्भुत असा होतो. श्रोतृसमाज ह्मणजे एके ठिकाणीं जमलेलीं कांहीं डोकीं, असाच केवळ अर्थ नाहीं. परस्परांविषयीं परस्परांत एक प्रकारचें प्रेम आणि कळवळा असल्यानें त्या समाजास सार्वजनिक संस्थेचें स्वरूप येऊन, ज्याप्रमाणें

विद्युज्जनक यंत्रांमधील विद्युत् त्या यंत्राच्या प्रत्येक घटामध्यें प्रवेश करते, त्याप्रमाणें या समाजरूपी वाद्यांतील प्रत्येक व्यक्तीमध्यें आणि विशेषतः वक्त्यामध्यें परस्परांविषयींचें प्रेम आणि कळवळा हे गुण वसत असतात. कोणत्या प्रसंगीं मनुष्याचा क्रोधाग्नि पेटविला जाईल हें अगोदर समजल्याखेरीज, त्याच्यानें श्रोते मंडळी कधींही खवळविली जाणार नाहीं. परंतु हें तत्व माहीत नाहीं असे पुष्कळ वक्ते सांपडतील. अशांना मुकाट्यानें खालीं बसण्याचा प्रसंग येतो. बहुशः समाजांतील पुष्कळ मंडळी अशा स्वभावाची असते, कीं त्यांना प्रोत्साहन मिळाल्याशिवाय त्यांच्या हातून कांहींएक घडत नसतें. मनोवृत्तींचा त्यांच्यावर इतका कांहीं विलक्षण पगडा बसलेला असतो, कीं तेथें विचाराचें कांहींच चालत नाहीं. तेव्हां बुद्धिवान् आणि शहाण्या लोकांना पटण्यासारखीं कारणें किंवा प्रमाणें सांगून वरील समाजांत बोलणें केवळ अरण्यरुदित होणार आहे. असा जर प्रकार आहे, तर त्या मंडळीवर आपलें वजन पाडावें तरी कसें? अर्थात् त्यांच्या मनोवृत्तींस उद्देशून बोलल्याखेरीज आपलें तेज पडणार नाहीं हें उघड आहे. त्यांच्या मनोवृत्ती कोणत्या स्वरूपाच्या असतात अशाविषयीं वरील ग्रंथकारानें आपले विचार प्रकट केले आहेत, ते अगदीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत, तो ह्मणतो कीं 'समाजाचे विचार व समजुती चुकीच्या असूं शकतील, परंतु त्यांच्या भावना किंवा मनोवृत्ती अगदी बरोबर असतात. कोणतीही गोष्ट करणें ती ते आपल्या मनोभावाप्रमाणें करीत असतात. मग ती रीतीची असो अगर गैरशिस्त असो. कांहीं

गोष्टी परिणामीं अपायकारक झाल्यानें त्या दुष्ट बुद्धीनें केल्या आहेत असें सकृद्दर्शनीं वाटतें; परंतु फार बारीक विचार करून पाहतां, त्यांचा हेतु उदारपणाचा असतो असें आढळून येईल.

'पहा कीं ज्या लोकांच्यायोगानें तुरुंग भरले जात आहेत, ज्यांच्याकडून जणूं काय कारागृहाचें पोषण होत आहे, अशी मंडळी एखाद्या क्षुल्लक नाटकांत प्रेक्षक या नात्यानें जाऊन बसली असतां, त्यांस देखील त्या नाटकांतील पात्रांच्या तोंडून एखादा सभ्यतेचा, औदार्याचा आणि सत्याचा प्रकार निघाला असतां, तो ऐकून आनंदाच्या उकळ्या येत असतात, व अशा वेळीं त्या पात्रास शाबासकी दिल्याखेरीज त्यांच्यानें राहवत नसतें. मनुष्य स्वतः दुराचरणी जरी असला, तरी तो दुसऱ्याच्या दुर्गुणाची चहा करील असें कधीं होत नाहीं. त्याच्या हातून जरी सदाचरण होत नसलें, तरी तो सद्गुणाला मान डोलवीलच डोलवील. गुन्हे करणारी मंडळी जरी असली, तरी तिनें आश्रय दिलेल्या एखाद्या खेळाच्या उपसंहारांत सद्गुणाची वाहवा झालेली असून दुर्गुणास योग्य प्रायश्चित्त मिळाल्याचें जर कदाचित् त्या मंडळीच्या अवलोकनांत न आलें, तर ते नाटककाराची हुर्यो करतील.'

'वक्त्याविषयीं श्रोत्यांच्या मनामध्यें प्रतिकूल ग्रह उत्पन्न होऊन त्याचें भाषण ऐकण्यास ते उत्सुक नसतील, तेव्हां वक्त्यानें मुकाट्यानें बसावें हेंच चांगलें. कारण समाज प्रतिकूळ झाल्यावर त्याच्यापुढें याचें एकट्याचें तें काय चालणार? याचें सामर्थ्य तें किती? तत्रापि असें नेहमीं घ-

डतें कीं, असा जो श्रोत्यांचा वक्त्याविषयीं वाईट ग्रह झालेला असतो तो क्षणिक असतो, व वक्त्यानें भाषण चांगलें व्यवस्थेशीर केलें म्हणजे त्यांचा तो ग्रह तत्काल नाहींसा होतो. तेव्हां श्रोत्यांचा आपल्याविषयीं जरी वाईट कल झाला असला, तरी त्यानें मनांत कांहींएक विषाद न मानितां स्वस्थ बसावें. त्यांनीं टर जरी उडविली तरी ती हंसण्यावारी न्यावी. इतकेंच नाहीं, तर शिवीगाळीचा जरी प्रसंग आला, तरी तो थट्टेंतला प्रकार आहे असें समजावें, परंतु मनाची चलबिचल होऊं देऊं नये. तें शांत आणि स्थिर ठेवावें. आपल्याला राग आला आहे, किंवा आपण घाबरलों आहों असें न दाखवितां, निमूटपणें ते "पुढें चालूं द्या" असें म्हणत तोंपर्यंत कांखेंत हात घालून स्तब्ध उभें राहवें. असें कांहीं वेळ केलें म्हणजे श्रोत्यांपैकीं कांहीं मंडळी गलबल करणाऱ्या दहापांच मंडळीस लागलींच गप्प बसायला सांगून जिकडे तिकडे शांतता करतील, आणि "हूं, चालूं द्या" असें त्यास म्हणतील. शांतता मोडणारी मंडळी नच ऐकूं लागली, तर प्रसंगविशेषीं त्यांना ते घालवूनही देतील. पार्लमेंटच्या नवीन निवडणुकीच्या वेळीं निरनिराळ्या ठिकाणीं मुखत्यार पाठविण्याकरितां ज्या सभा भरत असतात, तेथें देखील वरील प्रकारचा दंगा एखादे वेळीं होत असतो, तेव्हां वरील युक्तीनेंच त्या मंडळींत शांतता झाल्याचें पुष्कळ वेळां माझ्या पाहण्यांत आहे.'

'दांडगाई वगैरे होण्याचा प्रसंग जरी दिसला तरी भिऊं नये. दंगेखोर मंडळी जात्या फार भित्री असते. त्यांना

मानसिक बळ व तसेंच शारीर बळ त्या वेळेला कांहीं नसतें. याचें कारण त्यांचे ठिकाणीं परस्परांत ऐक्य आणि विश्वास हीं मुळींच नसतात. ज्या विकारांनीं त्यांच्या मनोवृत्ती उच्छृंखल होतात, ते विकार त्यांच्या हातून तसलीं कृत्यें घडून जाईपर्यंत टिकत नसतात. रागाचा परिणाम घडवून आणण्याकरितां त्यांच्या अंगीं पुरेसा जोर नसतो. त्यांच्यांत ऐक्य, व्यवस्था व विश्वास या तिहींपैकीं एकही नसतें. त्यांच्यांत तट पडून जो तो आपल्यापुरता विचार करूं लागतो. कारण अडचणीच्या प्रसंगीं आपला शेजारी आपल्याला मदत करील कीं नाहीं, याची त्यांस शंका असते. मोठ्या छातीनें समाजापुढें उभें राहून गंभीर मुद्रेनें व शांत दृष्टीनें त्याच्याकडे अवलोकन केलें असतां, त्रास देणाऱ्या मंडळींत तुमच्याविषयीं एक प्रकारचा पूज्यभाव उत्पन्न होऊन त्यांस जरब बसेल, इतकेंच नाहीं, तर पुष्कळ मंडळी तुमच्या त्या गुणाचें अभिनंदन करतील, व त्रासदायक लोकांकडून दंगाधोपा न होईल अशा रीतीची व्यवस्था करतील. तुमचे हे वरील गुण त्रासदायक मंडळीला लाजवून सोडतील. मीं असें पाहिलें आहे कीं, जी मंडळी वक्त्यास खडे मारण्यास उद्युक्त झाली होती, तीच मंडळी, त्याची ती शांत वृत्ती पाहून व त्याचें तें रसाळ व्याख्यान ऐकून शेवटीं मनांत अगदीं खजील होऊन गेली, व हातांतील खडे फेंकून देऊन आनंदानें टाळ्या पिटूं लागली.

**श्रोत्यांचा वक्त्यावर परिणाम.**—समाज अवलोकन करून जी मनांत धडकी भरते किंवा भीति उत्पन्न होते,

ती नाहींशी होण्यास वक्त्यानें प्रथम असें मनांत आणिलें पाहिजे कीं, आपण जी ही मंडळी समोर पाहत आहों तीं मनुष्यें नव्हत, तर निव्वळ पाषाणाच्या मूर्तीच आहेत. लूथरची प्रथम अशीच अवस्था झाली असेल, ह्मणून त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, "मनुष्य पहिल्यानें उपदेशपीठावर चढला ह्मणजे समोर बसलेल्या मंडळीचा थवा पाहून तो अगदीं गांगरून ज्ञात असतो. मी स्वतः त्या पीठावर उभा राहत असें, तेव्हां कोणाकडेही पाहत नसें; व माझ्या डोळ्यासमोर असलेले लोक केवळ लांकडाचे ठोकळे आहेत असें मी समजें."

"तथापि श्रोतेमंडळी ह्मणजे कांहीं तरी माणसांचा एक जमाव आहे असें मानणें फार चुकीचें होईल. कारण वक्त्याच्या भाषणाचा थोडकासा जरी मासला त्यांना पहिल्यानें कळला, तरी ते लागलीच एकमेकांत कुजबुजूं लागून एकदम त्यांच्यांत एकमत उत्पन्न होतें. तें एकदां उत्पन्न झालें, ह्मणजे मग श्रोते आपल्या मानसिक व शारीर कृती कशा अद्भुत रीतीनें व्यक्त करतील याचा नियमच नाहीं. याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे हेंच आहे, कीं मनुष्यामनुष्यांत लोहचुंबकांतल्यासारखी स्वभावसाम्यजनित एक प्रकारची आकर्षणशक्ति असते, यामुळें क्षणभर त्यांच्या मनोवृत्ती सारख्या होऊन, सर्वांचा कलही एकाच बाजूचा होतो. ह्मणून श्रोत्यांपेक्षां वक्ता योग्यतेनें शतपट जरी मोठा असला, तरी वर सांगितल्याप्रमाणें श्रोत्याश्रोत्यांत एकचित्त झाल्यावर, ती श्रोतेमंडळी ह्मणजे एक प्रचंड राक्षस आपल्यापुढें बसला आहे, व त्या मानानें

आपण केवळ वामनमूर्ति किंवा कःपदार्थ आहों, असें वक्त्यास वाटल्यावांचून राहणार नाहीं. याचप्रमाणें व्यक्तिपरत्वें पाहूं गेलें असतां राजा जरी प्रजेपेक्षां अधिकारबळानें श्रेष्ठ आहे, तत्रापि समाजपरत्वें ती सर्व प्रजा मिळून राजाला भारीच आहे, व तिचा तो आज्ञांकित झालाच पाहिजे.

मंडळीचा मोठा जमाव पाहून वक्त्याला एक प्रकारची भीति जरी उत्पन्न होत असली, तरी हें खचित आहे कीं, वक्तृत्वापासून जो कांहीं मोठा लाभ व्हावयाचा, तो श्रोतृसमाज मोठा असल्याशिवाय होणार नाहीं. लहान समाजामध्यें जें भाषण किरकोळ असें गणलें जातें, तेंच त्याच वक्त्याकडून बहुसमाजापुढें झालें असतां टाळ्यांचा अगदीं गजर होऊन जाईल. याचें कारण असें आहे कीं, पुष्कळ मंडळीमध्यें एकाच्या मनावर ठसा उमटला ह्मणजे त्याचें पाहून दुसरा, दुसऱ्याचें पाहून तिसरा, असा सर्वांचे ठिकाणीं एकदम सारखाच ठसा वठतो. एखादें गाणें किंवा व्याख्यान चाललें असतां, ऐकायला एकच एक मनुष्य असला, ह्मणजे त्यास तें ऐकून जें काहीं चांगलेंवाईट वाटलें असेल, तें सांगण्यास दुसरा कोणी जवळ नसल्यानें, त्याच्या मनांतल्या मनांतच तें राहतें. परंतु तोच श्रोता बहुजनसमाजांत बसला असतां त्याची ती चर्या पाहून इतर मंडळी चटकन् त्याचें अनुकरण करतात, व त्यायोगानें त्याच्याचसारखा चांगलावाईट परिणाम त्या लोकांच्या मनावर लागलींच दिसून येतो. अशा रीतीनें सर्व समाजाचे मनोधर्म एकदम प्रकट झाले असतां, त्यांचें प्रतिबिंब

वक्त्यावर पडून त्यास सभाषण करण्यास जास्त स्फुरण येतें. अशा प्रकारें उभयतां श्रोत्यावक्त्यांमध्यें प्रेमभाव उत्पन्न होतो. त्यांच्या चर्येवरून त्यांचें हृद्गत वक्ता तेव्हांच ओळखून काढून तो त्यांना रुचेल असेंच बोलूं लागतो. आपल्या भाषणाचा श्रोत्यांच्या मनावर आतां चांगला परिणाम होईल अशी त्याची खात्री होऊन तो निर्धास्तपणें बोलूं लागतो व नवीन नवीन उपयुक्त विचारही त्यास सुचूं लागतात.

जेथें जागा मोठी प्रशस्त असून, श्रोते अगदीं थोडे असतात त्या ठिकाणीं समयस्फूर्तीनें बोलणाराचें खरें वाक्चातुर्य दिसून येण्यास मार्ग नसतो; कारण ऐकणारी मंडळी थोडी असल्यामुळें आपल्या भाषणाला जोर येणार नाहीं, आणि आपलें सामर्थ्य येथें दाखविण्यांतही कांहीं अर्थ नाहीं असें त्यास वाटत असतें.

# भाग ८ वा.

## व्याख्यान देण्याची शैली.

वक्ता कसा असावा, त्यानें काय शिकलें पाहिजे, समाजासाठीं व्याख्यानें कशीं तयार करावीं, याविषयीं येथवर झालें. आतां एक गोष्ट सांगावयाची राहिली, ती ही कीं, तो जरी जात्या बुद्धिवान् असला, उपयुक्त विद्या शिकून तयार झाला असला, व त्याची पदरचना उत्तम प्रकारची असली, तरी त्याखेरीज आणखी एक गुण त्याच्या अंगीं असावा लागतो. तो जर त्याच्या अंगीं नसेल तर त्याच्या बोलण्यापासून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं; त्याचें भाषण कोणी देखील निमूटपणें ऐकणार नाहीं. तो गुण ह्मणजे व्याख्यान देण्याची शैली हा होय. तो संपादन करण्याविषयीं प्रत्येक वक्ता होऊं इच्छिणारानें झटलें पाहिजे. त्याला हा गुण संपादन करण्यांत जितकें लक्ष घालावें लागेल व परिश्रम करावे लागतील, तितके दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा अभ्यास करण्यास लागणार नाहींत. हा गुण वक्त्याच्या अंगीं असणें अत्यंत जरूरीचें आहे असें प्राचीन व अर्वाचीन काळच्या सुज्ञ लोकांनीं कबूल केलें आहे. क्किंटिलियन ह्मणतो कीं, विषय क्षुल्लक असेना, त्यावर व्याख्यान जर चांगलें देतां आलें तर त्याचा लोकांच्या

मनावर जसा चांगला परिणाम होईल, तसा एखाद्या महत्वाच्या विषयावरील गचाळ व्याख्यानापासून होणार नाहीं. वक्तृत्वामधील श्रेष्ठ भाग कोणता असें डेमॉस्थेनीजला कोणीएकानें विचारलें, तेव्हां त्यानें 'व्याख्यान देण्याची शैली' असेंच चटकन् सांगितलें, आणि 'त्याचे खालोखाल?' असें दुसऱ्यांदां, विचारिलें, तरी डेमॉस्थेनीजचें उत्तर 'शैली' हेंच होतें. या भागास इतकें महत्व देण्याचें कारण काय असावें असें एकानें विचार करून पाहतां त्यास असें वाटलें कीं, डेमॉस्थेनीजला हजारों मंडळीपुढें उभें राहून त्यांचे मनोधर्म उत्तेजित करावे लागत असत; ते उत्तेजित होण्यास आवाज खणखणीत परंतु कर्णमधुर असून, भाषण जोरदार व्हावें लागतें, ह्मणून कदाचित् या प्रसिद्ध वक्त्यानें शैलीस इतकें महत्व दिलें असेल. जों जों आपण या गोष्टीचा बारीक विचार करूं, तों तों आपणास असें दिसून येईल, कीं डेमॉस्थेनीजचें हें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. ही गोष्ट नुसत्या एका बर्कच्या उदाहरणावरून सिद्ध होणार आहे. विचारसरणीसंबंधानें त्याची इतकी प्रसिद्धि होती कीं, त्याच्यासारखा वक्ता आजपर्यंत कोणी झाला नाहीं, असें म्हणतात. परंतु भाषणशैलीसंबंधानें त्याचीदेखील एकदां हाउस ऑफ् कॉमन्समध्यें अगदीं फजीती उडाली. तो बोलत असतां सर्व मंडळी ही आपली जेवणाचे वेळची घंटाच आहे असें समजून पटापट तेथून उठून गेली.

लॉर्ड चेस्टरफील्डनें आपल्या मुलास जीं कित्येक बोधपर पत्रें लिहिलीं आहेत, त्यांपैकीं एकांत त्यानें असें लि-

हिलें आहे कीं, 'मुला, तूं उद्यास येण्यास तुला चांगला वक्ताच बनलें पाहिजे. उत्तम वक्ता ह्मणवून घेण्यास व्याख्यानशैली जितकी तुला कामास येईल तितकें विषयाचें प्रतिपादन उपयोगी पडणार नाहीं. पिट्, मरे, हे केवढे वक्ते होऊन गेले आहेत पहा. आणि ते कशानें? त्यांची भाषणशैली अत्युत्तम आहे ह्मणून. कॉमन्ससभेंतील मंडळीला स्फुरण आणणारे, आणि पुनः गार करून सोडणारे तरी तेच! पुष्कळ मंडळींनीं गजबजून गेलेल्या त्या स्थानीं वरील दोघांचींच भाषणें कायतीं निमूटपणें ऐकलीं जात आहेत. त्यांचीं भाषणें चाललीं असतां तेथें इतकी शांतता असते कीं, साधारण टांचणी जर भुईवर पडली तर तिचा आवाज स्पष्ट कानीं येतो. इतरांपेक्षां त्यांचा विषय किंवा कोटिक्रम चांगला असतो ह्मणून का असें होतें? त्यांच्यापासून कांहीं अद्वितीय माहिती मिळेल असें तेथल्या सभाजनांस वाटत असतें, ह्मणून का ते त्यांच्या भाषणसमयीं इतकी शांतवृत्ती धारण करतात? नाहीं, असें मुळींच नाहीं. करमणूक व्हावी हीच त्यांची इच्छा असते, व तशी करमणूक त्यांच्या भाषणानें होत असल्यामुळे त्यांना तें पसंत पडतें, आणि ह्मणूनच ते तें लक्ष लावून ऐकतात.'

कित्येक लोक असें स्थापित करतात कीं, वक्तृत्व करण्याला शिकलेंच पाहिजे असें नाहीं. चांगला गुणी वक्ता होण्याला मनुष्यास फारसें कांहीं करावें लागत नाहीं. फक्त विधीनें घालून दिलेल्या नियमांस अनुसरून चाललें ह्मणजे पुरे आहे, असें ते म्हणतात. परंतु सगळ्यांच्याच नशीबीं चांगलें बोलतां येणें हा गुण नसतो. ते बोलतात, नाहीं

असें नाहीं, पण त्यांना चांगलें बोलतां येत नसतें. प्रकृतिसिद्ध गुणांपेक्षां, त्यांना ज्या वाईट संवयी लागलेल्या असतात, त्यांचाच त्यांच्यावर विशेष अंमल असतो. तेव्हां अशा मंडळीनें वक्तृत्वकलेचा अभ्यास केला असतां त्यापासून त्यांचा तोटा तर व्हायचा नाहींच, उलट झाला तर नफाच होईल. सर्व मनुष्यांना स्वभावतः चांगलें बोलतां येत असतें, असें जरी धरून चाललें, तरी वक्तृत्वाचा अभ्यास केला असतां फुकट जाणार नाहीं. त्यापासून अंगीं जडलेल्या वाईट खोडी निदर्शनास येऊन मनांत एक प्रकारचा उजेड पडेल, आणि प्रकृतिधर्मानुसार वागण्याची इच्छा होईल.

आतां येथें हेंही कबूल केलें पाहिजे कीं, वक्तृत्वनियमांस फारही धरून उपयोगी नाहीं. त्या नियमांचेंच सदासर्वकाळ मी अवलंबन करीन असें कोणी म्हणेल, तर तो कधींही चांगला वक्ता होणार नाहीं. तथापि वक्तृत्वाच्या अभ्यासाची ज्याला पुरी माहिती झाली आहे, त्याच्या बोलण्यांत विचाराला धरून जरी कांहीं नसलें, तरी तो जें बोलेल तें शुद्ध असेंच निघेल; आणि असेंच बोलतां येण्याला आपण मूळ झटलें पाहिजे. चांगलें बोलण्याविषयींचे नियम आपल्या मनांत इतके दृढ बागविले पाहिजेत कीं, त्यांना अनुसरून चालण्याची आपल्याला संवय लागावी. कोणतीही कला पूर्णपणें अवगत होण्याला असेंच प्रथम करावें लागतें.

आतां ही भाषणशैली अमक्याच लोकांस साधेल, व इतरांना साधायची नाहीं असें नाहीं. जे कोणी अविश्रांत श्रम करून ती साधून घेण्याची खटपट करतील

त्यांस ती साधणार आहे, असें ऑस्टिन नामक एका ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. तो ह्मणतो कीं, भाषणशैलीसंबंधानें विचार करण्यासारख्या ज्या कांहीं अत्यवश्यक आणि नाजूक गोष्टी आहेत त्यांचा विचार केला असतां असें खचित दिसून येतें कीं, भाषणशैली ही अमक्याच विवक्षित लोकांस साधेल व इतरांस ती साधायची नाहीं, हें ह्मणणें गैर आहे. हिला ईश्वरी देणगी म्हणतां येत नाहीं. इतर मोठमोठ्या गुणांप्रमाणेंच ही संपादनीय आहे. मात्र दीर्घ परिश्रम आणि थोडेंसें कौशल्य खर्च केलें असतां फळ मिळणार आहे. त्याखेरीज हा गुण संपादन होणें नाहीं, हें खचित आहे. ग्रॅकस, सिसेरो, डेमॉस्थेनीज, इसॉक्रेटीस, इत्यादि प्राचीन वक्त्यांनीं हा गुण प्राप्त करून घेण्याचे कामीं भगीरथ प्रयत्न केले होते. सारांश जे कोणी प्रसिद्ध वक्ते होऊन गेले, त्यांपैकीं एक तरी ह्या गुणाच्या प्राप्तीकरितां श्रम केल्याखेरीज राहिला असेल काय? नुसत्या नैसर्गिक गुणानें का त्यांची कीर्ति झाली असेल? हा गुण त्यांच्याबरोबर जन्मापासून आला होता असें नाहीं. तेव्हां कोणत्याही कलेचें पूर्ण ज्ञान होणें हें दीर्घ श्रमाचें व कालावधीचें काम आहे हें उघड होतें.

**आवाज.**—वक्त्याचें मुख्य हत्यार म्हटलें ह्मणजे आवाज हें होय. आवाज कमावण्याकडे त्यानें विशेष लक्ष दिलें पाहिजे. कित्येकांचा आवाज जात्याच वक्तृत्वोपयोगी असतो. तो चांगला कणखर व स्पष्ट असला, ह्मणजे वक्ता बोलूं लागला असतां ऐकणारांच्या अंतःकरणास पाझर सुटूं लागतो, आणि त्यांचीं मतें वक्त्याच्या मताविरुद्ध जरी असलीं, तरी

त्याचें भाषण ऐकून ते लोक त्यास लागलीच अनुकूळ होतात. परंतु ही ईश्वरी देणगी थोड्यांनाच मिळालेली असते; ह्मणून ती ज्यांस मिळालेली असेल त्यांनीं ईश्वराचे आभार मानले पाहिजेत. कित्येकांजवळ ही किल्ली असते, परंतु तिच्यायोगानें वक्तृत्वरूपी कुलूप त्यांना उघडतां येत नाहीं. त्यांचा स्वर एकच एक असून घोगरा किंवा भसाडा असतो. असा आवाज लोकोपयोगी होण्यास चांगली मेहनत घेऊन तो कमाविला पाहिजे. श्रम केल्यावर तो सुधारणार नाहीं असें समजूं नका. श्रमानें सर्व कांहीं होईल. पहिल्यानें जो बदसूर व कर्णकटु आवाज असेल, तोच जर चांगला बनविला, तर मूळच्या व न कमाविलेल्या उत्तम आवाजापेक्षां तो खरोखर चांगला होईल.

**प्रेमोत्पादक स्वरः**—याविषयीं लिहितांना अगोदर असें सांगितलें पाहिजे, कीं स्वर आणि मन या दोहोंचा परस्परांशीं सूक्ष्म असा निकट संबंध आहे. प्रेमोत्पादक स्वराचें मुख्य उत्पत्तिस्थान आत्मा हें आहे. ज्यांचा आवाज स्वभावतःच प्रेमळ असतो, ते मोकळ्या मनाचे असून त्यांचें अंतःकरण अगदीं कोंवळें असतें, व ते आपल्या मनोवृत्तीनुसार चालत असतात. हे गुण ज्यांचे अंगीं आहेत, ते वक्ते क्षणांत आपल्या श्रोत्यांवर चांगला पगडा बसवितात. त्यांच्या मनाकडून त्यांच्या स्वरास प्रोत्साहन मिळतें; परंतु तें कसें मिळतें हें कळत असतांही वर्णन करतां येत नाहीं. त्यांचें भाषण चालूं झालें, ह्मणजे त्याचा प्रतिध्वनि सर्व श्रोत्यांच्या अंतःकरणांत होतो. त्यांचें बोलणें उत्कंठेचें व खऱ्या कळकळीचें असलें ह्मणजे

मग तें जरी न्यायदृष्टीनें चुकीचें असलें, तरी त्याचें चांगलें तेज पडणार आहे.

ॲबी बौटन असें ह्मणतो कीं ‘ कळवळा उत्पन्न करणारा आवाज असला ह्मणजे त्यापासून श्रोत्यांच्यां मनावर भाषणाचा चांगला परिणाम होतो. प्रस्तावनेदाखल जे चार शब्द बोलावयाचे किंवा लिहायचे, ते दुसऱ्याचें मन हरण करून घेण्यासारखे असले ह्मणजे जो फायदा होतो, तितकाच किंबहुना त्याहीपेक्षां जास्त प्रेमोत्पादक आवाज असला ह्मणजे होणार आहे यांत शंका नाहीं. माझ्या माहितींत एक वक्ता आहे, त्याच्या अंगीं वक्त्यांचे इतर गुण असून त्याच्या आवाजांत मोहकता हा गुण विशेष असल्यानें तो भाषण करावयास लागला ह्मणजे त्याची ती गंभीर मुद्रा पाहून व आरंभींचे प्रेमळ असे दोनचार शब्द ऐकूनच मंडळी अगदीं गर्क होऊन जाते.

आतां हा गुण कृत्रिम रीतीनें संपादन करतां येत नाहीं, तर मग तो उत्पन्न होतो तरी कोठून हें पाहूं. हा खरोखर वागिंद्रियाच्या स्वाभाविक घटनेचेंच फळ असावा; व याला प्रत्यंतर पाहिजे असल्यास गायनाचा प्रकार ध्यानीं आणला ह्मणजे कळून येणार आहे. शिवाय ज्या भावनांनीं आत्म्यास प्रोत्साहन मिळतें त्यांच्या द्वारें आत्मा वागिंद्रियास मदत करीत असेल. त्याचप्रमाणें आत्म्यास जें कांहीं भासत असतें, तें दुसऱ्यांस प्रकट करून त्यांच्या अंतःकरणांत बिंबविण्यासाठीं त्या आत्म्याचे जे प्रयत्न चालू असतात, तेही प्रेमोत्पादक आवाज निघण्यास कारणीभूत होत असतील. एखादा मनोविकार खऱ्या कळकळीनें


व हुबेहूब प्रदर्शित करण्यामध्येंच कळवळयासारखें किंवा प्रेमोत्पादक कांहीं असतें. वक्त्याच्या मनांत खरोखर कांहीं एक विकार झाला आहेसें श्रोत्याला दिसून आलें पुरे, कीं लागलींच सांसर्गिक धर्मानें त्याच्याही मनावर त्या विकाराचें प्रतिबिंब उठून, एका सुरांत बसविलेल्या जोड तारांप्रमाणें, त्याला वक्त्यासारखेंच वाटूं लागतें. एखाद्या गोष्टीच्या खरेपणाविषयीं वक्त्यानें श्रोत्यास नीट रीतीनें उलगडा करून सांगितलें, व आपण जें बोलत आहों तें समजून बोलत आहों, व आपले मनोधर्मही तसेच झाले आहेत, असें जर वक्त्यानें श्रोत्याच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिलें, तर लागलींच त्याच्या मनांत उजेड पडून तो श्रोता मोठ्या उत्सुकतेनें त्याचें बोलणें ग्रहण करील. साधारण स्वरूपाचा किंवा अगदीं कुरूप असा मनुष्य आपल्या थोर मनानें व उदार अंतःकरणानें जसा शोभला जाऊन प्रसिद्धीस येतो, तद्वत् दुसऱ्याची खात्री करून देण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे असें एकदां वक्त्यास खात्रीनें वाटूं लागलें ह्मणजे आपोआप त्याचे शब्द मोठे जोरदार आणि रसाळ निघूं लागतात, आणि तो नांवाजला जातो.

कळवळा उत्पन्न करण्याचा गुण वक्त्याच्या आवाजांत मूळचा जरी नसला, तरी तो त्यांत मागाहून आणतां येतो. तो आणण्याचा उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे त्यास जें कांहीं सांगावयाचें असतें, तें त्यानें स्पष्टपणें व्यक्त करून दाखवावें, व लोकांच्या मनावर तें ज्याप्रमाणें वठविण्यास तो पाहत असेल, तसें तें प्रथम त्याच्या मनावर उठलेलें असावें. एकंदरींत उत्तम मार्ग हा कीं, अंतःकरणांत परोपकारबुद्धी

नेहमीं जागृत ठेवून त्याप्रमाणें उपकारकृत्येंही आपल्या हातून नेहमीं घडत जावीं. कारण अंतःकरणांत कोमलता व सद्बुद्धि असेल तरच त्याच्या मुखांतून कोमल आणि प्रेमोत्पादक शब्द निघतील.

कलाकुशलतेचा या ठिकाणीं कांहीं एक उपयोग होत नाहीं. मनोविकार, अंतःकारणाची कोमलता, त्याचप्रमाणें बोलण्यांत आणि कृतींत उत्साह आणि आनंद प्रदर्शित करण्याची संवय, या गोष्टी शिकून यावयाच्या नाहींत. हें काम अंतःकरणाचेंच आहे; आणि त्याच्याच साहाय्यानें मनुष्य वक्ता होऊं शकतो.

**वाग्यंत्रः**—मनुष्याचा आवाज कोठून व कसा निघतो याची माहिती असणें फार महत्वाचें आहे. प्रोफेसर विलिस यांनीं आपल्या एका ग्रंथांत यासंबंधानें बरीच माहिती दिली आहे; तीपैकीं येथें थोडी देतों.




"ह्या वाग्यंत्राचें आदिस्थान फुफ्फुस हें आहे. ह्या फुफ्फुसांपासून नरड्यापर्यंत जोडलेली एक वायुधमनी असते, तिला श्वासमार्ग असें ह्मणतात. या श्वासमार्गाच्या द्वारें फुफ्फुसांतील वायु नरड्यापर्यंत येऊन, तेथून तो जीभ तोंड आणि नाक यांच्या पार्श्वभागीं जी पोकळी असते, तेथें जाऊन आदळतो; आणि नंतर शब्द किंवा ध्वनिरूपानें बाहेर पडतो. कधीं कधीं त्यापासून कर्णमधुर नाद निघत असतो.

**फुफ्फुसः**—हे जितके निरोगी आणि सुदृढ असतील, तितका आवाज जोरदार आणि आवेशयुक्त निघेल. आवाज पुष्कळ निघणें हें फुफ्फुसाच्या स्थितीवर विशेष अवलंबून नसून, वर जी पोकळी असते ह्मणून सांगितलें आहे तिच्या आकाराच्या आणि शक्तीच्या मानानें कमजास्त निघत असतो. मध्यें कितीही अडथळे आले तरी त्यांतून पार पडून आवाज लांबवर ऐकू जाणें हें प्रत्येकाच्या घाटीवर अवलंबून असतें. फुफ्फुस जसे निरोगी असतील, त्याप्रमाणें आवाजाचा व्यापार सुरू होऊन तो आंदोलन घेत घेत दुसऱ्याच्या कानावर कमीजास्त जोरानें आदळतो. याकरितां फुफ्फुसांची शक्ती वाढविण्याची काळजी घेऊन श्वासोच्छ्वास नियमितपणानें करण्याची संवय करावी.

**श्वासमार्गः**—कृत्रिम उपायांनीं याचा अधिक चांगला उपयोग होणें शक्य नसल्यानें यासंबंधानें जास्त सांगण्याची जरूरी दिसत नाहीं.

**नरडेंः**—ही एक अस्थिमय पेटी आहे. ह्या पेटीच्या बाजूंना एक प्रकारची गति मिळत असते; व तिच्यायोगानें कंठाच्या ज्या शिरा असतात त्या बेतानें ताणल्या जाऊन त्यांच्यावर श्वासोच्छ्वासाचें दडपण पडल्यानें आवाज खुलाशानें बाहेर पडतो. या वाक्तंतूंचा व्यापार वाद्यांतील तारांच्या स्फुरणासारखा असतो. हे वाक्तंतू ताणल्यानें किंवा ढिले केल्यानें निरनिराळ्या सुरांचे लहान मोठे आवाज निघत असतात. आवाज नेहमीं कमावीत गेलें ह्मणजे तो सतत उपयोगांत असलेल्या वाद्याप्रमाणें चांगला राहतो.

जीवंत मनुष्याच्या कंठांतील अंतर्गत व्यापारांचें परीक्षण करण्याचें काम फार कठिण ( किंबहुना अशक्य ) असल्यामुळें ध्वनि उत्पन्न होतांना कंठाच्या आंत जो व्यापार चाललेला असतो त्याविषयीं अद्याप चांगली माहिती मिळालेली नाहीं, आणि जी थोडीबहुत माहिती मिळाली आहे, तिजवरून कंठनाळावर आपणास कांहीं क्रिया करतां येऊन आवाज सुधारतां येईल अशी आशा बाळगितां येत नाहीं.

**पोकळीः**—ही पोकळी जीभ, पडजीभ, दांत आणि ओंठ यांच्या मध्यभागीं असते. प्रो० विलिस असें ह्मणतात कीं ह्या वाग्यंत्रासारखें एक कृत्रिम यंत्र तयार करून त्यास भाते, नळया व पोकळी हीं जोडून नरड्याच्या ऐवजीं वाऱ्याचा सोसाट्याचा धक्का बसून वाद्यासारखा आवाज निघेल असा एक लवचीक पडदा त्यास जोडावा. असलें यंत्र तयार करून पाहिलें असतां असें कळून येईल कीं, त्या जोडलेल्या कृत्रिम पडद्यापासून जो आवाज निघतो, त्याच्या वरल्या बाजूची पोकळी जसजशी कमीजास्त करावी तसतसे मनुष्याच्या आवाजाप्रमाणें अनेक तऱ्हेचे आवाज त्यांतून निघतील. यावरून नरड्यांतून निरनिराळे सूर निघण्याला निरनिराळया शक्तींची योजना करण्याची जरूरी नाहीं हें स्पष्ट होतें. तेव्हां नरडें ह्मणजे सूर उत्पन्न करणारें एक यंत्र आहे, व तेथून सूर निघून वरील पोकळीमध्यें गेला, ह्मणजे त्याचें त्या ठिकाणीं रूपांतर होऊन तो स्वरव्यंजनादि रूपानें बाहेर पडतो असें ह्मटलें असतां चालेल.

आतां वरील वाग्यंत्रांत व सूरसनयादि वाद्यांत एक विशेष फरक आहे, तो हा कीं या तोंडानें वाजविण्याच्या

वाद्यांत आवाज उत्पन्न होण्यासाठीं त्याच्या तोंडास एक पोपरें लावावें लागतें, व त्याला जी एक पोकळ नळी असते तिच्या योगानें आवाज कमजास्त करतां येतो: प्रत्येक वाद्य निरनिराळ्या प्रकारचें असतें. परंतु वाग्यंत्रांत जी पोकळी किंवा पोकळ जागा असते तिच्या साहाय्यानें सूर कमीजास्त करतां येतो इतकेंच नाहीं, तर सर्व जातींच्या वाद्यांचे सूर, त्याचप्रमाणें स्वर, व्यंजनें, व मनुष्येतर प्राण्यांचे आवाज काढण्याचीही शक्ति येते.

यावरून हें खास निष्पन्न होतें कीं आवाजाची तान घेतां येणें हें पुष्कळ अंशीं फुफ्फुसाच्या सुदृढ स्थितीवर अवलंबून असतें. त्याचा विस्तार आणि लवचीकपणा हा नरड्याचा गुण आहे, आणि स्वर, व्यंजनें, सूर वगैरे भेद त्यांतील पोकळीच्या स्थितीवर अवलंबून असतात.

हेंही येथें सांगितलें पाहिजे कीं आपल्याला इतर इंद्रियांची शक्ती जशी जितकी वाढवावी तितकी वाढवितां येते, तशी किंबहुना त्याहीपेक्षां जास्त वागिंद्रियाची शक्ती वाढवितां येण्यासारखी आहे.

**आवाज कायम राखणें.**—यासंबंधानें पुष्कळ नियम आहेत. ते पाळले असतां आवाज चांगला राहतो व त्याची शक्तिही वाढवितां येते. ते नियम येणेंप्रमाणें:—

१ आवाजाची कसरत करण्याची वेळ ह्मटली ह्मणजे सकाळीं दहा आणि बारा यांच्या दरम्यान, व संध्याकाळीं पांच ते आठ. हंटसाहेब ह्मणतात कीं अगदीं पहांटेस या कृत्यास आरंभ करणें चांगलें नाहीं. कारण त्या वेळीं आपल्या घशामध्यें श्लेष्मा जास्त असल्यामुळें तो साफ

नसून, आवाजास अवरोध होतो. अनशेपोटीं किंवा पोटभर जेवल्यावर फार भाषण करणें चांगलें नाहीं. थोडें बेताबाताचें जेवून चार तास लोटल्यावर मग व्याख्यान वगैरे देणें चांगलें आहे.

२ एकाच वेळीं फार लांबलचक बोलण्याची संवय लावून घेऊं नये. लहान मुलांनीं फार झालें तर अर्धा तास बोलावें, व मोठ्यांनीं सव्वा तासपर्यंत बोलावें.

३ ताठ उभें राहून बोलण्याची संवय ठेवावी. छाती ताठ व पुढें करावी, तथापि मुद्दाम छाती काढून उभें राहिल्याचें दिसूं देऊं नये. खांदे दबलेले असून त्यांचा झोंक पाठीमागें असावा. तोंड चांगलें उघडून बोलावें; परंतु मुखचर्या मात्र बिघडूं देऊं नये. उच्चार चांगला निघेल अशा रीतीनें ओंठांचा व्यापार चालूं द्यावा.

४ आवाजाची शक्ति वाढण्याला उघड्या हवेमध्यें; सपाट जागेवर किंवा टेंकडीवर वाऱ्याच्या समोर तोंड करून उभें राहून, किंवा चालतां चालतां मोठ्यानें ओरडत जावें. डेमॉस्थेनीजची गोष्ट वाचकांना आठवत असेलच. त्यानें समुद्रकिनाऱ्यावर मोठ्यानें ओरडत बसून आपल्या आवाजाचा कोतेपणा नाहींसा केला. अर्थात् इतर गोष्टींप्रमाणें यालाही 'अति सर्वत्र वर्जयेत्' ही ह्मण लागू आहे. एवढ्याकरितां विद्यार्थ्यांनीं तसली संवय करितांनां थोडें तारतम्य धरून शहाणपणानें वागलें पाहिजे.

५ थंडीसंबंधानें फार जपलें पाहिजे. जपावयाचें ह्मणजे अंगांत पुष्कळ कपडे घालून व गळपट्टा बांधून गेलें ह्मणजे

झालें असें नाहीं, तर रोज गार पाण्यानें स्नान करूं नये. आवाज बसला ह्मणजे मग फार श्रम घेऊं नये.

६ गळा बिघडण्याला पुष्कळ कारणें आहेत. तेव्हां तीं वर्ज केलीं पाहिजेत. आम्ल व स्निग्ध पदार्थ फारसे खाऊं नये.

७ दांतांच्या बळकटीविषयीं व स्वच्छतेविषयीं फार जपलें पाहिजे; कारण ते अधू झाल्यानें वर्णोच्चार स्पष्ट निघणार नाहीं.

८ छातीवर, गळ्यावर, फारसें दडपण पडूं देऊं नये.

आवाज सुधारण्याला व फुफ्फुसांची शक्ति वाढण्याला उत्तम प्रकारची कसरत ह्मटली ह्मणजे अ, आ, इ, ई, इत्यादि स्वर वाटेल त्या सुरांत ह्मणण्याचा परिपाठ ठेवावा; व हे सूर शक्त्यनुसार वाटेल तितके लांब काढीत जावें. एक सूर संपला ह्मणजे लागलींच दम खावा, व मग दुसरा चालूं द्यावा. हें करण्याला अगोदर कांहीं गद्य किंवा पद्य पाठ करून ठेवावें, आणि तें वरील रीतीनें ह्मणत जावें.

आवाजाची कसरत आरोग्यजनक आहे. वरील कसरतीनें शरीर चांगलें राहतें, व मनुष्याची शक्ति वाढून क्षयादि रोग व त्याचप्रमाणें श्वसनेंद्रियांचे रोग होत नाहींत. यासंबंधानें सर हेनरी हॉल्डचें जें मत आहे त्याचें अवतरण आह्मी खालीं देतों:—

'श्वसनेंद्रियाची कसरत करून, ह्मणजे, ज्या शारीर व्यापारांनीं वक्षस्थलांत हवा येते व जाते ते व्यापार पद्धतशीर केले असतां, फुफ्फुसांसंबंधीं रोग नाहींसे होणार

नाहींत काय? व शरीर आरोग्य स्थितींत राहणार नाहीं काय? अर्थात् राहील. पाश्चिमात्य वैद्यकग्रंथांतून वरील प्रकारच्या सूचना पुष्कळ झालेल्या आहेत; परंतु त्यांस द्यावें तसें महत्व न दिल्यानें लोक त्यांस क्वचित् मान देतात, व त्यांचा क्वचितच उपयोग करतात. खरें पाहिल्यास जनरूढी नेहमीं त्या नियमांविरुद्धच असते; आणि दगदग नसावी अशी वृथा समजूत होऊन गेल्यानें फुफ्फुसांसंबंधीं रोगांची छाया ज्यांच्यावर पडली आहे अशांना ह्या प्रत्यक्ष फायदा करून देणाऱ्या कसरतीचें अवलंबन ती रूढी करूं देत नाहीं. श्वासोच्छ्वास करण्याच्या रीती निरनिराळ्या आहेत. रोग्याला जशी ताकद आणि जरूरी असेल त्याप्रमाणें त्यानें ही कसरत करावी. फार प्राचीन काळापासून लोक असें ह्मणत आले आहेत कीं 'मोठ्यानें वाचणें चांगलें' याचा उपयोग वरील गोष्टीलाच आहे असें नाहीं. नेहमींच्या बोलण्याच्या श्रमापेक्षां ज्या पठणानें इंद्रियांना जास्त मेहनत पडणार आहे, तशा प्रकारचें पठण करण्याची संवय सर्व मंडळींनीं आणि विशेषतः ज्यांची छाती कमकुवत आहे व ज्यांना फारसे श्रम सोसत नाहींत, अशांनीं लहानपणापासून लावून घेतली असतां फार चांगलें होणार आहे. अशा लोकांनीं गाण्याचाही थोडा प्रघात ठेवला असतां बरेंच आहे; परंतु या गाण्याच्या कामांत त्यांना वाचनपद्धतींतल्यापेक्षां जास्त काळजी घ्यावी लागेल. अशी काळजी घेतली, आणि कोणत्याही गोष्टीचा अतिरेक न करितां अंगविक्षेप व स्पष्टोच्चार यांजकडे विशेष नजर पोहोंचविली, तर त्यापासून श्वसनेंद्रियांना

चांगला फायदा होऊन आवाजही चांगला कमावला जाईल. परंतु यासंबंधानें प्रचारांत जी शिक्षणपद्धति आहे, ती फार चुकीची आहे. मनुष्याची ग्राहकशक्ति न पाहतां त्याच्या मनांत थोडक्या अवकाशांत पुष्कळ गोष्टी भरविण्याच्या नादीं न लागतां, तो वेळ जर चांगल्या शिक्षणानें त्याचीं वागिंद्रियें सुधारून त्यांना चांगलें रूप देण्यांत घालविला, आणि चांगले चांगले वेंचे जर त्याजकडून पाठ करविले, तर त्याच्या मानसिक व शारीरिक शक्ती पुष्कळ सुधारतील यांत संशय नाहीं.'

**सूर** (आवाजाचे प्रकार).—आवाज कमजास्ती असतो हें सर्वांस माहीत आहेच. मनुष्याच्या आवाजाचे तीन भेद केले असतां चालेल. पहिला खरज, दुसरा पंचम, आणि तिसरा षड्ज किंवा दुगुण. यांना गायनकलेंत ग्राम अशी संज्ञा आहे.

खरज—ह्मणजे अगदीं खालीं उतरलेला सूर.

पंचम—ह्मणजे मधला सूर, फार उतरताही नाहीं आणि चढताही नाहीं. षड्ज—ह्मणजे उंच चढलेला.

या तिहींपैकीं मधला ह्मणजे पंचम हा व्याख्यान देण्यास योग्य असतो. कारण हा जसा वांकवावा तसा वांकला जातो. हा फार वेळ टिकणारा असतो, आणि इतरांपेक्षां त्या सुरांत बोललेलें फार लांबवर ऐकूं जातें. दुगुणाच्या ठिकाणीं हें एक व्यंग आहे, कीं वक्ता त्यांत मोठ्या आवेशानें बोलूं लागला, ह्मणजे त्याचा शब्द किंकाळी फोडल्यासारखा निघून, तो लवकरच अगदीं थकून जातो. अर्थात् त्याचें बोलणें श्रोत्यांला गोड लागत

नाहीं. खरज सूर नीट रीतीनें लावण्यास फार कठिण पडतें. तो तेव्हांच दुःसह व एकसुरी होऊन अखेर अखेर आवाज अगदीं बदसूर होतो.

**अडखळत व तोतरें बोलणें.**—आतां बोलण्यांतील व्यंगें कोणकोणतीं असतात हें थोडक्यांत सांगूं. पहिलें व्यंग ह्मणजे अडखळत किंवा तोतरें बोलणें हें आहे. आपण सर्व एखादे वेळेस बोलतांनां अडखळत असतों. कोणी थोडें अडखळतो, तर कोणी फार अडखळतो. प्रसंगविशेषीं आपण गांगरतों, क्रोधानें आपलें चित्त खवळतें, एखादे वेळीं झोंपेची गुंगीही येत असते, कधीं थंडी वाजत असते, अशा वेळीं आपल्या तोंडांतून स्पष्ट उच्चार बहुधा निघत नसतात. आह्मांला जें सांगावयाचें आहे, तें अशा अडखळण्याबद्दलचें नाहीं. अडखळणें आणि तोतरेपणा हे शब्द प्रचारांत साधारणपणें समानार्थी (पर्याय शब्द) समजले जातात, ह्मणून त्याच अर्थानें आह्मीं तसा उपयोग केला आहे. डा. हंटरच्या मतें हे दोन्ही भिन्नार्थी आहेत. अडखळणें ह्मणजे शब्दोच्चार चांगला न करतां येणें; तोतरें बोलणें ह्मणजे एकाच वर्णाचा पुष्कळ वेळ पुनरुच्चार करणें, जसें त त त, प प प. अशा ह्या हाडीं खिळलेल्या त्रासदायक तोतरेपणाबद्दल आह्मांस सांगावयाचें आहे. ही खोड नाहींशी व्हावी ह्मणून पुष्कळांनीं निरनिराळ्या प्रसंगीं नाहीं नाहीं ते उपाय केले आहेत; परंतु असे उपाय लहानपणीं योजिले असतां जितके फलप्रद होतील तितके मोठेपणीं होणार नाहींत. याकरितां आईबापांनीं आपल्या मुलांमध्यें हें व्यंग अस-

त्यास चारचौघां अनुभविक लोकांचा सल्ला घेऊन, तें त्यांच्यांतील व्यंग समूळ नाहींसें करण्याची त्यांनीं फार काळजी घेतली पाहिजे. या विषयावर डाक्टर जे. हंट यांच्या ग्रंथांत फार उपयुक्त माहिती दिली आहे.

**आवाज चिरकणें.**—आवाज एखादे वेळेस मध्येंच चिरकत असतो. हा बोलण्यांत एक कमीपणाच आहे. एखादे वेळीं तो फारच तार स्वरांत जाऊन कर्कश किंवा किंकाळीसारखा निघतो. बोलण्यांत अडखळणें हा जसा एक कमीपणा आहे, तशाच मासल्याचा हाही पण आहे. बहुधा असें होण्याचें कारण असें आहे, कीं ज्याप्रमाणें जीभ आणि तोंड यांच्या स्नायूंचा समतोलपणा बिघडला ह्मणजे शब्द अडखळत किंवा तोतरे निघतात, त्याचप्रमाणें नरड्यांतील स्नायूंच्या समतोलपणांत कांहीं बिघाड झाल्यानें आवाज चिरकत असतो. तो चिरकण्यास मूळ आरंभ मुलाचा कंठ फुटूं लागल्यापासून होतो. या समयास कंठनाल वाढत जाऊन पूर्णदशेला येत असल्यामुळें, पुढें एक दोन वर्षांत त्याचा आवाज अगदीं उतरून जातो. याचें कारण असें दिसतें कीं त्याला मूळचें सूरज्ञान नसतें, आणि आवाजांत जो वर सांगितलेला फेर पडतो, तो हळूहळू पडत चालल्यानें ही गोष्ट कोणाच्या समजण्यांत चटकन् येत नाहीं. ज्याप्रमाणें अडाणी लोकांस 'न' आणि 'ण,' 'श' आणि 'ष' यांतील भेद कळत नाहीं, त्याचप्रमाणें ज्यांचा आवाज चिरकत असतो, त्यांना तो एका सुरांतून दुसऱ्या सुरांत निमिषार्धांत जातो, हें कळत नसतें.

तथापि, ही खोड लागलेली असते, अंगची नसते, तेव्हां अस्खलित बोलतां येण्यासाठीं, आपला आवाज कोठें चिरकतो हें पाहण्याची सावधगिरी ठेवून, ती खोड दृढनिश्चयानें घालवून टाकण्याचा मनुष्यानें प्रयत्न केला पाहिजे.

एकंदरींत भाषणांतील व्यंगें घालविण्याचा काळजीपूर्वक उद्योग झाला पाहिजे. प्राचीनकाळचा प्रसिद्ध वक्ता डेमॉस्थेनीज यांचें ढळढळीत उदाहरण या बाबतींत घेण्यासारखें आहे. त्याचा शब्द तोतरा निघत असे हें जगविश्रुत आहे. ही खोड घालविण्याकरितां तो तोंडांत खडे धरून समुद्रकिनाऱ्यावर नेहमीं ओरडत बसत असे. खडे धरल्यानें अडखळणारी जीभ नीट वळविण्यास त्याला दुप्पट श्रम पडत. समुद्रांतील लाटांच्या आवाजानें त्याचे शब्द नीट ऐकूं येत नसत. ते ऐकूं येण्याकरितां तो मोठ्यानें ओरडत असे. या संवयीनें पुढें असें झालें कीं व्याख्यानस्थलीं जनसमूहांत होणाऱ्या गलबलीपासून निघणाऱ्या प्रचंड आवाजानें गांगरून न जातां तो त्याच्यापुढें बेधडक व्याख्यान देऊं लागला.

**घसा चेपणें.**—याचीं कारणें दोन आहेत. एक, कांहीं दिवस विश्रांती घेऊन एखादे दिवशीं एकदम भडभड बोलणें; आणि दुसरें, भलत्या सुरांत बोलण्यास आरंभ करणें. घसा न चेपला जावा म्हणून वक्त्यानें बोलण्याचा रोज नियमित प्रघात ठेविला पाहिजे. त्याचें बोलणें ऐकण्यास कोणी मिळो वा न मिळो, त्यानें आपल्या नियमास बाध आणतां कामा नये. ऐकणारे नसले तरी त्यानें व्याख्यानशैलीकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे.

**श्वासोच्छ्वास.**—याकडे प्रथमच जर थोडें लक्ष पुरविलें, तर ती शक्ति आपल्या अंगीं आली ह्मणजे वक्त्याला चांगल्या सवयी तेव्हांच लागतील, आणि बोलतांनां योग्य ठिकाणीं योग्य रीतीनें त्यास सहज दम घेतां येईल. ध्यानांत ठेवण्यासारखी मुख्य गोष्ट ही आहे कीं, श्वासोच्छ्वास अगदीं बेताबातानें करावा. श्वास पुष्कळ घ्यावा व उच्छ्वास थोडा टाकावा. आपले फुफ्फुस नेहमीं वायूनें भरलेले असावे; तथापि फारच वायु त्यांत कोंडलेला नसावा. प्रसंगवशात् जर त्यांतील वायु कमी झाला, तर त्याचा परिणाम वक्त्याला व तसाच श्रोत्यांनाही घातक होणार आहे. जिवापाड मेहनत करून दम लागलेल्या मनुष्याचें भाषण लोकांस गोड लागत नाहीं.

वयांत आलेला मनुष्य, चित्त स्वस्थ असतां एका मिनिटांत तेरापासून पंधरा वेळ श्वास घेतो. असें समजा कीं हाच मनुष्य एखाद्या विषयावर फार जलद भाषण करूं लागला, तर त्याचें श्वास घेण्याचें मान वर सांगितल्यापेक्षां कमी होईल. परंतु वक्त्यानें आपलें श्वसनेंद्रिय इतकें ताब्यांत ठेवलें पाहिजे, कीं तो स्वस्थ असो, किंवा व्याख्यान देण्याच्या गडबडींत असो, दोन्ही प्रसंगीं त्याचें श्वास घेण्याचें मान सारखें राहिलें पाहिजे.

श्वास घेणें तो अगदीं स्थिरपणें घेत जावा. आतां प्रश्न निघेल कीं, तो श्वास तोंडानें घ्यावयाचा किंवा नाकानें घ्यायचा? अर्थात् नाकानें घ्यावा. वैद्यदेखील ही रीत पसंत करितात; व वक्तृत्वनिष्णात लोकही असें सांगतात

कीं, व्याख्यान फार वेळ, व त्रासकारक न होई अशा प्रकारें, टिकण्यास हाच मार्ग चांगला आहे.

वाक्यामध्यें जो श्वास घ्यावयाचा तोदेखील नीट विचार करून योग्य ठिकाणीं घेतला पाहिजे. जें वाक्य आपण बोलूं त्यांत वास्तविक ज्या ठिकाणीं थांबावयाचें तेथेंच श्वास घेत जावा.

**कसरत किंवा तालीम.**—यासंबंधानें इतकेंच सांगावयाचें कीं, बोलायला उभें राहतांनां अगोदर पुष्कळसा श्वास घ्यावा. ताठ उभें राहून डोक्याचा झोंक थोडा मागें ठेवावा. याची तालीम व्याख्यानाखेरीज इतर प्रसंगीं केली असतां फायदा होणार आहे. मात्र ती उघड्या हवेंत किंवा हवाशीर जागेंत खिडक्या वगैरे उघड्या ठेवून करीत जावी.

आवाज आणि फुफ्फुसांची शक्ती सुधारण्यास दुसरी कसरत करावयाची ती 'आरोग्यजनक आवाजाची कसरत' या सदराखालीं पूर्वीं सांगितली आहे.

**तिसऱ्या प्रकारची कसरत.**—सावकाश आणि स्पष्टपणें श्वास न घेतां 'एक'पासून पुढील अंक ह्मणत जावें.

**वर्णोच्चार.**—आतां आपण वर्णोच्चाराविषयीं थोडासा विचार करूं. समाजव्याख्यानांत आणि धर्मपर व्याख्यानांत याविषयींचे नियम बहुधा चांगले पाळले जात नाहींत; ह्मणून आह्मी त्याविषयीं येथें थोड्या सूचना करीत आहों. तसा प्रकार जर प्रचारांत न आढळता, तर आमचें हें लिहिणें अगदीं गैरवाजवी दिसलें असतें. वर्णोच्चार करण्याची शुद्ध रीत ह्मटली ह्मणजे चांगल्या चांगल्या लोकांनीं जी पसंत केली असेल तीच. आतां कोणी असें ह्म-

णेल कीं, प्रत्येकाला चांगल्या मंडळीचा सहवास कसा घडावा? ही गोष्ट खरी आहे. परंतु आमचें म्हणणें असें कीं, सहवास जरी न घडला, तरी मंडळीपैकीं जे कोणी ठळक ठळक विद्वानांत मोडत असतील, व ज्यांची भाषणपद्धति कित्ता घेण्यासारखी वाटत असेल, त्यांचीं व्याख्यानें ऐकून त्यांपासून त्यांनीं आपला फायदा करून घ्यावा. आपल्या तोंडांतून चुकीचा वर्णोच्चार निघाल्यानें ऐकणारे किती नाखुष होऊन जातात, हें जर वक्त्यानें लक्षपूर्वक पाहिलें, तर त्यांची ती नाखुषी पाहून तसली चूक पुढें न होण्याविषयीं तो फार जपेल. जिचा व्याख्यानविषयाशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं, अशा क्षुल्लक गोष्टीनें जे श्रोते नाखुष होत असतील, ते मूर्ख समजले पाहिजेत. असें सकृद्दर्शनीं वाटेल. परंतु हें ध्यानांत आणलें पाहिजे कीं, थोडें थोडें मिळून फार होत असतें. किरकोळ गोष्टींत सुधारणा होत होत मनुष्य पुरा बनतो. आतां तो श्रोत्यांचा मूर्खपणा असो वा शहाणपणा असो, त्याची आपल्याला पंचाईत नको. आपली चूक होत आहे ही गोष्ट खरी; व ती न होऊं देण्याविषयीं जपावें हें चांगलें.

**तोंडांतून स्पष्ट शब्द काढणें.**—वर्णोच्चार चांगला येतो अशी खात्री झाल्यावर, तोंडांतून स्पष्ट रीतीनें पूर्ण शब्द निघेल असें बोलावयास शिकलें पाहिजे. असें होण्यासाठीं त्यानें प्रथम लहान लहान वाक्यें स्पष्टपणें उच्चारावीं. तसें करितांनां प्रत्येक शब्द वेगळा दिसून येईल अशा प्रकारें शब्दोच्चार करावा. तो वेगळा दिसून येण्याला प्रत्येक शब्द उच्चारल्यावर थोडें थांबलें पाहिजे असें नाहीं. न

थांबतां देखील लवकर बोलून शब्दांचा गोंधळ न होईल अशा रीतीनें बोलतां येईल.

ही गोष्ट व्यंजनांचा स्पष्ट उच्चार करतां येण्यावर अवलंबून आहे. याकरितां व्यंजनांचा उच्चार अर्धवट न करितां जलद परंतु स्पष्ट करीत जावा. तरी पण फारही स्पष्टता त्यांत दाखवितां कामा नये; कारण तसें केल्यानें ऐकणाराला तें बोलणें कर्कश व कंटाळवाणें होईल. स्पष्टता आणणें हा व्यंजनांचा विषय आहे, आणि जोर आणणें हें स्वरांचें काम आहे. स्वरांच्या योगानें बोलणें चांगलें ऐकूं येतें, व स्पष्ट व्यंजनोच्चारानें शब्द ठळक उमटतो. तेव्हां वाचण्यांत आणि बोलण्यांत या दोन्ही तत्वांची चांगली सांगड घातली पाहिजे. जोरदार आणि स्पष्ट शब्दोच्चारानें लांबचें देखील भाषण चांगलें ऐकूं येतें. आवाज कोता असला तथापि स्पष्ट शब्दोच्चार जर होईल, तर तें बोलणें इतकें लांबवर ऐकूं जाईल कीं, तितकें आवाज मोठा असूनही अस्पष्ट शब्दोच्चारानें जायचें नाहीं. कारण आपण नेहमीं पाहतों कीं, मोठ्या गोंगाटाचा आवाज, गाण्याच्या आवाजापेक्षांदेखील कमी लांब ऐकूं जातो. स्टीलचेंही ह्मणणें असेंच आहे. तो ह्मणतो कीं, जे चांगले वक्ते आहेत, त्यांचा शब्दोच्चार पूर्ण होत असल्यानें, ते हलक्या सुरांत जरी बोलले, तरी त्यांच्या त्या अस्पष्ट उच्चारानें त्यांचें बोलणें स्पष्ट ऐकूं येतें. तेंच इतर मंडळी मोठ्यानें ओरडून जरी बोलली, तरी त्यांच्या त्या अस्पष्ट उच्चारानें त्यांचें बोलणें चांगलें ऐकूं येत नाहीं.

जे कोणी नवशिके असतात त्यांना बहुधा सामासिक

शब्द, प्रास, कटिबंध, आदिकरून उच्चारण्यास कठिण असे शब्द वाचण्यांत किंवा बोलण्यांत आले, ह्मणजे ते बरोबर उच्चारतां येत नसतात. तेव्हां त्यांनीं त्या शब्दांचें टिपण करून ते नीट ह्मणतां येईपर्यंत, त्यांची उजळणी करीत जावें. अशा शब्दांचे मासल्याकरितां येथें थोडे चुटके देतों:—

१. त्या लुंगाहीन कंगालांनीं दंगा माजवून, इंगा फिरला नव्हता तोंपर्यंत, फार पिंगा घातला होता.

२. चंचद्भुजभ्रमितचंडगदाभिघातसंचूर्णितोरुयुगलस्य सुयोधनस्य.

३. असमशरज्वरभरखरपवित्ररि वरि समाधि वा याची.

४. पोटावरि त्रिवळी, कटावरुनि पितपटासि लपटुनि कटार खोवि करपुटांत मुदी.

५. फाटका मुकटा, धडका मुकटा.

६. काळे राळे, गोरे राळे राळ्यांत राळे मिसळले.

**स्वरभेद.**—बोलणाराचा आवाज नेहमीं सारखाच राहतो असें नाहीं. तो क्षणांत उंच, क्षणांत खालीं असा होत असतो. तो एकाच सुरांत फार वेळ राहत नाहीं. तसा जर राहील तर तो कानालाही पण गोड लागणार नाहीं.

स्वराचे प्रकार तीन आहेत. पहिला उदात्त, दुसरा अनुदात्त, आणि तिसरा स्वरित. या स्वरिताचे दोन पोटभेद आहेत—१ उदात्त स्वरित, व २ अनुदात्त स्वरित.

**शब्दावरील जोर.**—तोंडांतून उच्चारलेल्या वाक्यांतील कांहीं शब्दांकडे ऐकणाराचें विशेष लक्ष लागावें ह्मणून त्या शब्दांवर एक प्रकारचा जोर देत असतात. प्रत्येक मनुष्याच्या बोलण्यांत तो सहज गतीनें निघत असतो. परंतु

जे कोणी त्याचा दुरुपयोग करितात, ते स्वभावजन्य नियम विसरतात असें ह्मणावें लागतें.

याविषयीं दोन नियम ध्यानांत धरण्यासारखे आहेत. योग्य शब्दावरच जोर देणें हा एक, आणि दुसरा, त्या योग्य शब्दावर हवा तितकाच, ह्मणजे वाजवीपेक्षां जास्त नाहीं इतका जोर देणें.

आतां योग्य शब्द कोणते हें बोलणाराच्या अर्थाच्या धोरणावर अवलंबून असतें, किंवा तो जर दुसऱ्याचे शब्द उच्चारीत असेल, तर त्याच्या मनांत त्यांचा जो अर्थ आला असेल, त्याच्या अनुरोधानें त्यानें योग्यायोग्य समजावें. एकाच वाक्यांतील निरनिराळ्या शब्दांवर निरनिराळ्या वेळीं नेट देऊन बोललें असतां, त्यापासून भिन्न भिन्न अर्थ निष्पन्न होऊन, श्रोत्यांच्या मनावरही त्याप्रमाणें भिन्न तऱ्हेचे ठसे उमटतात.

**मूळ वाक्य.**—तो ह्मातारा ब्राह्मण मेला ?

**तो** ह्मातारा ब्राह्मण मेला ?=( मला वाटलें दुसरा कोणी असेल ).

तो **ह्मातारा** ब्राह्मण मेला ?=( दुसरा कोणी तरुण असेल ).

तो ह्मातारा **ब्राह्मण** मेला ?=( इतर जातीचा दुसरा कोणी ).

तो ह्मातारा ब्राह्मण **मेला** ?=( मला तो चांगला धट्टाकट्टा व लवकर मरणार नाहीं असा वाटला होता ).

मूळ वाक्य.—" तो दुपारीं जेवून शाळेस गेला. "

तो.............................(दुसरा कोणी नाहीं).

....दुपारीं.........................(सकाळीं नाहीं).

..........जेवून...............(उपाशी पोटीं नाहीं).

...............शाळेस........(दुसरे कोठें गेला नाहीं).

.........................गेला..(येथें तो हल्लीं नाहीं).

कांहीं मंडळीला वाक्यांतील सर्व शब्दांवर जोर देण्याची संवय असते. परंतु तसें करणें चांगलें नाहीं. तें अगदीं चुकीचें आहे. बोलणारास वाटत असतें कीं तसें केल्यानें आपण चांगल्या प्रकारें बोलत आहों, व ऐकणाराच्या मनावर त्यायोगें चांगला ठसा उठत असेल. परंतु वास्तविक तसा ठसा मुळींच उमटत नसतो. दुसरी एक ढोबळ चूक अशी असते कीं, कित्येक वक्ते किरकोळ शब्दांस जास्त महत्व देऊन त्यांवर जोर देत असतात; परंतु तसेंही करणें वाजवी नाहीं.

**उद्गार.**—आपल्या मनांत कांहीं विकार उत्पन्न होऊन तदनुसार जे शब्द तोंडांतून काढावयाचे, ते ज्या सौम्य किंवा आवेशयुक्त प्रकारानें प्रकट केले जातील, त्यास उद्गार असें ह्मणावें. आपले मनोविकार दुसऱ्यास कळविण्याचा स्वाभाविक मार्ग हाच आहे. आतां उद्गार काढणें ते अतिशयोक्ति दिसेल अशा रीतीनें काढूं नये. यांतही एक प्रकारची खुबी आहे, व ती चांगली साधली पाहिजे. दुसऱ्यांचें बोलणें वगैरे ऐकून, वक्ता होऊं इच्छिणाराच्या कानाला चांगला संस्कार झाला पाहिजे; व त्याच्या वाणीसंस्कारालाही तसाच संस्कार झाला पाहिजे. आपलें हृद्गत दुस-

त्यांच्या कानांत चांगलें भरून, त्यांच्या अंतःकरणांत त्याचें उत्तम प्रतिबिंब उठलें पाहिजे. हें काम साधणें न साधणें हें बोलणाराच्या सुरावर अवलंबून असतें. प्रत्येक मनोविकाराचे उद्गार काढण्याला निरनिराळे सूर आहेत. एकंदरींत उद्गार हा स्वरभेदाची वरची पायरी आहे. तथापि या दोहोंची अगदीं सांगड आहे. एकाचा दुसऱ्याच्या साहाय्याशिवाय विचारच करितां यावयाचा नाहीं. अर्थात् ते अन्योन्याश्रयी ह्मटले पाहिजेत. स्वरभेदाचें काम ह्मटलें ह्मणजे आवाज वाढवून त्यास जोर देणें हें होय; व उद्गाराचें काम ते सूर उपयोगांत आणून त्यांचा मनोविकारांशीं योग्य संबंध जोडणें हें आहे.

उद्गार हा भाषणाचें मुख्य चिन्ह आहे; व अमक्याचें हें भाषण किंवा हे शब्द आहेत, हें ओळखण्याला त्याचा उद्गार हेंच साधन आहे. कळवळा किंवा प्रेम उत्पन्न करणारा आवाज जो पूर्वींच कथन केला आहे, त्याच्याशीं याचा निकट संबंध आहे.

आवाज काढण्याच्या अगोदर जसा आपला विचार, भावना किंवा मनोवृत्ति फिरेल, तसा आपला आवाज किंवा उद्गार निघेल. हा होणारा फेरबदल तिखट कानाच्या मनुष्याला तेव्हांच कळतो. साधारण बोलण्यांत देखील हें कळून येण्यासारखें असतें. एखाद्या सूक्ष्म किंवा नाजूक प्रकाराचें वर्णन करावयाचें आपल्या मनांत असलें, ह्मणजे त्या त्या प्रकारचे आपले अंगविक्षेप होऊन उद्गारही तसेच निघतात.

ज्या आवाजामध्यें शब्द किंवा वाक्य बोलावें, त्याप्र-

माणें त्याचा अर्थ फिरत असतो. नुसत्या शब्दांत जो अर्थ असतो त्याहून जास्त अर्थ आवाजाच्या भेदानें ते शब्द उच्चारण्यांत निष्पन्न होतो. याचें एक मासलेवाईक उदाहरण खालीं देतों.

एलिझाबेथराणीनें, ससेक्स आणि लीस्टर यांच्यामध्यें जें वितुष्ट आलें होतें तें नाहींसें करून त्यांचें सख्य व्हावें ह्मणून, त्या उभयतांस असें ह्मटलें कीं 'महाराज, तुह्मां उभयतांमध्यें निरर्थक वाढलेला हा वैरभाव नाहींसा करून, तुम्ही हातांत हात घालून कसे प्रेमानें चालतां, तें पाहूं बरें.' हे राणीचे शब्द ऐकून ते दोघेही अगदीं नाराज मुद्रेनें एकमेकांकडे पाहूं लागले. प्रत्येकास वाटूं लागलें कीं आपण होऊन राणीच्या ह्मणण्याप्रमाणें करण्यास पुढें सरसावूं नये. हें पाहून राणी ह्मणाली, 'ससेक्स, माझी एवढी विनंती ऐका, आणि लीस्टर, तुम्हीही पण माझ्या ह्मणण्याप्रमाणें करा.' हे तिचे शब्द इतके जोराचे आणि खुबीदार निघाले होते कीं, तिची ती विनंति हुकमतीसारखी वाटली व हुकूम विनंतीसारखा भासला.

समाजव्याख्यानामध्यें चांगले उद्गार निघण्याला स्वभावास किंवा प्रकृतिनियमास अनुसरून चाललें पाहिजे. कोणत्याही संवयीच्या स्वाधीन न होतां, साहजिक नियमानें ज्या क्रिया होतात त्यांचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां, समाजव्याख्यानांत किंवा वक्तृत्वाच्या इतर शाखांत चांगलें यश मिळणार आहे.

**सूर.**—नेहमींचें भाषण ज्या सुरांत चालत असतें त्याच पंचम किंवा मधल्या सुरांत मुख्यत्वेंकरून समाज-

व्याख्यान देत जावें. अर्थात् हा सूर जसा भाव दाखवावयाचा असेल तशा प्रकारें बदलत असतो. नाजूकपणा दाखविण्याचा सूर निराळाच असतो. तसेंच दया, क्रोध, दुःख इत्यादिकांचा निरनिराळा असतो. एकंदरींत प्रत्येक रसाचा सूर भिन्न आहे. तथापि सर्वांस साधारण असा जो पंचम तो सूर कायम राखीत जावा. आपआपल्या सामर्थ्याप्रमाणें आवाजाला प्रत्येक सुराची चांगली तालीम देत जावें. प्रथम मध्यम सुराचा (पंचमचा) उपयोग करावा; नंतर उंच सुराचा (दुगुण); आणि शेवटीं खालच्या सुराचा (खरज) उपयोग करावा. हा शेवटचा सूर वक्त्यास फार त्रास देत असतो; आणि फारच थोड्या मंडळीला या सुरांत स्पष्ट बोलतां येतें. सिडन्स नांवाची एक नटी होती, ती अगदीं हलके जरी कुजबुजली, तरी मोठ्या नाटकगृहांत अगदीं दूरच्या मंडळीला तिचे ते शब्द स्पष्ट ऐकूं येत.

संभाषण करतांनां ज्या ठिकाणीं आपला सूर बदलेल तेथें विषयाचा निराळा भाग लागला पाहिजे, व तो नच लागला तर थोडें थांबून बोलावयास लागावें. भलत्याच ठिकाणीं सूर बदलला तर सर्व घाण होऊन जाईल. सर्व वक्त्यांचें असें मत आहे, कीं बोलतांनां सूर उतरविण्यापेक्षां तो चढविण्याचें काम अधिक सोपें आहे.

सूर व जोर या दोहोंचीं लक्षणें व धर्म अगदीं भिन्न आहेत. जोराच्या योगानें सुरास एक प्रकारची मदत होत असते. बोलणारे नेहमीं यांचा घोंटाळा करीत असतात. असे कित्येक वक्ते आढळतात कीं जसजसें त्यांचें भाषण जोरदार निघायला लागतें, तसतसा त्यांचा सूरही चढूं

लागतो. परंतु ही त्यांची मोठी चूक आहे; व ती न करण्याविषयीं त्यांनीं जपलें पाहिजे. जोर वाढवण्यास सूर हें एक साधन आहे, आणि हें ध्यानांत ठेविलें पाहिजे, कीं सूर जरी बदलला, तथापि उदात्त, अनुदात्त वगैरे ज्या चढत्या उतरत्या पायऱ्या आहेत त्या मात्र जशाच्या तशा चालू द्याव्या.

दुसरी एक गोष्ट अशी कीं, जसा आपला सूर असेल, तसें कमीजास्त लांब आपलें बोलणें ऐकूं जाईल. दूरवर आपलें बोलणें ऐकूं जावें, असें आपणास वाटलें ह्मणजे आपण मोठ्यानें बोलतों इतकेंच नाहीं, तर सूरही लांबच काढतों. पुरुष केवळ्यानें जरी ओरडला, तरी त्याच्यापेक्षां एखाद्या स्त्रीची किंकाळी दूरवर ऐकू जाते याचें कारण तरी हेंच आहे.

आतां हा सूर स्थानपरत्वें कमजास्त निघाला पाहिजे. ह्मणजे ज्या खोलींत बोलावयाचें असेल तिच्या मानानें वक्त्यानें सूर काढावा. प्रत्येक ठिकाणीं कांहीं विशिष्ट गुण असतात; यामुळें कांहीं विशेष रीतीचा सूर काढला, तरच तो त्या मंदिरांत खुलत असतो. जर एखाद्या अनोळखीच्या जागीं वक्ता प्रथमच बोलावयास उभा राहिला असेल, तर तेथें त्याला योग्य सूर लावण्याला कांहींसें कठिण जाईल. याकरितां तशा प्रसंगीं त्यानें आरंभीं हलका सूर काढून नंतर या स्थानाला अमुक एक सूर योग्य आहे, असें कानाला समजेपर्यंत त्यानें तो हलके हलके चढवीत जावें.

**जोर.**—जोर किंवा आवाजाची तीव्रता फुफ्फुसांवर अवलंबून असते. ह्मणजे श्वासावर दाब पडला असतां जोर

उत्पन्न होतो. सुराहून जोर भिन्न आहे, हें पूर्वी सांगितलेंच आहे. आपणाला हलक्या सुरामध्यें मोठ्यानें बोलतां येईल, व उंच सुरांत फार हळू बोलतां येईल.

जसा भाव प्रदर्शित करावयाचा असेल, तसा जोर बदलला पाहिजे. तसें करण्यास आपल्याला एखादे वेळीं हलके बोलावें लागेल, व दुसऱ्या प्रसंगीं मोठ्यानें बोलावें लागेल. एखादे वेळीं तर फारच आवेशानें बोलावें लागेल. या कामांत स्वभाव किंवा सृष्टिनियम यांस अनुसरून चाललें पाहिजे. ज्या इमारतीमध्यें वक्ता व्याख्यान देत असेल, तिच्या मानानें त्यानें आपल्या जोरांत फेरबदल केला पाहिजे. इमारतीच्यासंबंधानें जोराची गोष्ट सुरासारखीच आहे. शेरिडॅन यानें असा एक उत्तम नियम घालून दिला आहे, कीं आपलें बोलणें सर्वांना सारखें ऐकूं जावें ह्मणून, वक्त्यानें आपल्यासमोर समाजाच्या शेवटीं दूर जो कोणी मनुष्य बसला असेल, त्याच्याकडे दृष्टी लावावी, आणि त्यास उद्देशून बोलत राहावें. असें केल्यानें सहजगत्या त्याच्या बोलण्याला योग्य सूर आणि जोर येईल. परंतु त्यांतल्यात्यांत वक्त्यानें आपल्या शरीरसामर्थ्याकडेही लक्ष पुरविलें पाहिजे. ह्मणून त्यानें तें काम आपल्या शक्तीबाहेर न जाऊं देण्याची काळजी घ्यावी. प्रत्येक मनुष्यास आपलें बोलणें ऐकूं जावें ह्मणून, जर त्यानें अगदीं नेट धरून खड्या सुरांत बोलण्याचा क्रम सुरू केला, तर लवकरच त्याचा घसा अगदीं बसून जाईल. तेव्हां तसें न होण्याविषयीं वक्त्यानें फार जपलें पाहिजे; आणि जर सर्वांस ऐकूं जाण्याइतकी त्याच्यांत बोलण्याची ताकद

नसेल, तर कांहीं थोड्या मंडळीला तें चांगलें ऐकूं गेलें म्हणजे त्यांतच त्यानें समाधान मानावें. अशी त्यानें संवय ठेविली, तर आपल्या आवाजानें जागा भरून टाकण्याची शक्ति त्याला क्रमाक्रमानें येईल. आपल्या आवाजाचा प्रतिध्वनि आपल्या कानांत आला म्हणजे वक्त्यानें असें समजावें कीं त्या आवाजानें छत अगदीं भरून गेलें आहे. मनुष्य आवेशाच्या भरांत आला म्हणजे तो नेहमींपेक्षां जास्त जोरानें बोलत असतो. परंतु हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, मनोवृत्ती उच्छृंखल झाल्या असतांही वक्त्यानें बोलण्याची मर्यादा ओलांडून जाऊं नये.

वक्त्यानें कोणत्या प्रसंगीं किती जोरानें बोलावें हें खालील कोष्टकांत दाखविलें आहे.

| जोराचें प्रमाण. | प्रसंग. |
|---|---|
| १ सौम्य, सावकाश. | गुह्यगोष्ट, सावधगिरी, इशारा, संशय, दया, प्रीति, दुःख, धास्ती, कोमलत्व, दुःखदर्शकभाव, विनय, लज्जा, विश्रांति, थकवा, ग्लानि. |
| २ कांहींसा उंच. | साधारण भाषण, साधें निरूपण किंवा वर्णन, विनआवेशाचें व्याख्यान. |
| ३ उंच किंवा मोठ्यानें. | निश्चयात्मकता, क्रोध, संताप, द्वेष, उग्रता, थट्टा, आनंद, जयोत्सव, प्रज्वलित मनोवृत्ती. |

ठेपेः—वक्तृत्वांतील ठेपे व व्याकरणांतील विराम हे

परस्परांपासून भिन्न आहेत. वक्तृत्वांत ज्या ठिकाणीं ठेपे असतात, तेथें व्याकरणरीत्या विराम नसतात; व जेथें व्याकरणाचे विराम असतात, तेथें वक्तृत्वाचे ठेपे नसतात. विद्यार्थ्यानें एक छापील पुस्तक घेऊन, त्यांतील कांहीं भाग वाचून पाहिला असतां हें त्यास सहज कळून येईल. त्यांत स्वल्पविराम, अर्धविराम वगैरे चिन्हें त्याच्या दृष्टीस पडून, त्यांविषयीं जपण्याचा त्याचा कल होईल. परंतु दुसऱ्याशीं संभाषण करतांनां जसें तो बोलतो, तसें जर तो वाचील, तर जेथें व्याकरणांतील चिन्हें नाहींत अशा ठिकाणीं त्याचा आवाज विसांवा घेतल्यासारखा होईल, असें त्यास कळून येईल.

चांगलें बोलण्यांत आणि वाचण्यांत पदोपदीं चारपांच शब्दांच्या आड विरामचिन्हें येतील; आणि त्या त्या विरामाच्या ठिकाणीं आवाज थांबला, ह्मणजे उत्तम भाषण झालें असें होईल. योग्य स्थळीं विराम असण्याची अवश्यकता किती आहे, याविषयीं सांगायला नकोच. अयोग्य स्थळीं विसांवा घेतल्यानें अर्थाचा अनर्थ होतो. दुसऱ्याचा लेख वाचतांनां विराम वगैरे घेऊन आपण तो लेख वाचीत असतों.

व्याख्यान देतांनां कधींकधीं बऱ्याच ठिकाणीं अकस्मात् थांबून श्रोत्यांचें मन त्याकडे वेधून घ्यावें लागतें. बोलतांनां असे कांहीं प्रसंग येतात कीं, त्या वेळेस वक्ता स्तब्ध उभा राहिला ह्मणजे त्याच्या तशा कृतीनेंच त्याचा मनोभाव श्रोत्यांना चांगला कळून येतो. कारण त्यास पुढें पुष्कळ बोलावयाचें असून जर तो मधल्यामधेंच क्षणभर

स्तब्ध उभा राहील, तर त्या योगानें श्रोत्यांचीं मनें साशंक होऊन, त्यांच्या मनोवृत्ती अशा कांहीं चमत्कारिक होऊन जातील कीं, त्याचें वर्णनदेखील करतां येणार नाहीं.

**बोलण्याचा वेगः**—वक्त्याचें बोलणें फारच साव-काश चालूं नये. कारण तशानें श्रोत्यांस झोंप लागून जाण्याचा संभव असतो. तसेंच तें फार जलदही नसावें. तो भराभर बोलूं लागला तर ऐकणारांचा एकच घोटाळा होऊन तें त्यांच्या ग्राहकशक्तीपलीकडे जाईल. बोलण्यांत अति-शय घाई केल्यानें वक्त्याच्या मनाची स्थिरता बिघडून त्याला भान राहत नाहीं, आणि त्यामुळें त्याचे उच्चार व स्वरभेद सर्व बिघडून जातात. याकरितां मध्यम गतीनें त्यानें आपलें बोलणें चालूं द्यावें. परंतु त्यांतही एक सावधगिरी घेतली पाहिजे, कीं तीच ती गति शेवटपर्यंत ठेवणें चांगलें नाहीं. हातीं धरलेल्या विषयाच्या मानानें वक्त्यानें आपल्या संभा-षणास शीघ्र किंवा मंद गती द्यावी. जी गोष्ट कशी तरी सांगावयाची, ठेवायची नाहीं असें वक्त्याच्या मनांत असतें, ती श्रोत्यांस सांगतांनां कांहीं वेळ त्यानें आपल्या बोलण्याचा वेग कमी केला पाहिजे; आणि ज्या गोष्टीच्या सत्यतेविषयीं त्याच्या मनाची खात्री असते, जी दुसऱ्यास केव्हां सांगेन अशी त्याच्या मनाची उतावीळ स्थिति झाली असते, ती दुसऱ्याच्या मनांत भरवून देतांनां, किंवा विरुद्ध पक्षाचें खंडन करतांनां, शब्द जास्त वेगानें निघावे. ज्या जा-गेंत वक्ता बोलण्यास उभा राहावयाचा असेल, त्या जागेची स्थिती मनांत आणल्यावांचून त्याचा शब्दोच्चार कशा वेगाचा असावा, याविषयीं बरोबर नियम घालून देतां येत

नाहीं. जर ती जागा प्रतिध्वनि निवण्यासारखी असेल, तर वक्त्याला नेहमींपेक्षां फार विचारानें व स्पष्टपणें बोलावें लागेल.

ज्याचें भाषण अस्खलित व सरास चालतें, अशाच्या तोंडून एका मिनिटांत सुमारें सव्वाशें किंवा एका तासांत सात हजार शब्द उच्चारले जातील. एक तासांत दहा-हजार शब्द बोलणारेही वक्ते आहेत. मनाच्या स्थिती-नुरूप उच्चाराच्या वेगाचें मान खालील कोष्टकांत दिलें आहे.

| वेगाचें मान. | प्रसंग |
|---|---|
| मंद.<br>फार मंद. | गांभीर्य, गौरव, विचार, संशय, दुःख, स्वास्थ्य. |
| मध्यम वेग. | क्रोधरहित भाषण. |
| जलद.<br>फार जलद. | उल्हास, हास्य किंवा थट्टामस्करी, आनंदवृत्ति, उपहास, राग, तिरस्कार, क्रूरता, मनाची आवेशयुक्त चळवळ. |

येथवर आह्मीं वक्त्याच्या वाणीच्या संस्कारासंबंधानें बरेंच सांगितलें. आतां त्याच्या कृतीविषयीं थोडेंसें सांगणें जरूर आहे. योग्य वेळीं योग्य अंगविक्षेपादि कृती केल्यानें वक्त्याच्या भाषणाला विशेष रंग येतो; व भलत्याच वेळीं भलतेच अंगविक्षेप केल्यानें, त्याच्या भाषणाचा रस जातो, आणि मग तें लोकांच्या मनांत ठसावें तसें ठसत नाहीं. आपल्या हावभावादि कृती सभ्यपणाच्या आणि लोकांस पसंत पडतील

अशा असाव्या ह्मणून वक्ते जी विशेष काळजी घेतात, ती घेण्याचें मुळींच कारण नाहीं असें कित्येक स्पष्ट ह्मणतात. कितीएक ती घेऊं नये असें जरी निक्षून सांगत नाहींत, तरी त्यांस ती नापसंतच दिसते. परंतु ज्यांचीं मतें वास्तविक घेण्यासारखीं आहेत, ह्मणजे जे मतें देण्यास योग्य आहेत, अशांचें ह्मणणें वरील मंडळीच्या अगदीं उलट आहे. हा गुण आपल्या अंगीं चांगला यावा ह्मणून वक्त्यानें सतत उद्योग केलाच पाहिजे, असें त्यांचें आग्रहपूर्वक सांगणें आहे. या विषयावर ॲडिसननें आपल्या स्पेक्टेटर नामक प्रसिद्ध ग्रंथांत बरीच टीका केली आहे ती आह्मी साद्यंत खालीं देतों.

तो ह्मणतो कीं ' इतर देशांपेक्षां आमच्या इकडचे वक्ते बोलतांनां फारच कमी अभिनय करतात. त्यांत आमचे धर्मोपदेशक तर निव्वळ दगडासारखे उभे राहतात. ते इकडे तिकडे एक बोट हालवितील तर शपथ. वकिलीच्या धंद्यांतील लोकही असेच आढळतात, त्याचप्रमाणें वादविवादस्थळीं एखाद्या सतत वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणें आमच्या लोकांचा शब्दौघ एकसारखा सुरळीत चालत असतो. आमचा आवाज कधींही ताण घ्यावयाचा नाहीं. ग्रीक व रोमन लोकांचे हाताचे झटके व शरीराची चळवळ त्यांच्यांत दृष्टीस पडायची नाहीं. विषय कसाही बरावाईट असो; प्रसंगीं राष्ट्रीय जीवितसंशयाचा कां असेना? त्यावर आमच्या वक्त्यांचें बोलणें शांत व निश्चल रीतीनें व्हावयाचें. विषय आवडीचा जरी असला, तरी हीच रड. अलंकार किंवा रूपकें करण्यामध्यें मात्र आमची मंडळी पटाईत आहे;

परंतु तीं बोलून दाखवीत असतां अभिनय करण्याच्या नांवानें पूज्य. ज्यांनीं इतालीदेश पाहिला आहे, ते नेहमीं असें ह्मणतांनां मीं ऐकलें आहे कीं, ज्यानें ह्मणून कधीं प्रवास केला नाहीं, अशा इंग्लिश मनुष्याला इताली देशांतील चित्रांतील सौंदर्य मुळींच पसंत पडणार नाहीं; कारण त्या चित्रांच्या आसनाची वगैरे ठेवण त्या देशांतील लोकांच्या आवडीप्रमाणें असते. ज्यानें इतालीमधील धर्मपर व्याख्यान देणारा इसम कधीं पाहिला नाहीं, त्याला सेंटपॉलची तसबीर पाहून तींतील मर्म कांहींएक कळून येणार नाहीं. सेंटपॉल हा हात वर करून अथेन्स येथील मूर्तिपूजक लोकांना अलंकारिक व्याख्यान देत आहे, असा त्या तसबिरीचा झोंक आहे. योग्य अभिनय आणि जोरदार भाषण हीं अतिशय अध्ययन करून कधींही चांगलीं साधणार नाहींत. अभिनय व जोर हीं बोलणाराचा भाव उत्तम प्रकारें दाखवितात. साधारण अकलेच्या श्रोत्यांपुढें वक्ता जें बोलेल, त्यांतील सप्रमाण दाखल्यांपेक्षां त्याच्या अंगविक्षेपादि क्रियांनीं श्रोत्यांचें मन अधिक लवकर वळेल अंगविक्षेपादि क्रियांनीं श्रोते जागृत राहून वक्त्याच्या तोंडचे शब्द लक्षपूर्वक ऐकूं लागतात. शिवाय ऐकणारांस असें वाटत असतें कीं, वक्त्याला मोठी कळकळ आहे; व तो जें आपल्याला जोरानें सांगत आहे, त्याचा त्यावरही तसाच परिणाम झाला आहे. आवेशयुक्त अभिनय आणि स्वर ह्यांच्या योगानें अडाणी लोकांचें अंतःकरण थक्क होऊन, त्यांच्या मनांत वक्त्याविषयीं एक प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न होते. एखाद्या धर्मोपदेशकाचें मनोवेधक व साभिनय भाषण ऐकतांनां दूर अंतरा-

वरील स्त्रियांच्यादेखील नेत्रावाटें अश्रुपात चालून, त्या कंपायमान झाल्याचीं शेंकडों उदाहरणें आपण डोळ्यांनीं पाहतों. इंग्लंडमध्यें नेहमीं असा प्रकार घडतो कीं एखादें परिश्रम घेऊन तयार केलेलें महत्वाचें धर्मपर व्याख्यान कोणी देऊं लागला, ह्मणजे मध्येंच कांहीं मंडळीला झोंप येऊं लागते. तेव्हां मग आवेश उत्पन्न करण्याकरितां त्या वक्त्यानें मोठ्यानें ओरडून व नानाप्रकारचे अंगविक्षेप करून व्याख्यान चालू केलें, ह्मणजे त्यांची ती गुंगी जाऊन त्यांचें मन तें भाषण ऐकण्यांत अगदीं तल्लीन होतें. पहा कीं, ज्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा विषयावरील भाषणांत अंगविक्षेप व जोरदार शब्द असले ह्मणजे तें जर लोकांना चांगलें रुचत आहे, तर आपल्या तोंडून जीं उत्कृष्ट भाषणें निघण्यासारखीं असतात तीं जर खुबीदार अभिनय करून व आवेशानें बोलून दाखविलीं, तर त्यापासून आपल्या इच्छेप्रमाणें कार्य होणार नाहीं काय?'

'एका ल्याटिन वक्त्याला अतिशय हावभाव करून भाषण करण्याची संवय असल्यामुळें त्यानें आपल्या शरीराची अगदीं खराबी करून घेतली असें सांगतात.'

'एका ग्रीक वक्त्याची अंगविक्षेप करण्यांत इतकी ख्याति होती, कीं त्यानें आपल्या वाक्चातुर्यानें आपल्या प्रतिपक्ष्यांपैकीं एकाला जेव्हां अथेन्समधून हद्दपार करण्याची शिक्षा करविली, तेव्हां त्या शिक्षा झालेल्या मनुष्यानें तें भाषण लिहून आपल्या मित्रमंडळीस वाचून दाखविलें. त्यांनीं त्या भाषणाची पुष्कळ वाहवा केली, हें पाहून त्या मनुष्यास बोलल्याशिवाय राहवेना. तो ह्मणाला,

' कांहो, लिहिलेलें भाषण नुसतें वाचल्यानें जर तुमचें मन इतकें वेधून जाऊन तुह्मी आश्चर्यचकित झालेले दिसत आहां, तर त्याच्या तोंडून हा वाक्प्रवाह निघतांनां तुह्मीं पाहिला असता तर तुमची किती गलबल आणि त्रेधा उडून जाती बरें ? '

वरील वक्त्यांच्या भाषणांत जो रंग उडतो ह्मणून सांगितलें, त्या मानानें पाहिलें असतां, आमच्या इकडील बॅरिस्टर बगळ्यासारखी वर मान करून, व अंगांत घातलेल्या लांब झग्याचे पदर हालूं नयेत ह्मणून त्यावर नेहमीं हात फिरवीत, गंभीरपणाचा पोकळ आव घालून बोलत बोलत असतो, तेव्हांचा तो देखावा किती निस्तेज आणि मृतकळा आल्यासारखा दिसत असेल बरें ? याचें खरें कारण हेंच कीं आमच्या वक्त्यांच्या अंगविक्षेपासारखी हास्यास्पद दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं. आपण असें पाहतों कीं, कांहीं मंडळी खिशांत हात घालून बराच वेळ बोलत असतात; शेवटीं त्यांनाच होऊन जेव्हां खिशांत हात ठेवण्याचा कंटाळा येतो, तेव्हां तो खिशांतून बाहेर काढतात. दुसरे कित्येक लहानसा कागदाचा चिठोरा घेऊन त्याकडे लक्ष लावून वोलत असतात. त्यांवर कांहीं एक लिहिलेलें नसतें; पण त्यांना ती खोडच असते. कित्येक वक्ते आपली डोक्यास घालण्याची टोपी हातांत घेऊन ती गरगर फिरवीत असतात. कोणी ती वांकडी करून तिला कोंने देतो. कोणी तिच्या वरील कडेकडे नजर देऊन तोंडानें बोलत असतो. कोणी खालची कडा निरखीत

असतो, व तोंडानें बोलण्याचें काम सुरू असतेंच. असे विचित्र प्रकारचे अंगविक्षेप करून ते बोलत असतात.'

'एखादा वक्ता ब्रिटिश राज्याच्या दुर्दैवाविषयीं बोलत असला, तर एखाद्या बहिऱ्या मनुष्याला असें वाटेल कीं हा नुसता माकडचेष्टा करीत आहे. मला आठवतें कीं मी तरुण असतां, वेस्टमिन्स्टर हॉलमध्यें नेहमीं जात येत असें. तेथें एक वकील बोलायला उभा राहिला कीं त्याच्या हातांत सुतळीचा एक तुकडा असायचाच. तो तुकडा, तो सर्व बोलणें होईपर्यंत घटकेंत हाताच्या अंगठ्याला गुंडाळी, घटकेंत बोटाला गुंडाळी. त्या काळच्या थट्टेखोर मंडळीनें त्या दोरीला 'व्याख्यानतंतू' असें औपरोधिक नांव दिलें होतें. आणि तें खरेंच होतें. कारण ती दोरी हातांत असल्याखेरीज त्याला बोलवयाचें कांहींच सुचत नसे. एकदां असें झालें कीं, त्याच्या कुळांपैकीं एकजण थट्टा करण्यांत मोठा पटाईत होता; पण त्याच्या अंगीं ह्मणण्यासारखें शहाणपण नव्हतें. एक दिवस तो वकील त्या कुळाचा खटला चालवीत असतां, मध्येंच त्या थट्टेखोर कुळानें आपल्या वकिलाच्या हातांतील ती दोरी हळूच चोरून एकीकडे ठेविली. मग काय विचारावें? ती दोरी नाहींशी झाली, तसें त्या स्वारीच्यानें एक अक्षरही बोलवलें नाहीं, आणि त्यायोगानें त्याचा तो कज्जा बुडाला. अर्थात् त्या थट्टेखोर कुळाचें नुकसान झालें.'

वर दिलेला उतारा वाचकांस जरी बराच लांबलचक वाटेल, तरी त्यांत प्रौढी व उपदेश घेण्यासारखा मजकूर जास्त असल्यानें, त्याच्या विस्तारासंबंधानें वाचकांस कुर-

कुर करायला मुळींच जागा नाहीं. तो वाचून वाचकांस उघड कळून येईल कीं, निव्वळ वाक्पांडित्यापेक्षां आत्म्याच्या मनोवृत्ती ज्यायोगानें जास्त उद्दीपित होतील, असा जो अंगविक्षेप तो सुधारणें अत्यंत इष्ट आहे.

ॲडिसननें त्या वकिलाच्या दोरीसंबंधानें जी मजेदार गोष्ट सांगितली तिच्यासारखीच दुसरी एक गोष्ट आहे; ती येथें दिली असतां, बोलण्यांत व त्याचप्रमाणें अंगविक्षेपांत ज्या वाईट खोडी असतील त्या घालविण्याविषयीं वक्त्यानें अगदीं जपलें पाहिजे, हें उघड दिसून येणार आहे. सर फ्रेडरिक फ्लड याची अशी गोष्ट आहे कीं, त्याच्या बोलण्याच्या ओघांत कोणीं एखाद्यानें जर त्याच्या कानीं लागून कांहीं सुचविलें, तर तो तेच शब्द अक्षरशः बेलाशक बोलून जात असे. एका प्रसंगीं तो ऐरिश पार्लमेंटमध्यें वेक्सफर्ड येथील माजिस्ट्रेट लोकांचे गुणानुवाद वर्णन करून, दंगेखोर लोकांचें बंड मोडण्याकरितां या न्यायाधीशांना कांहीं जास्त अधिकार द्यावे ह्मणून फार वेळ व्याख्यान देत असतां, शेवटीं या माजिस्ट्रेट लोकांजवळ, लॉर्ड लेफ्टेनंटची अनुग्रहदर्शक कांहीं खूण असावी असें बोलला, इतक्यांत त्याच्या पाठीमागें बसलेला जॉन इगन नांवाचा एक थट्टेखोर हळूच ह्मणाला कीं, 'आणि त्यांना चाबकाखालीं मारावें.' हे शब्द त्या वक्त्याच्या कानीं पडतांच त्यानें ते जसेच्या तसेच कांहींएक विचार न करितां उच्चारिले. तेव्हां तें विसंगत बोलणें ऐकून श्रोतेमंडळींत जो कांहीं हशा पिकला त्याचें वर्णन देखील करतां येणार नाहीं.

**ठोकळ तत्वें.**—अंगविक्षेपासंबंधानें कांहीं ठोकळ नियम आहेत, त्यांचें येथें निरूपण करितों. साधारण बोलण्याचालण्यांत आपल्या ज्या अंगिक चेष्टा होतात, त्याच वक्तृत्वांतील अंगविक्षेपाचा मूळ पाया होत. तथापि असें कोणीं समजूं नये कीं, यांपेक्षां जास्त विक्षेप व्याख्यानांत करण्याची जरूर नाहीं. मंडळीचा जमाव पाहून, व विषयाचें महत्व मनांत आणून, घरगुती बोलण्याचालण्यांतल्यापेक्षां प्ल्याटफार्मावर ह्मणजे व्याख्यानस्थळीं वक्त्याची वृत्ती जास्त उल्हासयुक्त होत असते. प्लॅटफार्म व रंगभूमी हीं दोन्ही स्थानें फार भिन्न आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. रंगभूमीवर किंवा नाटकांत जें स्वतःस स्वातंत्र्य असतें, तें व्याख्यानस्थळीं नसतें. कारण तेथल्यासारखे प्रकार व्याख्यानांत करणें श्रोत्याच्या मर्जीवर अवलंबून असतें. ह्मणजे त्यांची एक प्रकारची अप्रत्यक्ष परवानगी असावी लागते.

अंगविक्षेप करावयाचे ते, त्यासंबंधानें तोंडांतून शब्द निघावयाच्या अगोदर कांहीं वेळ केले पाहिजेत. एकसमयावच्छेदानें ते करून उपयोग नाहीं, किंवा बोलून गेल्यावर ते प्रदर्शित करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एकजण ह्मणतो कीं, अंगविक्षेप हे भाषणाचे पुरोगामी असावे; ह्मणजे ज्याप्रमाणें राजाची स्वारी चालली असतां भालदारचोपदार पुढें चालून 'राजेसाबकी सवारी आती है' असा घोष करीत असतात, तद्वत् वक्त्याच्या तोंडून निघणारे शब्द त्यांच्या अंगिक चेष्टांनीं प्रथम सूचित झाले पाहिजेत.

अभिनय ओढूनताणून व अविचारीपणानें मुळींच करूं नये. तो अगदीं साधा असून, साहाजिकपणें व्हावा.

लोकांस असें वाटूं नये कीं हा बनावट आहे. अभिनय कसा करावा हें जरी वक्त्यानें अगोदर शिकून घेतलें असेल, तरी ती लुच्चेगिरी अगदीं उघडकीस देऊं येऊं नये. ती झांकून ठेवण्याचें काम फार कठिण आहे. शिकून केलेले हावभाव श्रोत्यांस बिलकुल पसंत पडत नाहींत. त्यामुळें लोक त्या वक्त्याचा कंटाळा करितात, इतकेंच नाहीं, तर तो सप्रमाण जरी कांहीं बोलत असला, तरी त्यावर त्यांचा विश्वास बसत नाहीं.

दुसरा आणखी एक नियम असा आहे कीं, ह्या चेष्टा नेहमीं नेहमीं करीत जाऊं नये. बोलण्यांतील कांहीं भाग असे असतात कीं, त्या ठिकाणीं वक्त्यानें अगदीं हाल-चाल करतां कामा नये. ह्मणून जरूर वाटल्याशिवाय हालचाल करावयाची नाहीं असा त्यानें नियमच करावा. कित्येकांस वाटतें कीं बोलण्यांत नेहमीं कांहीं तरी चळवळ करीत असावें. ह्या लोकांनीं फनेलॉनचा एक नियम ध्या-नांत ठेवावा. तो असा कीं, आपणास स्फुरण आलें ह्मणजे हस्तविक्षेप करावे; अगोदर हस्तविक्षेप करून तद्द्वारा स्फुरण आलें आहे असें दाखविण्याचा आव घातला असतां तें हास्यास्पद होईल.

आपली कृति हास्यास्पद न होऊं देण्याची तुह्मी काळजी बाळगा. या संबंधाचें एक सुप्रसिद्ध उदाहरण बर्कचें आहे. कॉमन्ससभेपुढें एका बिलासंबंधानें बर्क व्याख्यान देत असतां, उपसंहाराचे वेळीं त्यानें एक कट्यार काढून सभेपुढें ठेविली. त्याचप्रमाणें लॉर्ड ब्रौहॅम ह्यानें अध्यक्षांच्या ऊर्णासनाजवळ गुडघे टेंकून रिफॉर्म बिल मंजूर करण्याविषयीं

लॉर्ड लोकांस विनंती केली. तथापि हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं जें कृत्य आपणास प्रशांत वेळीं असमंजसपणाचें वाटत असतें, तेंच जेथें कडाक्याचा वाद चालला आहे, अशा ठिकाणीं केलें, तर त्यापासून खरोखर चांगला परिणाम होणार आहे.

**चेहरा किंवा चर्या.**—आतां आपण वक्त्याच्या शरीराच्या ज्या भागांनीं वक्तृत्वास जास्त रंग येईल त्या प्रत्येक शरीरभागाचें विवेचन करूं. सर्व अवयवांत वक्त्याची चर्या प्रधान आहे. त्याच्या मुखचर्येवरून त्यास कांहीं भासत आहे, व तें अमुक एक आहे, असें स्पष्ट दिसून आलें पाहिजे. त्याच्या प्रत्येक मनोवृत्तीचें प्रतिबिंब मुखश्रीवर उमटलें पाहिजे. असा साधारण नियम आहे कीं, जर त्याच्या चेहऱ्यावरून कांहींएक भास होत नाहीं, तर तो त्याच्या अंतःकरणांतही नाहीं असें पक्कें समजावें. परंतु चर्येंत नेहमीं बदल होऊं देऊं नये; नाहीं तर तो सर्व प्रकार बनावट आहे असा आक्षेप येऊन त्याच्या अडाणीपणाबद्दल व ढोंगीपणाबद्दल लोक त्यास हंसूं लागतील. आपलें निरूपण किंवा कोटिक्रम चांगला वठावा ह्मणून जर कोणी वक्ता मुद्दाम तदनुसार अंगविक्षेप करील; पण तशी संवय ठेवणें सुजाण मनुष्यास अगदीं गैर आहे. जे कोणी ढोंगी असतात त्यांनाच तें साजूं जाणे. इतरांनीं त्यांचें वळण घेऊं नये.

प्रत्येक मनोभाव प्रकट करण्याकरितां चर्या कशी असावी, यासंबंधानें नियम घालून देण्याचें काम फार कठिण आहे. वक्त्याच्या मनांत जर खरोखरच कांहीं-

एका गोष्टीविषयीं वाटलें असेल, तर त्याची चर्या आपोआप तशी होईल; मुद्दाम तिला तसलें रूप द्यावयाला नको. चर्या करावयाला कोणीं शिकवावें लागत नाहीं. विनाकारण कपाळाला आठ्या घालणें, ओंठ चावणें व आपले मनोविकार दुसऱ्याला कळूं नयेत, ह्मणून गैरसमजुतीनें उदारवृत्ती धारण करणें, वगैरे ज्या वाईट खोडी आहेत, त्या न लागण्याविषयीं जपलें ह्मणजे पुरे.

**नेत्र.**—मुखचर्येचा मुख्य भाग ह्मटला ह्मणजे नेत्र हा आहे. तो मन मोहून घेतो, व तिटकाराही प्रदर्शित करतो; क्रोधानें तो अगदीं लाल होऊन जातो, व त्याचप्रमाणें कोमलत्वानें त्याच्या ठिकाणीं स्निग्धता येते. सारांश, प्रत्येक मनोविकारानुरूप त्याची स्थिति बदलत असते. ह्मणून वक्त्यानें हें नेहमीं लक्षात ठेविलें पाहिजे कीं, वक्त्याचें जें खरें सामर्थ्य आहे, तें नेत्रकटाक्षांतच आहे. हें नुसतें ध्यानांत धरावयाचें इतकेंच नाहीं, तर त्या शक्तीचा करवेल तितका उपयोग करून दाखविला पाहिजे. बोरडेलो नांवाचा एक प्रसिद्ध फ्रेंच वक्ता होऊन गेला, त्याला डोळे मिटून बोलण्याची एक वाईट संवय होती. त्याचें व्याख्यान जरी आश्चर्य करण्यासारखें होतें, तरी त्यांत ही वरील गोम असल्यानें, त्यापासून व्हावा तसा परिणाम होत नसे.

**मान.**—मान ताठ असावी, परंतु तिच्यांत ताठरपणा किंवा डौल नसावा. खांदा वर खालीं करूं नये, किंवा आकुंचित करूं नये. तसें करणें वाईट दिसतें; आणखी त्यायोगानें मानही आंखडली जाते, व त्यांत हलकटपणा

आणि छचोरपणा दिसून येतो. विशेषेंकरून खुशामत करते वेळीं किंवा आश्चर्य किंवा भीति प्रदर्शित करतांनां तर असले अभिनय करणें फारच अप्रशस्त दिसतें.

हात.—हस्तविक्षेपाचें काम फार कठिण आहे, आणि यासंबंधानें चांगले चांगले वक्तेदेखील ढोबळ चुका करीत असतात. प्राचीन साहित्यशास्त्रवेत्ते हाताला फार महत्व देत असत. त्यांनीं याचा उपयोग कसा करावा याविषयीं फार परिश्रम करून बारीक माहिती दिली आहे. क्विंटिलियन या विषयासंबंधानें लिहितांनां असें ह्मणतो कीं, हाताच्या चेष्टा इतक्या कांहीं अगणित आहेत कीं, त्या सर्व सांगणें फार कठिण काम आहे. त्यांच्या साहाय्याखेरीज इतर सर्व चेष्टा लंगड्या होणार आहेत. भाषेंत जसे नानाप्रकारचे शब्द असतात, तशा त्याही नानाविध आहेत. बोलण्याच्या कामांत मनुष्यास इतर अवयवांपासून मदत मिळत असते; परंतु हात हे स्वतःच बोलणारे आहेत असें ह्मटलें असतां हरकत दिसत नाहीं. कांहींएक वस्तु आपणास हवी असल्यास, ती पाहिजे आहे असें आपण हातानें नाहींका दाखवीत? त्याचप्रमाणें वचन देणें, हांक मारणें, घालवून देणें, धमकी देणें, विनंती करणें, तिरस्कार किंवा भय प्रदर्शित करणें, वगैरे क्रिया हातानें होतात कीं नाहीं? तसेंच प्रश्न करणें, नाकारणें, आनंद, दुःख, शंका, कबूली, पश्चात्ताप इत्यादि गोष्टींत हातांचा संबंध आहेच. तेच हात क्रोध, मनाई, विनंती, पसंती, नवल किंवा लज्जा प्रदर्शित करीत नाहींत काय? याच हातांकडून स्थलनिर्देश व व्यक्तिनिर्देश होत असल्यामुळें

ते नाम, सर्वनाम व क्रियाविशेषण यांच्याऐवजीं उपयोगी पडतात किंवा नाहीं ? यांचा इतका उपयोग होत आहे कीं, या जगांत जरी हजारों तऱ्हेच्या भाषा आहेत, तरी त्या सर्वांना साधारण अशी ही हस्तचेष्टारूपी किंवा करपल्लवी भाषा सर्वत्र सारखी उपयोगी पडत आहे.

प्राचीन लोकांच्या अभिनयामध्यें हाताच्या बोटांचा देखील फार उपयोग होत असे.

क्विंटिलियन म्हणतो कीं अंगविक्षेपामध्यें दोन्ही हात किंवा दोन्ही पाय एकदम एकाच वेळीं उपयोगांत आणूं नये. हल्लींची रीत यापेक्षां कांहीं भिन्न आहे. परंतु उच्छृंखल मनोवृत्ती, प्रीति, इच्छा, द्वेष, भीति किंवा आश्चर्य इत्यादि गोष्टी खेरीज करून इतर सर्व प्रसंगीं वर सांगितलेल्या क्विंटिलियनच्या नियमाप्रमाणें चालावें हें उचित आहे.

**पाय.**—कमरेच्या खालील भाग आणि पाय यांच्या योग्य चलनवलनावर सडसडीतपणा व सर्व खुबी अवलंबून असते. एका पायावर सर्व शरीराचा भार देऊन दुसरा पाय इकडे तिकडे सहज रीतीनें हालवितां येईल अशा प्रकारें उभें राहावें. वक्त्याच्या एकंदर शारीरचेष्टांसंबंधानें जें वर सांगितलें आहे, तें विशेषतः पायाच्या चलनवलनाला चांगलें लागू पडतें. तथापि नेहमीं नेहमीं पाय मागेंपुढें करणें, किंवा आदळणें उपयोगाचें नाहीं. ठाण किंवा अंगस्थिती बदलली असतां, ज्याच्यावर शरीराचा भार नसेल तोच पाय प्रथम हालवीत जावा.

**अभिनयाचे भाग.**—स्मार्ट म्हणून एक प्रसिद्ध ग्रंथकार व वक्तृत्वाध्यापक होऊन गेला, त्यानें अंगविक्षेपाचे

चार भाग केले आहेत:—१ आवेशद्योतक, २ लाक्षणिक, ३ मनोधर्मसंबंधी, आणि ४ अनुकरणसंबंधी.

पहिल्यासंबंधानें विवेचन करण्याची जरूरी नाहीं. कारण त्याच्या नांवावरून त्याचा अर्थ स्पष्ट निघत आहे.

दुसरा नेहमींच्या प्रचारांतला आहे. या अंगविक्षेपानें वक्ता, जी गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यापुढें आहे, किंवा आहे अशी कल्पनेनें खात्री होत आहे, तिच्याकडे, किंवा ज्या प्रकारानें अमुक एक गोष्ट घडली आहे, किंवा घडण्याचा संभव आहे, त्याकडे ऐकणाराचें चित्त वेधून घेत असतो. लॉर्ड चॅथॅम बोलतां बोलतां, जवळ टांगलेल्या एका तसबिरीकडे बोट करून म्हणाला कीं 'पहा, तो पुरुष आपल्या वंशांत जन्मलेल्या एका कुलांगार मनुष्याकडे कसा क्रोधदृष्टीनें पाहत आहे तो!'

कॅन्यूटनें आपली खुर्ची समुद्र किनाऱ्यावर ठेवण्यास आज्ञा केली, अशा प्रकारचें वर्णन करतांनां एका वक्त्यानें जवळच्याच एका विवक्षित जागेकडे आपली नजर फेंकली, व जणूं काय तेथें प्रत्यक्ष समुद्रच आहे, अशा प्रकारें त्या देखाव्याचें हुबेहुब वर्णन केलें.* कोणा एका गोष्टीचें चित्र श्रोत्यांच्या मनावर वठवावयाचें असेल तर, मूळ ज्या प्रकारचें तें स्वतःच्या मनांत आलें असेल तसें, व तो देखावा जसा कांहीं स्वतःच्या डोळ्यापुढेंच आहे असें भासविण्या-

* ह्यासंबंधानें जास्त खुलासा पाहिजे असल्यास आमच्या प्रिय वाचकांनीं, नाटकांतील एखादें पात्र कांहींएका देखाव्याचें वर्णन करतांनां जो अभिनय करितें, तो ध्यानांत आणिला असतां त्यास सर्व कळून येईल.

साठीं, त्या चित्राच्या निरनिराळ्या भागानुरूप वक्ता जसे अंगविक्षेप करील त्या मानानें त्या चित्राचा ठसा, बरा किंवा वाईट ऐकणाराच्या मनावर उमटणार आहे.

तिसरा प्रकार.—हा जरी स्वाभाविक प्रेरणेचा परिणाम आहे, तरी वक्त्यानें आह्लादकारी भाव प्रदर्शित केला असतां, अंतर्यामीं खरी मनोवृत्ति उत्पन्न करण्यास तें एक प्रकारचें साधन होत असतें; आणि असा हा फायदा आहे, म्हणूनच ज्या ठिकाणीं स्वभावावर (निसर्गावर) गोष्टी अवलंबून असतात, तेथें कृतीचा किंवा कलेचा अंशतः तरी उपयोग होतो असें सांगता येतें.

चौथा प्रकार.—हंसें उत्पन्न होण्यासारखें एखादें वर्णन करण्यांत, किंवा एखादी गोष्ट सांगतांना विशेषेंकरून दुसऱ्याचें अनुकरण करून हुबेहूब हावभाव करून दाखविले असता या चौथ्या प्रकाराचा बराच उपयोग होतो. खऱ्या रीतीचें वर्णन करण्यांत--ह्मणजे थट्टेचा प्रकार ज्यांत बिलकुल येण्यासारखा नाहीं अशा वर्णनात—दुसऱ्याच्या अंगविक्षेपाचें अनुकरण केल्यानें, वास्तविक तो विषय हास्य उत्पन्न होण्यासारखा नसून मुद्दाम त्यांत हास्यरस आणण्याकरितां ते बनावट केले आहेत, असें तेव्हांच साधारणपणं दिसून येतें. परंतु यदाकदाचित् ते अंगविक्षेप करावेसे वाटलेच तर, ते थोडक्यांत केले असतां, तशा वर्णनांत देखील ते शोभतील, नाहीं असें नाहीं.

वर जे अभिनयाचे भेद सांगितले, ते कशा प्रकारच्या भाषणामध्यें उपयोगांत आणावे, हें ठरविणें कांहीं फारसें कठिण नाहीं. धर्मपर व्याख्यानांत नेहमीं कांहीं आवेश-

जनक अभिनयाचाच उपयोग होतो. पार्लमेंट आणि न्यायसभा या ठिकाणीं उद्देश व भावजनक अभिनय वारंवार येण्यासारखे असतात; परंतु अनुकरणसंबंधीं अभिनय फारच क्वचित् दिसून येतात. नाटकाच्या रंगभूमीवर मात्र चारी प्रकारच्या अभिनयांचा उपयोग करतां येतो. तथापि विद्यार्थ्याचा कोणताही का धंदा असेना, त्यानें एक किंवा दोन प्रकारच्याच अभिनयांचें अवलंबन करून स्वस्थ बसूं नये. कारण त्याला आपला बुद्धिप्रभाव जगास प्रकट करण्यासाठीं निरनिराळे विषय हातीं धरावे लागतात. ह्मणून हरएक प्रसंगीं त्यानें आपल्या शब्दानुसार अभिनय केले पाहिजेत, व अभिनयांनुसार तोंडांतून शब्द काढले पाहिजेत. सारांश अभिनय आणि शब्द या दोहोंचा त्यानें चांगला मेळ घातला पाहिजे.

**हॅम्लेटचा नाटककारांस उपदेश.**—'बाबांनों, ज्याप्रमाणें मी तुह्मांला आतां बोलून दाखविलें त्याप्रमाणें तुह्मी नुसती जीभ लवकर लवकर हालवून बोला. परंतु पुष्कळ नाटककारांना गळा फुगवून मोठ्या डौलानें बोलण्याची संवय असते; तसा जर तुह्मी बोलण्याचा डौल घालाल, तर तुह्मांला एखाद्या दवंडीवाल्याची उपमा द्यावी लागेल. पोहतांनां पाणी तोडायला जसे आपण हात करितों, तसे हात बोलतांनां फारसे करूं नका. माफक हात हालविले ह्मणजे ठीक पडतें. कारण तुमच्या मनोवृत्ती कशाही प्रखर झाल्या, तरी त्या वेळेस त्या बेतानें प्रदर्शित करण्याचा गुण अंगीं असला, ह्मणजे सर्व प्रकार सुरळीत चालेल. ज्यांना खेळांतील कांहींएक मर्म कळण्यासारखें

नसतें, व जे केवळ नेत्रसुखजनक कोरड्या धामधुमीचे शोकी असतात, अशा अडाणी प्रेक्षकांस प्रिय असें पोकळ हावभावाचें भाषण करणाऱ्या ढोंगी मनुष्याचा मला खरोखर तिटकारा आणि राग येतो. असे जे कोणी असतील त्यांना बेलाशक चावकाखालीं झोडावें. ह्मणून बाबांनो, तुह्मी तसें करूं नका, असा माझा तुह्मांस उपदेश आहे.'

'तथापि अगदींच मिळमिळीत भाषण तुह्मी करूं नका. कांहीं तारतम्य खर्चीत जा. अभिनयास अनुसरून तोंडांतून शब्द काढा, व शब्दास अनुरूप असे अभिनय अगोदर करीत जा. विशेषेंकरून स्वाभाविक जी विनयशीलता ती ओलांडून जाऊं नका. कारण तसें जर कराल, तर त्यापासून तुमचा हेतु मुळींच साध्य होणार नाहीं. विनयातिरेक केल्यानें, किंवा तो सोडल्यानें, अडाणी मंडळीला हंसं येईल खरें; परंतु जे कोणी सुज्ञ व मर्मज्ञ आहेत, त्यांना तें खचित गोड लागणार नाहीं. एका शहाण्या मनुष्यानें केलेली निंदा ही हजार अडाणी प्रेक्षकांनीं केलेल्या स्तुतीपेक्षां जास्त महत्वाची आहे, असें तुम्ही पक्कें समजा.'

मनमोहक अशी जी वक्तृत्वकला तीमध्यें निष्णात असलेल्या लोकांच्या अंगचे खरे गुण पुढील पिढ्यांस कळून येण्याचा मार्ग उपलब्ध नाहीं, ही खरोखर मोठी खेदाची गोष्ट आहे. एखाद्या ग्रंथकाराचें बुद्धिचातुर्य त्याच्या ग्रंथांतून दिसून येतें; चितार्‍याचें त्यानें काढलेल्या चित्रावरून कळून येतें; तसेंच संगीतशास्त्रप्रणेत्याचें त्याच्या तद्विषयक

ग्रंथावरून समजण्यास मार्ग आहे. परंतु वक्त्याचें तसें नाहीं. जरी त्याच्या तोंडचे शब्द लिहून ठेवले असले, तरी त्याची व्याख्यान देण्याची शैली, त्याचा आवाज, त्याचा सूर, त्याची मुद्रा अभिनय, इत्यादि गोष्टींचें परिज्ञान भावी पिढ्यांस होण्यास कांहींएक मार्ग राहत नाहीं. त्याच्या सर्व कलेचें सार जी त्याची कृति (अंगविक्षेप) ती त्याच्या बरोबरच लयास जाते, व याच कारणामुळें डेमॉस्थेनीज व सिसेरो, आणि इतर वक्तृत्वकलाभिज्ञ लोक यांची परस्पर तुलना करण्यास मार्ग नाहीं.

चांगल्या मंडळीचा सहवास ठेवल्यानें मनुष्याची कृति सुधारत जाते. चांगली मंडळी ह्मटली ह्मणजे, जे कोणी रसिक असतील, व ज्यांची चालचलणूक रीतभात चांगली असेल, असेच लोक होत.

**पोषाख.**—आपल्या शरीरास शोभा आणणाऱ्या ज्या ज्या गोष्टी आहेत, त्यांचा प्रस्तुत विषयाशीं निकट संबंध आहे. त्या गोष्टींमध्यें पोषाख ही एक मोठी गोष्ट आहे. ह्मणून वक्त्यानें नीटनेटका पेहराव करीत जावें. यासंबंधानें सर्वांस माहीत असणारा असा एक उत्तम ठोकळ नियम आहे, तो असा कीं जें तुह्मी अंगावर घालाल त्याच्याकडेच लोक पाहत राहतील असें तें नसावें.

**व्याख्यानाचा उद्देश.**—एकंदरींत व्याख्यान देण्याच्या पद्धतीसंबंधानें इतका वेळ जें निरूपण केलें, त्याचा उपयोग लोकांच्या मनांत खरें भरवून देणें हा जो व्याख्यानाचा मुख्य हेतु, तो साधण्याकडे केला पाहिजे. जर

वक्त्याला यश मिळविण्याची इच्छा असेल, तर तें त्यास त्याच्या प्रतिपाद्य विषयांतच सांपडणार आहे. त्याचें लक्ष त्या विषयांत इतकें गढून गेलें पाहिजे, कीं भाषण करतांना बोलण्याची खुबीदार शैली, स्पष्ट उच्चार, अंगविक्षेप इत्यादि गोष्टींकडे त्याचें लक्ष लागून, त्या सहजगत्या झाल्या पाहिजेत. यांतच त्याची खरी कळकळ श्रोत्यांना दिसून येणार आहे. व ती त्यांना दिसून आली, ह्मणजे ते त्यावर भरंवसा ठेवून, त्याच्या मतांचा स्वीकार करतील. अर्थात् श्रोत्यांनीं वक्त्याचीं मतें अंगीकारिलीं ह्मणजे वक्त्यानें मिळविली, व त्याचा भाषण करण्याचा हेतु तरी तोच असतो. असें झालें ह्मणजे मग, मासिडोन देशाचा विजयी राजा फिलिप याजवर उठावणी करण्याकरितां, डेमॉस्थेनीज यानें अथेन्स येथील लोकांना जेव्हां उत्तेजन दिलें तेव्हांची त्याची जी स्थिति झाली, तद्वत् त्या वक्त्याची स्थिति होऊन जाईल. त्या समयीं डेमॉस्थेनीजचें भाषण संपतांच 'केवढा हा विद्वान् वक्ता' वगैरे बोलून त्याच्या वक्तृत्वाविषयीं नवल करीत न बसतां, सर्व श्रोतेमंडळी एकदम मोठ्यानें ओरडून ह्मणाली, 'उठा, पाहतां काय? चला, फिलिप राजावर चाल करून जाऊं या.' जेव्हां व्याख्यानविषय श्रोत्यांच्या मनांत इतका उत्तम रीतीनें बिंबून जातो, कीं त्यामुळें त्यांना भाषणाच्या रीतिभाती किंवा इतर खुब्या ह्यांकडे त्या वेळेस मुळींच लक्ष पुरवावेंसें वाटत नाहीं, तेव्हांच त्या भाषणामध्यें वक्तृत्वगुण पूर्ण ओतला गेला आहे, असें खरोखर ह्मणतां येईल. तथापि सिसेरोनें ब्रूटसला जीं पत्रें लिहिलीं त्यांपैकीं एकांत त्यानें असें ह्मटलें

आहे कीं 'ज्या वक्तृत्वांत श्रोत्यांना आश्चर्यानें थक्क करून टाकण्याचा गुण नसतो, तें वक्तृत्वच नव्हे असें मी समजतों, माझ्या मतें ती निरर्थक बडबड होय.' ॲरिस्टॉटलचेंही असें मत आहे कीं श्रोत्यांना आश्चर्यभरित करणें हा एक वक्त्याचा मुख्य हेतु असला पाहिजे.

# भाग ९ वा.

# वक्तृत्वाची तालीम.

## वादविवाद करणाऱ्या सभा.

क्यानें तयार होऊन जगापुढें येण्याला आह्मी येथपर्यंत जीं उत्तम उत्तम साधनें सांगितलीं, त्यांसारखेंच, वादविवाद करणाऱ्या मंडळींत जाणेंयेणें ठेवणें, हें एक उत्तम साधन आहे. त्या मंडळींत प्रवेश केल्यानें अस्खलित बोलावयास येतें; आणि आपल्या अंगीं बोलण्याचें व मन आकर्षण करून घेण्याचें कितपत सामर्थ्य आहे, हें कळून येतें; इतकेंच नाहीं, तर एखाद्या प्रश्नाला अनुकूल, प्रतिकूल गोष्टी शोधून काढितां येतात आणि विचार करण्याची संवय लागते. अशा संवयीनें पुष्कळ वक्ते नांवलौकिकास चढल्याचीं उदाहरणें आहेत.

यांत यश येण्यास कोणती तरी एक नेहमींची संवय ठेविली पाहिजे, व कसाही प्रसंग येवो, त्या क्रमांत अंतर पडूं देतां कामा नये. फॉक्स इतक्या प्रख्यातीस आला, तो कशानें? आपल्या दृढ निश्चयानेंच. असें सांगतात कीं तो पार्लमेंटांत प्रथम आला, तेव्हांपासून त्यानें निश्चयच केला कीं कसाही प्रसंग असो, कोणी वेडेंवांकडें ह्मणोत कीं चांगलें ह्मणोत, दररोज रात्रीं एकदां तरी बोलावयाचें.

तो एकदां ह्मणाला कीं, पार्लमेंटांत शिरल्यास मला पस्तीस वर्षें झालीं, दररोज रात्रीं भाषण करण्याचा माझा क्रम अव्याहत चालू आहे. नाहीं ह्मणायला एकच रात्र तशी सांपडेल. त्या दिवशीं मात्र खाडा पडला; पण त्याबद्दल मला अजून देखील वाईट वाटत आहे.'

सर टॉमस वुइल्सन आपल्या एका ग्रंथांत असें ह्मणतो कीं 'वकील जें इतकें चांगलें बोलतात, तें कशानें? त्यांना संवय असते ह्मणून.पाद्री लोक सयुक्तिक व समर्पक भाषण करतात, तें कां त्यांना सहजगत्या येतें? नाहीं. संवयीनेंच. वायकाही संवयीनें लवकर लवकर बोलूं शकतात, हें मी खात्रीनें सांगतों. म्हणून कोणत्याही धंद्यात सतत उद्योग करण्याची संवय आणि बुद्धि असली, ह्मणजे या दोन गोष्टींनीं पुरुष त्या त्या धंद्यांत निष्णात होतो.

साधारण वादविवाद करणाऱ्या मंडळीमध्यें कोणत्या विषयावर वाटाघाट करावी, यासंबंधानें विचार करतांनां प्रथम हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं अशा ठिकाणीं केवळ ज्ञानप्राप्ति व्हावी असा आपला उद्देश नसतो. तर बोलण्याची चांगली संवय लागावी हाच कायतो प्रधान हेतु असतो. तथापि ते विषय तरी पुष्कळ लोकांच्या माहितींतलेच असले पाहिजेत. ज्यांच्याकरितां अगोदर परिश्रम घेऊन तयारी करावी लागेल, असे विषय वर्ज करावे. पाठशाळेंत विद्यार्थ्यांची जी छोटेखानी सभा असते, तींत चालण्यासारखे विषय ह्मटले ह्मणजे त्यांच्या अभ्यासाला जे लागून असावेत. कोठेंही, क्षुद्र, तसेच बुद्धीच्या आटोक्यांत नसणारे विषय हातीं धरूं नयेत. यासंबंधानें डॉक्टर

ब्लेअरनें तीन नियम घालून दिले आहेत. पहिला:—ज्या विषयाची आपणास मुळींच किंवा पूर्ण माहिती नाहीं असे विषय बोलायला घेऊं नये. परंतु ज्या विषयासंबंधानें चांगली माहिती मिळवून अगोदर विचार केलेला असेल, तो घेण्यास हरकत नाहीं दुसरा:—बोलायला लागलें ह्मणजे निव्वळ वाक्पांडित्यावर भर न देतां, भाषण जेणेंकरून चांगलें विचारयुक्त आणि मनमोहक होईल, अशाविषयीं त्यानें काळजी घेतली पाहिजे. तिसरा:—दुसऱ्या नियमांत सांगितलेला हेतु साध्य होण्यास जो पक्ष त्याच्या दृष्टीनें न्यायाचा व खरा ठरेल तोच त्यानें पत्करीत जावें; आणि अशा मार्गानें तो चालला ह्मणजे त्याची भाषणशैली प्रौढ, शुद्ध आणि मनमोहक अशी बनेल.

**साहित्यशास्त्रावरील ग्रंथांचें अध्ययन.**—प्राचीन व अर्वाचीन ग्रंथकारांनीं वक्तृत्वविषयावर जे चांगले चांगले ग्रंथ करून ठेविले असतील, ते वाचले असतां विद्यार्थ्यास बराच फायदा होणार आहे. तथापि त्यानें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं व्यावहारिक ज्ञानापासून त्याला जितका फायदा होईल, तितका पुस्तकी ह्मणजे पोपटी विद्येपासून व्हावयाचा नाहीं. एखाद्याला नुसतें साहित्यशास्त्र चांगलें अवगत असलें, तथापि तेवढ्यावरून त्याला चांगलें बोलतां येईल असें नाहीं. ज्याचा व्याख्यान देण्याचा धंदा असेल त्यानें, किंवा ज्याला आपल्याला उत्तम प्रकारचें वक्तृत्व करतां यावें अशी इच्छा असेल, त्यानें प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथांचें ज्ञान अवश्य संपादन केलें पाहिजे.

वक्तृत्वसंबंधी सिसेरोचे ग्रंथ पहा, असें सांगायला

नकोच आहे. कारण असल्या जाड्या विद्वान वक्त्याचे वक्तृत्वविषयावरील विचार लक्ष लावून वाचण्यासारखे असलेच पाहिजेत. आतां त्याच्या ग्रंथांत कांहीं गोष्टी टाकाऊ असतील; तरी पण तो ग्रंथ अवलोकन केल्यानें पुष्कळ उपयुक्त माहिती मिळणार आहे. त्यांत सिसेरोचे स्वतःचे वक्तृत्वसंबंधी जे विचार आहेत, ते समजल्यापासून ह्मणजे कांहीं लहानसा फायदा आहे असें नाहीं. याच्याहीपेक्षां क्विंटिलियनचे ग्रंथ फारच उत्तम आहेत.

आतां आपण अर्वाचीन कालासंबंधानें विचार करूं. पूर्वीच्या मानानें पाहिलें तर हल्लीं फारच थोडे ग्रंथकार दिसून येतात. याचें वास्तविक कारण काय असें पाहिलें, तर हेंच दिसून येतें कीं पूर्वीप्रमाणें हल्लीं वक्तृत्वाचा अभ्यास फारसा कोणी करीत नाहीं. हल्लीं त्याचें महत्व पूर्वीपेक्षां फार कमी झालें आहे. वक्तृत्वगुणाचें लोकांवर पूर्वीं जसें वजन पडत असे, तसें हल्लीं पडत नाहीं. प्रस्तुत जे इंग्लिश आणि फ्रेंच ग्रंथकार आहेत, त्यांत कँब्रेच्या बिशपानें वक्तृत्वावर जो ग्रंथ लिहिला आहे, तो फारच सुरेख आणि बोधपर आहे. आह्मीं मागें कित्येक ठिकाणीं त्याच्या ग्रंथांतील उतारे दिलेच आहेत.

**चांगल्या वक्त्यांचीं भाषणें ऐकणें:**—वक्तृत्वांत सुधारणा करण्याला जे कोणी नांवाजलेले वक्ते असतील त्यांचें भाषण ऐकणें हा एक मार्ग आहे. पक्ष्यांचीं पिलें मोठमोठे पक्षी कसे उडतात तें पाहून प्रथम उडावयाला शिकतात, तसें होतकरू विद्यार्थ्यानें चांगल्या चांगल्या वक्त्यांचें भाषण ऐकून तद्वत् स्वतः वर्तन ठेवण्यास शिकलें

पाहिजे. मुख्यत्वेंकरून वक्त्यांपासूनच वक्ते तयार होतात; आणि त्या कलेंत पारंगत असलेल्या वक्त्याचें व्याख्यान ऐकावयास सांपडलें ह्मणजे आपलें भाग्यच समजलें पाहिजे. पुस्तकापेक्षां अशा वक्त्याची थोरवी जास्त आहे. कारण त्यापासून आपल्याला ताजें व ढळढळीत उदाहरण मिळत असतें. परंतु आपण नमुन्याकरितां जरी त्या वक्त्याची भाषणपद्धती स्वीकारिली, तरी तिचा सर्वांशीं कित्ता गिरवूं नये. जरी ती पूर्णत्वास आलेली असली, तरी तसें करणें दोषार्ह आहे. कारण त्या योगानें आपल्या अंगची बुद्धि वाढविण्याचा मार्ग राहत नाहीं. शिवाय सर्वज्ञ असा अद्याप कोणीही झाला नाहीं. प्रत्येकाचे ठिकाणीं कांहींना कांहीं तरी व्यंग असतेंच. ह्मणून विद्यार्थ्यानें अशा प्रसंगीं सार ह्मणून जेवढें असेल तेवढें घेऊन बाकीचें टाकून द्यावें.

सर्वोत्कृष्ट ज्या कांहीं गोष्टी आपल्या ऐकिवांत येतात, त्यांचें अनुकरण करण्याकडे आपलें नेहमीं लक्ष लागलें पाहिजे. कारण हें अगदीं खचित आहे कीं, कलेचा बहुतेक भाग अनुकरणानें येण्यासारखा असतो. नवीन कल्पना लढविणें या गोष्टीस विशेष महत्व आणि मान दिला पाहिजे, हें खरें आहे. परंतु पूर्वी काढिलेल्या कल्पनांचा जर चांगला अनुभव आला आहे, तर त्यांचेंदेखील अनुकरण करणें गैरफायद्याचें होणार नाहीं.

कित्येक लोक इतके आळशी असतात कीं दुसऱ्यानें ज्या कल्पना काढल्या असतील त्याच घेऊन ते बसतात; नवीन कल्पना बसविण्याची ते मुळींच खटपट करीत नाहींत.

आपण नुसतें अनुकरण करतों तें हुबेहुब वठलें ह्मणजे त्यांतच समाधान मानून बसणें क्षुद्रपणाचें काम आहे. पूर्वींची मंडळी स्वतः जास्त कांहींएक न करितां केवळ दुसऱ्याचें अनुकरण करूनच जर स्वस्थ बसती, तर कसें झालें असतें ? तेव्हां आपण जो गुरू करतों त्यापेक्षां कांहीं जास्त गुण आपल्या अंगीं येण्याची आपण नेहमीं खटपट केली पाहिजे.

**समाजापुढें वाचणें.**—कोणताही एखादा ग्रंथ किंवा निबंध लोकांपुढें वाचूं लागलों ह्मणजे हलके हलके व्याख्यान देण्याची संवय लागते. आपली शक्ति किती आहे हें वाचकानें अगोदर पाहिलें पाहिजे. आपणास जें योग्य व गोड वाटत नसेल तें त्यानें वाचण्याकरितां मुळींच हातीं धरूं नये. वीररसप्रधान ग्रंथ जर त्यास उत्कृष्ट वाटत असेल व वाचतां येत असेल, तर एखाद्या जाणत्या मित्राचा या कामीं विचार घेऊन, त्यानें तो समाजास वाचून दाखवावा; किंवा शोकरस प्रधान आवडत असेल, तर तोही त्या प्रमाणेंच वाचावा. श्रोत्यांची अभिरुचि कशी काय आहे हेंही त्यानें पाहावें. कारण त्यांना सर्वच आवडत असतें असें नाहीं. ज्यांच्यायोगानें मनोभाव व विकार उत्पन्न होतील, किंवा एखाद्या गोष्टीचें चित्र वठवितां येईल, किंवा मनोवृत्ती प्रदीप्त करतां येईल, असेच विषय वाचण्यालायक असतात. जें पुस्तक वाचतांनां निरनिराळे सूर काढावे लागतील, व अभिनय करावा लागेल तेंच पुस्तक वाचण्यायोग्य समजावें. त्यांत संवादरूपानें जर गोष्टी लिहिल्या असतील, तर त्या वाचून दाखविल्यानें श्रोत्यांचें मन जास्त

वेधलें जाणार आहे. तिसरी एक सूचना करावयाची आहे, ती ही कीं, समाजापुढें जें कांहीं वाचावयाचें असेल, त्याची अगोदर पुष्कळदां उजळणी करावी, आणि नंतर तें समाजापुढें वाचण्यास उभें राहवें. कॉक्ससाहेब ह्मणतो कीं, एका प्रसिद्धीस आलेल्या प्रपाठकाची अशी वहिवाट असे कीं, जे लेख नेहमीं त्याच्याकडून वाचले जाऊन परिपाठांत पडले असतील, ते देखील तो ज्या दिवशीं रात्रीं ते समाजापुढें वाचावयाचे, त्या दिवशीं दिवसा वाचून ठेविल्याखेरीज कधींही राहत नसे; आणि तें वाचून ठेवितांनां, कोठें जोर द्यावयाचा, प्रत्येक विचाराचें श्रोत्यांच्या मनावर कसें चित्र वठवावयाचें, वगैरे गोष्टींकडे तो चांगलें लक्ष पुरवीत असे.

तुह्मी जें वाचाल तें जोरानें, गंभीरपणानें व ऐकणारांस गोड लागेल असें वाचा. गद्याप्रमाणें पद्य कधींही वाचूं नये. कारण पद्य ह्मणजे एक प्रकारचें गाणेंच आहे. तथापि कविता निव्वळ गाण्याप्रमाणें गाऊं नये, व तिच्या अंगीं जें मार्दव नाहीं तें आणून ती मिळमिळीत करूं नये; एकाला अशीच हेल काढून वाचण्याची संवय होती. तेव्हां तो प्रकार पाहून केअस सीझर त्याला, ह्मणाला 'हें तूं गातोस किंवा वाचतोस, कांहींच कळत नाहीं. गातोस ह्मणावें तर तें धड गात नाहींस; बरें वाचतोस ह्मणावें, तर गाण्यासारखा सूर निघत आहे; तेव्हां हें आहे तरी काय?'

**सिद्धांत.**—जगमान्य वक्ता होणें हें केवळ प्रारब्धाधीन आहे; ह्मणजे जन्मतःच वक्तृत्वगुण वक्त्याच्या बरोबर आला पाहिजे. तथापि या कलेचा काळजीपूर्वक

अभ्यास केल्यास, पुष्कळ किरकोळ प्रसंगीं त्यापासून मनुष्याचा मांत्रलौकिक होणार आहे. डा० ब्लेअरनें एका पुस्तकांत आपल्या वाचकांस असाच बोध केला आहे. तो ह्मणतो कीं, ‘चांगल्या प्रसिद्धीस आलेल्या वक्त्यांची संख्या जितकी कमी आहे, तितकी कवींची नाहीं. प्रसिद्ध कवि होण्यापेक्षां वक्ता होण्यांत एक विशेष फायदा आहे, तो असाः—पूर्ण कवित्व अंगीं असल्याखेरीज कवीला लोकाश्रय मुळींच मिळत नाहीं. तसें वक्त्याचें नाहीं. साधारण गुण जरी अंगीं असला, तरी त्याला थोडाबहुत आश्रय मिळतो.

वक्तृत्वाच्या व्याख्या ऐकूनच तरुण मनुष्याचें मन त्याकडे वेधून जाणार आहे. अटिफन नांवाच्या एका वक्त्यानें अथेन्स शहरीं अशी जाहिरात लाविली होती कीं, ‘सर्व प्रकारचे मानसिक रोग मी आपल्या शब्दांनीं बरे करीन.’ मनुष्य कितीही उच्चपदास चढलेला असो, या ठिकाणाहून त्यास उतरविण्यास दोनतीन शब्दप्रहार पुरे आहेत. कसेंही अरिष्ट आलेलें असो. त्या प्रसंगीं समर्पक शब्दांची योजना केली असतां, तें टळण्यासारखें असतें. सॉक्रेटीस असें ह्मणत असे कीं, ‘माझ्या अंगीं अशी कांहीं शक्ति (वक्तृत्व) आहे कीं तिच्या साह्यानें मी ल्हानाचें मोठें व मोठ्याचें ल्हान करून दाखवितों.’ ही व्याख्या चटकदार आहे खरी, परंतु ती एकदेशीय आहे. स्पार्टन लोकांचे वेळीं ह्या कलेला तीक्ष्ण तरवारीचें स्वरूप आलें होतें. सॉक्रटीस ह्मणतो कीं, कनिष्ठ वर्गांतील एखाद्या स्पार्टन मनुष्याशीं कोणी संभाषण करूं लागला, तर त्याच्या त्या बोलण्यावरून त्यास असें वाटेल कीं, हा

मनुष्य अगदीं गचाळ व कवडीमोल आहे; परंतु प्रसंग आला कीं, तोच मनुष्य एकदां बोलायला उभा राहिला असतां, त्याच्या मुखांतून वाग्बाण भराभर सुटून मंडळीला तो अगदीं गर्क करून टाकी; व त्याची निंदा करणारा वर सांगितलेला इसम त्यापुढें अगदीं तुच्छ वाटूं लागे. वक्तृत्व ही मनुष्याच्या मनावर पगडा बसविणारी एक कला आहे, असें प्लेटो ह्मणत असे. [एकपरी पर्वत जागचा हालूं शकेल, परंतु मानवी स्वभाव कधींही बदलावयाचा नाहीं, अशी एक ह्मण आहे.] परंतु वक्तृत्वाच्या योगानें दोन तासांच्या आंत, प्रसंगविशेषीं अर्ध्या तासांत देखील, वर्षोगणती कायम राहिलेले मनोग्रह व हाडीं खिळलेल्या खोडी फिरवितां येणार नाहींत काय?

जिच्यायोगानें सर्वांच्या अंतःकरणांत आपल्याबद्दल प्रेमभाव उत्पन्न होईल, अशी जी ही वक्तृत्वशक्ति तिचा तरी आपल्या अंगीं थोडा गंध असावा अशी तरुण मंडळीला देखील उत्कट इच्छा असते. वक्त्याला असें वाटत असतें कीं, आपण या सर्व मंडळींचे चालक आहों, व त्यांच्या सर्व नाड्या आपल्या स्वाधीन आहेत. वक्त्याची इच्छा किंवा वक्तृत्वाचा हेतु एखादी मनोरंजक गोष्ट सांगून आपली चतुराई दाखविण्याचा, किंवा नीट रीतीनें पुरावा जुळवावयाचा, अथवा न्यायशास्त्ररीत्या कोटिक्रम करण्याचा, किंवा मंडळीच्या विरुद्ध मनोग्रहास अनुलक्षून बोलण्याचा नसतो. तर श्रोते पूर्णपणें आपल्या कवज्यांत येऊन, त्यांच्यावर आपला चांगला पगडा बसावा अशा प्रकारचा असतो. पियानो नामक वाद्य वाजविणाराप्रमाणें ज्याला

समाजवाद्याध्या सर्व किल्ल्या आपल्या ताब्यांत ठेवतां येऊन समयविशेषीं त्या समाजाचा पित्तक्षोभ झाला असतां तो शमवितां येईल, व वाटेल त्या वेळेस त्याला हांसविण्याचें किंवा रडविण्याचें ज्याचे अंगीं सामर्थ्य असेल, त्यासच आम्ही कुशल वक्ता समजूं. त्याला एकदां समाजापुढें उभा राहूं द्या, मग तो समाज अडाणी असो, अगर विद्वान् असो, संतुष्ट असो, असंतुष्ट असो, दुर्मुखलेला असो, किंवा निर्दय असो, त्यांचीं मतें ठाऊक असोत, कीं नसोत, त्या वक्त्याच्या मनांत आलें कीं, तो त्या मंडळीला लागलीच हर्षभरित करून सोडील, आणि मंडळीही तो सांगेल त्याप्रमाणें करण्यास तयार होईल.

एक प्राचीन ग्रंथकार ह्मणतो कीं ' वक्तृत्वगुण चांगला अंगीं वास करण्याला पुष्कळ वाचन झालें पाहिजे; व तो चांगला साध्य होण्यास कांहींतरी कला पाहिजे. ती कला येण्यास अभ्यास केला पाहिजे. संवय आणि अनुकरण करावयाचें तें तरी एवढ्याचसाठीं. सर्व आयुष्यभर त्याच्या पाठीस लागलें पाहिजे. बोलण्यामध्यें एका वक्त्याची दुसऱ्यावर सरशी होते, किंवा एकाची शैली दुसऱ्यापेक्षां जास्त चांगली असते, याला तरी वरील गोष्टच कारण आहे.

विद्यार्थ्यानें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं प्रत्येक मनुष्याला दोन प्रकारचें शिक्षण मिळत असतें. एक परदत्त व दुसरें स्वसंपादित. या दोहोंत स्वसंपादिताचें जास्त महत्व आहे. खरोखरच मनुष्यानें कोणतीही गोष्ट स्वतःच्या मेहनतीनें प्राप्त करून घेतली असतां, तें त्यास भूषणावह आहे, व यांतच वक्तृत्वाचें खरें व उत्तम पोषक द्रव्य

आहे. आपण स्वतः होऊन जें शिकतों, त्यापासून आपल्या मनाला जसें पोषक द्रव्य मिळतें, तसें दुसऱ्याच्या साहाय्यानें शिकून मिळणार नाहीं.

वक्तृत्वकलेसंबंधानें इतकें सांगून आम्ही पुरे करतों. यासंबंधानें सांगावें तितकें थोडेंच आहे. हा विषय अमर्याद असून, त्यांत नाना प्रकार असल्यामुळें पुष्कळ दिवसपर्यंत जरी सांगूं लागलों, तरी प्रत्येक वेळेस नवीन कांहीं तरी तऱ्हा निघणार आहेतच. याविषयीं सांगतां येण्यासारखें जें आहे तेंदेखील सर्व सांगूं ह्मटलें तर लवकर संपावयाचें नाहीं.



# भाग १० वा.

## प्राचीन व अर्वाचीन वक्तृत्व.

वक्तृत्वाची उत्पत्ति शोधून काढण्याला आपणास फार लांब जायला नको. फार प्राचीन काळीं वक्तृत्व ह्मणून कांहीं एक प्रकार होता; पण तो काव्याच्या जवळ जवळ जात असे. त्यामुळें त्याला वक्तृत्व हें नांव शोभत नाहीं. त्या वेळची भाषा अलंकारिक व जोरदार होती असें मानण्यास पुष्कळ आधार आहेत. याचें कारण त्या वेळेस शब्द संग्रह फार थोडा असे. एखाद्या विद्याहीन मनुष्याच्या मनोवृत्ती उच्छृंखल झाल्या, किंवा कांहीं आश्चर्य वाटण्यासारख्या गोष्टी त्याच्या नजरेसमोर आल्या, ह्मणजे त्याच्या भाषणाला जें एक प्रकारचें स्वरूप येत असतें, तद्वत् पूर्वीच्या भाषणपद्धतीचा प्रकार होता. तशा स्थितीमध्यें मनाचा उल्हास आणि आवेश हे गुण प्रधान असत. आणि हे दोन्ही काव्याचे जनक आहेत. त्या वेळीं मनुष्यांचें परस्परांत दळणवळण फारच थोडें होतें. वळी तो कान पिळी या न्यायानें तंट्याचा मुख्यत्वेंकरून निकाल होत असे. ह्मणूनच कार्यकारण दाखवून वादविवाद करण्याच्या व मन वळविण्याच्या ज्या वक्तृत्वाच्या कला आहेत, त्यांचा त्यांत मुळींच प्रवेश झाला नाहीं.

अशी स्थिति बरींच वर्षेंपर्यंत चालली. शेवटीं ग्रीस देशामध्यें जेव्हां प्रजासत्तात्मक राज्य झालें, तेव्हांपासून

वक्तृत्व ह्मणून जी मन वळविण्याची कला आहे, तिचा प्रादुर्भाव होऊन, पुढें ती त्या लोकांनीं इतक्या पूर्णत्वास आणून सोडली कीं, तशी पूर्वीं तर न्हतीच न्हती, परंतु अद्यापपर्यंत देखील तिचा मासला कोठें आढळून येत नाहीं. तेव्हां ज्याअर्थीं या ग्रीक लोकांच्या वक्तृत्वानें तत्कलाभिज्ञ लोकांना आश्चर्यचकित करून सोडलें आहे, त्याअर्थीं त्या काळासंबंधानें आपण थोडासा विचार करूं.

पूर्वीं ग्रीस देशांत पुष्कळ लहान लहान स्वतंत्र संस्थानें होतीं. प्रथम प्रत्येक संस्थानाला निराळा राजा असे. त्याची सत्ता अगदीं अबाधित असे. पुढें कांहीं काळानें प्रत्येक संस्थानांतील प्रजेनें आपआपल्या राजास पदच्युत करून सामान्यजनसत्ताक राज्य स्थापन केलें. त्यांना स्वातंत्र्याची फार अभिरुचि असे. यामुळें त्यांचें आपसांत वैमनस्य वाढून ते एकमेकांचा हेवा करूं लागले. ह्या संस्थानांचा उत्कर्षकाळ ह्मटला ह्मणजे इसवीसनापूर्वीं ४९० वे वर्षीं जी मॅराथॉनची लढाई झाली त्या वेळेपासून, तों शिकंदर बादशाहानें ग्रीस देशावर स्वारी करून तो जिंकल्यापर्यंतचा होय. ह्मणजे सतत दीडशें वर्षेंपर्यंत तीं ऊर्जित दशेंत होतीं. तेवढ्या काळांत त्या देशामध्यें मोठमोठे कवी, नामांकित तत्ववेत्ते आणि वक्ते बरेच होऊन गेले.

ह्या ग्रीक लोकसत्तात्मक राज्यामध्यें प्रत्येक कलेंत पारंगत झालेलें, व विशेषेंकरून वक्तृत्वाविषयीं प्रख्यातीस आलेलें, कायतें एकच अथेन्स नामक संस्थान होतें. अथीनियन लोक फार चतुर, कल्पक, चपळ आणि उल्हासी असून, आपल्या व्यासंगांत नेहमीं निमग्न असत. त्यांच्या

राज्यपद्धतीमध्यें वारंवार आकस्मिक उलाढाली होत असल्या-कारणानें, ते लोक अगदीं चलाख आणि कुशाग्र बुद्धीचे बनून गेले होते. त्यांची राज्यपद्धति सर्वांशीं सामान्यजन-सत्ताक होती. सर्व लोक मिळून राज्याचे कायदे करीत. त्यांच्या राज्यकारभाराच्या सभेंत पांचशें सभासद असत. परंतु कोणत्याही गोष्टीचा अखेर निकाल करणें, तो सर्व लोक एके ठिकाणीं जमवून त्यांच्या मतानुरूप करीत. त्या ठिकाणीं जीं कामें चालत तीं मोठ्या खुबीनें व विचारानें, संभाषणें वगैरे होऊन, लोककल्याण आणि त्यांचे मनोधर्म यांस उद्देशून, चालत असत. कायदेकानू वगैरे सर्व तेथें होई. तह करावयाचा किंवा लढाई करावयाची हें त्या मंडळीच्या विद्यमानें ठरवीत असत. न्यायाधीश नेमावयाचे ते देखील ह्याच मंडळींतून निवडले जात. संस्थानांतील मोठमोठ्या हुद्यांच्या जागा सर्वत्रांस सारख्या देत असत; ह्मणजे अमक्यांनाच त्या द्यावयाच्या व अमक्यांना नाहीं असा द्वैतभाव त्यांच्यांत मुळींच नसे. त्यांच्या वरिष्ठ प्रतीच्या कोर्टांत, अतिशय गरीब आणि हलका जरी उदमी असला तरी त्याला जागा मिळे. अशी एकंदर स्थिति असल्यावर, आपल्या हातीं एक प्रकारचें अधिकारसामर्थ्य असावें, व लोकांवर आपलें चांगलें वजन पडावें, ह्मणून त्या वेळेस वक्तृत्वाचा अभ्यास जारीनें सुरू असेल, हें अगदीं उघड आहे. पण तें वक्तृत्व कोणचें? दिसण्यांत सुरेख आणि भपकेदार असें नव्हे, तर ज्याच्यायोगानें श्रोत्यांचें मनरंजन होऊन, त्यांस स्वपक्षाकडे सहज वळवितां येईल असा अनुभव अगोदर घेतलेला होता, अशा वक्तृत्वाचा अभ्यास ते

लोक फार करूं लागले. कारण त्या वेळीं समाजव्याख्यान देण्यांत आपली पोकळ बडेजाव व्हावी व आपला नांवलौकिक व्हावा असें कोणासही वाटत नसे. सद्गुणी आणि महत्वाकांक्षी लोक, समाजधुरीणत्व आपणाकडे असावें, व आपल्या ह्मणण्याप्रमाणें लोकांनीं चालावें, ह्मणून नेहमीं मोठ्या चढाओढीनें वक्तृत्वगुण संपादण्याची खटपट करीत.

ह्या विद्याचारसंपन्न व पाणीदार राष्ट्रामध्यें सर्व लोकांचें लक्ष प्रत्येक कलेंत जें चांगलें ह्मणून असेल, तें साध्य करून घेण्याकडे लागल्यानें, त्यांच्या अभिरुचीस चांगलें वळण लागून, ती सुधारत चालली असेल असें उघड दिसतें. आतां हें खरें आहे. कीं कांहीं गांवगुंड मंडळी, आपला मोठेपणा व्हावा अशा व्यर्थ आशेनें वाक्पांडित्य करून लोकांच्या डोळ्यांत धूळ घालीत, व अशा प्रकारें त्यांचें मन भलत्या मार्गाकडे वळवीत. अथीनियन लोक जरी कुशाग्र बुद्धीचे होते, तरी ते मोठे दंगेखोर व अविचारी असत. ते अभिनवलोलुप होते, ह्मणजे एखादा अपूर्व प्रकार घडला कीं तो पाहून ते अगदीं लुब्ध होऊन जात. परंतु आपल्या हिताहिताच्या गोष्टीकडे त्यांचें एकदां कां लक्ष लागलें, किंवा आपणावर आलेल्या एखाद्या बिकट प्रसंगासंबंधानें ते विचार करूं लागले, ह्मणजे मात्र हंसक्षीरन्यायानें खरें वक्तृत्व कोणतें व खोटें कोणतें हें ते तेव्हांच पारखून काढीत. डेमॉस्थेनीजच्या सामनेवाल्यांचा पाडाव होऊन, त्याला जय मिळण्याचें कारण तरी हेंच होतें. हा विद्वान वक्ता नेहमीं मुद्यापुरतें बोलत असे. निरर्थक शब्दलाघव तो कधींच करीत नव्हता. त्याचा कोटिक्रम भरदस्त होता; व

लोकांच्या हिताची गोष्ट कोणती हें तो स्पष्टपणें दाखवून देई. संस्थानावर एखादें अरिष्ट आलें असतां, त्या आणीबाणीच्या प्रसंगीं सर्व लोक एकत्र जमून, कोणाचीं मतें काय आहेत तीं कळविण्याचीं सूचना झाली असतां, जर त्या ठिकाणीं कोणीं मिथ्यवाद करणारानें पोकळ बडबड केली, तर खरोखर त्याची नुसती चेरच उडत असे असें नाहीं, तर ती मंडळी अगदीं खवळून जाऊन त्या जल्पकास चांगलें शासन करीत. त्यांच्यांतील मोठमोठे वक्ते देखील बोलायाला उभे राहिले ह्मणजे थरथरां कांपत; कारण आपण जें बोलणार त्यापासून होणाऱ्या परिणामाबद्दल आपण जबाबदार धरले जाऊं, हें ते पूर्णपणें जाणून असत. अथेन्स येथील लोकसत्ताक राज्याला असें कांहीं साहजिक स्वरूप आलें होतें, कीं तें खऱ्या वक्तृत्वाचें अधिष्ठान होऊन बसलें. मोठमोठ्या राजांनीं उदार आश्रय देऊन वक्तृत्वाच्या शाळा आपल्या राज्यांत घालण्याचा पुष्कळ आव आणला, परंतु अथेन्सची बरोबरी त्यांच्यानें करवली नाहीं.

अथीनियन लोक नेहमीं उद्योगांत निमग्न असत. त्यांना लौकिक कृत्यें करण्याची हौस असे. त्यांच्यांत नेहमीं दुफळी माजून तंटेबखेडे होत; यामुळें त्या ठिकाणीं वक्तृत्व गुण आपोआप उत्पन्न होऊन जोरावत चालला. हा गुण संपादन होण्यास एकांत ह्मणजे शांतता, व विचार ह्यांची विशेष जरूरी आहे, असें आपणास वाटतें खरें; परंतु हा समज चुकीचा आहे, हें वरील अथीनियन लोकांच्या उदाहरणावरून कळून येईल.

ग्रीस देशांत पुष्कळ वक्ते होऊन गेले; परंतु त्या सर्वांमध्यें ज्यानें आपली कीर्ति अजरामर करून ठेविली, असा एक डेमॉस्थेनीजच होऊन गेला. त्याचें चरित्र सांगण्यांत आम्ही वेळ घालवीत नाहीं; कारण तें सर्वांस महशूर आहेच. व्याख्यानकलेंत श्रेष्ठत्व मिळविण्याची त्यानें महत्वाकांक्षा मनांत बाळगिली. त्याचे आरंभींचे प्रयत्न निष्फल झाले. त्याच्या शारीरिक व्यंगामुळें व बोलण्यांत उत्पन्न होणाऱ्या अडचणीमुळें होणारे दुष्परिणाम घालविण्यासाठीं त्यानें अश्रांत श्रम केले. मन भलतीकडे जाऊं नये ह्मणून तो एका गुहेंत जाऊन वक्तृत्वाची तालीम करीत असे. मोठ्या समाजांतील गोंगाटापुढें देखील आपलें भाषण स्पष्टपणें ऐकूं जाईल अशा प्रकारचा आपला आवाज करण्याकरितां तो समुद्रकिनाऱ्यावर मोठ्यानें ओरडत बसे; आपला तोतरेपणा घालविण्यासाठीं तोंडांत खडे धरी; आणि बोलतांना खवाटे वर करण्याची त्याला खोड असल्यामुळें ती घालविण्यासाठीं वर एक नागवी तरवार टांगून ठेवी, ती अशा बेतानें कीं खवाटा वर होतांच तिचा अग्रभाग त्यास टोंचून तो शुद्धीवर यावा. ह्या सर्व गोष्टी वाचून वक्तृत्वाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला खरोखर उत्तेजन येणार आहे. कारण जे गुण ईश्वरानें आपल्या अंगीं ठेविले नाहींत, त्यांत आपला चांगला प्रवेश होण्याला कलेचा उपयोग केला असतां किती फायदेशीर होणार आहे, हें त्यास वरील उदाहरणावरून स्पष्ट कळून येईल.

डेमॉस्थेनीजची भाषणपद्धति जोरदार आणि संक्षिप्त असे. परंतु कधीं कधीं त्याचें भाषण त्रोटक, संदर्भरहित

व कठोर असें होई. त्याच्या शब्दांवरून चांगला अर्थबोध होत असे. त्यानें एकदां उच्चारिलेले शब्द वाक्यांत कायम बसून जोरदार असत. त्यानें गायनकलेचा अभ्यास केला होता; असें कित्येक प्राचीन टीकाकार ह्मणत; परंतु जरी तो सुरांत बोलत असे, तरी त्यानें आवर्जून गाण्याचा अभ्यास केला आहे, असें त्याच्या भाषणपद्धतीवरून व्यक्त होत नसे. भाषणास शोभा आणणाऱ्या लहानसहान खुब्यांकडे त्याचें इतकें लक्ष नव्हतें. त्याचें मुख्य धोरण व्याख्यानांत रस ओतून, त्यास प्रौढी आणण्याचें होतें. त्याचे अभिनय आणि वर्णोच्चार विलक्षण उत्साहदर्शक, तीव्र आणि जोरदार होते असें लिहिलेलें आढळतें, व ही गोष्ट खरी असावी असें आह्मांस त्याच्या पदरचनेवरून वाटतें. त्याचे ग्रंथ वाचल्यावर वाचणारास वाटतें कीं तो मोठा निष्ठुर असेल, व त्याचे अंगीं सौम्यता नसावी. प्रत्येक प्रसंगीं तो गंभीर आणि रागीट दिसे. प्रत्येक गोष्टीला तो मोठें स्वरूप देई. तो नेहमीं तोऱ्यांत असे. थट्टामस्करी करून त्यानें आपला गंभीरपणा कधींही घालविला नाहीं. त्याचें भाषण एखादे वेळीं फारच चढत जाऊन नीरस होई, एवढाच कायतो त्याच्या अप्रतिम वाक्चातुर्यामध्यें दोष आढळतो.

डेमॉस्थेनीज मरण पावल्यावर थोड्याच काळांत ग्रीस देशाचें स्वातंत्र्य गेलें, व त्याबरोबर खऱ्या वक्तृत्वाचाही लोप झाला.

येथवर ग्रीक लोकांत वक्तृत्व कसें उदयास आलें व तें कोणत्या स्थितीप्रत पावलें, याविषयीं आह्मीं सांगितलें.

आतां आपण रोमन लोकांकडे थोडेसे वळूं. पुष्कळ वर्षेंपर्यंत हे लोक लढाऊ ह्मणून नांवाजलेले होते. कलाकौशल्याचा त्यांना गंधही नव्हता. त्यांनीं जेव्हां ग्रीस देशावर स्वारी करून तो जिंकिला, तेव्हांपासून मात्र ग्रीक लोकांच्या कला त्यांच्यांत हळूहळू प्रवेश करूं लागल्या. नंतर यांच्यांतदेखील ग्रीक लोकांप्रमाणें बरेच वक्ते झाले. त्यांत सिसेरो नामक वक्ता फारच प्रख्यातीस आला होता. त्याच्या चरित्राची आपल्याला प्रस्तुत फारशी जरूरी नाहीं. फक्त तो कशा प्रकारचा वक्ता होता, त्याच्या भाषणांत गुणावगुण काय होते, याचा मात्र येथें आपल्याला विचार कर्तव्य आहे. त्याच्या व्याख्यानांत घेण्यासारखे पुष्कळ चांगले गुण होते, हें अगदीं निर्विवाद आहे. त्याचीं सर्व व्याख्यानें फारच खुबीदार आहेत. त्याच्या भाषणांचा उपोद्घात फारच सुरेख आणि सुव्यवस्थित असे. लोकांचें मन आकर्षण करून घेण्याची खुबी त्याला चांगली साधली होती. त्याची पद्धत पायाशुद्ध असून, तर्क व प्रमाणेंही फार चांगल्या रीतीनें शिस्तवार दिलेलीं असत. डेमॉस्थेनीजपेक्षांही याची पद्धत जास्त स्पष्ट समजण्यासारखी असे. योग्य ठिकाणीं योग्य कल्पना लढवून तो समर्पक शब्द योजीत असे. लोकांची खात्री करून दिल्याखेरीज त्यांचें चित्त वेधण्याची तो व्यर्थ खटपट कधींही करीत नसे. लोकांच्या मनांत विकार उत्पन्न करण्यामध्यें आणि विशेषेंकरून सौम्य मनोधर्म उत्तेजित करण्यांत त्याचा हातखंडा होता. शब्दांच्या अंगीं काय सामर्थ्य आहे व किती जोर आहे, हें तोच कायतो जाणत असे. तो एकदां शब्दलालित्य करूं

लागला कीं, त्याचें बोलणें मोठ्या थाटाचें आणि शोभिवंत दिसे. त्याची वाक्यरचना अत्यंत चमत्कृतिजनक असून, अगदीं समर्पक असे. त्याचा सांठा भरपूर असल्यामुळें शब्द व कल्पनाप्रवाह एकसारखे वाहून, मागला पुढला संदर्भ कधींही सुटत नसे. प्रत्येक विषय तो गौरवून व मोठ्या थाटानें सांगत असे. त्याच्या भाषणांत बीभत्स रस कधींही सांपडावयाचा नाहीं. त्याची नेहमींची धाटी फैलावून सांगण्याची खरी, तथापि जसा विषय असेल, तसा तो तो कमीजास्त करून सांगे. जेव्हां एखाद्या सार्वजनिक कृत्यासंबंधानें त्यास स्फूर्ति होऊन त्याचें मन खवळून जाई, तेव्हां तो आपलें सांप्रदायिक शिथिल आणि सालंकार भाषण एका बाजूस ठेवून, मोठ्या अवसानानें व जोरानें व्याख्यानाची झोड उडवीत असे. त्याच्या अंगीं असे जरी अत्युत्तम गुण होते, तरी त्याच्यांत दोषही बरेच आढळतात; तेव्हां ते सांगणें अगदीं जरूर आहे. कारण सिसेरोचें वक्तृत्व नमुन्यादाखल जर आपण घेऊं लागलों, तर त्याच्या त्या वक्तृत्वसौंदर्यानें आपण इतके दिपून जाऊं कीं, थोडी नजरचूक झाली पुरे, आपण कांहीं ठिकाणीं अगदीं फसले जाऊं; व असे पुष्कळ लोक फसले गेल्याचें आपण पाहतों. त्याच्या बऱ्याच व्याख्यानांमध्यें, आणि मुख्यत्वेंकरून त्याच्या पूर्ववयांत त्यानें जीं व्याख्यानें दिलीं, त्यांत कृत्रिमपणा फार दिसून येतो; तो इतका कीं, त्या योगानें त्यावर दांभिकपणाचा दोष येऊं पाहतो. त्याच्या भाषणांत फारच थाटमाट दिसून येतो. आपल्या भाषणानें लोकांची खात्री न झाली तरी बेहत्तर, परंतु त्यांना आ-

श्चर्यचकित करून टाकावें असा त्याचा ग्रह झाला असावा असें दिसतें. ह्मणून कित्येक प्रसंगीं त्याचा डौल दृष्टोत्पत्तीस येतो, पण त्यांत तथ्य ह्मणून कांहीं नसतें. तसेंच जी गोष्ट खऱ्या कळकळीनें सांगावयाची, ती एखादे वेळीं तो रेंगाळतरेंगाळत सांगत असे. त्याचें वाक्य पूर्ण असून स्पष्टपणें ऐकूं येई. तो एकाच सुरांत बोलत नसे, त्यामुळें त्याचें बोलणें मोठें कर्णमधुर होई. परंतु त्याचें भाषण फारच डौली असल्यानें त्याचें लोकांवर फारसें वजन पडत नसे.

डेमॉस्थेनीज आणि सिसेरो या दोन विद्वान वक्त्यांच्या गुणावगुणांसंबंधानें पुष्कळांनीं टीका करून त्यांतील विरोध दाखविला आहे. डेमॉस्थेनीजची भाषणपद्धति जोरदार आणि कडक होती; व सिसरोची सौम्य आणि मनोहर होती. एकींत वीरश्रीचा प्रकार फार असे, व दुसरींत अलंकाराचा असे. डेमॉस्थेनीजचें भाषण जरी अंमळ उग्र निघे, तथापि त्यांत आवेश व गांभीर्य जास्त होतें. सिसेरोचें भाषण जरी कर्णप्रिय होतें, तथापि तें घरसोडीचें व कमजोर निघे.

आतां या दोघांमध्यें असा जो फरक आढळतो त्याचें कारण श्रोत्यांची स्थिति व रुचिवैचित्र्य हेंच दिसतें. अथीनियन लोक सुशिक्षित असल्यामुळें त्यांना, डेमॉस्थेनीजचें भाषण जरी संशयछेदक परंतु संक्षिप्त होतें तरी तें सहज पटत असे. परंतु तसें रोमन लोकांचें नसे. त्यांना वक्तृत्वकलेचें ज्ञान फारसें नसल्यानें, व बुद्धीनेंही ते अंमळ कमी चाणाक्ष असल्यामुळें, त्यांना पटेल असें भा-

षण करावयाचें म्हटलें ह्मणजे तें सालंकार आणि लोकप्रिय असेंच असलें पाहिजे होतें. ग्रीक वक्त्याच्या श्रोते मंडळींत नानातऱ्हेचे लोक असत. अथीनियन लोकांची राजकीय कामें देखील समाजाकडून होत असत. किरकोळ मंडळीही त्याचें भाषण ऐकण्यास येत, व त्याच्या गुणाची पारख करणारे तरी अर्थात् तेच होते. रोमन वक्ता सिसेरो याची श्रोतेमंडळी बहुधा अशी नसे. त्याचें व्याख्यान बहुतकरून निवडक व मोठमोठ्या मंडळीपुढें होत असे. तेव्हां ज्या अर्थी अथेन्सच्या साधारण मंडळीपेक्षांही वरील रोमन मंडळी चांगली शिकलेली व मोठ्या हुद्याची होती, त्याअर्थी त्यांच्यासमोर कार्यकारण संबंध दाखवून वाद करतेवेळीं सिसेरोसारख्या वक्त्यास त्यांची समजूत घालण्यासाठीं, किंवा आपलें भाषण गोड वाटण्यासाठीं पाल्हाळिक रीतीनें बोलावें लागत असेल, अशी कल्पनादेखील करवत नाहीं. एकंदरींत सर्वगुणसंपन्न असणें ही मानवी शक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे. ज्या भाषणामध्यें सौम्यता आणि अलंकार यांचें प्राधान्य असतें, त्यांत आवेशातिरेक सांपडण्याची शंकाच आहे. दोन्ही गोष्टींकडे सारखें लक्ष पुरविणें अगदीं असंभाव्य आहे. जास्त अलंकार घालण्याची जेथें बुद्धि झाली, तेथें जोर ह्मणून कांहीं सांपडावयाचा नाहीं. वरील दोन प्रसिद्ध वक्त्यांच्या व्याख्यानशैलींत फरक असण्याचें कारण तरी हेंच असावें असें उघड दिसतें.

रोमन लोकांनीं वक्तृत्वकलेचा उपभोग फार दिवस घेतला नाहीं. सिसेरोच्या पाठीमागें ती अगदींच लयास

गेली. आतां ती लयास गेली, यांत कांहीं नवल नाहीं. कारण तो नाहींसा झाल्यापासून स्वातंत्र्याचाही ऱ्हास होत चालला, इतकेंच नाहीं तर ज्यास जसें वाटेल तसा तो वागूं लागला, व याप्रमाणें जुलमी अम्मल सुरू झाला. अशी स्थिति झाल्यावर अर्थात् रसिकता आणि शहाणपण यांचें कांहींच चालेनासें झालें यांत कांहीं नवल नाहीं.

रोमन राज्यास उतरती कळा लागल्यावर, ख्रिस्ती धर्माचा प्रसार होऊन धर्मोपदेश नांवाचा एक नवीनच वक्तृत्वाचा प्रकार निघाला.

तदनंतर मधल्या काळांत सांगण्यासारखें कांहीं विशेष घडलें नाहीं; ह्मणून त्या काळाचा विचार न करितां आपण प्रस्तुतकाळच्या वक्तृत्वाविषयीं थोडासा विचार करूं. आतां प्रथम हें कबूल केलें पाहिजे कीं, ग्रीक आणि रोमन लोकांच्या वेळीं समाजव्याख्यानाची जी कांहीं चहा होती व त्याचा ते लोक जसा अभ्यास करीत होते, तशी चहा किंवा तसा अभ्यास युरोपांतील एकाही राष्ट्रांत हल्लीं होत नाहीं. वक्तृत्व इतकें नाणावलें नाहीं, व त्याचा परिणामही व्हावा तसा झालेला नाहीं. तथापि धर्मोपदेश हा एक नवीन धंदा निघाला आहे; त्यामुळें वक्तृत्वाला कांहींसें रूप आलें आहे, व धर्मसंबंधानें मात्र लोकांच्या बुद्धींत काहींसा फरक झाला आहे असें दिसतें. फक्त फ्रान्स आणि ग्रेट ब्रिटन या दोन देशांत वक्तृत्वासंबंधानें कांहीं चळवळ आहे. तथापि त्या कलेला अद्याप पूर्वीचें वैभव प्राप्त झालें नाहीं. गद्य आणि पद्य ग्रंथरचनेमध्यें मात्र त्यांनीं ग्रीक व रोमन लोकांची बरोबरी केली आहे; व कांहीं अंशानें त्यांना मागेंही टाकलें

आहे. परंतु डेमॉस्थेनीज व सिसेरो यांच्या तोडीचा वक्ता अद्याप कोणीही निपजला नाहीं.

अद्याप ग्रेटब्रिटनमध्यें वक्तृत्वकलेंत लोकांचें पाऊल पुढें पडलें नाहीं, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. त्यांची बुद्धि व ग्राहकशक्ति वक्तृत्वोपयोगी असूनही अशी शोचनीय स्थिति असणें ही मोठी खेदाची गोष्ट आहे. त्यांची बुद्धि जरी चांगली आहे, तथापि वक्तृत्वासंबंधानें ते ग्रीक व रोमन लोकांच्या पासंगालाही यावयाचे नाहींत, हें उघड आहे; परंतु कांहीं कांहीं गोष्टींत ते फ्रेंच लोकांच्याही मागें आहेत. इतर राष्ट्रांपेक्षां त्यांच्यांत प्रत्येक शास्त्रामध्यें पुष्कळ नामांकित तत्ववेत्ते झाले आहेत. ते रसिक आहेत, विद्वान आहेत, त्यांच्यांत मोठमोठे कवी आणि इतिहासकार झाले आहेत; परंतु खरे वक्ते किंवा समाजव्याख्यानकार त्यांच्यांत किती सांपडतील बरें? त्यांच्या बुद्धिप्रभावाचीं तरी कोणतीं कृत्यें दृष्टोत्पत्तीस येत आहेत? प्रत्येक काळांत एक दोन वक्ते असे होऊन गेले आहेत; परंतु ते पार्लमेंटमध्यें वाद-विवादच करणारे होते, व त्यांनीं जो लौकिक मिळविला तो शहाणपण, व्यवहारपटुत्व व अनुभवजन्यज्ञान यांच्याच साहाय्यानें मिळविला. वाक्चातुर्याचें तें कांहीं फळ नव्हे. उच्च प्रतीचें वक्तृत्व प्राप्त करून घेण्याची ग्रीक आणि रोमन लोकांची खटपट असे, असें आम्हीं पूर्वीं सांगितलेंच आहे. ते जशी खटपट करीत, तशी हल्लींच्या लोकांच्या हातून होत नाहीं. त्यांचें वक्तृत्व जोराचें व खऱ्या कळ-कळीचें होत असे, यामुळें ते आपल्या श्रोत्यांचीं अंतःकरणें खवळवून टाकीत, व त्यांच्या कल्पना वाटेल तिकडे

नेण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य असे. त्यांचे विचार जसे जोरदार असत, तसे अंगविक्षेपही पण होते. अर्वाचीन वक्तृत्व फारच शिथिल आणि निर्जीव आहे. विशेषेंकरून ग्रेटब्रिटनमध्यें तर तें प्रमाणांनीं व विचारांनीं जखडलें जाऊन अगदीं मर्यादित झालें आहे. लोकांच्या मनाची खात्री करून देणें, किंवा कांहीं एक गोष्टीचें वळण लावणें, एवढाच कायतो ब्रिटिश वक्त्यांच्या भाषणाचा उद्देश दिसून येतो. मनोधर्माला किंवा मनोविकाराला उद्देशून त्यांत कांहींएक नसतें. या गोष्टीमुळें त्यांचें वक्तृत्व साधारण सप्रमाण वाद किंवा संभाषण याच्यापलीकडचें नसतें.

आतां अर्वाचीन वक्तृत्व इतकें मर्यादित कां, व त्याचा परिणामही चांगला कां होत नाहीं, याचीं कारणें अनेक आहेत. त्यांपैकीं, तथ्य शोधून काढण्याची अलीकडच्या मंडळीची खटपट हें एक अंशतः तरी कारण असावें असें वाटतें. प्राचीन ग्रीक व रोमन लोक ब्रिटिशलोकांपेक्षां बुद्धीनें श्रेष्ठ होते, हें निर्विवाद आहे; परंतु त्यांच्यांत ब्रिटिश लोकांपेक्षां टापटीप व खोल विचार कमी होता हें खचित. जसजसी जगाची सुधारणा जास्त होत आहे, तसतसें तत्वज्ञान फार वाढत आहे, व यामुळें प्रत्येक विषयामध्यें शहाणपणाचा प्रकार दिसून येत आहे. हल्लींचे लोक वक्तृत्वाच्या झोंकाला भुलून न जाण्याविषयीं काळजी घेत असतात. वक्तृत्वानें आपण फसले जाऊं नये, ह्मणून ते जणूं काय डोळ्यांत तेल घालून बसलेले असतात. लोकांच्या कल्पना आणि मनोवृत्ती उद्दीपित करण्याचा प्रयत्न करण्यास प्राचीन वक्त्यांपेक्षां हल्लींचे थोडें मागें घेतात, व

आहे. परंतु डेमॉस्थेनीज व सिसेरो यांच्या तोडीचा वक्ता अद्याप कोणीही निपजला नाहीं.

अद्याप ग्रेटब्रिटनमध्यें वक्तृत्वकलेंत लोकांचें पाऊल पुढें पडलें नाहीं, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. त्यांची बुद्धि व ग्राहकशक्ति वक्तृत्वोपयोगी असूनही अशी शोचनीय स्थिति असणें ही मोठी खेदाची गोष्ट आहे. त्यांची बुद्धि जरी चांगली आहे, तथापि वक्तृत्वासंबंधानें ते ग्रीक व रोमन लोकांच्या पासंगालाही यावयाचे नाहींत, हें उघड आहे; परंतु कांहीं कांहीं गोष्टींत ते फ्रेंच लोकांच्याही मागें आहेत. इतर राष्ट्रांपेक्षां त्यांच्यांत प्रत्येक शास्त्रामध्यें पुष्कळ नामांकित तत्ववेत्ते झाले आहेत. ते रसिक आहेत, विद्वान आहेत, त्यांच्यांत मोठमोठे कवी आणि इतिहासकार झाले आहेत; परंतु खरे वक्ते किंवा समाजव्याख्यानकार त्यांच्यांत किती सांपडतील बरें? त्यांच्या बुद्धिप्रभावाचीं तरी कोणतीं कृत्यें दृष्टोत्पत्तीस येत आहेत? प्रत्येक काळांत एक दोन वक्ते असे होऊन गेले आहेत; परंतु ते पार्लमेंटमध्यें वादविवादच करणार होते, व त्यांनीं जो लौकिक मिळविला तो शहाणपण, व्यवहारपटुत्व व अनुभवजन्यज्ञान यांच्याच साहाय्यानें मिळविला. वाक्चातुर्याचें तें कांहीं फळ नव्हे. उच्च प्रतीचें वक्तृत्व प्राप्त करून घेण्याची ग्रीक आणि रोमन लोकांची खटपट असे, असें आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे. ते जशी खटपट करीत, तशी हल्लींच्या लोकांच्या हातून होत नाहीं. त्यांचें वक्तृत्व जोराचें व खऱ्या कळकळीचें होत असे, यामुळें ते आपल्या श्रोत्यांचीं अंतःकरणें खवळवून टाकीत, व त्यांच्या कल्पना वाटेल तिकडे

नेण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य असे. त्यांचे विचार जसे जोरदार असत, तसे अंगविक्षेपही पण होते. अर्वाचीन वक्तृत्व फारच शिथिल आणि निर्जीव आहे. विशेषेंकरून ग्रेटब्रिटनमध्यें तर तें प्रमाणांनीं व विचारांनीं जखडलें जाऊन अगदीं मर्यादित झालें आहे. लोकांच्या मनाची खात्री करून देणें, किंवा कांहीं एक गोष्टीचें वळण लावणें, एवढाच कायतो ब्रिटिश वक्त्यांच्या भाषणाचा उद्देश दिसून येतो. मनोधर्माला किंवा मनोविकाराला उद्देशून त्यांत कांहींएक नसतें. या गोष्टीमुळें त्यांचें वक्तृत्व साधारण सप्रमाण वाद किंवा संभाषण याच्यापलीकडचें नसतें.

आतां अर्वाचीन वक्तृत्व इतकें मर्यादित कां, व त्याचा परिणामही चांगला कां होत नाहीं, याचीं कारणें अनेक आहेत. त्यांपैकीं, तथ्य शोधून काढण्याची अलीकडच्या मंडळीची खटपट हें एक अंशतः तरी कारण असावें असें वाटतें. प्राचीन ग्रीक व रोमन लोक ब्रिटिशलोकांपेक्षां बुद्धीनें श्रेष्ठ होते, हें निर्विवाद आहे; परंतु त्यांच्यांत ब्रिटिश लोकांपेक्षां टापटीप व खोल विचार कमी होता हें खचित. जसजसी जगाची सुधारणा जास्त होत आहे, तसतसें तत्वज्ञान फार वाढत आहे, व यामुळें प्रत्येक विषयामध्यें शहाणपणाचा प्रकार दिसून येत आहे. हल्लींचे लोक वक्तृत्वाच्या झोंकाला भुलून न जाण्याविषयीं काळजी घेत असतात. वक्तृत्वानें आपण फसले जाऊं नये, ह्मणून ते जणूं काय डोळ्यांत तेल घालून बसलेले असतात. लोकांच्या कल्पना आणि मनोवृत्ती उद्दीपित करण्याचा प्रयत्न करण्यास प्राचीन वक्त्यांपेक्षां हल्लींचे थोडें मागें घेतात, व

लोकरुचिही तशीच असल्यामुळें त्यांची वक्तृत्वशक्ति फारच क्षीण होते. तिच्यांत तरतरी राहत नाहीं. आतां आह्मांला खऱ्या रीतीनें आणि शहाणपणानें चालावयाचें आहे, ह्मणून आह्मांला प्राचीन लोकांचें गौरवयुक्त मनमोहक वक्तृत्व नको असें सांगण्यांत येतें, तें उगीच आहे. वास्तविक पाहिलें तर जात्याच त्यांच्या अंगीं शैथिल्य आहे, तेव्हां त्यांच्या अंगीं प्राचीन लोकांची ती खुबी कोठून येणार ?

इंग्लंडांत समाजव्याख्यान देण्याचीं तीन स्थानें आहेत, तेथील कांहीं विशेष गोष्टींच्या योगानें वक्तृत्वामध्यें लोकांचें पाऊल पुढें पडत नाहीं. वक्त्यास आपलें सामर्थ्य दाखविण्याला पार्लमेंटपेक्षां दुसरें मोठें स्थानच नाहीं. ही गोष्ट जरी खरी आहे, तथापि ग्रीक व रोमन लोकसमाजापुढें तेथील वक्त्यांचें जसें तेज पडत होतें, तसें येथें पडत नाहीं. कारण पूर्वींच्या कारकिर्दींत राजसत्ता हीच प्रबळ होऊन बसली होती; परंतु हल्लींच्या काळीं राज्याचें नियंतृत्व प्रधानमंडळाच्या स्वाधीन असल्यामुळें त्यांचेंच स्वामित्व जास्त आहे. तेव्हां या दोहोंवरही तेज पाडण्यापुरतें सामर्थ्य वक्तृत्वाच्या ठिकाणीं अद्याप आलें नाहीं, आणि ह्मणूनच त्याचा कोणी मोठ्या कळकळीनें अभ्यास करीत नाहीं.

न्यायाची रीत प्राचीन काळच्यासारखी नाहीं. त्या लोकांत न्यायाधीश बहुशः पुष्कळ असत. कायदे फार थोडे व साधे होते, आणि प्रकरणाचा निकाल पुष्कळ अंशीं समतेनें व धोरणानें असे. ह्यामुळें त्या वेळीं न्यायासंबंधीं वक्तृत्वाला वाटेल तितकी सवड होती. परंतु हल्लीं या बाबतींत जमीनअस्मानाचा फरक झाला आहे. न्यायपद्धतींत अगदीं गुंता-

गुंत होऊन गेली आहे, यामुळें कायद्याचें ज्ञान प्राप्त करून घेणें इतकें कांहीं कष्टसाध्य होऊन गेलें आहे कीं त्यांत सर्व आयुष्य घालवावें लागतें. वकिलाची मुख्य विद्या ह्मणजे कायद्याचें ज्ञान, असें होऊन गेलें आहे. वक्तृत्वकला या ज्ञानापेक्षां कमी महत्वाची गणली जात आहे, ह्मणून तिच्याकडे द्यावा तितका वेळ दिला जात नाहीं, व ती प्राप्त करून घेण्यांत व्हावी तितकी मेहनतही होत नाहीं. न्यायप्रकरणीं वक्तृत्व अगदीं संपुष्टांत आलें आहे. कांहीं प्रसंग खेरीज करून बाकीच्या ठिकाणीं वक्तृत्व ह्मणजे, कायदेकानू व पूर्वदृष्टांत यांस धरून सप्रमाण वाद करणें हेंच होय, असा समज झाला आहे. यावरून एकंदरींत असें निघतें कीं वक्तृत्वापेक्षां कायद्याच्या ज्ञानाचीच अलीकडील लोकांस विशेष जरूरी आहे.

धर्मपर व्याख्यानें प्रथम पाठ करून आयत्या वेळीं आठवतील तशीं न सांगतां, तीं लिहून लोकांपुढें जशींच्या तशीं वाचून दाखविण्याची जी इंग्लंडांत चाल पडली आहे, ती वक्तृत्वास फार हानिकारक आहे. ह्या चालीमुळें वक्तृत्वाची पायमल्ली झाली इतकेंच नव्हे, तर त्याचें असें रेंरें करीत चाललेलें भाषण ऐकण्याची लोकांस संवय झाल्यामुळें, तशाच मासल्याची रडकी भाषणपद्धति लोकांत सुरू झाली आहे.

डीक्विन्सी यानें आपल्या एका निबंधांत प्राचीन व अर्वाचीन वक्तृत्वांत जो फरक दिसतो त्यासंबंधानें टीका केली आहे; त्याचीं कारणें दाखवितांना पार्लमेंटांतील व्याख्यानासंबंधानें त्यानें लिहिलें आहे तें येणेंप्रमाणें:—‘ अलंकारशास्त्राचें आतां पुनरुज्जीवन कधींही व्हावयाचें

नाहीं. याला कारण आपलें व्यवसायव्यापृतत्व, ह्मणजे अत्यंत भानगडींचीं हजारों लौकिक कृत्यें आपणांस करावीं लागतात हें, होय. समाजस्थिति बदलत चालल्यामुळें जसा साहित्यशास्त्राचा बींमोड होत चालला, तशाच रीतीनें पार्लमेंटमधील किंवा न्यायसभेंतील वक्तृत्वाचाही ऱ्हास होऊं लागला आहे. प्राचीन लोकांच्या प्रजासत्ताक राज्यांत अर्थशास्त्र अगदीं साधें होतें. त्याचप्रमाणें त्यांचा व्यापारही बेताबाताचा होता. त्यांचीं लढाईचीं व मुलकी किंवा जनव्यवहारपद्धतीचीं तत्वें फार उघड व आटोक्यांतलीं होतीं. याचें कारण त्यांची गृहस्थितिच तशी होती. त्यांच्या गरजा फारच थोड्या असत. पुष्कळ लोकांस स्वाभाविकपणें लागणाऱ्या वस्तूंहून इतर वस्तूंची अपेक्षाच वाटत नसे. यामुळें राज्यकारभार करण्यांत किंवा लढाई करण्यांत अगर स्वस्थ चैनीनें बसण्यांत त्यांचा एकदां लय लागला ह्मणजे त्या नादीं ते लागत. ऐन भरभराटीच्या काळांत रोमन लोकांस इतर राष्ट्रांकडून खंडणी मिळत असे, व काबीज केलेल्या देशांच्या जिवावर ते चैनींत असत. अशा प्रकारें परपुष्ट झाल्यावर मग हल्लींच्या काळच्या युरोपियन राष्ट्राप्रमाणें देशांत द्रव्योपार्जनाचीं साधनें व युक्ती काढून देश धनसंपन्न करून घेण्याची त्या प्राचीन रोमन लोकांना कांहींच जरूरी वाटली नाहीं.'

'अथीनियन लोकांचे व्याख्यानविषय म्हटले म्हणजे तह किंवा लढाई, लोकांस केलेल्या पीडेबद्दल एखाद्याचा सूड उगविणें, शरणागतास अभय देणें, त्याचप्रमाणें राष्ट्राची

इभ्रत व राष्ट्रीय कृतज्ञता, वैभव, अपकीर्ति, एकंदरींत मनुष्याच्या अंगच्या बुद्ध्यंकुरास उद्देशून बोलण्यासारखे जे विषय असतील, त्यांवर त्यांचीं व्याख्यानें चालावयाचीं. आतां इंग्लिश पार्लमेंटकडे पहा, त्याला बहुतांशीं सार्वजनिक स्वरूप असल्यामुळें, त्या ठिकाणीं वादाचे विषय म्हटले म्हणजे एखाद्या रस्त्यासंबंधाचें बिल, किंवा एका ग्यास कंपनीला दुसऱ्या तसल्या कंपनीपेक्षां कांहीं जास्त हक्क मिळण्याविषयींचें बिल, एखाद्या खेड्यांतील लोकांचे हक्क त्यांच्या दुर्वर्तनामुळें काढून घेणें, जमाबंदीच्या खर्ड्याचा मसुदा अमुक एका तऱ्हेचा असावा, वगैरे निरनिराळ्या संबंधाचे विषय तेथें निघत असतात. अशा किरकोळ गोष्टींमुळें लौकिक कृत्यांला गौणत्व आलें आहे. अदालती वक्तृत्वाचा तरी असाच मासला आहे. ग्रीक आणि रोमन लोक कायद्याच्या विषयावर वाद करतांनां फक्त न्यायाच्या मूलतत्वांचाच विचार करीत. तीं तत्वें इतकीं उघड आणि स्पष्ट होतीं कीं एखाद्या अडाणी मनुष्याला देखील तीं समजतील. वादविवादही मोठ्या कडाक्यानें चालत असे. ब्रिटिश लोकांची तऱ्हा फारच निराळी झाली आहे. जर कोणी म्हणेल कीं मी सरळ रीतीनें आणि जोरानें वादविवाद करून खटला जिंकीन, तर तसें होणें अशक्य आहे. कारण इंग्रजी कायद्यांत पारिभाषिक शब्द वगैरे फार झाल्यामुळें, त्यांचें ज्ञान ज्यास पूर्णपणें झालें असेल, व खटल्यांतील भानगडीच्या गोष्टींचा जो बारकाईनें विचार करणारा असेल, अशाच वकिलाला यश मिळण्याचा संभव आहे.'

## परिशिष्ट अ.

वक्ता होण्यास कोणत्या गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे याविषयीं लॉर्ड ब्रोह्याम यांनीं प्रसिद्ध ग्रंथकार लॉर्ड मेकॉले यांच्या वडिलांस पत्रद्वारें केलेल्या सूचनाः—

**मत्प्रिय मित्रा,**—आज तुम्हांला पत्र लिहिण्यांत माझा मुख्य हेतु इतकाच आहे कीं, तुमचा मुलगा केंब्रिज येथील विद्यालयांत शिकत आहे, त्याच्यासंबंधानें लॉर्ड ग्रे यांचें माझ्याशीं जें बोलणें झालें, त्यांत त्यांनीं तुमच्या मुलाची फारच तारीफ केली, तो मजकूर तुम्हांस कळवून कांहीं गोष्टी सुचवाव्या असें माझ्या मनांत आलें आहे.

त्यांनीं आपल्या स्वतःच्या मुलावरून तुमच्या मुलाची परीक्षा केली; तरी पण त्याच्याविषयीं मला स्वतःला जी माहिती आहे व दुसरीकडूनही जी मिळाली आहे, तीवरून मी खचित सांगतों कीं तुमच्या मुलाविषयीं लॉर्ड ग्रे यांचें झालेलें मत कांहीं चुकीचें नाहीं. तुम्ही त्याला आतां अर्थात् वकील करालच. त्याच्याही मनांतून तोच धंदा करावयाचा असेल. तेव्हां प्रसंगविशेषीं त्या धंद्यांत लागणाऱ्या लोकव्यवहाराच्या गोष्टीही त्याला शिकणें जरूर आहे, असें धरून, ज्या एकदोन गोष्टी मला स्वानुभवावरून कळल्या आहेत, व ज्या दुसऱ्याच्या अनुभवावरून पूर्ववयांतच आपल्याला माहीत व्हाव्या म्हणून मीं पुष्कळ परिश्रम केले असते, त्यासंबंधानें तुम्हांला एक दोन ढोबळ्या वाईट सूचना कराव्या, म्हणजे तुम्ही त्या त्याच्या मनांत चांगल्या रीतीनें ठसवून द्याल असें मला वाटत आहे.

सर्वगुणसंपन्न होण्याला अगोदर पूर्ववयांत सर्व प्रकारचें ठोकळ ज्ञान मिळविण्याची खटपट केली पाहिजे, हें तुमच्या मुलाला माहीत आहेच. कदाचित् त्याला हें माहीत नसेल कीं, कोणत्याही धंद्यांत पारंगत होण्याला अगोदर हलक्या-सलक्या काबाडकष्टाच्या कामामध्यें राबावें लागतें. वकी-लाच्या हाताखालीं एक वर्ष कामकाज केल्यापासून होणारा फायदा मनांत आणला असतां, उमेदवारी करणें म्हणजे मोठें काबाडकष्टाचें व वाईट काम आहे असें मला वाटत नाहीं. परंतु जो बहुश्रुत आहे, व ज्याला प्राचीन ग्रंथासं-बंधी बरेंच ज्ञान झालें आहे तो असे काबाडकष्ट करा-वयला कधींही धजणार नाहीं. तशा त्या भिकारी कामापा-सून तो नेहमीं अलग राहील, व त्यांतून तो एकदां सुटला म्हणजे पुढें खरोखर तो उदयास येणार आहे. परंतु समाजव्याख्यानाचा गुण सुदैवानें तुमच्या मुलाच्या अंगीं असल्यानें, मला त्यास मुख्यत्वेंकरून एक गोष्ट सांगा-वीशी वाटते, ती ही कीं, जेणेंकरून त्या कलेच्या शिख-राला तो जाऊन पोंहोंचेल, अशा रीतीनें त्यानें आपला गुण वाढवीत गेलें पाहिजे. एवढ्याकरितां दोन गोष्टींकडे त्यानें लक्ष पोंहोंचवावें. यासंबंधानें मी जें कांहीं सांगत आहें, तें स्वानुभवावरून व निरीक्षणावरून आहे.

पहिली गोष्ट अशी कीं, ही कला मूळ शिकण्यास आरंभ करणें म्हणजे प्रथम सोपें व सरळ बोलावयाला शिकावें. मूल प्रथम थोडेथोडे व सोपे शब्द तोंडांतून काढायला शिकलें, म्हणजे पुढें जसें व्याकरणशुद्ध बोल-ण्यास त्याला सहज शिकतां येतें, तद्वत् उमेदवार वक्ता

पहिल्यानें सोपें बोलायाला शिकला, ह्मणजे मग त्यास चांगलें वक्तृत्व करतां येईल. अशा रीतीनें पाया बांधून, नंतर त्यावर वक्तृत्वाची इमारत रचली पाहिजे. ही संवय तरुण वयांतच संपादन केली पाहिजे. याकरितां तुम्ही आपल्या मुलाला ही संवय अगोदर लावा. आतां असें करण्यांत त्याच्या कांहीं चुका होतील; तथापि त्या दुरुस्त होण्यासाठीं सोपें लिहिण्याची, मंडळींत पुष्कळ बोलण्याची, व वादविवाद करण्याची त्यानें संवय ठेविली पाहिजे.

अशा रीतीनें सोपें बोलतां आणि लिहितां आलें म्हणजे मग साधें व्याख्यान देण्याचा त्यानें प्रघात ठेवावा. या ठिकाणीं त्यानें एक महत्वाचा नियम ध्यानांत ठेविला पाहिजे, तो असा कीं, त्यानें अहोरात्र आपल्या नजरेपुढें ग्रीक वक्त्यांचें उदाहरण ठेविलें पाहिजे. हल्लींच्या काळचे वक्ते कसें बोलतात तेंहीं पाहत जावें, व त्यांचीं व्याख्यानेंही वाचावीं.

सहज रीतीनें सोपें बोलण्याची संवय लागेपर्यंत, अगोदर कांहींएक न लिहितां बोलणें, हें जरी चांगलें आहे, तरी ती संवय लागल्यावर त्या मनुष्यास लिहावेंसें वाटणार नाहीं. कारण तें काम फार त्रासदायक असतें. परंतु पूर्ण वक्तृत्वाचा गुण अंगीं येण्याला व्याख्यान लिहून काढण्याची संवय अत्यावश्य आहे. फार तर काय, पण व्याख्यानांतील उत्तम उत्तम भाग वक्त्यानें जर अक्षरशः अगोदर तयार करून ठेवण्याचा जन्मभर प्रघात ठेविला, तर खरोखर तो जाडा वक्ता होईल, व स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घेणाऱ्या देशांतील लोकांचें कल्याण करण्याचें सामर्थ्य

त्याच्या अंगीं येईल यांत संशय नाहीं. यास्तव अशा प्रकारचा वक्ता बनण्याची ज्याची इच्छा असेल, त्यानें हे वरील नियम पाळलेच पाहिजेत. आपला,

(सही) एच. ग्रोह्याम.

## परिशिष्ट ब.

**उघड्या हवेंत बोलणें.**—याला फारसें शिरा ताणण्याचें कारण नाहीं. ओरडून बोलल्यानें वक्त्याला फार त्रास होतो; शिवाय आपल्या भाषणापासून जो परिणाम व्हावा अशी त्याची इच्छा असते, तो परिणामही होत नाहीं. तेव्हां उघड्या हवेंत चांगलें बोलतां येण्यास वक्तृत्वकलेच्या मूलतत्वांची वक्त्यास चांगली माहिती असून, शिवाय खालील नियम त्यानें पाळिले पाहिजेत:—

बोलण्याला आरंभ करण्यापूर्वी फुफ्फुस हवेनें पूर्ण भरून ठेवावे; आणि श्वास घेणें तो नाकपुड्यांतून वायुमार्गानें फुफ्फुसांत जाईल अशा प्रकारें घेत जावा. असें केलें असतां, तोंड उघडतांनां फारशी हवा खर्चिली जात नाहीं; आणि बोलण्यांत योग्य ठिकाणीं थांबलें असतां, त्या योगानें फुफ्फुसांत हवेची जास्त भर पडून, उच्छ्वासानें बाहेर निघालेल्या हवेच्या ठिकाणीं ताजी हवा शिरते. साधारण दिवाणखान्यांत व्याख्यान देतांनां जितकें तोंड उघडावें लागतें, त्यापेक्षां कांहीं जास्त मोकळ्या हवेंत उघडीत जावें, आणि शब्दांतील प्रत्येक स्वरावर जास्त जोर देत

जावें. आणखी ज्या इंद्रियांच्या योगानें स्पष्टोच्चार होऊन तोंडांतून शब्द बाहेर निघतात, त्यांवर चांगला जोर द्यावा. कंठनालाचे किंवा नरड्याचे आघात आणि प्रत्याघात नीट रीतीनें होऊं द्यावे, ह्मणजे ज्या तोलावर चांगलें बोलणें किंवा वाचणें अवलंबून असतें, तो महत्वाचा तोल संभाळिला जातो.

वरील नियम पाळले तर खरोखर साधारण शक्तीचा जरी मनुष्य असला, तरी उघड्या हवेंतील त्याचें व्याख्यान लोकांस जितकें चांगलें ऐकूं जाईल, तितकें एखाद्या सुदृढ परंतु वरील नियम ज्यास माहीत नाहींत अशा मनुष्याचें ऐकूं जाणार नाहीं. तो अजाण मनुष्य केवळ ओरडून कांहीं तरी गोंगाट करतो आहे असें वाटेल, व त्याचें उच्चार स्पष्टपणें ऐकूं येणार नाहींत.

वक्त्याचा आवाज, जमीनीचा पृष्ठभाग व हवेची स्थिति यांच्या मानानें मोकळ्या हवेंतील व्याख्यानें कमीजास्त लांब ऐकूं जातात. आयर्व्हिंग नांवाच्या एका पाद्रीसाहेबांचें व्याख्यान अर्ध्या मैलावरून ऐकूं आलें होतें, असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. रसेल नामक एका गृहस्थाचें भाषण तर एक मैलपर्यंत ऐकूं गेलें. त्यावर कडी डा. ब्लॅकच्या व्याख्यानाची आहे. हे साहेब एका टेंकडीवरील तंबूंत उभे राहून बोलत असतां, त्यांच्या व्याख्यानाचा कांहीं भाग एका इसमानें दोन मैल अंतरावरून स्पष्टपणें ऐकिला.

## परिशिष्ट क.

**वादविवाद करणाऱ्या मंडळीचे नियम.**—साधारण सभांतून कामाची व्यवस्था येणेंप्रमाणें असावी:—

१ सभेनें प्रथम एक अध्यक्ष नेमावा. नंतर मागील सभेनें केलेल्या कामाचें संक्षिप्त टांचण चिटणिसानें वाचावें. तीं कामें कायम केलीं ह्मणजे मग जो कोणी वाद करण्यास उभा राहणारा असेल, त्याला अध्यक्षानें बोलण्याची परवानगी द्यावी. त्याचें व तत्पक्षीय लोकांचें बोलणें झाल्यावर सभेंतील कोणत्याही सभासदानें बोलण्यास उठावें. सभेचें काम आटोपण्याची वेळ जवळ जवळ आली ह्मणजे, विषयास ज्यानें मूळ आरंभ केला असेल, त्याला प्रत्युत्तर देणें असल्यास तें देण्यास सांगावें. नंतर एखादा ठराव पास करणें असेल तर त्याबद्दलचा प्रश्न अध्यक्षानें सभेपुढें ठेवावा, व सभासदांनीं आपलीं मतें हस्तविक्षेपानें द्यावीं. शेवटीं अध्यक्षानें पुढील सभेकरितां विषय नेमावा.

२ कोणाही मनुष्यास दोनदां बोलण्याची परवानगी नसावी. फक्त प्रारंभ करणारास प्रत्युत्तरदाखल बोलण्याची, व इतरांस स्पष्टीकरणार्थ बोलण्याची परवानगी असावी.

३ अध्यक्षास आसनावर बसून बोलूं देऊं नये, आणि दोहों पक्षांकडील मतांची संख्या सारखी असल्यास अध्यक्षानें निर्णायक मत ( कास्टिंग व्होट ) द्यावें

४ कोणताही प्रश्न तहकूब ठेवतां येतो; व पुढें, ज्यानें तो तहकूब ठेविला असेल त्यानें किंवा तत्पक्षीयानें पुनः तो वाटाघाट करण्यास सभेपुढें काढावा.

कांहीं वादविवाद करणाऱ्या मंडळ्यांमध्यें अशी चाल असते कीं, सभासदाचें बोलणें कांहीं एक विवक्षित काळ पर्यंत—समजा दहा मिनिटें—व्हावें, व विषयास आरंभ करणाराचें पंधरा मिनिटें व्हावें. ही पद्धत खरोखर चांगली आहे.

समाप्त.

# ग्रंथसंपादक व प्रकाशक मंडळी–बडोदें.

## मंडळीचे नियम.

( १ ) लोकोपयोगी विषयांवर ग्रंथ तयार करविणें, व चांगल्या ग्रंथकारांनीं लिहिलेले ऐतिहासिक, शास्त्रीय, तात्विक विषयांवरील ग्रंथ, त्यांस योग्य मोबदला देऊन हक्कांसुद्धां त्यांजपासून विकत घेणें, व छापून प्रसिद्ध करणें.

( २ ) मंडळीनें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांचा सर्वत्र प्रसार व्हावा, व लोकांस अल्प किंमतींत त्यांचा लाभ घेतां यावा, ह्मणून ग्रंथांची किंमत होईल तितकी कमी (ह्मणजे इंग्लिश साइझच्या आठ पृष्ठांस अर्ध्या आण्यापेक्षां जास्त नाहीं इतकी ) ठेवणें.

( ३ ) या कृत्यास मदतीदाखल शंभर किंवा त्यापेक्षां अधिक रक्कम देणारे गृहस्थ या संस्थेचे हितचिंतक गणणें, त्यांस या मंडळीच्या देखरेखीखालीं जितके ग्रंथ निघतील, त्यांच्या लागतील तितक्या प्रती कायमच्या वर्गणीदाराच्या भावानें देणें.

( ४ ) ह्या उद्योगांत जो फायदा राहील त्यांतील निम्मा भाग चांगल्या ग्रंथकारांच्या ग्रंथांस उत्तेजन देण्याकरितां वेगळा राखून ठेवणें व निम्मा भाग भांडवलांत जमा करणें.

( ५ ) ग्रंथांची निवड करणें, आलेल्या ग्रंथांचें परीक्षण करणें, चांगल्या ग्रंथकारांस उत्तेजन देणें, उपयुक्त ग्रंथांचें भाषांतर करविणें वगैरे व्यवस्था खालीं लिहिलेल्या मंडळीच्या विचारानें व देखरेखीखालीं होईल.

## अध्यक्ष.

श्रीमंत रा. ब. संपतराव गायकवाड.

एफ. आर. एस. एल., व एफ. आर. जी. एस., बॅरिस्टर-ॲट-लॉ.

## सभासद.

रा. ब. रघुनाथ महादेव केळकर.
रा. सा. शंकर मोरो रानडे, बी. ए.
रा. सा. महादेव राजाराम बोडस, एम.ए.,एलएल.बी.
रा.ब.डा.कृष्णराव विनायक धुरंधर,एल.एम्.ॲण्ड एस.
रा. सा. बाळाजीराव जाधव, बी. ए., बी. एल्.
प्रो. भास्कर रामचंद्र आर्ते, एम. ए.
प्रो. पांडुरंग भिकाजी नाईक, बी. ए.
डा. रामचंद्र नारायण जाधव, एल. एम. ॲण्ड एस.
रा. सा. नानासाहेब शिंदे, बॅरिस्टर-ॲट-लॉ.
रा. सा. नारायण महादेव समर्थ, बी. ए., एलएल. बी.
रा. सा. हरी बाळकृष्ण तळवलकर, बी.ए.,एलएल.बी.
रा. सा. शंकर विष्णु पुराणिक, बी. ए.
डा. गंगाधर बाळकृष्ण परांजपे, एल. एम. ॲण्ड एस.
रा. सा. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.
रा. सा. रामचंद्र आबाजी राजे.
रा. सा. नागेश विनायक बापट.
रा. सा. भानु केशव गांगनाईक.
रा. रा. मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए.
रा. रा. शंकर विठ्ठल कदम कातरणीकर, बी. ए.
रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे.

### परीक्षक मंडळीचे चिटणीस.

रा. सा. शंकर मोरो रानडे, बी. ए.
रा. रा. मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए.
रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे.